
- होनाजी बाळा
- सगनभाऊ
- अनंतफंदी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. १०३४८

# शाहिरांतील लावण्या



य. न. केळकर

REFBK-0009124
REFBK-0009124

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम २९११८ वि. ०३१०५
क्रमांक ......१३७८..... नों: दि: ३०/११/४८

# अंधारांतील लावण्या

( होनाजी बाळा, सगनभाऊ, बाळा बहिरू, गंगू हैबती, अनंत फंदी या सुप्रसिद्ध व इतर कांहीं शाहीरांच्या अप्रकाशित लावण्यांचा संग्रह )

२९११८ ०३१०५
३०/११/४८

REFBK-0009124

संशोधक व संपादक
य. न. केळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १२७

किंमत चार रुपये

# प्रस्तावना

इतिहाससंशोधनाच्या उद्योगांतील माझा प्रवेश प्रथम ऐतिहासिक पोवाड्यांच्या अभ्यासानें सुरू झाला. *Follow the River and you will find the sea* असाच तो प्रकार झाला. शाहिरी वाङ्मयाच्या नदीच्या कांठानें जातां जातां मी अखेर इतिहाससंशोधनाच्या समुद्राप्रत पोहोचलों. ऐतिहासिक पोवाड्यांतील विधानांना किंवा त्यांतील घटनांना समकालीन अस्सल ऐतिहासिक पत्रांचे प्रत्यंतर-पुरावे देण्यासाठीं म्हणून मला ऐतिहासिक साधन-ग्रंथ वाचावे लागले. त्यांतूनच इतिहासाची गोडी लागली आणि पुढें त्याच हव्यासानें स्वतः संशोधन करून ऐतिहासिक कागदपत्रें व जुनें हस्तलिखित काव्यादिक वाङ्मय मी संग्राहित करूं लागलों.

'पोवाडे' हा वस्तुतः लावणी वाङ्मयाचाच एक पोटविभाग आहे. अर्थात् संशोधनांतहि लावण्याच अधिक मिळत. त्या मानानें पोवाडे फारच थोडे असत. गेल्या तीस वर्षांत 'पिपीलिका' न्यायानें मिळतील त्या लावण्या-पोवाड्यांचा संग्रह मी करीत गेलों. त्यांपैकीं पोवाड्यांचे दोन खंड मी 'सटीक' छापून प्रसिद्ध करूं शकलों. अद्याप तिसरा शेवटचा खंड छापावयाचा राहिलाच आहे. अशा स्थितींत माझ्या संग्रहांतील लावण्या छापून निघण्याची शक्यता मला न वाटली, तर त्यांत आश्चर्य नाहीं. वास्तविक शाहिरी वाङ्मयाच्या अभ्यासाची पूर्तता 'लावणी' वाङ्मयाच्या अभ्यासाखेरीज होतच नाहीं. पोवाडा राजकीय दृष्टीनें महत्त्वाचा असला, तर लावणी ही सामाजिक दृष्ट्या तितकीच महत्त्वाची असते. यामुळें गतकालचा इतिहास साग्र समजावून घेण्यासाठीं पोवाड्याइतकेंच लावण्यांचेंहि अध्ययन आवश्यक होय. हा मुद्दा मी माझ्या 'ऐतिहासिक पोवाडे, खंड १' च्या प्रस्तावनेंत विस्तारानें मांडलेलाहि आहे. असें असतां मजजवळील 'लावणी-संग्रह' छापून काढण्याची उबळ इतके दिवस मी थोपवून धरली. याचें मुख्य कारण हें कीं, या लावणी-वाङ्मयांत अतिरिक्त श्रृंगाराचा चिखल फारच असतो; आणि त्यामुळें या काव्यप्रकारांत काव्यगुण व इतर उपयुक्त ऐतिहासिक सामुग्री कितीहि असली, तरी त्यांत शिरून अंगावर त्या चिखलाचे शिंतोडे उडवून घेण्यास तितकेसें प्रशस्त वाटेना. आतां कदाचित् स्वतःचें नांव प्रसिद्ध न करतां माझा लावणीसंग्रह एखाद्या फूटपाथवर विकल्या जाणाऱ्या लावणी-पुस्तकांच्या प्रकाशकास देऊन टाकून तो

प्रकाशक
ग. ल. ठोकळ,
ठोकळ प्रकाशन,
६२ बुधवार, पुणें २

पहिली आवृत्ति १९५६

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए.
आनंद मुद्रणालय,
१९६।४६ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रस्तावना

इतिहाससंशोधनाच्या उद्योगांतील माझा प्रवेश प्रथम ऐतिहासिक पोवाड्यांच्या अभ्यासानें सुरू झाला. *Follow the River and you will find the sea* असाच तो प्रकार झाला. शाहिरी वाङ्मयाच्या नदीच्या कांठानें जातां जातां मी अखेर इतिहाससंशोधनाच्या समुद्राप्रत पोहोचलों. ऐतिहासिक पोवाड्यांतील विधानांना किंवा त्यांतील घटनांना समकालीन अस्सल ऐतिहासिक पत्रांचे प्रत्यंतर-पुरावे देण्यासाठीं म्हणून मला ऐतिहासिक साधन-ग्रंथ वाचावे लागले. त्यांतूनच इतिहासाची गोडी लागली आणि पुढें त्याच हव्यासानें स्वतः संशोधन करून ऐतिहासिक कागद-पत्रें व जुनें हस्तलिखित काव्यादिक वाङ्मय मी संग्राहित करूं लागलों.

'पोवाडे' हा वस्तुतः लावणी वाङ्मयाचाच एक पोटविभाग आहे. अर्थात् संशोधनांतहि लावण्याच अधिक मिळत. त्या मानानें पोवाडे फारच थोडे असत. गेल्या तीस वर्षांत 'पिपीलिका' न्यायानें मिळतील त्या लावण्या-पोवाड्यांचा संग्रह मी करीत गेलों. त्यांपैकीं पोवाड्यांचे दोन खंड मी 'सटीक' छापून प्रसिद्ध करूं शकलों. अद्याप तिसरा शेवटचा खंड छापावयाचा राहिलाच आहे. अशा स्थितींत माझ्या संग्रहांतील लावण्या छापून निघण्याची शक्यता मला न वाटली, तर त्यांत आश्चर्य नाहीं. वास्तविक शाहिरी वाङ्मयाच्या अभ्यासाची पूर्तता 'लावणी' वाङ्मयाच्या अभ्यासाखेरीज होतच नाहीं. पोवाडा राजकीय दृष्टीनें महत्त्वाचा असला, तर लावणी ही सामाजिक दृष्ट्या तितकीच महत्त्वाची असते. यामुळें गत-कालचा इतिहास साग्र समजावून घेण्यासाठीं पोवाड्याइतकेंच लावण्यांचेंहि अध्ययन आवश्यक होय. हा मुद्दा मी माझ्या 'ऐतिहासिक पोवाडे, खंड १' च्या प्रस्तावनेंत विस्तारानें मांडलेलाहि आहे. असें असतां मजजवळील 'लावणी-संग्रह' छापून काढण्याची उबळ इतके दिवस मी थोपवून धरली. याचें मुख्य कारण हें कीं, या लावणी-वाङ्मयांत अतिरिक्त शृंगाराचा चिखल फारच असतो; आणि त्यामुळें या काव्यप्रकारांत काव्यगुण व इतर उपयुक्त ऐतिहासिक सामुग्री कितीहि असली, तरी त्यांत शिरून अंगावर त्या चिखलाचे शिंतोडे उडवून घेण्यास तितकेसें प्रशस्त वाटेना. आतां कदाचित् स्वतःचें नांव प्रसिद्ध न करतां माझा लावणीसंग्रह एखाद्या फूट-पाथवर विकल्या जाणाऱ्या लावणी-पुस्तकांच्या प्रकाशकास देऊन टाकून तो

मी प्रसिद्ध करवूं शकलों असतों. परंतु त्यांत संशोधन, शुद्धीकरण, परिष्करण किंवा टीपादिकांना वाव मिळाला नसता. कारण तशा प्रकारच्या प्रकाशकांना तसल्या गोष्टींची आवश्यकताच नसते ! यामुळें तोहि उद्योग घडला नाहीं.

अशा स्थितींत, निरनिराळ्या ऐतिहासिक दप्तरांतून हें लावणीसाहित्य माझ्या दप्तरांत येऊन पडलें इतकेंच झालें ! अर्थात् त्यांच्या मूळ जागेपेक्षां माझ्या संग्रहांत त्यांची निगा अधिक काळजीपूर्वक झाली व त्यांचा अभ्यासहि मजकडून झाला, हें खरें असलें तरी त्या साहित्याला सूर्यदर्शन घडण्याचा योग लाभेना. तो लाभण्याचा योग आतां येत आहे. याचें कारण गेल्या तीस वर्षांत झालेलें समाजाचें मानासिक स्थित्यंतर हेंच होय. सध्यां तर लोक–वाङ्मयाच्या संशोधनाला आणि प्रसिद्धीला जणूं उधानभरतीच आली आहे. लावणीवाङ्मयाचें वाङ्मयेतिहासदृष्ट्या असलेलें महत्त्व लोकांना पटत चाललें आहे व शृंगाराबाबत कोणच्याहि कारणानें कां होईना, पण समाजाची चूज निवून गेली असून त्याचें मन त्याबाबत बोथट किंवा निगरगट्टहि झालें आहे ! एवढेंच नव्हें तर वाङ्मयेतिहासाभ्यासाच्या दृष्टीनें हें वाङ्मय बी. ए.–एम्. ए. सारख्या वरिष्ठ परीक्षांच्या अभ्यासक्रमांतहि दाखल झाल्याचें आढळेल. या पालटलेल्या परिस्थितीचा फायदा मला मिळावा असा योग होता. म्हणूनच श्री. ठोकळ यांना माझा संग्रह छापून काढण्याची स्फूर्ति झाली आणि म्हणून त्या दृष्टीनें त्यांनीं या ग्रंथाला सुचविलेलें ' अंधारांतील लावण्या ' हें नांव मला फार समर्पक वाटतें.

आतां या संग्रहांत समाविष्ट झालेल्या लावण्यांचें वैशिष्ट्य किंवा विशेष काय तेवढें सांगतों. पाहिला विशेष हा कीं, यांतील एकूणएक लावण्या अगदीं अप्रसिद्ध म्हणून सर्वस्वीं नव्या आहेत. त्या दृष्टीनें शाहिरी वाङ्मयांत ही खरी खरी भरीव भर पडत आहे, असें अभिमानानें म्हणण्यांत मला बिलकुल संकोच वाटत नाहीं. अलीकडे लावणीवाङ्मयासंबंधीं बरीच तात्त्विक चर्चा, गुणदोषविवेचन आणि शुष्क काथ्याकूटहि सतत सुरू असतो. तथापि त्या सर्वांचें येऊन जाऊन सारें मूळ भांडवल म्हटलें म्हणजे शालिग्रामांनीं चित्रशाळेमार्फत प्रसिद्ध केलेलीं लावण्यांचीं चार पांच पुस्तकें आणि अवांतर प्रसिद्ध झालेले तसलेच चारपांच तुटपुंजे संग्रह. ते सर्व संग्रह इतके अशुद्ध छापलेले आहेत कीं विचारतां सोय नाहीं. पण शुद्ध संहितेची दरकार

न करतां अपभ्रष्ट पाठांनीं फुलून गेलेल्या त्या संग्रहांच्या अध्ययनावरच सारी मदार ठेऊन वर उल्लेखिलेली चर्चा सुरू असते. अर्थात् उपलब्ध असलेल्या छापील लावण्यांविषयीं जर इतकी अनास्था, तर संशोधन करून नवीन लावण्या शोधून काढण्याचे कष्ट कोणाला परवडणार ?

या संग्रहांत छापलेल्या बहुतेक सर्व लावण्यांचीं मूळ जुनाट हस्तलिखितें हीं मोडी लिपींतीलच आहेत. तथापि तें मोडीलेखनहि सुशिक्षित लेखकांचें नसून अडाण्यांच्या आनाडी मोडी लिपींतील आहे. यामुळें शुद्ध वाचन होणें फार अवघड जातें. या अडाणी लोकांच्या मनांत वापरावयाचा जो शुद्ध शब्द असतो त्याचें प्रत्यक्ष बोलींत ते कांहीं अपभ्रष्ट रूप बनवितात आणि अखेर मोडी लिपींत लिहितांना आणखी कांहींतरी निराळेंच लिहितात. उदा० त्यांना मूळ म्हणावयाचें असतें 'याजून'. पण प्रत्यक्ष उच्चार करतात 'यवजून' आणि अखेर मोडी लिपींत अक्षरें लिहितात 'यैवजुन.' 'कंदिले' या मूळ शुद्ध शब्दाचे 'खणं दिले' किंवा 'हृदयासी' याचे 'व्हारदयासी,' 'दंदी दुष्माण' याच्या ऐवजीं 'दणंदी दुशेमाण', 'द्रुपद बाळी' याऐवजीं 'द्रोपद भाळी', 'गुप्त' बद्दल 'गुपक्त', 'चुंबन' बद्दल 'चुमन' असा गोंधळ किती सांगावा ? अशा स्थितींत शुद्ध मूळ पाठ उन्नीत करणें हें फार कष्टाचें होऊन बसतें. इतिहाससंशोधनाशीं ज्यांचा साक्षात् परिचय नाहीं अशा लोकांच्या हातून, मग ते इतर दृष्टींनीं कितीहि पदवीधर किंवा तज्ज्ञ असले तरी त्यांच्या हातून शाहिरांची गाथा शुद्ध स्वरुपांत नकलली जाणें संभवनीय नसतें. या संग्रहांतील मोडी लावण्यांचें मी केलेलें वाचन सर्वच ठिकाणीं बरोबर झालेल असेल, असा दावा मीहि सांगूं शकत नाहीं. तथापि तें थोड्या ठिकाणीं चुकलेले असेल, असेंहि म्हणावयास मला हरकत वाटत नाहीं. शिवाय जेथें जेथें मला शुद्ध वाचन करितां येऊं शकलें नाहीं तेथें तेथें स्पष्टपणें कंसांत प्रश्नचिन्ह घालून मी माझी असमर्थता किंवा संशय प्रकट करून ठेवलेलाच आहे. सारांश, पाठशुद्धीविषयीं शक्य तितकी दक्षता हा या पुस्तकाचा दुसरा विशेष आहे.

तिसरा विशेष असा कीं, दर लावणीच्या खालीं अवघड शब्दांचे अर्थ व खुलाशाच्या टीपा दिलेल्या आहेत. या शाहिरी वाङ्मयांत जुनाट ऐति-

हासिक शब्दांची समृद्धि असते. यामुळें त्यांचें वाचन जुन्या ऐतिहासिक कागदपत्रांसारखेंच दुर्बोध होतें. आतांपर्यंत छापलेले लावण्यांचे संग्रह शुद्धीकरण व अर्थबोधक टीपांच्या आणि खुलाशांच्या अभावीं किती निरुपयोगी झालेले आहेत ते त्यांचे वाचकच सांगूं शकतील.

या संग्रहाचा चवथा विशेष असा कीं, सुप्रसिद्ध शाहीरपंचकापैकीं 'होनाजी बाळा 'सगनभाऊ' आणि 'अनंत फंदी' यांच्या अनुक्रमें ७७, २१ आणि ४ अशा अगदीं नव्या लावण्या प्रथमच लोकांपुढें येत आहेत. गंगू हैबतीच्या १०, होनाजीचा आजा सातप्पा याची एक व चुलता बाळा बहिरू याची एक व रामा गोंधळ्याच्या सुमारें २५ लावण्या यांचाहि मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. खेरीज जुन्या काळीं कदाचित् प्रसिद्ध परंतु त्यानंतर नामशेषाहि न राहिलेल्या अशा अगदीं नव्या २५।३० तरी शाहिरांचा वाचकांना प्रथमच परिचय होणार आहे.

काव्यदृष्ट्या या सर्व शाहिरांच्या गुणदोषांचें विस्तृत विवेचन करून त्यांतील रसवत्तेचें सोदाहरण विवरण करणें हा एक स्वतंत्र विषय असल्यामुळें स्थलाभावीं तें मी करीत नाहीं. फक्त होनाजी बाळा व प्रभाकराचा गंगू हैबतीचा फड यांच्यापुरतें इतकें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं कीं, या संग्रहांत छापलेल्या लावण्यांमुळें त्यांची आधींच असलेली कीर्तिप्रभा नवेनवे पैलू पडल्याप्रमाणें अधिकच वृद्धिंगत होईल.

शेवटीं आभार-प्रदर्शनाचें गोड काम तेवढें राहिलें. मुख्य आभार प्रकाशक श्री. बाबूराव ठोकळ यांचे. ते स्वतः एक कसलेले लेखक व या लावणीवाङ्मयाचे खरे रसिक तज्ज्ञ असल्यामुळेंच त्यांनीं हें इतरांनीं उपेक्षिलेलें प्रकाशनाचें काम उत्साहानें स्वीकारलें. तसेंच माझे स्नेही श्री. मारुतीराव गुजर बी. ए. व श्री. ना. ग. गांधी यांचाहि त्यांच्या साहाय्या-बद्दल मी आभारी आहे.

मजजवळ असलेल्या अप्रसिद्ध लावणीसंग्रहापैकीं हा एक हप्ता झाला. या संग्रहाच्या जवळ जवळ दुप्पट इतका संग्रह अद्याप मजजवळ शिल्लक आहे श्री ठोकळांप्रमाणें दुसऱ्या कोणा प्रकाशकास स्फूर्ति झाली, तर तोहि जगापुढें येऊं शकेल.

३३।२४ 'पुष्करणी', डे जि., पुणें ४
ता. २०-१-१९५६

**यशवंत नरसिंह केळकर**

# अनुक्रमणिका


| लावणी | | शाहीर | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ,, | १ | होनाजी बाळा | १ |
| ,, | ७८ | सगनभाऊ | १३४ |
| ,, | १०७ | साताप्पा | १६८ |
| ,, | १०८ | बाळा बहिरू | १७० |
| ,, | १०९ | गंगू हैब्रती | १७२ |
| ,, | ११९ | अनंत फंदी | १८९ |
| ,, | १२४ | दादू गोपाळ | १९६ |
| ,, | १२५ | विश्वनाथ | २०२ |
| ,, | १२६ | शेखभाई | २०४ |
| ,, | १२७ | गोपाळ | २०६ |
| ,, | १२८ | रामा काशी | २०८ |
| ,, | १२९ | लक्ष्मण | २०९ |
| ,, | १३० | आत्माराम | २१० |
| ,, | १३१ | भवानी साळी | २११ |
| ,, | १३२ | विरोबा | २१४ |
| ,, | १३४ | सखाराम | २१७ |
| ,, | १३५ | बाबू सवाई | २१८ |
| ,, | १३६ | आप्पा यशवंत | २१९ |
| ,, | १३८ | केशव संत | २२० |
| ,, | १३९ | बापू | २२३ |

,, १४० बाळू नारू २२४

,, १४१ राघो मुशाफर २२६

,, १४२ सुभान २२७

,, १४३ लहरी सिद्राम २२९

,, १४८ रामा गोंधळी २३६

,, १७६ रामतनय २५९

लावणी शाहीर पृष्ठ

,, १७७ धोंडी बांघू २६१

,, १८१ गजानन २६३

,, १८९ तुकनगिरी २६९

,, १९० सगाजी २७०

,, १९१ रघु २७०

,, १९२ देवराज २७३

,, १९३ गणू महादू २७४

,, १९४

ते १९९ गोविंदराव २७६ ते २८५

पुरवणी टीपा २८६ ते २८९


* * *

मराठी ... अनुक्रम २१११८ दि ३०५ नों: दि: ३०।११।५ मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# अंधारांतील लावण्या

## हो ना जी बा ळा

•••०Ⓜ०•••

### लावणी १ ली

सोडुन सर्व लागले मी तुमच्या मागें ।
आतां मजवरी नका भरूं रागें ॥ ध्रु० ॥
आयुष्य माझें हें तुमच्या शिरीं चढावें ।
जळतें कामज्वरीं, मज काढावें ।
प्रीतीमध्यें अंतर कधीं न पडावें ।
प्रतिदिवशीं, प्रत्यहीं दर्शन मजला घडावें ।
पुरवा गरिबाची आशा हो ! पायिं जडावें ।
वाटे मज अमृतफळ तोडावें ।
  व्हा मेहरबान गुणिराया !
  केली प्रीत जाइल वाया
  घासुनी झिजविली काया
विनवितें समय पाहुनिया रंगरागें ॥ १ ॥
नित उठुन हें काय परोपरीनें उमजाऊं ।
दुबळेपण कोठवरसें समजाऊं ? ।
आपण आकाश, मी जमीन, किती वर पाहूं ? ।
दुरले दूर कशी बापुडी राहूं ? ।
तुम्ही दयामेघ, मी नदी, कोणिकडे जाऊं ? ।
पडतां आवर्षण कैसी वाहूं ? ।

स्नेह करुन मागें का सरतां ?
कसें केलें कर्म विसरतां ?
मी दमलें पदर पसरतां
घट्ट पाय धरितां क्षुधा तृषाचि न लागे ॥ २ ॥
वाढिलें पात्र हें, दुसऱ्यापुढें न जावें ।
रात्रंदिस माझ्याजवळ निजावें ।
अक्षयी देणें राहिलें असें वोजावे ।
घरच्या स्त्रीसमान मज मोजावे ।
टाकितां पिता पुत्रासी कसें लजावें ।
मग हो बाळानें कोणीकडे जावें ? ।
मी येवढी तुमची आळकी
सहजागती झाल्या ओळखी
जीव फार करी तळमळ कीं
घडिघडि पळखी, दिस जाती विषयपरागें ॥ ३ ॥
ईश्वरापाशीं मागावा पुरुष अशेला ।
येतां जातांना धरिते शेला ।
हें मन चंचळ, आवरावें किती आशेला ? ।
बुडतां येऊन लागले कासेला ।
घ्या लुटा बहर नवतीचा रंग रसेला ।
सख्या, तूं माझा प्राणवशेला ।
मुख पसरुन बोलूं कोणासी ?
वाहिलें शरिर दानासी
जिव देते आदरमानासी
**होनाजी बाळा** गुणराशी जनासी सांगे ।
पाहतां ही सुंदरा मजवर रागें ॥ ४ ॥

मेहरवान—मेहरवान, कृपाळू; कोठवरसे—कोठपर्यंत; वोजावणें—व्यवस्था लावणें, सुव्यवस्थित करणें; आलकी—हळवी, तुमची आलकी-तुमच्याविषयीं हळवेपणा किंवा प्रेम असलेली; सहजागती—योगागोगानें, अनपेक्षितपणें; पलख-पळ, निमिष; अशेला-अशासारखा, अपूर्व असा; वशेला-वशिला, आधार.

* * *

## लावणी २ री

कां निद्रा केलीस मंचकीं मजविरहित मंदिरीं ?
खरें सांगा मजला तरी ॥ ध्रु० ॥
प्रथम प्रहर अवशीचा यामध्यें कां डोळा लागला ?
श्रम कोठवर जीवीं वाटला ।
पदर काढितां वरुन तुझा मुखचंद्र म्लान पाहिला ।
तेंव्हांच भाव समजला ।
कोण कार्य मसलती रोजगाराची काळजी तुला—।
उद्भवली ? भास मला ।
दुर्बळ आहों आपण म्हणुन कां श्रम वाटती अंतरीं ? ॥१॥
द्वितिय प्रहर लोटली रात्र मध्यान्ह बोलतां तुशीं ।
खरें अजुन कां न सांगशी ? ।
विनंतिच्या नादांत जाउं पाहते ही सारी निशी ।
मग केंव्हां मला भोगशी ? ।
मी तों जाहले अधीर, सख्या, तूं चिंताग्रस्त मानसीं ।
पुढें युक्त करावी कशी ? ।
सुखदु:खाची आहे विभागिण सख्या तुझ्याबरोबरी ॥ २ ॥
तृतिय प्रहर झोपेचा निवळ रात्रा चिंचिण वाजती ।
डुकल्या येती मजप्रती ।
मंदिरचे कंदील, समया, दीप विझूं पाहती ।

यापुढें विनऊं तरि किती ? ।
अघोर निद्रा कुठुन लागली चाडाळिण तुजप्रती ? ।
व्यापिलें तिनें निश्चिती ।
नेत्र उघडुन पहा मजकडे उगिच एकदां तरी ॥ ३ ।
चौथे प्रहरामधें ऐकतां शब्द कांतेचे असे ।
मग कृपादृष्टि पाहतसे ।
म्हणे, सुंदरी ! वृथा श्रमविले तुला अम्ही राजसे !
न कळतां गोष्ट जाहली असे ।
घेऊन मंचकावरी मग तिला गुजगोष्टी पुसतसे ।
प्रियभावें भोगीतसे ।
**होनाजी बाळा** म्हणे, असेंच अर्जवुन घ्यावें सुंदरी ।
मृदु भाषणें मधुरोत्तरीं ॥ ४ ॥

तुशीं—तुझ्याशीं; युक्त—युक्ती; चिंचिण--रातकिडयांचा आवाज.

★

## लावणी ३ री

आल्याविण राहावेना, तुसाठीं हा जीव केवळ भुका ।
बसावया अवकाश नाहिं, गडे, उभ्यानेंच दे मुका ॥धृ०॥
सासुरवाशी स्नेह सखे संपादन केल्यावरी ।
करू नये हयगयी, फार असावें जपुन आपल्यापरी ।
समजेना तुजपाई काय लिहिलें ललाटावरी ।
वैर पडो पाहाती उभयतां लोक वाइटावरी ।
प्रीत चालवुं आपण धरून निश्चय व्याघ्राबरोबरी ।
काय करिल बापुडे भुकत हे जन श्वानापरी ।
प्रीत ही तुझ्याकडे कशी

भक्षितां शर्करा जशी
लागसी मिष्ट तूं तशी
स्नेहपालनाविशी तुला अम्हि शरिर वाहिलें फुका ॥१॥
गोड वाटसी म्हणुन सखे निर्लज्ज लागलों गळीं ।
न करावी वाटतें अतां क्षणभर प्राणावेगळी ।
न पडे एकांतीं गांठ, न लागे हातपायाची धुळी ।
कठिण तुशी रत होणें खर्चितां द्रव्याच्या ओंझळी ।
रानोमाळ बायिका पहाव्या, काय द्यावें त्या सुळीं ?।
गुणनिधान अशी दुजी नसे या अभ्रमंडपातळीं ।
चांगली म्हणावी किती
गोजरी सौम्य आकृती
वर्णितां भागले किती
प्राण तुझ्या संगतीं वाहिला, तरि कां म्हणशी नको ? ॥२॥
मुखमृगांक टवटवित, सुवासिक तूं निर्मळ राजसे ।
गौरवर्ण पोटऱ्या, शरिर पत्र केतकीचें जसें ।
न पडे श्रवणीं हळुच बोलणें, तुझें थोडकें हसें ।
दृष्टभेट होतांक्षणिं तुजवर मग इच्छा जातसे ।
प्रीत विघडतां दुःख जिव्हारीं, मन कष्टी होतसे ।
अप्रमाण होऊं नको, तुझ्या मांडावर ठेविलें उसें ।
तू धन्य धन्य प्रियकरे
भोगितां न वाटे पुरे
कल्पना मनाची उरे
तुजविण निशिदिनीं बरें न वाटे आम्हां विषयसाधका ॥३॥
दे सोडुन मीपणा, अम्हांसी बोल वचन राजीचे ।
वागत जा, लेकरू जसें करि आर्जव पंतोजिचे ।

अभिमानानें उंच वाढले देठ जसे भाजिचे ।
गुण नसतां मी गुणी म्हणावें, हें लक्षण पाजिचें ।
ऐक्य विचारें मान्य असावें मन पाहुन मर्जिचें ।
न झाकती पान्यांत सुढाळक दाणे हुरमूजिचे ।
मी मी कोणीच म्हणुं नये
भुइ कोपरानें खणुं नये
**होनाजीबाळा** म्हणे सये
होऊं नये वायको, होउन आतां वसलीस लांब कां ? ।
चतुर मानती खरें, मूर्ख म्हणती पोबारा वायिका ॥४॥

वैर पडो पाहातीं--वैर पडूं पहातें; व्याघ्रावरोवरी--वाघासारखा; अभ्र-मंडपातळीं--आकाशाखालीं, सर्व पृथ्वींत; मुखमृगांक—मुखचंद्र; अप्रमाण--वेइमान; प्रमाण-शपथ, वचन. भावार्थ-दिल्या शब्दाला वेइमान; मीपणा--गर्व, अहंकार; राजीचे—राजीखुषीचे, मान्यतेचें; सुढाळक दाणे--पाणीदार, तेज असलेले मोत्याचे दाणे; हुरमुजी—पाणीदार मोत्यांचा एक प्रकार. हीं मोतीं होरमजच्या आखातांतून काढतात; म्हणून त्यांना हुरमुजी मोतीं म्हणतात.

* * *

## लावणी ४ थी

लागलें वेड मज तुझ्या प्रीतिचें भारी ।
झुरते दिसरात्रा सारी ॥ धृ० ॥
प्रारंभदशेपासून मन तुमचे पाई । ठेविलें मि अंतर नाहीं। जिवलगा।
केलीत कां हो येकांतीं माझि मनाई । तें कारण सांगा काई ।
हा वियोग तप्त उन्हाळा मला न साही । कमिंते दिवस वाई वाई ।
दहादहा वेळा येऊन उभी राहते द्वारीं ॥ १ ॥
संनिध वसून सांगते, ऐका गुणिराया। जीव धरला आशा पुरवाया।
घडविल्या गोष्टि त्या माघाऱ्या न फिराव्या । पैलतीरपार कराव्या ।

शिव निर्माल्याच्या क्रिया कशा विसराव्या ? । अपअपल्या मनीं स्मराव्या ।
भिऊभिऊन फार वर्तते मी जनवेव्हारीं ॥ २ ॥
नको टाकुं ओळख तुझीमाझी बहुत दिसाची । आण तुला माझे मासाची ।
बारा वर्षे लोटली प्रीत नवसाची । ही जुगण जशी हौसांची ।
स्वाधीन सख्या मी तुझ्या दासिदासांची ।
लागली मज गोडी उसाची । जिवलगा ।
वेइलाज मार्जी येवढी कोण्या प्रकारीं ? ॥ ३ ॥
धरीला पक्ष तो सरशेवटास न्यावा । पण केला तसा निभावा ।
पाहिना बरें जन विरुध्द करिती दावा । स्नेह परिणामासी लावा ।
पहा पहा देहादर करिते जेव्हां तेव्हां ही आठवण माझी ठेवा ।
**होनाजी बाळा** म्हणे आमचें वचन स्वीकारीं ।
तू प्राणाची अधिकारी । जिवलगे ।

दिसरात्रा—रात्रंदिवस; प्रारंभदशेपासुनी—पहिल्यापासून; बाई बाई—व्यर्थ, निरर्थक; शिवनिर्माल्याच्या क्रिया—शिवावरील निर्माल्य हातांत घेऊन दिलेली शपथ; जुगण—जोडी,जूग; स्वाधीन सख्या मी तुझ्या दासिदासांची—मी तुझ्या दासाचीहि दास आहे; सरशेवटास नेणें—अखेरी पोचवणें; विरुद्ध—वैर, शत्रुत्व.

* * *

## लावणी ५ वी

सख्या, चल घरिं माझ्या । घरिं माझ्या ।
जीव पायावरि तुझ्या ॥ धृ० ॥
रात्रंदिस जपते । कधीं येशील म्हणुन टपते ।
हतरूण मज खुपते । सेजेवर देहा रुपते ।
अंतरीं तपते । ही जपमाळ जपते ।
करिते ध्यानपुजा ॥ १ ॥
कष्टी तरमळते । डोळ्यांतुन जळ गळतें ।

काळिज कळवळतें । जसें गगन कोसळतें ।
तिळ तिळ मनिं जळते । खळखळ दु:ख उसळतें ।
तुजविण नाहीं मजा ॥ २ ॥
ही वस्त सापडली । गांठ उभयतां पडली ।
जडुं नये प्रीत जडली । वरि ममता आवडली ।
नवती पुरी चढली । हिरा हिरकणी भिडली ।
मी पाच, तूं सब्ज्या ॥ ३ ॥
नव्हे कीं रे वरवरची । स्वतां सिद्ध मी घरची ।
मुद्रिका तव करिंची । म्हणती तुझ्या पदरची ।
विनंती परोपरीची । नको म्हणुं बाहेरची ।
मला बुट रेज्या ॥ ४ ॥
केलें आर्जवणें । मजला तुला रिझविणें ।
जनाला लाजिवणें । जें लागेल तें पुरविणें ।
**होनाजी बाळा** म्हणे, स्नेह शेवटीं लावणें
साक्षीला शिवगिरिजा ॥ ५ ॥

नवती—तारुण्य; बुट रेज्या—रेज्या म्हणजे उंची कापडाचा लहानसा तुकडा. बुट रेज्या म्हणजे ज्यावर बुट्टे काढलेले आहेत असा कापडाचा तुकडा. **भावार्थ**—भरजरी उंची कापडाचा कापून काढलेला बारिक तुकडा असला तरी त्याला कांहीं किंमत नाहीं. तर अशा एखाद्या उंची कापडाच्या निरुपयोगी तुकड्याप्रमाणें तूं मला अव्हेरूं नकोस. आर्जवणें—विनवणी.

* * *

## लावणी ६ वी

स्त्रीचरित्र यापरि श्रवण हें ऐकावें कानीं ।
बहुत नारी घरोघरीं त्यामधें विरळा असेल इमानी ॥धृ०॥
सुखसंग्रह तोंवरी मोह माया ममता लाविती ।

जड पडतां किंचित् भावना द्वैताच्या लाविती ।
नाहिं प्रीतिचा लेश, द्रव्य संपादन संपादिती ।
येकाला मोहुनी अणिक मन दुसऱ्यावर ठेविती ।
दाखवून विश्वास, कार्य आपलें तेवढें साधिती ।
मग त्याची ती नव्हे, येकल्या अविचारें नांदती ।
गोड बोलतीं मुखें, परंतु विष भरलें अंतरीं ।
शिर कापुन वाहिलें तरी त्यांना वाटे मस्करी ।
लुटुन घेति सर्वस्व, जणूं का नागविलें तस्करीं ।
अशा रीति वरवरी शोभल्या, नाहिं कळवळा मनीं ॥१॥
आहे कारण तें जंवर तंवर त्याचा आदर असावा ।
पुरंतें हातीं लागल्यावरी तो अगदींच वाटे नसावा ।
या विषयाचे पाई नरानें जिव अपला द्यावा ।
दिस गेले ते विसरती, धरती करती उभा दावा ।
क्रियाप्रमाण अनृत्यभाषणी पापाचा ठेवा ।
जगमोहिन्या वायका असा दुसरा नाहीं गोवा ।
सदा राहती घरीं पुरुष, त्यांच्या स्वाधीन राहिले ।
कुलदैवत्य जशा त्या म्हणती मायेनें मोहिले ।
तत्क्षणीं तें सौख्य; नाहीं दुरवर कोणी पाहिलें ।
तप अवघें वाहविलें, भ्रौंशिले नारदादि ऋषिमुनी ॥२॥
किति अर्जाविल्या तरी नाहिं मन त्यांचें अपलेकडे ।
निट करतां होईना जसें तें श्वानपुच्छ वाकडें ।
लावितील परिणाम प्रीतिचा हें दुर्लभ ना घडे ।
वाजावितिल शेवटीं जनीं अपकीर्तीचे चवघडे ।
असतां अंतर शुध्द तिथें मन स्त्रीपुरुषांचें जडे ।
सत्वानें तारितो तिला परमेश्वर मागेंपुढें ।

वरकड साऱ्या वृथा दुरून दिसती केवळ पद्मिणि
पाचहिरकण्या नव्हेत, आहेत खोटे काचेचे मणी।
निर्धन जाहल्यावरी होतसे त्यांची ममता उणी।
मग निष्ठुर बोलणीं देति अंतर सर्वत्र निदानीं ॥३॥
तो अपलासा करून कितिक लटक्याच अणा वाहती।
पैक्याच्या लोभिष्ट कठिण ही धारि (?) देव साहती।
जो तो येतो घरीं सर्व संधानें त्याचे हर्ती।
टक लावुन त्याकडे लोक हे वर खालीं पाहती।
चतुरपणें चतुरासी येक्या क्षणामधें मोहिती।
लागेल तें अनुकूल अशा या बेपर्वा राहती।
नये भरवसा धरुन कोणती वेळा अणतिल कशी।
मनचे मनिं समजोन पहावी करुन पुरती चौकशी।
सत्य संगतीं धरा जसें तें सोनें बावनकशी।
**होनाजी बाळा** म्हणे, अशीं लक्षणें पहा शोधुनी।
चित्ताला आवरून असावें या निर्मल साधनीं ॥ ४ ॥

सुखसंग्रह तोंवरी--जोपर्यंत जवळ संपत्ती आहे तोपर्यंत; तस्कर--चोर, लुटारू. क्रियाप्रमाण--क्रियेला अप्रमाण म्हणजे वचन मोडणाऱ्या; अनृत्य--असत्य, खोटें; गोवा--फास, खोडा; दैवत्य--दैवत; भ्रौंशिले--भ्रष्ट केले; निदानीं--संकटप्रसंगीं; धरून--जुन्या काळीं कित्येकदां अनुस्वाराबद्दल न हें अक्षर लिहीत असत; धरून—धरूं.

★ ★ ★

## लावणी ७ वी

आवड हीच कीं तुझ्या बसावें सारा वेळ जवळी।
चित्तापुन चाहतेस जिवलगे, तूं कमळण पिवळी ॥धृ०॥
रूपदर्शन संतुष्टवदन पाहतां रंभा पिवळी।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २७११८ वि: [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]
३०।२।१५



चिरंजीव अक्षई तुझि गडे भर नौती टिकली ।
गोड बोल रसभरित, निबिड जैशीं द्राक्षें पिकलीं ।
स्त्रीमोहपाश कठीण, गुंतलों मायेच्या चिखलीं ।
तुजवरती मन तृप्त, फेरि चौऱ्यांशीची चुकली ।
मेजवान जीवप्राण, तुला गडे भरज्वानी विकली ।
चपळ अंग पाहतां जशी सर्पिण सदा वळवळी ॥१॥
काहींच बरें वाटेना, वाटते केव्हां उठून गाठूं ।
तिळशर्करा तशी उभयतां नित्य अपण भेटूं ।
अजवर जें जें केलें तें नको पाण्यामध्यें लोटूं ।
ज़वळ घेतल्यावर तदनंतर कंठ नको काटूं ।
चंद्रकांति लखलखित तुझें मुख प्रीतीनें चाटूं ।
तुजकरितां आतीतवेष घेऊन अवघी सृष्टी पकटूं ।
बिलगुन मिठी मारुं दे, वाजते थंडीची हिवळी ॥२॥
गुणमंडित वेल्हाळ बाळमुद्रा दिसते साधी ।
सुखसंपत्ती भोगितां जशी कल्पतरूची खांदी ।
दिव्य शरिर जल तेज, केवळ मखमाली गादी ।
तुज पोटासी धरुन येकांतीं मग्न ध्यावी समाधी ।
उंच मलमल परल्याबरोबर नव्हे शेला खादी ।
कूलशिल शुध्द, इमान जागवी लालन अशि एकादी ।
घरिं यावें कधिं सांग, दृष्टी पडाशिल कोण्या वेळीं ? । ॥३॥
सोडुन अष्टाधिकार कृतसंकल्प तुझेवर्ता ।
पहा पहा रमतों, फिरत फाकिर जाहलों प्रीतीकारितां ।
बंगाला, सिंहलद्वीप, काशी नवखंड हेरतां ।
हे प्रतिबिंब दिसेना, श्रवणीं ही अनुचित वार्ता ।
ताबेदार प्रीतचिे, सबळ आश्रय चालिव पुरता ।

निराश तुजविण, काळ व्यर्थ जातो झुरतां झुरतां ।
क्षिरसागरिंचें गर्भरत्न ही परकांता कवळी ।
**होनाजी बाळा** म्हणे, ठेवी हृदयांतरकमळीं ।

रंभा—केळ; भरनौती—भर तारुण्य; मेजवान—अर्पण, अर्पित; काटूं—कापूं. काटणें-कापणें; आतीतवेष—वैराग्याचा वेष, फकीरी; पक्टूं—धुंडूं, पालथी घालूं (?); हिवळी—हुडहुडी; परल्याबरोबर—पेहरल्याबरोबर. मलमलीचा कपडा पेहरल्यानंतर त्यावर खादीचा भिकार शेला घेणें कसें शोभणार? लालन—लाडकी, प्रियकरीण; कृतसंकल्प तुझेवर्ता—तुझ्यावर म्हणजे तुझ्यासाठीं, म्हणजेच तुझ्या प्राप्तीसाठीं कृतसंकल्प केलेला आहे; हेरणें—शोधणें; क्षिरसागरींचें गर्भरत्न—क्षीरसागराच्या अगदीं तळाचें अपूर्व असें रत्न.

* * *

## लावणी ८ वी

रूप जैसा ऐना, चकचकाट पाहुन तुजवर दिल फिरला ।
ये शेजारीं वैस, अमळशी काढ पदर मुखड्यावरला ॥ धृ ॥
ठाणमाण कल्याण वासना गुणसुंदर बहुतापरिची ।
नाहीं कुणाची दर्द जरा, तूं पाच्छाइण अपल्या घरची ।
चिरकंचुकि भूषण नागमंडित सरळ वेणि पाठीवरची ।
लहान चिरी कुंकाचि कपाळीं, लाल जशी पिकली मिरची ।
नव्हे पदर वर, घडी सारखी, आंतबाहेर येकअंतरची ।
उदंड काष्टे काय साम्यता लागे मैलागिरिची? ।
कधिं लागशिल हतीं? घराचा तुझ्या अम्ही थारा धरिला ॥ १ ॥
नदर वयांत भरली भरनौती, गोड जशी साखरपेढा ।
डळमळती हृदयावर जोबन, दोन आंबे आले पाडा ।
तेजस्वी टकटकित गुलाबी पुष्प जसे येते झाडा ।
निकोप काया कोमळ, केवळ किरळ कर्दळीचा माडा ।

लावुनिया प्रीतिच्या जरवा पुरुषा करिसी वेडा ।
तुला भेटल्याविणें जाइना येक दिवस आमचा खाडा ।
दे प्रसाद उजवा कार्यार्थी, निरउपाय अमुचा हरला ॥ २ ॥
वदन कमळ, देह निर्मळ, नेहमीं अचळ पदर शोभे माथा ।
टपुन उभे भिरभिरा पहातों रोज तुला जातां येतां ।
जिगजिग झालें फार, तरी न लागसी त्याचे हाता ।
तू चतुराईची हद्द, सखे तूं शहाण्याला देसी गोता ।
शिरोभाग बत्तीस गुण औधे नारीनर दृष्टी पहातां ।
पण हरलें कितिकांचें पाणी तुझ्या घरीं वहातां वहातां ।
कसें करुन भोगावि, मनाचा हा विचार पुरता ठरला ॥ ३ ॥
उदंड जाहल्या, तरी वेगळ्या त्या चांगुलपणाची युक्ती ।
मिठसाखर पांढरी, परंतु अपअपल्या मोलें विकती ।
एकावर चढ एक लाख पाहिल्या, तुजवरती आमची भक्ति ।
मालावरते मोल हव्या त्या घें, मोहरा देतों नक्ती ।
प्रीतिचें साधन हेंच कीं, अडल्याला द्यावी मुक्ती ।
हेत पुरवितें एकदां एकांतीं, गांठ पडल कोण्या युक्ती ? ।
आज आज उद्यां उद्यां किती म्हणसी तूं ? दिस आयुष्याचा सरला ।
**होनाजीबाळा** म्हणे, तुसाठीं जिव बारा वर्षे झुरला ।

ऐना--आरसा; दर्द--भीड, भीति; मैलागिरी—चंदन; माडा—लहान झाड रोपा; किरळ—जोमदार, अवानींतला; जरब—तोफ, जरबा–तोफा; दे प्रसाद उजवा--उजव्या बाजूच्या फुलाचा कौल दे; निरउपाय--उपाय. कवीनें येथें उपाय या अर्थीच 'निर उपाय' म्हणजे निरुपाय असा शब्द वापरला आहे; जिगजिग—संत्रस्त, श्रांत; तूं चतुराईची हद्द--तुझ्या चतुराईची सीमा झाली किंवा कमाल आहे; पण हरले--प्रतिज्ञा विफल झाल्या; नक्ती--रोख, नगद.

* * *

## लावणी ९ वी

चल दुर हो पलिकडे सुकाळे जन झव कीं तू देहा दिसा ।
गेला भर नवतीचा, यापुढें काय आतां राहिल्या पिसा ?॥धृ॥
उतार जाहलें वय, माघारें न ये फिरून जें जें घडलें ।
वाइट झालें तोंड, अतां गडे गालाला पोचे पडले ।
पोटऱ्यांची नळकांडी जहाली, मांड्यांचे गोळे झडले ।
भोगावी यापुढें अमंगळ असें तरि कोणाचें अडलें ? ।
कोठुनि पैदा झालें न कळे हें स्वरूप कोणीकडलें ।
द्रव्य खर्चिणें नको, तुझ्याकडे त्या पुरुषाचे मन जडलें ।
येल्या जाल्यापाशि घरोघरिं मागत जा पैसा पैसा ॥ १ ॥
थाट करूनि शिंदळीचा फिरसी लोकांचे दारोदारीं ।
कंबर काळी सुकट, पुसेना फुकट कोणि पैश्यावेरी ।
तेलकटीच्या मळ्या अंगावर, उवालिखा माशा वारी ।
भिक मागत जा स्वच्छ मुखानें, म्हणे मल्हारीची वारी ।
सांधोसांधीं डाग चकदळीं, मुख दुर्गंधीची मोरी ।
खवट खोबरें, कच्ची चिकटी डोईला घाशी बेरी ।
नाहिं मडि मुर्वत मर्यादा, धिपट दांडगी औदसा ॥२॥
आपण कायाहीन असून चांगल्या नारीचा आणसी ठेवा ।
एक लुगडें एक चोळी मिळेना, दुसऱ्याचा करिशी हेवा ।
रोज हिंडशी गल्लोगल्लीं रस्त्यानें यावा जावा ।
सवंग मेवा गुळ दमडीचा भलत्यानें घ्यावा खावा ।
अनभ्यस्त पाहून एकादा गरिब बिचारा बुडवावा ।
कोणि तुला भेटतां खपाऱ्या, मग म्हणशी देवा ! देवा ! ।
न भोगुं देशीं फुकट, कशाला उगाच म्हणशी बसा बसा ?॥ ३ ॥
कां ग द्रव्य मागसी धनलोभे, अजुन तुला नाहीं ठावें ? ।

शहाणपणाची गोष्ट ऐक तूं, गुणि जनास भोगूं द्यावें ।
ज्याचें चांगुलपण त्याला तें, आपल्याला तें कशास हवें ।
नलगे मिठाई तुला सुखानें, राताळें भाजुनि खावें ॥४॥
प्रीतिचें सदावर्त, फल परोपकाराचें घ्यावें ।
माल नासका सवंग विकावा, वरें सांगितलें ऐकावें ।
कवन करी **होनाजी बाळा**, अज्ञानें पहावा अरसा ।
ही खोली तुज इनाम जागा, नांदत जा वरसोवरसा ॥५॥

ठेवा--आव, आव; खपाल्या—खप्पी; राताळ—रताळें; भलत्यानें—वाटेल त्यानें; सुकाळे--सवंग. सुकाळे जन–तुझ्या सारखीला भोगणारे फुकटे; पिसा-- कणसांतून दाणे झोडून काढल्यानंतर उरणाऱ्या कणसाला पिसा म्हणतात. येथें भावार्थ—नुसतीं हाडकें उरलीं.

* * *

## लावणी १० वी

निर्लोभ प्रीत माझी माया टाकुं नका ॥ धृ० ॥
पावले कष्ट इतुका स्नेह तुमचा जोडितां ।
निर्लज्ज जवळ निजले, आतां कां सोडितां ? ।
लाउन सोनकेळी पाणी कां तोडितां ? ।
अपला संग्रह होतां वाटते शरिर वाहावे
सागरिं बुडि देतां कोरडे कसे रहावे ?
जवळुनि येतां जातां अनाथाकडे पाहावे
मज काहींच न द्यावा पैसा दमडी रुका ॥ १ ॥
प्रतिच्या आधारानें जाहले साहेबसुभी ।
भोगुन अंतर द्याव हें न दिसे वाजवी ।
दूर जात नाहीं कोठें शेजारीं मी उभी ।
छत गालिच्या हंतरते, बैसा राजिवनेत्रा ! ।

ओणवी पाय चुरते आपले कोमळगात्रा ।
तुमच्या मागें करिते देशांतरिंच्या यात्रा ।
कल्याणभूषणमित्रा, तूं माझा सोनका ॥२॥
हाडाचीं काडें करून आर्जव संपादिलें ।
आजवर अंगाखालीं काचानें नांदले ।
हें वर्तमान समुळीं अवघे निवेदिले ।
ईश्वरसूत्रीं आचरणें, निर्फळ काय बकावे ।
व्यर्थच रागें भरणें तुम्ही येवढें टाकावें ।
थोराचें हेंच करणें उघड्याला झाकावें ।
आधीं काम करून भावें कापावी मान कां ? ॥३॥
अज्ञानदशा माझी काय काय सांगु अपणां ? ।
निःशंक जवळ आले, सोडावी कल्पना ।
**होनाजीबाळा** म्हणे हो ऐका विज्ञापना ।
किंचित न्यून नसावें संगत केल्या अर्थी ।
निर्मळ लक्ष असावें रुचकर गोड पदार्थीं ।
अवघड कसाणिं कसावें, मी सुंदर भावार्थी ।
क्षोभित विषय अनर्थी जिव झाला तानका ॥४॥

साहेबसुभी—साहेबसुभ्याची वायको; भावार्थ–मोठी सरदारीण; वाजवी—उचित, योग्य; सोनका—लाडका, प्रिय, आवडता; तानका—विव्हळ, वावरा.

* * *

## लावणी ११ वी

मला पतिपुरुषोत्तमा ! असावी अपराधाची क्षमा ॥ध्रु०॥
तुम्ही गुलाब, मी काटेशेवंती समसमान शोभले ।
कंठीची पानडी मी तुमच्या गळ्यामध्यें लोंबले ।
कृपाउदर विस्तीर्ण आपल्या पदराला झोंबले ।

अघटित फळ आलें हाता, आतां मज पाहावें गरिबाकडे
माशिं बोलावें रुबरू, नका धरुं मनामधें वाकडें
प्रीतीचा योग हा कसा ? जसा रविउदय दक्षिणेकडे
जशी ती पडे गांठ रेशमा ॥१॥
मीं मुळची अज्ञान, काय तरि बोलूं थोरापशीं ।
मेरूवर मक्षिका येकटी जड वाटावी कशी ? ।
मधुसाखर लागतां तिथें स्थिर झाले मुंगी जशी ।
भावार्थानें जीव दिला, आपला मानपान राखते
सोसुन अवघी कुणकुण, तुमचे मी दुर्गुण झांकिते
एकांतामधिं अहोरात्र अंगावर हातपाय टाकिते
चरण चेपिते, हरविते श्रमा ॥२॥
समय पाहुन गांठिते, कां हो तरि भाषण केलें मना ? ।
निराधार चालून आल्याच्या पुरवाव्या कामना ।
न टळे बळी सत्वास, दान भूमी दिधली वामना ।
कृतनिश्चय माझा पाईं, नाहीं कुचराई केली कधीं
हिंडन वारा ज्योतिर्लिंगें तुमच्या मागें आपल्या पदीं
नाहीं संशय ठेविला, चक्क शिवते देवाची उदी
प्रीतिला जुदी नसे उपमा ॥ ३ ॥
स्वाती घन तुम्ही, त्यांत जिवलगा मी सौदामिन नभीं ।
काळे रात्रीं जेव्हां गरज लागते तेव्हां मी उभी ।
महा संकटीं धीर करिन, कांहि किंचित मन माझें न भी ।
नाना परिचीं साधनें करून तुम्ही अधीं माया लाविली
अगम्य प्रीतिच्या कळा सकळही कळसूत्रें दाविलीं
**होनाजी बाळा** म्हणे, सखे तुला करुं प्राणाची साउली
बरी जाहली गडे खातरजमा ॥ ४ ॥

ओणवी पाय चुरते आपले कोमळगात्रा ।
तुमच्या मागें करिते देशांतरिंच्या यात्रा ।
कल्याणभूषणमित्रा, तूं माझा सोनका ॥२॥
हाडाचीं काडें करून आर्जव संपादिलें।
आजवर अंगाखालीं काचानें नांदले।
हें वर्तमान समुळीं अवघे निवेदिले ।
ईश्वरसूत्रीं आचरणें, निर्फळ काय वकावे ।
व्यर्थच रागें भरणें तुम्ही येवढें टाकावें ।
थोराचें हेंच करणें उघड्याला झाकावें ।
आधीं काम करून भावें कापावी मान कां ? ॥३॥
अज्ञानदशा माझी काय काय सांगु अपणां ? ।
नि:शंक जवळ आले, सोडावी कल्पना ।
**होनाजीबाळा** म्हणे हो ऐका विज्ञापना ।
किंचित न्यून नसावें संगत केल्या अर्थी ।
निर्मळ लक्ष असावें रुचकर गोड पदार्थीं ।
अवघड कसाणिं कसावें, मी सुंदर भावार्थी ।
क्षोभित विषय अनर्थी जिव झाला तानका ॥४॥

साहेबसुभी—साहेबसुभ्याची वायको; भावार्थ–मोठी सरदारीण; वाजवी—उचित, योग्य; सोनका—लाडका, प्रिय, आवडता; तानका—विव्हळ, वावरा.

* * *

## लावणी ११ वी

मला पतिपुरुषोत्तमा ! असावी अपराधाची क्षमा ॥ध्रु०॥
तुम्ही गुलाब, मी काटेशेवंती समसमान शोभले ।
कंठीची पानडी मी तुमच्या गळ्यामध्यें लोंबले ।
कृपाउदर विस्तीर्ण आपल्या पदराला झोंबले ।

अघटित फळ आलें हाता, आतां मज पाहावें गरिबाकडे
माशिं बोलावें रुबरू, नका धरुं मनामधें वाकडें
प्रीतीचा योग हा कसा ? जसा रविउदय दक्षिणेकडे
जशी ती पडे गांठ रेशमा ॥ १ ॥
मीं मुळची अज्ञान, काय तरि बोलूं थोरापशीं ।
मेरूवर मक्षिका येकटी जड वाटावी कशी ? ।
मधुसाखर लागतां तिथें स्थिर झाले मुंगी जशी ।
भावार्थानें जीव दिला, आपला मानपान राखते
सोसुन अवघी कुणकुण, तुमचे मी दुर्गुण झांकिते
एकांतामधिं अहोरात्र अंगावर हातपाय टाकिते
चरण चेपिते, हरविते श्रमा ॥ २ ॥
समय पाहुन गांठिते, कां हो तरि भाषण केलें मना ? ।
निराधार चालून आल्याच्या पुरवाव्या कामना ।
न टळे बळी सत्वास, दान भूमी दिधली वामना ।
कृतानिश्चय माझा पाईं, नाहीं कुचराई केली कधीं
हिंडन वारा ज्योतिर्लिंगें तुमच्या मागें आपल्या पदीं
नाहीं संशय ठेविला, चक्क शिवते देवाची उदी
प्रीतिला जुदी नसे उपमा ॥ ३ ॥
स्वाती घन तुम्ही, त्यांत जिवलगा मी सौदामिन नभीं ।
काळे रात्रीं जेव्हां गरज लागते तेव्हां मी उभी ।
महा संकटीं धीर कारिन, कांहि किंचित मन माझें न भी
नाना परिचीं साधनें करून तुम्ही अधीं माया लाविली
अगम्य प्रीतिच्या कळा सकळही कळसूत्रें दाविलीं
**होनाजी बाळा** म्हणे, सखे तुला करुं प्राणाची साउली
बरी जाहली गडे खातरजमा ॥ ४ ॥

रूबरू--समक्ष; उदी शिवणें--उदीला हात लावून शपथ घेणें; जुदी--अन्य किंवा निराळी.

* * *

## लावणी १२ वी

गुजगोष्टी कुठवर सांगूं ? ।
किती तुमच्या पाईं लागूं ? ॥ धृ० ॥

मजवर तुमचें मन रिझलें । सारा वेळ जवळ निजलें
भाषण करितां मुख झिजलें । घामानें हृदय भिजलें
प्रीत नवनीत घृत हें थिजलें । या पाईं सर्व त्याजिलें
केवढा वेळ रात्रीं जागूं ? ॥ १ ॥

तुम्ही नित माझ्या घरिं यावें । सुखशयनीं सुरत व्हावें
कधीं मधीं तरी भेटत जावें । मजविषयीं कांहीं न भ्यावें
ताकानें दुध विरजावें । पडलें तें पदरीं घ्यावें
सापडलें तें नये त्यागूं ॥ २ ॥

मजवर कां रागें भरतां ? । केलें तें कसें विसरतां ?
तुम्ही सागर, मी तव सरिता । जिव माझा तुम्हांवरता
दिस अवघे जाती झुरतां । शिरीं ठेवा हात पुरता
सांगा मी कशी तरी वागूं ? ॥ ३ ॥

हुकुमामध्यें तुमच्या असतां । मग सख्या, कां हो रुसतां ?
कस लावुन कसणी कसतां । शेजारीं जवळ वसतां
**होनाजीबाळा** पुसता । म्हणे सखये बळे ( बोल ?) हसतां
सुख कवणापाशीं मागूं ? ॥ ४ ॥

* * *

## लावणी १३ वी

बेलबागीं नांदतो लक्ष्मीकांत शेषशायी ।
दर्शन घेतां मुक्ती, यांत कांहीं संशय नाहीं ॥ धृ० ॥
स्तव करितां भावार्थें प्राणी तो निर्भय झाला ।
आनंदमय चित्तांत, नाहीं भय काळत्रयीं त्याला ।
निधान वैकुंठीचें, पहा त्रैलोक्यपाळकाला ।
पायीं मुख लावितां गोड मुक्तीचा प्याला ।
लोटांगण घालित भेटूं या जगश्रीमंताला ।
तथा न धरितां सत्य अढळपद येते हाताला ।
धरावे एकनिष्ठेनें पाय ।
मिळे मग पायापाशीं ठाय ।
इच्छिलें देइल संशय काय ।
पाहातां कोण अधिक याशिवाय ।
पातक जन्मोजन्मीं जाय ।
करितसे शत्रूचा निरउपाय ।
सौम्यरूपी देवा, लय लावा विष्णूचे पाई ॥ १ ॥
स्थळ निर्मळ, बागांत पुष्प तरुवर सुवास येती ।
केळी, बकुळी, आवळी, सिताफळी, नारळी हालती ।
तुळसी, वृक्ष भोंवते द्राक्षीमंडप संगीन जाती ।
समोर पटांगण, कारंजें, गरूडवाहनमूर्ती ।
शांताकृत हें ध्यान लक्ष्मीनारायण ध्याती ।
धन्यकळा निर्मिता दोहीकडे शिवसुत गणपती ।
चिरे उथळी घोटीव साजती ।
माहिरपा खांब सरूचे सुती ।
नादघंटा खणखण वाजती ।

विणे, पखवाज, टाळ गाजती ।
परोपरी शृंगार विराजती ।
पाहतां अवघेच नांवाजती ।
नित्य शोभा दिसते जाजती ।
टाहो फोडती मोर अहोदिन शुभचिन्हें गाई ॥ २ ॥
निश्चय धरितां पाईं पडे अभिमान समर्थातें ।
सज्जन प्रीति पाळुन दुष्टवध करि अपल्या हातें ।
जग आधार श्रीपाल्य वाचे जमा अनंतातें (?) ।
व्यर्थ न जाय कदा मग शासन करी कृतांतें ।
अचल चित्त, एकाग्र, न लावा नेत्राचें पातें ।
न्याहाळा सुंदर चतुर्भुज रूप अपल्या रूपातें ।
नसावा सद्‌भजनीं अनमान ।
कीर्तनाकडे लावावे कान ।
करितां हरिनामाचें स्नान ।
पराजय शत्रू रानोरान ।
क्षणिक माया निरसे देहभान ।
जसें लेकरूं धरी आईचें थान ।
तसा हा भक्तीरस पयपान ।
करा प्राशन अवघे गुणनिधान ।
**होनाजीबाळा** म्हणे, ध्यान हें जो अंतरिं ध्याई ।
तो नर जाणा धन्य, देव राहतो त्याचे ठाई ॥ ३ ॥

तथा--संशय, वाकी, कुचराई; निरउपाय--निरूपाय; लय—लक्ष;संगिन--उत्कृष्ट, सुंदर; उथळीं—खांबाच्या वर व खालीं बसविण्याकरितां तयार केलेला चौकोनी लहान व उंच दगड, खांबाचा तळखडा, बैठक; जाजती—जास्ती, अधिक किंवा विशेष; अहोदिन—साऱ्या दिवसभर. अहोरात्र असें म्हणावयाच्या

ऐवजीं अहोदिन शब्द वापरला आहे. अहन्–दिवस आणि दिन म्हणजेहि दिवसच. पक्षी सहसा रात्रीं कधीं ओरडत नाहींत. त्यावरून अहोदिन म्हणतांना सारा दिवस असाच अर्थ कवीला अभिप्रेत असावा; पडे अभिमान समर्थातें— समर्थाला म्ह. देवाला भक्तावद्दल अभिमान किंवा आपलेपणा वाटूं लागतो; रानोरान—रानोमाळ.

* * *

## लावणी १४ वी

भोगुं द्या, प्रीत होउं द्या, राग जाउं द्या, जरा येउंद्या
कांहीं कनवाळा ।
ठेविला जिव पुढें, जिव माझा तुम्ही संभाळा ॥ ध्रु० ॥
नूतन नवतीच्या पहिल्याभरीं
रिकामी फिरते कीं घरभरी
तुम्हाविण न गमे मज क्षणभरी
लागला छंद चांगला तुमचा मला, एकांतीं चला, मी पडते पाया।
हंगाम हे पिकाचे, दिस हे जाती वाया ।
दशदिशा रिकाम्या कशा, तुम्हाविण जशा लागली आशा,
वाहिली काया ।
करुं नका कमी काडिमात्र माझी माया ।
चुरमुरून मन झुरझुरून, जाते मरमरून तुमच्यावरून
अहो गुणिराया ।
निर्वाण काळिं हा प्राण घेतसे धाया ।
डगमगले विषयानळीं
सर्वांगिं मदन जळजळी
वाटे उडि घालूं जवळी
ध्या कुशीं पराची उशी, मी जाहले खुषी धरुन
हवी तशी मशी कुरवाळा ॥ १ ॥

दिसोदिस ममता मनिं वाढली
घातली रेषा कधिं मोडली ?
आपली सेवा म्या जोडली
सौभाग्यधनाबंधना ! सकळसाधना,
हेमवदना, कल्पना सोडा ।
हा घटित योग ब्रम्ह्यानें निर्मिला जोडा ।
हा मेवा संग्रहीं ठेवा, रातींचि जेव्हां,
पाहिजे तेव्हां वलाऊं धाडा ।
हौसेनें मला द्या बांधुन दुसरा वाडा ।
भोजनास डावीकडे, जडे मी पुढें,
मला आवडे, सुधारस वाढा ।
आप दृष्टीं हुजूर अन्याई धरुन नाडा ।
रानांत हरण येकली
पडले मायाचिखलीं
निर्जल जाई सुकली
मागली वळख जागली, चतुर चांगली,
मला लागली आपली शाळा ॥२॥
पुढें पुढें आपलें मुख दाविते
अंगाला तुमच्या अंग लाविते
सुरतसंगाला वोलाविते
मी सदा शरण या पदा, दाविते आदा,
रोज दाहदां पसरिते ओटी ।
आपली मान कापली तरी मी चखोटी ।
हळहळत, नयनजळ गळत, वृथा कळकळत,
शरिर तळतळत, जळत अंग पोटीं ।

अवसानसमइ मग होते घाबरी मोठी ।
फळ पिको, लक्ष हें टिको, पाइं देह विको,
तुम्हांविण नको द्रव्य धन कोटी ।
आवडली मला बरी सख्या तुझी हातोटी ।
केवळ कोमळ नार मी
श्रमले अजवर फार मी
गळीं पडले निराधार मी
सांगतां, मार्ग लागतां, जपुन वागतां,
कसा उभयतां मिळाला ताळा ॥ ३ ॥
चालते मर्जीच्या अन्वयें
अंतरीं जाहाले मी निर्भये
वाट पाहायाला लावुं नये
स्नेहरसें उणेपण दिसे, चांगलें नसे,
विसरतां कसे गरिबगोराला ? ।
लाहानानें काय तरी शिकवावें थोराला ? ।
आडले, जवळ वाढले, भरी पाडलें,
भलि सापडले वेव्हाराला ।
कस्तुरी मिळाली ही मैलागिरीला ।
मी खास पदरची दास, धरियली कास,
आहे बारमास आधाराला ।
नाहीं जात कधीं पुसल्याविण माहेराला ।
बरोबर मजला हो नेणें
काय पुरुषावेगळें जिणें !
करुं शेवट केल्या पणें
तारणे ! नगो धारणे ( ? ) ! हे श्रमहरणे,

लोभ करा म्हणे **होनाजी बाळा ।**
घरीं येतो हमेशा, सखे, नको देउं टाळा ॥४॥

कनवाळा—कींव, कणव; द्याया—अर्पण करण्यासाठीं; कल्पना—संशय, किल्मिष; वलाऊं—बोलावणें; आपदृष्टिं हुजूर अन्याइ धरून नाडा-म्ह. स्वतः पाहून, समक्ष म्हणजे हुजूर चौकशी करून जर मी अन्याइ म्हणजे अपराधी ठरलें, तर मला नाडा म्हणजे माझें पारिपत्य करा. केवळ कंड्या ऐकून माझा त्याग करूं नका; शाळा--शिस्त. येथें अर्थ लळा, आवड, चटक; अवसानसमई--अखेरीस; निर्भयें--निर्भय; गरिबगोर--गोरगरीब; कस्तुरी मिळाली ही मैलागिरीला-कस्तुरीच्या सुवासाला चंदनाच्या सुवासाची जोड मिळाली, असा समसमा संयोग झाला. केल्यापणें--केलेल्या निश्चयाप्रमाणें; पण--प्रतिज्ञा.

* * *

## लावणी १५ वी

सताप श्राप हा माफ असावा मशीं ।
किति सांगुं स्वहित नित हितगुज तुमचेपशीं ? ॥धृ०॥
वाटते मला, आज चला येकांतीं निजूं ।
सामान सिध्द, शेजेवर होते रुजूं ।
मम सौख्यधुरंधरानिधी म्हणून किती भजूं ? ।
तुमच्या विरहित मी पाय कुणाचे पुजूं ? ।
मजाविषयीं कांहीं तिळमात्र नका गजबजूं ।
प्रीतीच्या स्थळीं भाषण बोलावें रुजूं ।
आज्ञेंत सिध्द, उभी राहते मी मागेंपुढें
पुण्याइ सबळ, यशवंत माझे चुडे
थोरासंगें दुर्बळास पाणी चढे
सापडे वस्त अंधा न मिळवितां जशी ॥१॥
तुम्ही माझे समूळ सौभाग्याचे अधिपती ।

तपसाध्य जसें सूर्यबिंब आलें हातीं ।
हा ढग वळला, मन धाले मेघामृतीं ।
पदोपदीं विनंतीच्या करिते आवृत्ती ।
मोहिलें रूपाकडे, चित्त चंचळ व्यावृत्ती ।
जळो माझी दृष्ट लागेल मुखचंद्राप्रती ।
    कोणती सवत अशी मजवर चढ भेटली ?
    नवि नवि बरी चव गोड तिची वाटली
    हें शास्त्र आवडतें, रीत सांगा कोठली ?
गांठली वेळ, श्रम केले जातीनिशीं ॥२॥
विश्वास वृक्ष विस्तीर्ण पूर्ण सागरा ।
चतुरस्र निपुण गुणविद्येच्या आगरा ।
हे सत्यशील सर्वज्ञ सर्वसुगरा ।
जिवप्राण सख्या, तूं बाण मदनमोगरा ।
लागला छंद अति, सुगंध मैलागरा ।
मेजवानी करिन, कधिं येतां माझ्या घरा ? ।
    एकनिष्ठपणें म्या संधिसमय साधिला
    निष्कपट निकट निळकंठ आराधिलां
    सर्वस्वें अतां हा देह पदरिं बांधिला
बोधिला बोध, कानमंत्र पाहिले दिशीं ॥३॥
मायासमुद्र थोर ओघ आला वळुन ।
पाण्यांत पाणी एक जैसें गेलें मिळुन ।
पाहिजे तशी पाहिली मला छळछळुन ।
शिरोमाणि कंठिंचा उरिं धरिते आवळुन ।
घ्या भोग अविट, हा घट भरला ज्ळमळुन ।
परिपक्व सुरस नवतीचा घ्यावा पिसुन ।

अर्धांग शयन विधिनिर्मित झालें वतन
अंगुष्ट चरणरज माझें पंचायतन
ठेविली सुखी, आजवर मज केलें जतन
**होनाजीबाळा** म्हणे, मदनमोहो लाविसी ।
सर्वथा अतां अंतर गडे न करूं तुशी ।।४।।

गजवजणें--कावेरेवावेरे होणें, संशय येणें; रुजूं--सरळ, खरें असेल तें; व्यावृत्ति--मूळ कवीला 'व्यावर्ती' असें म्हणावयाचें आहे. व्यावर्त म्ह. भ्रमण, चित्त चंचळ होऊन वृत्ति भ्रमिष्ट झाली आहे असा भाव; सुगर—चतुर; वाणमदन—मदनवाण, मोगऱ्याची एक अति सुवासिक जात; जळमळुन—आंतलें पाणी डळमळून वाहेर सांडेल इतका कांठोकाठ भरलेला; पिसुन—पिसून, पिळून; अंगुष्ट चरणरज—चरणांगुष्टरज.

* * *

## लावणी १६ वी

ही मजा कांहिं उमजा, घेऊन मज निजा,
सख्या, जिव माझा तुमचेपाशीं ।
राजसा ! अधांतरीं कसा देउन भरवसा पाडितां फाशीं ।।धृ.।।
तुम्ही शिरिमंत, मी गरजवंत असतां जिवंत आजपर्यंत मला राखलें ।
स्नेह सबळ झाला सफळ, केवळ हें अमृतफळ चाखलें ।
अमळसे वसा निवळसे, धरा जवळसे, लहानसें मी माणुस धाकलें ।
नावडे मी, कोण आवडे ? येवढें मन तिकडे फाकलें ।
जननीति रीतिच्या स्थिती, सांगु तरी किती ? असे हे प्रीतीचे दाखले ।
शिव शिव शिव शिव ! म्या कधीं वचन मोडून टाकिलें ? ।
अंतरची खोटी नव्हे । जिवलगा
जें द्याल मला तें हवें ।

झुळ झुळ नवतीजळ नवें । जिवलगा ।
मी रतलें तुमच्यासवें ।

अबळा आम्ही निर्बळा,भाव मोकळा,लाऊनिया ळळा गळा कापशी ।।१।।
लाभला लाभ हा मला, गुलाबी फुला, तुला ठाऊक मी पहिलेपासुन ।
धिर सुटे, मोठें भय वाटे, कुठें खोटेंपण आलें दिसुन ? ।
हा समेट कर,या नेट (काया नेट ?) होईना भेटखेट येका गांवामध्यें असुन ।
आवडि मी धरिते गडी, तुम्ही घडि घडि घडि वसतां रुसुन ।
धावली भली सावली, आस लावली, आलि ही भरजानी मुसमुसुन ।
या मुखें कौतुकें सुखें, मुके घ्याहो गालाला डसुन ।
कशि बोलूं म्हणुन लाजते । जिवलगा ।
अर्धांग वेश साजते ।
वेळ पळ पळ मोजिते । जिवलगा ।
मर्जि प्रसन्न योजिते ।

सजणा ! लोचना जना, विषयभंजना, विनाकारण कां संतापशी ?।।२।।
वरकशीं उतरले कशीं, मीच एकशी, आतां काशी अर्ध्या जाळें सोडितां ?।
मी आटले, पिटले, विटले, कष्टले, दुःखदिवस काढितां ।
हें हसें जनामधिं दिसे, वळाच्या मिषें, कसे विनअन्याई दंडितां ? ।
शशिप्रभा दिसे कोणी सुभा, वल्लभा, चतुर सभापंडिता ।
ग्राहिका ! नया करूं हिका माझे आयका, हे नरनायका सगुणमंडिता ! ।
अशि गहिरा तरतरा मिळेना खरा पुरुष धुंडितां ।
घरच्यावाणि पाळलें । जिवलगा ।
उणें पडतां संभाळलें ।
उघडें देखुन डाळलें । जिवलगा ।
ममता वियोगें वाळलें ।

मनोरथा सकळ सारथा ग्रंथभारता वृथा मजवरतां आरोपसी ।।३।।
मी अशी स्वकायानिशी मिळाले तुशी, कां रे माशि रुसशी रागें भरून ? ।
कर्वती शरीर रतीरति, जिती तुजवरती जाते मरून ।
कंठिची माळ सांभाळ, नका घेउं आळ, ढाळ मोत्याचा येईना फिरून ।
नित येते, जाते, पाहाते, तुला शिर हातें वाहाते चिरून ।
हासते, कधीं रुसते, संग सोशिते, गोष्ट मी पुसते पदरीं धरून ।
या नव्या नव्या पाहाव्या, हव्या त्या बहारा घ्याव्या करून ।

कोणितरी पाहिलें पुढें । जिवलगा ।
दाखविलें पद येवढें ।
**होनाजीबाळा** म्हणे गडे । जिवलगे ।
स्त्रीधर्म तुझा आवडे ।

आलें घडून, गेले पाईं जडुन, कल्पना
मोडुन, अडुन धरि, पडुन जाहले पिशी ।।४।।

वरकशीं उतरले कशीं मीच एकशी—वरकशी म्हणजे स्पर्धा, चुरस, भांडण वैर. उतरले कशीं–म्हणजे कसोटीला उतरले. एकशी–म्ह. एकटी, एक. भावार्थ–मी व तुझ्या इतर प्रियकरणी यांमध्यें तुझ्या कसोटीला कोण उतरते या विषयीं स्पर्धा सुरू झाली, तेव्हां अखेर मीच सरस ठरले; कसोटीला उतरले. ग्राहिक—गिऱ्हाइक; नया करूं—नये करूं, करूं नये; हिका—हेका; तरतरा—तरतरीत. डाळणें–झांकण घालणें. उघडे देखुन डाळले–मी उघडी पडलें तेव्हां पांघरूण घातलेंत. भावार्थ माझें कमी पडलें तेथें तें पुरविलेंत. मनोरथा सकळ सारथा—माझ्या सकळ मनोरथांचा तूंच सारथी आहेस, भावार्थ–माझ्या सर्व इच्छा पुरविणारा तूंच आहेस; आरोपसी—आरोप करतोस; कर्वती शरिर रतिरति–कर्वतीवर घातल्याप्रमाणें शरीर तुझ्या विरहानें रतिरति तुटलें जात आहे. ढाळ—तेज, मोत्याचें पाणी.

* * *

## लावणी १७ वी

याहो याहो घरिं, मला दिस पर्वतवत् जाती ।
जळो जळो हा चांडाळ विषय घडिघडि छळतो रातीं ॥ध्रु॥
कंठिच्या तायता, आयता स्नेह झाला
दुःख वणवा पेटतां कृपारस जणुं पाऊस आला
दिलि पदराला गांठ प्रीतीची, नको विसरूं माला
उभी राहते सेविका अपलें शिर घेऊन हातीं ॥१॥
जन्मापुन अजवर जिवलगा तुझ्यापसीं निजलें
लावुन मधेचें बोट मला कां आडरानीं त्यजिले ?
दगडावर हिरकणी घाशितां देह तैसे झिजले
वाट पाहतां गजबजले, माझी धडधडते छाती ॥२॥
येकांतीं घाबरी होतसे, नित अठवण करितां
जिव धरिला म्या मुठींत, पाहतों नारायण वरता
चांदाविण यामिनी तशापरि कांहो दुर धरितां ?
पळ पळ होते अधिरता, पांची प्राण जाउं पाहाती ॥३॥
चतुराला खूण येक असे, कांहीं चित्तामधें आणा
पायावरता स्वच्छ ठेविते हात, वाहते आणा
सुखदर्शनसंगमीं भोगिला मग मोतीदाणा
**होनाजी बाळा** म्हणे, गुणाच्या दुर गेल्या ख्याति ॥४॥

उभी राहते सेविका—सेविकेसारखी उभी राहते; मधेचे--मधाचे. 'मध हा शब्द स्त्रीलिंगीहि वापरतात; दगडावर—कसोटीच्या दगडावर; यामिनी--रात्र

* * *

## लावणी १८ वी

जिव तिळ तिळ देते सख्या तुसाठीं ॥धृ ॥

शुध्द भाव माझा, पाईं प्रीत पणाची
भरवयां आलि नवती पहिल्या शिणाची
सय घडोघडि होते तुमच्या गुणाची—समयानें गांठी ॥१॥
अढळ पुण्ययोगें आपल्या गड्या या पडाव्या
भगीरथ यत्न आमच्या तुमच्या गोष्टी घडाव्या
आतां उभयपक्षीं पुरत्या ममता जडाव्या—जेउं एकताटीं ॥२॥
तुझ्या भेटीसाठीं मोठी घार होते मी
आडजुड ठाइ ठाइ उभी राहते मी
दिसामधुन लाखो वेळ मुख पाहते मी—लागते पाठीं ॥३॥
हार कंठिंचा मी म्हणते प्राण जिव्हाळा
आधिं घेतला हो, येवढा भार सांभाळा
नित्य जवळ गाणें गाती **होनाजी बाळा**—बरी साधी धाटी ॥४॥

तुसाठीं--तुजसाठीं; पणाची--प्रतिज्ञेची; पहिल्या शिणाची--नव तारुण्याची; समयानें गांठीं—मी समय म्हणजे संधी साधून तुम्हांस गांठते; गडि--जोडी, गाठी. 'गड्या' हें गडिचें अनेकवचन; घार होतें—घार जशी सावजावर अत्यंत वेगानें अकस्मात झडप घालते, त्याप्रमाणें मी तुला भेटण्यासाठीं आतुर असतें; आडजूड होणें—हात जोडणें, नम्र होणें, शरण जाणें; धाटी—चाल, धाटणी, स्वररचना.

* * *

## लावणी १९ वी

तुझि तुझि किती म्हणुं ? सख्या, मजवर कां रुसशी ?
खरें लटकें किती पुसशी ? ॥धृ॥
प्रीत घडली तुझी माझी तेव्हां सुख विशेष जाहलें ।
आतां हे दिवस कसे आले ? ।
प्रत्यक्ष शिर कापलें तरी मी कांहीं न बोले ।
तरी कां मग देतां झोले ? ।

वेळ अवेळ नाहीं म्हटली निजनिजतां मेलें ।
असे अर्जव तुमचे केले ।
तरी म्हणतां ही लटकी
रुसतां घटकाघटकीं
भोगित फिरतां बटकी
विषयचतुर नेटकी, खरा मम प्रियकर असशी ॥१॥
बहुता दिवशीं भेटले तुला, आनंदमय दोघां
जसा पुर गंगेच्या ओघा ।
कधीं येशी घरीं, कधीं नाहीं, रस नवती भोगा ।
सख्या, तूं वळवाच्या मेघा ।
अळमळित भाषणें मशिं काशि करितां सांगा ।
जशा पाण्यावरल्या रेघा ।
तिनतिनदां घरीं येतें
लागल तें मी देते
माया लावुन घेते
मनामधें चिंतितें तुझी लागली असोशी ॥२॥
पहिल्यानें चांगलेपणीं रत झाला शेजे ।
आतां कसें वाइटपण साजे ? ।
त्रिविध लोक बोलती मला, तुम्हि घरचे राजे ।
ढोल हा दोहिकडे वाजे ।
फार दिवस भोगिल्यावरी जड वाटे ओझें ।
चालवा घरीं बसल्या माझें ।
उठतां, बसतां स्मरतें
मन फिदा तुम्हांवरते
जेव्हां जें हवें तसें करतें

वरवरते मोहुन माझी पाहातां कसोशी ।।३।।
आजपावेतों निभावलें, आतां कशी सोडूं ? ।
नका हो धड फडकें फाडूं ।
प्राणाची संगतिण तुझ्या, किती ममता जोडूं ? ।
दिनाभरि केवढा वेळ आरडूं ? ।
जें विधिनें भाळीं लिहिलें तें कैसें खोडूं ? ।
उभयतां मन संशय तोडूं ।
निश्चय माझा पाहणें
निर्मळपणीं हो राहणें
मी वेडी, तुम्ही शाहणे ।
**होनाजी बाळा** म्हणे, प्रीतिची नित्य वर्दळ सोशी ।
तरि जगीं धन्य सखे होशी ।।४।।

बटकी—दासी, कुळंवीण; अळमळित—पांचट; जशा पाण्यावरल्या रेघा—पाण्यावर काढलेल्या रेघोट्या जशा अशाश्वत असतात तशीं तुझीं वचनें किंवा आणा-शपथा भासतात; असोशी—तीव्र ओढ; ढोल—भावार्थ-लौकिक किंवा दुर्लौकिक; कसोशी—परीक्षा, कसोटी.

* * *

## लावणी २० वी

वृद्धि लोभाची करित जा, मी जाहले राजी ।
घरीं येउनया नवती भोगावी माझी ।।धृ०।।
याल केव्हांसे उभी राहते द्वारापशीं ।
चहूकडे पाहते, लाविते दृष्ट मार्गाशीं ।
अंगाशेजारून हटकरून खेटून जाशीं ।
तेव्हां मज वाटे, आज न्यावा तुला घराशीं ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २७७७६ वि: ...
नों: दि: ३०/७/...

आराधुन केलें गत जन्मीं साम्ब शिवासी ।
तयाचें देणें या जन्मीं आलें दैवासी ।
लुब्धलें तुम्हां इतुकी
मी तर कामातुर भुकी
स्नेहें वरिष्ठ तुमची सखी
मुखानें आणखी गुण तुमचे नित्य नवाजी ॥१॥
तुम्हाला सोडुन कशी राहीन आदांची ( ? ) ।
प्रीत ही दिसते वळकट ऋणानुबंधाची ।
शरिर पातळ, मी जशी नाजुक साय दुधाची ।
मुखावर शोभा टवटवते विषयमदाची ।
नको मज पैका, मी शिरिमंतिण सदाची ।
गुणावर मरते, स्मरते त्रिकाळ तिंदाची ।
काय काय गुण आठवूं ?
पोटांत किती साठवूं ?
बोलाऊं कोणा पाठवूं ?
नका मन ठेऊं परकीवर, तुम्ही मिजाजी ॥२॥
जनामधें साऱ्या मी विकते तुमच्या नांवें ।
बहुत श्रम केले, हें तरी मनांत आणावें ।
दिल्या वचनाला मग लटकें कां हो म्हणावें ? ।
दिसोदिस आगळी प्रीतिची रीत दुणावे ।
सोशिल्या जखमा देह झिजवुन अपल्या भावें ।
वर्ततां ऐशी ती नार अढळपद पावे ।
कोणता पुरुष तरी असा
देइल पुरता भरवसा
नेहमींच मजपाशीं बसा

प्रीतिच्या हंसा, खेळा हो सोंगटीबाजी ॥३॥
फिदा तुजवरती, जशी नागिण झापा घाली ।
येकांतीं रमते रात्रींची आनंदाखालीं ।
हातीं कर धरते, नेते तिसरे ताळीं ।
धीर धरवेना, सुटले मदनाची कुलाली ।
औक्ष माझें सर्वच तुझ्याच हवालीं ।
किती समजावुं ? वेड्याची आतां गत झाली ।
आळ घेऊन पडते गळा
कस्तुरीच्या परिमळा
चालिव रे माझा लळा
**होनाजी बाळा** म्हणे, भेटत जा तिनसांजी ।
निरंतर भोगुं गुलानार नवती ताजी ॥४॥

नवाजणें—नांवाजणें; मिजाजी—अभिमानी, लहरी, गर्विष्ठ; दिसोदिस—दिवसेंदिवस; आगळी—अधिक; सोंगटीबाजी--सोंगट्यांचा किंवा चौरसबाजीचा खेळ; ताळ--मजला; कुलाली--कुलुली, आवेग; आळ घेणें--आळी घालणें, मिठी घालणें; गुलानार नवती--डाळिंबाच्या फुलासारखी. गुलानार म्हणजेच गुलनार किंवा गुले आनार. त्याचा अर्थ डाळिंबाच्या फुलाच्या रंगाची असा आहे.

* * *

## लावणी २१ वी

मी तर तुमच्याजोगी ।
नित मजला भोगी ॥ धृ० ॥
तुम्हीं तर शिरिमंत राजे । सौदागर माझे
रुप लावण्य विराजे । अशी कांता साजे
गुणमंडित गुण गाजे । ज्यां ज्यां नौबत वाजे
आज वसले अर्धांगी ॥ १ ॥

करिते आदर आदराणा । जिव घ्या नदराणा
तूं नगद माल किराणा । प्रियकर पतिराणा
कां पोटाशीं धरा ना ? । मन शांत करा ना
मी झाले इतरागी ॥ २ ॥
शिरिं जरि हिरवा फेटा । हिरवाच दुपेटा
भर मदनाच्या लाटा । आवडसी मोठा
आवळुन मजला भेटा । मुख माझें चाटा
निसंग जाहले जोगी ॥ ३ ॥
मजवर लोभ असावा । कधीं राग नसावा
ममताघन वर्षावा । संशय निरसावा
कमानिला तीर कसावा । घट्ट जवा बसावा
**होनाजी बाळा** रागीं गाती सारंगी ॥ ४ ॥

सौदागर--व्यापारी, येथें अर्थ गिन्हाईक किंवा भोगणारा, भोग्या; आदर आदराणा--आदर सन्मान; नदराणा—नजराणा; किराणा—उंची, बहुमोल; इतरागी—वीतरागी, उदास; दुपेटा—शेला; जोगी–जोगीण, बैरागीण; कमान--कमठा म्हणजेच तीरकमठा; जवा—सांधा किंवा जोड.

* * *

## लावणी २२ वी

जवळ बसा चिकटून, कां हो दुर दुर जैसे पाहुणे ।
आज फारा दिवसा जाहलें येणें ॥ धृ० ॥
दिवसरात्र जातसे जिवावर चळ भरल्याचे परी ।
आठविते गुण तुमचे परोपरी ।
फुरफुरती कुच उरीं, दाटली तट चोळी कोपरी ।
शरिरामधें भरली कांपरी ।
नका लावुं सरसगट, बरोबर नव्हे पांच खापरी ।

किती सांगावें याउपरि ? ।
कोणाला नकळतां हळुच पाठविते बोलावणें ॥ १ ॥
मर्जिचा कल बघुन, आपला पाय मिउन टाकिते ।
जपुन भिडमर्यादा राखिते ।
उभी राहुन खिडकींत, घडोघाडिं सखा सखा घोकिते ।
तुझ्या वाटेकडे अवलोकिते ।
नाही ताठ्याची गोष्ट कधीं, मृदु मेण जशी वाकते ।
पदर लावुन हासते, खोकते ।
नित्यनेम दर्शनाविण मज हें अन्नपाणी उणें ॥ २ ॥
नाहीं जनाची आशा, पुढें म्या जीव ठेवला रोकडा ।
आतां कां शब्द तुझा वाकडा ? ।
विषयानळें संतप्त, जसें नवनीत कढे कडकडा ।
दोर हा वावडिचा आखडा ।
गोड वाटे शेजार, फार सकुमार पुरुष फाकडा ।
कालपी साखरेचा खडा ।
पर्जन्याविण भुमी तसे व्यर्थ काय माझें जिणें ॥ ३ ॥
मला अंतरचा नाभिकळवळा, निधी केवळ शांतिचा ।
जाडित चंद्रहार येकांतिंचा ।
येक पळ पळ कर्मिते लागला निजध्यास खंतिचा (?) ।
असावा लाभ मला पंगतीचा ।
आंतबाहेर सारखी, नव्हे लोका परलोकांतींचा
करा सुखसोहळा शिरिमंतीचा ।
**होनाजी बाळा** म्हणे, तुला वाखाणी सारें पुणें ॥ ४ ॥

कांपरी--कांपरें, कंप; पांच—रत्न; खापरी--खापराचा तुकडा; याउपरी—यापेक्षां अधिक; अन्नपाणी उणें—तुझी गांठ पडली नाहीं, तर मला अन्नपाणी

जात नाहीं; आशा--पर्वा; जनाची आशा--लौकिकाची पर्वा; पुढें म्या जिव ठेविला रोकडा—तुझ्यापुढें जीव काढुन ठेवला आहे; वावडी—मोठा पतंग; कालपी साखरेचा खडा–जुन्या काळीं काल्पीची खडीसाखर अतिशय प्रसिद्ध असे; मला अंतरचा नाभिकळवळा--बेंबीच्या देठापासून पोटतिडीक आहे. कर्मिते—क्रमिते, कंठिते; निजध्यास खंतिचा—निजध्यास सख्तिचा म्हणजे सक्तीचा, म्हणजे जोराचा असें तर नसेल ? आंतबाहेर सारखी नव्हे लोका पर-लोकांतींचा—आंतबाहेर मी सारखीच एकनिष्ठ आहे. एकांतांत व लोकांतांत फरक असा कांहींच नाहीं.

* * *

## लावणी २३ वी

दिला दिला जिव दिला तुम्हांला, नका मला विसरूं ।
कठिण कदर ही नदर, पदर किती एकंदर पसरूं ? ।। ध्रु.।।
धरा उराशीं जरा सुंदरा, कर्दळीच्या कोंबा ।
चक विषय जाचला, मला तुम्ही बेलाशक झोंबा ।
नव्या नव्या वैभवा वाढवा अंतरींच्या लोभा ।
गुणप्रविण हिण अहिण ( ? ) तुम्हांविण काय माझी शोभा ? ।
आधिक अधिक अति अधिक सुगंधिक जणुं चंदनगाभा ।
गबर जबर दिसे अमर उमर भरनवतीच्या खांबा ।
कां धरितां दूर मुखासी ?
निष्ठुर वृत्ति मजवरसी
निजते अंगासरशीं
हें विषयदु:ख मी श्रमलें या संसारीं–साहतां ।
दुष्काळ भेटीचा कुठें बाहेर परभारी–राहतां ? ।
आनंदभरित रूप तुमचें लोचनद्वारीं–पाहतां ।
स्वत: लागता पता (?) उभयतां मग मागें न सरूं ।। १ ।।

सुगर आगर गुणनागर सख्या तूं सुखसागर बरवा ।
आंसंनीं, शयनीं, भोजनीं, जनीं, मनीं आस माझी पुरवा ।
दिशिनिशि कशी दुरशी, अशी काय अन्याई ठरवा ।
उदित विदित भरविदित सदोदित नित मागें फिरवा ।
असे नसे, कसें बरें दिसे ? तुप साखरेला जिरवा ।
हसुन, बसुन, घ्या कसुन, रुसुन, मग मजपासुन दुर व्हा ।
दिस वहाराचे जाती
रसरस करिते छाती
तळतळ तळते रातीं
लागलें ध्यान, अवधान सुचेना कांहीं—त्रासले ।
हें कायापुर चैतन्य शरीर तव पाईं—वासले ।
सापडलें अयाचित रत्न हातीं लवलाही—असलें ।
ठसले, वसले, गवसले, विमानीं बसले, कशि घसरूं ? ।।२।।
फण फण फण फण फणी मदनविंचू मारी फणका ।
सण सण सण सण सणाट निघतीं विषयाच्या शिणका ।
टण टण टण टणा लागला सर्वांगीं ठणका ।
दण दण दण दण दणाणी जीव करितो दणका ।
खण खण खण खणीत देतसा जरबेचा खणका ।
घण घण घण घणोर लक्ष्मी, मग घ्यावें ऋण कां ? ।
मद्हृदयांतरिं साक्षा
कर धरिला ज्यापेक्षां
शिकले तुमची शिक्षा
कल्याणसमुद्रा ! शुरसत्वामधें आगळा—भासशी ।
सर्वत्र प्रकाशित चंद्र उगवला सगळा—दिसशी ।
भोगुन भोग अली त्या कर्मा वेगळा—दिसशी ।

हशी खुशी पशी (?) मजविशी हा मायापूर नका विसरूं ॥३॥
हालखि तलखि इतकी, मस्तकीं कामानळ चढला।
न ढळे न वळे, ना कळे, आळेंवळें मदकुंजर अडला।
घरिंदारिं, कांतारीं पक्ष धरितां दुसरीकडला।
अंगरंग नि:संग संग मज तुमचा आवडला।
रहा, च्याहा, सुख साहा, पहा हा स्नेहसंग्रह घडला।
निजा, पुजा, मज भजा, माल ताजा पदरीं पडला।
आटआटवुन खिर अळली
एक वर्ष मनें मिळलीं
संकटवेळा टळली
भावार्थप्रवाहीं ही मुक्ती झाली मजला—दर्शनें
नाहीं केली अवज्ञा, देहे काष्ठापरि झिजला—घर्षणें।
**होनाजी बाळा** म्हणे, प्राण तुझ्या गडे रिझला—भाषणें।
जिणें उणें साधणें वोधणें येक्या पणें आचरूं।
वारंवार विचारसार हा स्वजनामधें विचरूं ॥ ४ ॥

गुणप्रविणाहिण इ०--भावार्थ—मी कितीहि गुणप्रविण म्हणजे गुणवान असले तरी तुमच्यावाचून मला शोभा किंवा किंमत नाहीं; हिण—हीण. नाण्यांत लोखंडादि क्षुद्र धातु घालतात तीं. ती घातल्यानें नाण्याला नाद येतो; अहिण—लोखंड; पता—पत्ता; दिशिनिशि—कवीला निशिदिनीं म्हणावयाचें आहे; दुरशी—दूर धरलेली, अव्हेर केलेली; अन्यायी—अपराधी; भरविदित—भरररयांत; बिदी--रस्ता; साक्षा—साक्ष, विश्वास; अली—भ्रमर, भृंग; भृंगा जसा फुलाचा उपभोग घेऊन पुन्हां नामानिराळा राहतो तसा तूं आहेस; हशीखुषी--थट्टामस्करी; कांतारीं--अरण्यांत.

* * *

## लावणी २४ वी

नको नको नको नको सख्या शंभरदां छळूं।

संग अता सोसेना, शरिर जणुं दुखतें जैसें गळूं ॥धृ०॥
साजुक नाजुक नवा हवाशिर वय बांधा नेटका ।
मुख माझे चुंबितां नका हो लाउं हलकडीला धका ।
बळें बळें बांधिता बळानें बळें माझि मोट कां ? ।
कठिणकर्म हें वर्म किती सांगूं ? विषयपाठका ।
निजानिजतां आग जाहली, घेउं द्या पाण्याचा घुटका ।
विशेष हाल होतात, करा लौकर येथुन सुटका ।
हात लाउन तोंडास पुरे पुरे असें म्हणते हळुहळु ॥१॥
गौर पान केळिचें, तलम तारुण्य निघालें नवें ।
शीतळ नितळ पातळ देह, निर्मळ रूप माझें आनवें ।
केवळ निवळ रायवळ आणिक वनछोडसारखी नव्हे ।
सुरतशास्त्र हें, घाय सोशितां जिव जाइल हो जिवें ।
वसनकुंचुकीरहित पाहतां अंग माझें नागवें ।
मग थरथर कांपते, तशिच निजते मायालाघवें ।
खुडुं आले हात पाय, प्रहरभर केवढा वेळ तरमळूं ? ॥२॥
लाखरूप ये, येकरतीं खरात्री मालाची करुं नये ।
मजपेक्षां तुम्ही दुप्पट, लापटपणीं येवढा वेळ ठरूं नये ।
मी बायको आहे ठिसुळ, जागोजागीं आडवुन धरुं नये ।
उंच मोलाची शाल तिला चुरचुरुन पांघरूं नये ।
सोडुनि सोपे मार्ग, अमार्गीं काट्यामधिं शिरूं नये ।
जी कामाला आली, तिला सर्वकाळ विसरूं नये ।
उशी सरली डोइची, वाकडीतिकडी नका आवळूं ॥३॥
गात्रें गेलीं विटुन, सकल संधी जाल्या मोकळ्या ।
तुम्ही अपल्या छंदांत, खालत्या मी देतें आकळ्या ।
पुष्पें सुकलीं, सारि दडपली शेज, उत्रेल्या कळ्या ।

कुसमडले हार गजरे, विखुरल्या भवताल्या पाकळ्या ।
मृदुजागा टेकतां स्तनांवर दाबुन कोपरखळ्या ।
केलें ललित, शेवटीं निवाल्या प्रेमाच्या उकळ्या ।
**होनाजी बाळा** म्हणे, उभयतां ज्ञानदीप पाजळूं ।
तूं आमची खेळणी, नको गडे क्रियमाणाला टळूं ।।४।।

हलकडी—नथेचे लोंवते मोती किंवा नथीचा आकडा; आनवें—अमोलिक, सर्वोत्कृष्ट; वनछोड—एक उंची आंब्याची जात; चुरचुरून—चुरगाळून; संधी—सांधे; आकळी—आंकडी; उवेल्या—उवून गेल्या; कुसमडणें—म्लान होणें, कुस्करून जाणें; खेळणी—खेळगडीण; क्रियमाण—कर्तव्य;

* * *

## लावणी २५ वी

हा मिठा नवतिभर लुटा, उठवितें उठा, उशिर जाहला ।।धृ०।।
वाचवा प्राण लाघवा ( ? ), दिवस पांचवा, आज मी नाहाले ।
बोधितां, लक्ष वेधितां, करून सिद्धता एकांतीं आलें ।
धरिते पाय, द्यावा ठाय, असे अन्याय काय तरि झाले ? ।
वालाग्र मात्र संशय नसता ठेविला
घेतला हट्ट जो तो पदार्थ देविला
नाना प्रकार आजवर प्रसंग सेविला
पावला, देव धावला, परिस घावला, घेतला लाहो ।।१।।
हो हे ( ? ) डाग लागली, अंगविषय महा वाघ लागला पाठीं ।
गरगरा पाहतां भिरभिरा अले परघरा मि तुमचेसाठीं ।
मुकवितां मला दुखवितां, कसे चुकवितां लिखित ल्लाटीं ? ।
हा सिद्ध योग, मी दुर्धर तप वर्तले
सर्वांगीं शुद्ध, पदिं लोटांगण घातलें
शिखर नयनीं जणुं पाहतां मन शांतलें

गुंतले, हें फंल जिंतलें, काय चिंतलें ? माशिं त्रोला हो ।।२।।
ऋतुव्रहर. चालिलों प्रहर, जसा विष जहर, डोम शरिराचा ।
करुं कसा धीर करुं ? कसा शीण हरुं ? कसा मदन कहराचा ।
आटतों, कंठ दाटतो, तेंव्हां वाटतो समय वैऱ्याचा ।
अपरात्र जाली तळमळ करिते उठबशा
कामांत अतुर हा जीव घाली धापशा
परदु:ख शितळ या तुमच्या गोष्टी अशा
घ्या निशा, नका करूं दशा, राग तर कशावरून आला हो ? ।।३।।
मशि आंढा कां हो येवढा ? देतसे विडा, आतां समजावें ।
मी पुढें आडवी पडे, विरह साकडें कांहिं उमजावें ।
शेवटीं व्यापिले मोठी, अशा संकटीं कसें गांजावें ? ।
उभयतां मिळाला मग संगम छातिचा
जाहला शितळ मायानळ त्या धातिंचा ( ? )
**होनाजी बाळा** म्हणे, धन्य भाव हो तिचा
शर्तिंचा पूर भरतिचा, मोहज्वर तिचा सुखी धाला हो ।।५।।

मिठा—मिठ्ठा, गोड; जिंतले—जितले, जिंकले; धापशी घालणें--धापा देणें; घ्या निशा--निशा-खात्री, खात्री पटवून घ्या; आढा-आढीं; शर्तीचा-जोराचा.

* * *

## लावणी २६ वी

दैवानें गांठ जणुं पडलि देवभक्ताची ।
तोडाल प्रीत तरि आण माझ्या रक्ताची ।।धृ०।।
पहिले दिवसापसुन लागला चटका ।
काय सुख सांगावें, ही सोन्याची घटका ।
सकुमार लगी मी केवळ, तुं जरिपटका ।
लागेल गरज त्या काळिं मला तुम्हि हटका ।

मारितां हतावर हात, न व्हा लटका ।
जाउं द्या निघोन, आला रागाचा झटका ।
नेटका पुरुष चंद्रवर्ण ज्ञानी, पूर्ण स्वरूप सापडलें ।
छळितात, तस्करी तारुण्य आचरतां पुण्य पाठिशीं दडलें ।
साऱ्या गोष्टीला होय, अवघी सोय करून गळिं पडलें ।
वाढले दोन कुच नाजुक हृदयावरती–टवटवति ।
जाहले वयस्कर आतां अंगिं फुरफुरती–नवि नवती ।
निर्लज्याधिर होउन जिवलगा फिरती–तुजभवती ।
घरगुती मिठाई, पहा नव्हे वित्ताची ।। १ ।।
एक लेशमात्र कांहीं अन्याय न घडतां ।
नवरत्न हाराला जडले कां हो विघडतां ? ।
झिजलें मस्तक रात्रंदिवस पाया पडतां ।
करकरून विनंत्या दमले कान उघडितां ।
बोलतां नये, मजला शब्दांत पकडतां ।
शेजारीं हिऱ्याच्या पाच शोभली जडतां ।
भिडभिडतां तेव्हां अवकाश करून, सावकारा, करिते अर्जी ।
ईश्वरकरणी नाकळेकृपेच्या वळें प्याद्याचे फर्जी ।
हा संगयोग सर्वाहि, कसें तें दहि दुधाला विरर्जी ।
निष्ठुर मर्जि तरी कशावरून मजवरती–ठरवावी ।
लाविलीस लग ती अतां जनांमधें पुरती–मिरवावी ।
घर पुसत अलेली वस्त, कां हो मग दुर ती–करवावी ? ।
पुरवावी निरंतर आशा विषयसक्ताची ।। २ ।।
अलभ्य लाभ हें माझें वचन सकारा ।
अहो प्राणसख्या, मम सौख्याच्या अधिकारा ।
वर्तल्या प्रीतिचा ताळेबंद अकारा ।

अनमान नसावा माझ्या नांवरुकारा ।
ब्रह्मज्ञ, चतुर, स्वत्‌सिद्ध सुजन साहकारा ।
सायासि मिळाला, नव्हे जिन्नस नाकारा ।
अकरा बारा वर्षापुन सेवा जपुन दशा लोटिते ।
खोटसाल मायाजाल तुंबला गाळ, कळ घोटिते ।
हर्षामधें असतां इथें, जातसा जिथें तिथें गांठतें ।
कठिते काळ मी त्रिकाळ तुमचे द्वारीं—अर्जवितां ।
भागले नवस करकरून, देव वेव्हारीं—माजवितां ।
बोलुन भाषणें नानापरि वेव्हारीं—लाजवितां ।
उभयतां जन्मपत्रिका कोण्या वक्ताची ? ॥३॥
पदरच्या दासिचा संशय कां हो पडावा ? ।
सार्थकीं देह तुमच्या पदकमळीं जडावा ।
कार्यास हात घालुन मग कां काढावा ? ।
येकांतीं कसा माझा शालु फेडावा ।
स्नेह शरण आल्याचा काय म्हणुन तोडावा ? ।
मजविषयीं सकळ मळ गंगाजळिं सोडावा ।
वाढावा कायावृक्ष, नका करूं रुक्ष दया मजवरली ।
निजनिजतां जाहले धीट, कराग्रिं घट्ट पाउलें धरलीं ।
पद शिवतां तो श्रीराम सगुण निष्काम शिळा उद्धरली ।
भराळि नौका उंच माल पैलतीरासी—उतरा जी ।
मी हजीर असुन तर कां करितां गुणराशी—इतराजी ? ।
जाहले परस्पर त्या कमळण भ्रमरासी—चित्त राजी ।
**होनाजी बाळा** म्हणे, कर मक्ता उक्ताची ।
लागेल द्रव्य तें घे, हुंडि नक्ताची ॥ ४ ॥

लग किंवा लगी—निशाण. सैन्यांत किंवा स्वारींत लगी व जरिपटका अशीं

दोन निशाणें हमेशा असावयाचीं; न व्हा लटका—लटके होऊं नका, खोटें ठरूं नका; तस्कर—चोर, दरोडेखोर; निर्लज्यधिर-निर्लज्य आणि अधिर; बिक्ताची-बाजारची; कान उघडितां--कानउघाडणी करतां करतां, बोध करतां करतां; अवकाश करून--दम खाऊन; सकारणें—मान्य करणें; ताळेबंद आकारा--भावार्थ—माझ्या प्रीतीचें नफातोटापत्रक पाहून मी तुमच्याशीं कांहीं बेइमानी केली आहे कां तें पहावें; रुकार—संमति; साहकारा—साह्यकाऱ्या; सायासिं मिळाला—श्रमसायासानें प्राप्त झाला; नाकारा—खराब, टाकाऊ; खोटसाल—खोटा, हिणाची भेसळ असलेले; कळ धोटिते—कळ सोशिते; मळ—किल्मिष, संशय; उंच--उंची; इतराजी—गैरमर्जी; मक्ता--करार; उक्ताची--सगळेच्या सगळे घेण्याची; नक्तावी हुंडी--रोखीची हुंडी, सध्याचा बेअरर चेक.

* * *

## लावणी २७ वी

चांगुलपण संपदा आशी सुंदर पाहुन झुरतों ।
उदास वाटे दशा, तुझी गडे करित आशा फिरतों ॥ धृ० ॥
चंद्रानन अतिस्वच्छ, उदय भर पुनवेची भरती ।
सौदामिनिसम साम्य प्रभा पडते भुमिवरती ।
हर जिन्नस हरभास विलासामधें शाहणि पुरती
त्रिजल्या नारी मोठ्या तुला पाहुन मागें सरती ।
डामडौल पिढीजाद, चाल तुझी हंसिणिची धरती ।
सापडशील ज्याजला सकळ त्याचीं दुःखें हरतीं ।
सुगराइचा सरसुभा, काय करशील न कळे करणी ।
केवळ किमयागर, कळा नसे शोधन करितां धरणी ।
व्हावें म्हणुन हें राज्य प्राप्त, कबुल जाहलों मरणामरणीं ।
सकाम संचारणी शितळ छाया वरती धरितों । १ ॥
नीट निकोप देह, सरळ झाड सोन्याचें वाढलें ।
मुख पाहतां औचिता चहुकडे दिसतें उजाडलें ।

रत्न अणिक पाषाण परीक्षिला नाहीं दडले ।
गोड, अंबट, कडु, तिखट ब्रह्मदेवानें निवडले ।
तुझा नाद लागला, दौलतीला पाणी पडलें ।
जन्मीं आल्याचें सौख्य तुला भोगणें हें आवडलें ।
भिडुं दे राउत मैदान, वाट मग होइल ती होउं दे ।
चांडाळ दर्द पापिणी, एकदां कर वरता ठेउं दे ।
नव्हें अमरपट्याचें जिणें, असें कांहीं चित्तामधें येउं दे ।
पिक पिकलें घेउं दे, सराइचा पाहारा सरतो ।। २ ।।
फार गोरी गुलगुलित, नयनें कमळें जशीं उमलती ।
शिताफळें इरसाल उरावर तसे जोबन हलती ।
बागाइत कळी कनक शेवति गेंद तर्र फुलती ।
तव प्रीतिच्या बळें साध्य हे गजतुरंग झुलति ।
नदर ठरो देइ ना, ध्यान चंचळ, डोळे भुलती ।
धनमालाची खाण, हातीं लागेल त्याची चलती ।
या अष्टसिद्धी नवनिधि हजिर होति एक्या वचना ।
नग नाग निवळ न्याहाळितां दिसे त्रैलोक्याची रचना ।
ता म्हणतां ताकभात इतकी समजावी सूचना ।
मुक्त मदन मोचना हा मोहोमय भ्रम अंतरीं भरतो ।। ३ ।।
शुभ लक्षण शुभवंत, शांत शोभा नवि नवाळी ।
देवगुणाची रास, नवट नागीण फिरे गव्हाळी ।
सुमनाक्षर प्रतिवचन मधुर शब्दाची मवाळी ।
एकांतिं भेटशील त्या दिवशीं आमची दिवाळी ।
विषयानलीं धडधडत काळजामधिं जिव्हा वाळी।
मन मिळल्याचे अधिं कोणाची करूं नये टवाळी ।
साऱ्याहुन आगळी वेगळी लबक वजनदार ती ।

अवघ्यामध्यें कुलकुला तुला शरिराची आर्ती ।
खडकीं कोंब फुटतील असा कधीं परमेश्वर सारथी ।
ज्या ज्या रितीं होशिल मान्य ते ते विचार करितों ।। ४ ।।
धरिली आलिंगुन तुला, अशीं रात्रीं पडती स्वप्नें ।
हीण पदमीण अप्सरा राधिका रंभा कुळदीपनें ।
मोहनामृत विश्रांत योजलों हे प्रपंचदीपने ! ।
गुणसरोवर जळ वाहे, सखे तूं कल्याण कल्पने ।
परमनिष्ट संतुष्ट सधन संतत सुभाव जपणें ।
अनीत आचरीत, अपरमित अघोर तप तपणें ।
महान यत्न संकटीं मिळालें गोत्र घटित वागतां ।
इच्छित फळ घरीं आलें, लाभलें, निश्चयलय लागतां ।
न वर्णवें संतोष, घोष तो शेषमुखीं सांगतां ।
**होनाजीबाळा** म्हणे, भोगितां चौऱ्यांशीं तरतो ।
मिठमोहऱ्या जिवप्राण दृष्ट तुझि घडिघाडि उतरतों ।।५।।

सुगराईचा--चातुर्याचा; सरसुभा--सुभेदारावरील अधिकाऱ्याला सरसुभा म्हणतात; किमयागर कला--किमयागराची जादू; दर्द--दुःख; सराइचा पाहारा--पीक कापून घेण्याचा हंगाम; इरसाल—उंची; गेंद--फूल, स्तन; गव्हाळी--गव्हाच्या रंगाची; जिव्हा वाळी—जिव्हा कोरडी पडते; कुलकुला—कुलकुल्ला, सर्वाधिकारी, सर्वश्रेष्ठ; सारथी—साह्यकारक; तुरंग—घोडा. अष्टसिद्धि—अणिमा, महिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाश्य, ईशिता, वशिता व प्राकाम्य; नवनिधी—कुबेराचीं नऊ भांडारें -पद्म, महापद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील व खर्व.

* * *

## लावणी २८ वी

धरिं चला, बोलाउं आले विषयभोगाला ।
सर्वस्वें जाहले अन्याय ते पोटीं घाला ।। ध्रु० ।।

दिवसानदिवस भर जातो भेटायाचा ।
करितसे आठव घडि घडि तुमच्या पायाचा ।
स्नेह आपला कोणे काळीं न तुटायाचा ।
पगदस्त जाव हा ठरला मुळ ठायाचा ।
बांधिला बंध देवानें न सुटायाचा ।
नाहीं बाण मारिला मागें उलटायाचा ।
बिनतोड जोड ही काय म्हणुन तरी त्यजिली ?
बेजरब पडुन गळिं अशी कंचितरी निजली ? ।
गळबलित काम, घामानें चोळी भिजली ।
रिझली नागिण झडप घालि जशी नागाला ।। १ ।।
लागले प्रीतिच्या मागें आचरणाला ।
घातली मिठी म्या बळकट या चरणाला ।
जोडा बरोबर, नित येते सुविचरणाला ।
शिर हजिर पुढें, मी नाहीं भीत मरणाला ।
सही झाले चित्त मिळालें मदहरणाला ।
मग योग्य नव्हे अंतर देणें शरणाला ।
शिरिमंत लोक तुम्ही शिरिमंतापाशीं राहतां ।
एक दुसरी असून घरिं, तरि तिसरीला चाहतां
धुळीवरिल सारवण, लटक्या शपथा वाहतां ।
सर पाहतांना लागेना जमिन स्वर्गाला ।। २ ।।
सत्क्रिया वचन मर्यादा कशी टाकावी ? ।
जी छायेखालीं आली तिला झाकावी ।
वियोगें लाही शरिराची लाज राखावी ।
एक ठायीं मिठाई, मधसाखर चाखावी ।
घ्या हो इरसाल आंब्याची कोय चाखावी ।

अंगिकार केल्यावर कां दुर झोकावी ? ।
येउयेउन पाहुन मुख, उभी राहुन मुसमुसते ।
नवतीच्या आगीमुळें जळे काळीज, धुसधुसतें ।
आज उद्यां कीं परवा याल कधीं, तें पुसते ।
वसते सन्निध शेजारीं गोष्ट सांगायाला ।। ३ ।।
ऐकावी स्वस्थपणीं माझी ही कानगी ।
आनंदरसामृतपुर पाहावी वानगी ।
तुट तुट न पडे अशी योजावी मला देणगी ।
मउ मउ घास घ्या मयद्याची पानगी ।
जन्मोजन्माची असावी मेहेरबानगी ।
खर्चास द्यावी पोत्यावर परवानगी ।
त्या श्रवणसुखानें मोहो अंतरीं पातला ।
रत जाहली उभयतां हा मजकुर आंतला ।
**होनाजीबाळा** म्हणे, गळ गांठुन घातला ।
गुंतला प्राण स्वरूपाच्या व्यासंगाला ।
सृष्टीच्या नारी तव घ्याव्या पासंगाला ।। ४ ।।

आठव--आठवण, स्मरण; पगदस्त--पक्का, बळकट; कंचीतरी--कोणीतरी; सही झाले--मान्य, कबूल झाले; सर--तुल्यता; कानगी--कानगोष्ट, वानगी--नमुना; पोतें--खजिना.

* * *

## लावणी २९ वी

सरल्यावर ही गरज सहज, वैद्याचें कारण नसे ।
तसे मशीं जिवलगा जाहला पाठमोरे कसे ? ।।धृ०।।
ब्रह्महृदय जाणुन जवळ पायासन्निध पातले ।
दिसतें मन माघारें, आतां कां आळसावर घातलें ? ।

कामक्रोध षडरिपु दुष्ट शरिरामधें मातले ।
अपेक्षित इच्छिते हेत पुरवावे चित्तांतले ।
सुस्थळ जागा पवित्र पाहुन मी नि:संग राहातले ।
सुख द्यावें दुसऱ्यास, हित पहा मुळ शोधुन आंतलें ।
वाटीभर दुध पिऊन शेवटीं पात्र रिकामें जसें ॥१॥
रात्रीचा दिवस करून बदलल्यातर ही गोष्ट साहिली ।
तेव्हांची ती गेली जशी मृगजळगंगा वाहिली ।
लइ लालुच दावुन, हळुच मज फुस लावुन मोहिली ।
धरून हतिं नागीण, प्रीतिची वरि वेसण गोविली ।
एक म्हणतां दहा उभ्या, कोणती तरी त्यांतुन चांगली ? ।
पुढली जाहली पुढें, मागली मग मागेंच राहिली ।
तृप्त होतां वासना, भोजनाचा कंटाळा असे ॥२॥
जाहली वाचादत्त कृपा मजवर जय संपादिले ।
तुम्ही आणिक मी पूर्वीं परस्पर वचन हतावर दिलें ।
तुळशीदळ जर शिळें जाहलें तरि शास्त्रीं वंदिलें ।
विसर पडूं नये कधिं, आधीं ज्याला पदरीं बांधिलें ।
घट उदंड, पण जीवन येक हें सर्वांतरीं भेदिले ।
अतिचंचळ चैतन्य चित्त मायाचक्रीं वेधिलें ।
विटाळून सिद्धान्न, ताट भरलें वाया जातसे ॥३॥
तुम्हि चंद्रोदयप्रभा सख्या, मी आज्ञांकित आगळी ।
लाट सागरावरिल, तिला तरि कशि म्हणतां वेगळी ? ।
चालविले बरोबरी धरून माझी तुम्ही करांगुळी ।
हुरमोजी त्रिनडाग, डाग नसतां केली डागळी ।
एकांतीं खाशाचे त्रिछोन्यावरतीं पडते गळीं ।
कल्पवृक्ष भेटतां दैन्य जावें प्रपंचमंगळीं ।

ग्रा. क्र. २९२...५१

**होनाजीबाळा** म्हणे, न धरि संशय किंचित राजसे ।
येक निश्चयावरून स्वामीचें सदय हृदय होतसे ।

राहातले—राहाटले, वर्तले; वदलखातर--खात्रीसाठीं, खात्री होण्याकरितां; लइ--पुष्कळ; घट—घडा; उदंड--पुष्कळ; जीवन--पाणी; डागळी केली—नाश केला, खराबी केली.

* * *

## लावणी ३० वी

भोगा एकांतीं येकट, तिखट मर्जी कां हो इतुकी ? ।
काय तरी सांगा घडली चुकी ॥धृ०॥
तुम्ही पाच्छाय, रयत मी केवळ तुमची बघा ।
चालवा अतां सुखाच्या वगा ।
करून सात सायास करितसे या पायाची निगा ।
जवळ निजते हें ठाउकें जगा ।
जिव जातो तडतडा, काय गत करूं शरिराच्या भगा ? ।
तिफाशी नरद लागली पगा ।
गळिं पडुं पडुं घेतें छंद मालखांवद, तुम्हांला बघुन
घ्या आयती नवती हातीं, आली ती घटका जाती निघुन
पदरीं पडले तें भरा भरभर जाइल उलघुन
आला दिवस दगदगुन (?) वृथा जगजगुन होतसे दुःखी ॥१॥
महालमजकुराखालीं जन्म गेला नित उमजावितां ।
असेंच लटलटकें समजावितां ।
हमरस्ता चालुं द्या, प्रीतिची वाट कशी बुजवितां ? ।
मधुर फळ पिकलें का कुजवितां ? ।
तुम्हाखालिं बेलाशक दमले देह झिजणी झिजवितां ।
कशाला वरवरते रिझवितां ? ।
म्हणते साहेबशिरताज, बरें आज सांपडला एकटे

दिली ब्रम्ह्यानें निरगांठ, करा वाहिवाट, कोणाला सुटे ?
स्वाधिन जाहले आगदीं ! कागदी घ्या लेहून लाखोटे
कुठें जाण्यायेण्यास आपणा द्या मेणा–पालखी ॥२॥
द्यावा मज पदिं ठाव, सदर शिरपाव कृपेचा करा ।
बोल पुर्विंचा साचा करा ।
ज्यानें चाकरी केली द्यावें अंतर कसें त्या चाकरा ? ।
शोध आधीं पुरता याचा करा ।
धर्मशील म्हणवितां, कांहीं लौकिक नांवाचा करा ।
सत्य ही अपली वाचा करा ।
मशि येवढें का तापला ? प्राणदिप अपला ओवाळिते
गादीवरते धनि तुम्ही, प्रधान मी, सेवा संभाळिते
जनाबरोबर तोलल्या बोलल्या शब्दाला पाळिते
अंगावर लोळते, खेळते, बरीवाइट ठाउकी ॥३॥
करूं नये त्या नात्यानें करितसा भलभलती तु टाळता (?) ।
गोष्टी का मागील उटाळतां ? ।
झूल जरिची जड नव्हे गजाला, कां हो कंटाळतां ? ।
बरें नाहीं वेळा टाळितां
परिसा अजुन काय चित्तामध्यें घोटाळतां ? ।
सोवळें असतां विटाळतां ।
मिठी मारूनिया धरितसे, करितसे पोटामधें कळवळा
तुमचेविण कोणा वरूं ? काय करूं भरला गोतावळा ?
मग जाहाली उभयतां गार, विषय हा फारच उतावळा
**होनाजीबाळा** म्हणे, फळा आला ऋणानुबंध कीं ।
भरून घे द्रव्याच्या संदुखी ॥४॥

पाच्छाय—बादशहा, राजा; बग—कृपादृष्टी, आश्रय, शरिरसंबंध; नरदं—

सोंगटी; मालखावंद--मालाचे धनी; उलघून—उल्लंघुन, संपून, वाहून, सरून; महालमजकुराखालीं घालणें—कांहीं एक गोष्ट ज्या वेळीं करणें जरूर आहे त्या-वेळीं न करतां लांबणीवर टाकणें; नित--नेहमीं; उमजवितां--समजावितां; साहेबशिरताज--श्रेष्ठांतील श्रेष्ठ, पुरुषोत्तम; साहेब--श्रेष्ठ मनुष्य; शिरताज--एक शिरोलंकार; कागदी घ्या लेहून लाखोटे--वाटल्यास पक्के लेखी वचन देते. तें लखोट्यांत घालून जपून ठेवा. ठाव--ठेवा, आश्रय; सदर शिरपाव कृपेचा करा—पूर्वीच्या काळीं एखाद्यावर कृपा किंवा मेहरबानी करावयाची झाली, म्हणजे राजे लोक त्या इसमाचा सदरेवर म्हणजे कचेरींत त्याला शिरपाव म्हणजे पागोटें देऊन सन्मान करीत असत. येथें भावार्थ—तुम्ही मला आपली म्हटलींत, असें एकदां जगाला जाहीर होऊं द्या; साचा—खरा; उटाळणें—एखादा धोंडा किंवा जड वस्तु तरफ लावून उलथून टाकतात, त्याला 'उटाळणें' म्हणतात. येथें अर्थ उकरून काढणें; संदुख—पेटी; संदुखा—पेट्या.

* * *

## लावणी ३१ वी

काय करूं मेल्या कामाला ? छळितो माला ॥धृ०॥
आले भर नवति दिस उजवाया। झुरझुरझुरते जीव रिझवाया ।
वैरिण रात्रा जाते वाया । आग लावा या धनमाला ॥१॥
न ये निद्रा शेजेवरते । न पडे चैन येकटपणीं असते ।
हुरहुर हुरहुर चहूंकडे दिसते । त्रासते विषयवर्माला ॥२॥
कठिण समय मदनाचा घुटका । मरणप्राय ती संकटघटका ।
नको नको, कधिं होइल सुटका ? । व्यर्थच आट कां जन्माला ? ॥३॥
हृदयावर जोबन टकटकले । चोर जसे चोळींत अटकले ।
कसे तरी शरिरास चिकटले । टकले आपल्या कर्माला ॥४॥
भोग भोगि मग सुलक्षणी ती । कोण करिल सौख्याची गणती ? ।
**होनाजीबाळा** धन्यच म्हणती । जाणती स्वकुळ धर्माला ॥५॥

टकणें--एकसारखें सकाम दृष्टीनें पहाणें; टक लावून पहाणें, टकमका पहाणें.

येथें भावार्थ असा कीं, ' चोर पकडून कोठडींत घातले तरी निसटून जाण्याकरितां जसे धडपडतात, आपल्या कर्माला चुकत नाहींत ' त्याप्रमाणें तारुण्यानें पुष्ट झालेले माझे स्तन मी वारंवार किती जरी चोळीच्या आंत दडपून घातले तरी स्फुरण पावून वाहेर पडतात.

* * *

## लावणी ३२ वी

या घरांत, उभे कां दारात ? नवती भरांत चढली हाटा ।
जलदिनें झटा, भर लुटा ।।धृ०।।
शिणकरी जणुं दुखणकरि विषय ऋणकरि विषयाचा खडा ।
पडे धरणिवर धडधडा ।
काय करूं ? किं हाय हाय करूं ? कोण उपाय करूं ? केला मनधडा ।
हिंव आलें जसें थडथडा ।
दिसरात याच घोरांत, मदन शरिरांत लागला चढा ।
दडदडपुन वरते भिडा ।
दुःख सांगु तरि कोणापसी ?
उत आला दुध फुसफुशी
विस्तवास दारू जशी
होय त्वरा, चौकशी करा, वळे हा खरा, नका म्हणुं थटा ।।१।।
या हाटांत पडले आटांत महासंकटांत ही दुर्दशा ।
कडकडल्या दाही दिशा ।
भगभगा उष्णता अंगा, आम्ही तर वघा बायका पिशा ।
बेवहार दाटली निशा ।
जळे आंग जसा वचनाग, दुःखाचा विभाग माझ्या हिशा ।
आणिक कां रे जगदिशा ? ।

मराठी ग्रंथ सं . . . . स्वाधीन
अनुक्रम 21115 वि. ...
क्रमांक ...... नों: दि: 30/7/...

वोलते उगिच वडबडा
काळिज उडते तडतडा
हा कढ येतो कडकडा
जीव आकांत करितो लोकांत, घडवा एकांत, उडवा घटा (?) ॥२॥
भावेना, कोठें जावे ना, कांहीं खावे ना, विरह काहावला ।
कंदर्प सर्प चावला ।
आलिजाहा ! होतसे डाहा, पहा उर माझा धडकावला
कोणीं सोमल अंगीं लावला ? ।
आवरा तो मद वावरा, वरा वैऱ्यास वेळ फावला ।
पंचानन सरसावला ।
थिरकंप सुटे थरथरा
येतात कळंम गरगरा
जोवन फुगले दरदरा
विलंब कां ? व्यर्थ का हाका ? विरजला चखा, दह्याचा मठा ॥३॥
व्यापला काम तापला, प्राण आपला घेतला हातीं ।
धड नाहीं मेली जिती ।
देहकथा नका धरूं तथा जन्म तों कथा, मि सांगुं किती ? ।
घ्या घ्या मिळली आयती ।
दे ताव, मारला डाव, दोघे एकभाव भोग भोगिती ।
आनंद उभयता चित्तीं ।
**होनाजी बाळा** म्हणे, आतां भरसराइ आली हाता ।
निर्दोष जाहाली मुक्तता ।
धोताल करितसे ख्याल, घे ग धनमाल लाविला धटा ।
पाच्छाई शिका बिनबट्टा ॥४॥

हाटा चढणें—हट्टास पडणें; खडा—अनिश्चित ठेवलेला, पडून राहिलेला

जी स्वीकारलेली नाहीं किंवा परतहि केलेली नाहीं अशी हुंडी किंवा चेक. येथें भावार्थ असा, " मी विषयाची ऋणकरी झालेली आहे. त्याचें देणें प्रत्यक्ष संगाच्या रूपानें मला फेडावयाचें राहिलेलें आहे. आणि तें प्रत्यक्ष विषयभोग भोगल्यावाचून फिटणारें नाहीं; मनधडा-मनाचा निश्चय; चढा लागणें-जोरावणें, जोर करूं लागणें; होय त्वरा--त्वरा हवी, त्वरा व्हावी; थटा--थट्टा; हाट--गोंधळ, आकांत; आट--त्रास, संताप; पिशा--वेड्या; हिश्या--हिश्शाला. भावार्थ, दुःखच तेवढें माझ्या वाट्याला आलें आहे; काहावला--कावला. कंदर्प--मदन; अलीजाहा--वडे लोक; डाहा--दाह; पंचानन--सिंह; कळंम--कळंब, घेरी; चखा--चक्का; मठा--मठ्ठा; देहकथा--देहाची अवस्था; तथा--शंका; भरसराइ--पीक उचलण्याच्या आधींची हंगामाची अवस्था; धोताल--भरपूर; धटा--वजन करण्याचा मोठा तराजू किंवा काटा; पाच्छाइ शिक्का विनवट्टा-शिक्का-नाणें; पाच्छाई शिक्का--पादशाही होन; पादशाही होन हें स्टँडर्ड नाणें असल्यामुळें तो होन विकतांना वट्टा द्यावा लागत नसे.

* * *

## लावणी २३ वी

कामापुरतें मशिं हासतां, बरे मतलबसाधु दिसतां ।
शरण आल्यावर मरण देउं नये, थोर म्हणुन धरली आस्था ॥धृ०॥
चला येकांतीं मजलीं, कां मर्जि कठिण जाहली जड कां ? ।
चुकलें आसन तर रुसा, नाहीं तर मग येवढी तुमची भिड कां ? ।
धर्मन्यायें चाला धड कां मजविषयीं पडली आडका ।
लटकें असेल तर पहा पुराणें, चार वेदशास्त्रें हुडका ।
लाल रंग नवति भडका, भोगायाची नावड कां ? ।
दीन भाषणें भावार्थें भाकितां पाझर ते सुटती खडका ।
ही पूर्व दिशा प्रत्यक्ष भासते मजला तुमची आज्ञा
आपलि म्हटल्यावर जिला, तिला सांभाळणें सर्वज्ञा
प्रीत उभयतांची कशि चालवा जैशी भीमप्रतिज्ञा

घडली अवज्ञा कधिं नसतां, याच वेळेला कां रुसतां ? ।
मदन थरारि जेव्हां तेव्हां ती मरणांतिक होते अवस्था ॥ १ ॥
लाभ भरामधें भर लुटला, आतां कशानें जिव विटला ? ।
मजवर तुमचा लोभ वाटतो, मुसळाला अंकुर फुटला ।
मुळापासुन मेरू खटला किंवा सागरहि अटला ।
ढोंगधतोरे सारें पाहतां विषय कोणाला तरी सुटला ? ।
तुम्हांखालता उर पिटला, भोग भोगितां देह घटला ।
पूर्णाहुत प्राणाचि अजुन कां नाहीं मनचा संशय फिटला ? ।
हा महा सुखाचा मेघ वर्षतां चालुन आले द्वारां
वैश्वानर धडकावला काम, त्या दुःखाला संहारा
अवघड जाग्याचें दुःख सांगतां येइना जनवेव्हारा
तुम्ही सारासार समजतां, हें दुसऱ्याला काय पुसतां ? ।
जमाखर्च रोकडा, सोशिली म्या अजवर तुमची खस्ता ॥ २ ॥
सुखशैजेचा खुषमक्ता, हाजिर होते मी त्या वक्ता ।
देउन हाक मला, न कळता मज कां नवतीकडे झुकतां ? ।
जाबसाल माझा उक्ता, तुम्हीं तर परद्वारीं जुकतां ।
पैशा शेर सरसकट बरोबर मिठसाखर कां हो विकतां ?
घरिं पैका भरला मुक्ता, कसे कराराला चुकतां ? ।
अति शहाण्याचा बैल रिकामा, समजावा मार्ग उरकतां ।
तो कल्पवृक्ष, कल्पिलें न देतां कोठें बोभाटा न्यावा ?
त्या सिंधु जीवनीं मासोळीसारखा पाई जागा द्यावा
मग केली सदरलुट माफ, जन्मतों हवा तसा रस घ्यावा
गोड घोट घ्यावा नुसतां, मला चुकावून कां बसतां ? ।
न मिळावा जो कधिं तुम्हांला तोच माल जाला सस्ता ॥ ३ ॥
दिवस चालले भरभर, आयुष्य जातें झुरझुर ।

जी स्वीकारलेली नाहीं किंवा परतहि केलेली नाहीं अशी हुंडी किंवा चेक. येथें भावार्थ असा, " मी विषयाची ऋणकरी झालेली आहे. त्याचें देणें प्रत्यक्ष संगाच्या रूपानें मला फेडावयाचें राहिलेलें आहे. आणि तें प्रत्यक्ष विषयभोग भोगल्यावाचून फिटणारें नाहीं; मनधडा-मनाचा निश्चय; चढा लागणें-जोरावणें, जोर करूं लागणें; होय त्वरा--त्वरा हवी, त्वरा व्हावी; थटा—थट्टा; हाट—गोंधळ, आकांत; आट--त्रास, संताप; पिशा--वेड्या; हिश्या—हिश्शाला. भावार्थ, दुःखच तेवढें माझ्या वाट्याला आलें आहे; काहावला--कावला. कंदर्प--मदन; अलीजाहा--वडे लोक; डाहा--दाह; पंचानन--सिंह; कळंम—कळंब, घेरी; चखा—चक्का; मठा--मठ्ठा; देहकथा--देहाची अवस्था; तथा--शंका; भरसराइ—पीक उचलण्याच्या आधींची हंगामाची अवस्था; धोताल—भरपूर; धटा--वजन करण्याचा मोठा तराजू किंवा काटा; पाच्छाइ शिक्का विनवट्टा-शिक्का-नाणें; पाच्छाई शिक्का--पादशाही होन; पादशाही होन हें स्टँडर्ड नाणें असल्यामुळें तो होन विकतांना वट्टा द्यावा लागत नसे.

* * *

## लावणी ३३ वी

कामापुरतें मशिं हासतां, बरे मतलबसाधु दिसतां ।
शरण आल्यावर मरण देउं नये, थोर म्हणुन धरली आस्था ॥धृ०॥
चला येकांतीं मजलीं, कां मर्जि कठिण जाहली जड कां ? ।
चुकलें आसन तर रुसा, नाहीं तर मग येवढी तुमची भिड कां ? ।
धर्मन्यायें चाला धड कां मजविषयीं पडली आडका ।
लटकें असेल तर पहा पुराणें, चार वेदशास्त्रें हुडका ।
लाल रंग नवति भडका, भोगायाची नावड कां ? ।
दीन भाषणें भावार्थें भाकितां पाझर ते सुटती खडका ।
ही पूर्व दिशा प्रत्यक्ष भासते मजला तुमची आज्ञा
आपलि म्हटल्यावर जिला, तिला सांभाळणें सर्वज्ञा
प्रीत उभयतांची कशि चालवा जैशी भीमप्रतिज्ञा

घडली अवज्ञा कधिं नसतां, याच वेळेला कां रुसतां ? ।
मदन थरारि जेव्हां तेव्हां ती मरणांतिक होते अवस्था ॥ १ ॥
लाभ भरामधें भर लुटला, आतां कशानें जिव विटला ? ।
मजवर तुमचा लोभ वाटतो, मुसळाला अंकुर फुटला ।
मुळापासुन मेरू खटला किंवा सागरहि अटला ।
ढोंगधतोरे सारें पाहतां विषय कोणाला तरी सुटला ? ।
तुम्हांखालता उर पिटला, भोग भोगितां देह घटला ।
पूर्णाहुत प्राणाचि अजुन कां नाहीं मनचा संशय फिटला ? ।
हा महा सुखाचा मेघ वर्षतां चालुन आले द्वारां
वैश्वानर धडकावला काम, त्या दुःखाला संहारा
अवघड जाग्याचें दुःख सांगतां येइना जनवेव्हारा
तुम्ही सारासार समजतां, हें दुसऱ्याला काय पुसतां ? ।
जमाखर्च रोकडा, सोशिली म्या अजवर तुमची खस्ता ॥ २ ॥
सुखशैजेचा खुषमक्ता, हाजिर होते मी त्या वक्ता ।
देउन हाक मला, न कळता मज कां नवतीकडे झुकतां ? ।
जाबसाल माझा उक्ता, तुम्हीं तर परद्वारीं जुकतां ।
पैशा शेर सरसकट बरोबर मिठसाखर कां हो विकतां ?
घरिं पैका भरला मुक्ता, कसे कराराला चुकतां ? ।
अति शहाण्याचा बैल रिकामा, समजावा मार्ग उरकतां ।
तो कल्पवृक्ष, कल्पिलें न देतां कोठें बोभाटा न्यावा ?
त्या सिंधु जीवनीं मासोळीसारखा पाई जागा द्यावा
मग केली सदरलुट माफ, जन्मतों हवा तसा रस घ्यावा
गोड घोट प्यावा नुसतां, मला चुकावून कां बसतां ? ।
न मिळावा जो कधिं तुम्हांला तोच माल जाला सस्ता ॥ ३ ॥
दिवस चालले भरभर, आयुष्य जातें झुरझुर ।

किति करावे आर्जव तुमचे, अजुन बोलणें वर वर वर ।
पाऊस पडतो सर सर सर, भरती गंगा तर तर तर ।
नाहीं भरंवसा कांहीं घडिमधिं, पाणी उतरतें खर खर खर ।
मन वारा फिरे गर गर गर, शरीर कापतें थर थर थर ।
दु:ख मला सोसेना, आंत हें काळिज कांपें चर चर चर ।
जाला वंदखुलासा पुरज्या पूर्ण होत घामा घाई ( ? )
घरोघर असंख्य धुंडितां अशी योग्य नार कोठें नाहीं
येक ठाइ दोघे निजतां, आनंदाचा हमरस्ता
**होनाजी बाळा** म्हणे, तुझा गडे वैन्यावर कंवरवस्ता ॥ ४ ॥

मजलीं--माडीवर; भीमप्रतिज्ञा--'भीष्मप्रतिज्ञा' पाहिजे. तथापि 'भीमप्रतिज्ञाहि' चालेल. कारण त्यानेंहि आपल्या सर्व प्रतिज्ञा शेवटीं पुऱ्या केल्या होत्याच; जनवेव्हारा--लौकिकांत, लोकांत; खुषमक्ता—खुषीनें केलेला करार; वक्त—वेळ; परद्वारीं—परस्त्रियेकडे; जुकतां--झुकतां, 'जुगतां' असाहि पाठ घेतां येईल; मुक्ता--भरपूर; मार्ग उरकतां--प्रवासाच्या शेवटीं; बोभाट--तक्रार; सदरलूट माफ करणें--पूर्वी शत्रूचें एखादें ठाणें जिंकल्यानंतर सैन्याला केव्हां केव्हां वाटेल तशी लुटालूट करण्याची पूर्ण मुभा देत असत; लूट माफ करणें--लुटालूट करण्यास पूर्ण परवानगी देणें; वंद खुलासा—मूळ शब्द 'वंद खलास' म्ह. बंधनमुक्त; पुरजा--दस्तऐवज, कागद; घामाघाई:—दामाझाई असें तर नसेल ? दामाशाई म्ह. यथाप्रमाण योग्य वाटणी; कंवरवस्ता--जोरा शह, जरव.

* * *

## लावणी ३४ वी

हें चांगुलपण धन्य, जघन्यांमधें लावण्याची खाणी ।
कधिं प्रीतिचा योग सांग, जिव झुरतो गे मोरावाणी ॥धृ.॥
कृष्णागर सावळें शरीर वयरूप कांचनवर्णि जाणें ।
वदन आदर्शापरि दिसे जो लहान हिरकणीचें ठाणें ।

गालाभौतीं शाल दुहीरि, मुख दिसतें गोजिरवाणें ।
नथ नासाग्रीं सढळ, गुळधवि, मुक्ताफळ निर्मळ दाणे ।
न पडे नख दृष्टीस कुणाच्या, घरिं नाहीं येणें जाणें ।
शिरकमळें काढून स्वहस्तें पुरुष तुला देती वाणें ।
मृदुमंजुळ भाषणें ऐकतां जन अवघे म्हणती शाणी ॥ १ ॥
फार हळुच बोलणें मिजाजित, मिडमर्यादेची मोठी ।
कर्म तुझें हें नव्हें सखे, पण ऐकावें अमुचेसाठीं ।
तुझ्या आशेस्तव मोठ्या जिवावर दिस घालवितो नखबोटीं ।
वदन तुझें एकदा चुंबुदे, जशि ग अमृताची वाटी ।
निर्मळ अंतरभाव मनामधें सत्यरीतिच्या वहिवाटी ।
तुला भोगिली अशा अक्षता कधिं लागति या लल्लाटीं ? ।
झोपाळ्यावर बसून ऐकतों तुझ्या मुखावाटें गाणीं ॥ २ ॥
करूं जाणसी अवघ्याच विलासिक विषयांची मोठी लागी ।
रात्रीं तुज दहा वेळे वाटतें भोगावी लागोलागी ।
आम्ही किति वर्षें पहावि वाट तरी ? हा जीव जाहला वैतागी ।
जिथें बसावें तिथें होतसे स्मरण तुझें जागोजागीं ।
सावकाश पाहुंदे एकांतीं करून तुला उघडी नागी ।
मार्गामधें भेटतां येतसों आम्ही तुझ्या मागोमागीं ।
आबालवृद्धामुखिं तुला गडे वाइटशि न म्हणे कोणी ॥ ३ ॥
सगुण युक्त बत्तीस लक्षणें देवाचीं पाहुन धालों ।
घडणें सुखरूप घडो, पण तुझ्या समागमिं स्नेह चालो ।
नाहीं देहाची शुद्ध आपल्या, शहाणपणा तुज गडे गेलों ।
तुझ्यापाइं द्रव्यास मारली लाथ, आम्ही वेडे झालों ।
विरहविषयवेधांत विषाचा करिं प्याला घेउन प्यालों ।
आशाभंग होतांच मनाचा, जित असतां केवळ मेलों ।

**होनाजी बाळा** म्हणे, प्रीत कर लयलेमज्नूच्या वाणी ।
तसें आपण स्त्रिपुरुष जन्मलों मृत्युलोकींचे हे प्राणी ॥४॥

जघन्यामध्यें—लोकांत, जगांत; कृष्णागर--चंदनाची एक जात; कांचन-वर्णि—सोन्यासारख्या रंगाचे; आदर्श—आरसा, ऐना; गुळधवी--गुळधव्या रंगाची. पिंवळतांबुस रंगाला गुळधवा रंग म्हणतात. अशा गुळधव्या रंगाचे मोतीं उंची समजतात;वाणें देती—दान करतात, अर्पण करतात; शाणी--शहाणी, सूज्ञ; नखबोटीं दिवस घालविणें--हाताचीं बोटें घालून किती दिवस उरले अशी आतुरतेनें मोजणी करणें; लागी--चतुर, विषयोपभोगाच्या सर्व प्रकारांत निपुण; लागोलागी--तत्काळ; लागोपाठ; नागी--नग्न; जागो-जागीं--ठाईठाई; विषयवेधांत--विषयाच्या छंदांत, नादांत; वेध--नाद, छंद; लयलामज्नू—पार्शियन काव्यांतील प्रियकर-प्रेयसीची सुप्रसिद्ध जोडी; प्राणी--असामान्य; विशेष असलेले.

* * *

## लावणी ३५ वी

वर्षाची दिपवाळी आलि ग बाइ आनंदाची मोठी ।
प्रियकर नाहीं घरिं, करूं सण कोणाचेसाठीं ? ।
हर्षकृत मनिं लोक अवघे जन--दुनिया सारी ।
सहकुटुंबीं अतिसुखें वर्तती अपले संसारीं ।
पुढें दिवाळी बाइ ग आला सण गजराचा भारी ।
चार दिवस आनंद घरोघर करती नरनारी ।
अशा प्रसंगामधें घरिं नाहीं माझे घरबारी ।
मजवरिच भगवान कोपला वाटे निर्धारीं ।
किंवा साडेसाति, शनीश्वर आहे माझे पाठीं ॥ १ ॥
दूर मोहिम पहिल्यानेंच गेले परदेशावर ते ।
मी इकडे पाखरासारखी मनिं तिळतिळ झुरते ।
न पडे क्षणभर विसर मला, घडि वर्षाची जाते ।

कोठेंच गमेना म्हणुन भमिष्टावाणी उगीच फिरतें ।
कठिण करून मन बळेंच आपला जिव अवरून धरतें ।
जाहलि परिक्षा येथुन, माझें दैव फुटलें पुरतें ।
अपार करितां शोक, दुःखाचे येति उभड पोटीं ॥ २ ॥
खंत सख्याची करून वाळले, रोड झाली काया ।
दिसे रोगियावाणी, आली मुखचंद्रावर छाया ।
जाहलीं बारा वर्षें प्रवासिं जाउन पतिराया ।
कसे विसरले ? माझी नाहीं त्यांना तिळभर माया ।
ऐन माझे मजेचे दिवस, तरुणपण ग जातें वाया ।
सखा भेटवा म्हणुन कुणाच्या पडुं जाउन पाया ? ।
करूं काय मी ? झाले साजणी दैवाची खोटी ॥ ३ ॥
कर्मकथनगाति अशि चित्त देऊन ऐका बाई
पतिविण नांदण्यापरिस हें दुःख दुजें नाहीं ।
सकळ पदार्थांसाहित सदन अवघें भरलें पाही ।
कांहीं नको ग आतां, जिव झाला त्राहि त्राहि ।
असे पतिपदीं लक्ष लावितां केवळ दीनप्राई ।
परमेश्वर पावला, घरिं ( आले ) प्रियकर ते समयीं ।
**होनाजी बाळा** म्हणे, विसर आतां मागील गोष्टी ।
सुखें सख्याशीं नित्य रमत जा, धर कवळुन पोटीं ।

हर्षकृत--आनंदी, हर्षयुक्त; जनदुनिया—जनविश्व; सहकुटुंबी—कुटुंबांसह; गजर--उत्सव; घरवारी--यजमान, कारभारी; निर्धारीं--खचित; उभड—उभडे, उमाळे; खंत--काळजी; छाया--काळोखी; दीनप्राई--दीनप्राय.

* * *

## लावणी ३६ वी

आलों तुझे मंदिरीं सुंदरी, इच्छा कर अमुची पुरती ।

पहा मनुष्याकडे, नको ठेउं दृष्ट गडे द्रव्यावरतीं ॥ धृ० ॥
झाला जनिं बोभाट आगाजा सुंदर स्वरुपाचा भारी ।
प्रसिद्ध जनवार्तेत ऐकली कीर्त तुझी कर्णद्वारीं ॥
मोहनिरूप निर्माण सखे, तुज केलें विधिनें निर्धारीं ।
आधिन करून सर्वत्र ठेविलें त्वां पुरुष आपुले आहारीं ।
राजमान्य लक्षणें तवांगीं लक्ष्मीचीं चिन्हें सारीं ।
काय दुसऱ्या बापुड्या तुजपुढें रुपवंत्या साऱ्या नारी ! ।
अशि सुगर गुणवान अवडलिस तूं अंतःकर्णामाजीं ।
चित्तायोग्य पाहुन तुजवरतीं खुष अमची झाली मर्जी ।
बळे पडत नाहीं गळां, सखे सुखसंतोषें व्हावें राजी ।
विषयामृत हें पाजी, तुसाठीं पंचप्राण आमचे झुरती ॥ १ ॥
नाहीं आवड दुसरी, वेधलें मन सखे सौंदर्यातें ।
तुला पाहिल्यापसुन विषयचळ अति सुटला सर्वांगातें ।
आशाभंग, मन विरस नये करूं, स्नेहमार्गें चालिव नातें ।
नको आमचें मन मोडूं, यामधें काय तुझें तरि जातें ? ।
मृगजळवत् हा व्यर्थ मानवी जन्म, पहा शोधुन पुरतें ।
जोड स्नेहाची करी, सांचलें द्रव्य कोणापाशिं राहातें ? ॥
लक्ष देऊन शब्दाकडे सखे, गोष्ट ऐक आमचे मनची ।
उघड पुसावें कसें ? आहेस तूं स्त्री मोठ्या श्रीमंताची ।
लौकिकांत नाणितां योजना कर सत्वर एकांताची ।
आशा पुरव ही आमचि, अलि गडे विषयसमुद्राला भरती ॥२॥
कां विचारीं पडलिस ? कोणते अर्थीं भय वाटे तुजला ? ।
असें उगेच बसल्यानें मुक्याची खुण समजेल कैशी आम्हांला ।
रात्र उजाडूं पाहे बोलतां, अमृतकर अस्ता गेला ।
नये वक्त हा फिरुन, अजुन तरि पहा पूर्तता लाभाला ।

जाहाली पहाटेची हवा, प्रभंजन थंड सखे शीतळ आला ।
केवढा वेळ पहावी वाट तरि ? अंगिं मदन चंचळ झाला ।
आतां न करी उशिर सखे, ऊठ, चल मंदिरिं लवलाही ।
इतर सुखाचे परिस विषयसुख, याला सर दुसरी नाहीं ॥
तुला सांगणें हवें कशास्तव ? मन देतच आहे ग्वाही ।
मुखचंद्राकडे पाहिं आमच्या, कां लाजिर केली वृत्ती ? ॥ ३ ॥
किति पर्यायें करुन तुला अम्हि पढवियले जैशी मैना ।
अजुन घडी पहिलीच अंतरीं, कसा तुझे मनिं द्रव येइना ? ।
जिव तोडुन जिवलगे सांगतों तरि तुला उपतिष्ठेना ।
अम्हि तर अति अत्याधिर, वेडे झालों नवतीच्या रसपाना ।
बोल तर एकदां आम्हांसी शब्द सखे लाजिरवाणा ।
तेवढ्यानेंच मन शांत करुन मग जाऊं आपल्या स्वस्थाना ।
भीड सख्याची पडतांच सखीनें कृतनिश्चय मनचा केला ।
तयारून मंदीर आवघें सखा एकांतामधें नेला ।
सावकाश नवतिचा लुटा भर, अशी रजा दे सखयाला ।
**होनाजी बाळा** म्हणे, मारला ठाव अखेरिस बेशर्थी ॥ ४ ॥

आगाजा--लौकिक, कीर्ति; आहारीं--ताब्यांत, छापेंत, स्वाधीन; प्रभंजन--वारा; लाजिर--लज्जित; उपतिष्ठणें--समजणें, उमजणें; लाजिरवाणा--लाडका; तयारणें--तयार करणें, शृंगारणें; रजा--परवानगी; बेशर्थी--पैज मारल्याप्रमाणें, पराक्रमानें.

* * *

## लावणी ३७ वी

हे सुवर्णचंपके सखे, तुजला घडिघडि पाहतों ।
केव्हां भेटशील म्हणुन वाट तुझी धरून उभे राहतों ॥ धृ. ॥
स्त्रीनायकपद योग्य शोभसी तूं सुंदर सगुणा ।

पहा मनुष्याकडें, नको ठेउं दृष्ट गडे द्रव्यावरतीं ॥ धृ० ॥
झाला जनिं बोभाट आगाजा सुंदर स्वरुपाचा भारी ।
प्रसिद्ध जनवार्तेंत ऐकली कीर्त तुझी कर्णद्वारीं ॥
मोहनिरूप निर्माण सखे, तुज केलें विधिनें निर्धारीं ।
आधिन करून सर्वत्र ठेविलें त्वां पुरुष आपुले आहारीं ।
राजमान्य लक्षणें तवांगीं लक्ष्मीचीं चिन्हें सारीं ।
काय दुसऱ्या बापुड्या तुजपुढें रुपवंत्या साऱ्या नारी ! ।
अशि सुगर गुणवान अवडलिस तूं अंतःकर्णीमाजीं ।
चित्तायोग्य पाहुन तुजवर्ती खुष अमची झाली मर्जी ।
बळे पडत नाहीं गळां, सखे सुखसंतोषें व्हावें राजी ।
विषयामृत हें पाजी, तुसाठीं पंचप्राण आमचे झुरती ॥ १ ॥
नाहीं आवड दुसरी, वेधलें मन सखे सौंदर्यातें ।
तुला पाहिल्यापसुन विषयचळ अति सुटला सर्वांगातें ।
आशाभंग, मन विरस नये करूं, स्नेहमार्गें चालिव नातें ।
नको आमचें मन मोडूं, यामधें काय तुझें तरि जातें ? ।
मृगजळवत् हा व्यर्थ मानवी जन्म, पहा शोधुन पुरतें ।
जोड स्नेहाची करी, सांचलें द्रव्य कोणापाशिं राहातें ? ॥
लक्ष देऊन शब्दाकडे सखे, गोष्ट ऐक आमचे मनची ।
उघड पुसावें कसें ? आहेस तूं स्त्री मोठ्या श्रीमंताची ।
लौकिकांत नाणितां योजना कर सत्वर एकांताची ।
आशा पुरव ही आमचि, अलि गडे विषयसमुद्राला भरती ॥२॥
कां विचारीं पडलिस ? कोणते अर्थीं भय वाटे तुजला ? ।
असें उगेच बसल्यानें मुक्याची खुण समजेल कैशी आम्हांला ।
रात्र उजाडूं पाहे बोलतां, अमृतकर अस्ता गेला ।
नये वक्त हा फिरुन, अजुन तरि पहा पूर्तता लाभाला ।

जाहाली पहाटेची हवा, प्रभंजन थंड सखे शीतळ आला ।
केवढा वेळ पहावी वाट तरि ? अंगिं मदन चंचळ झाला ।
आतां न करी उशिर सखे, ऊठ, चल मंदिरिं ल्वलाही ।
इतर सुखाचे परिस विषयसुख, याला सर दुसरी नाहीं ॥
तुला सांगणें हवें कशास्तव ? मन देतच आहे ग्वाही ।
मुखचंद्राकडे पाहिं आमच्या, कां लाजिर केली वृत्ती ? ॥ ३ ॥
किति पर्यायें करुन तुला अम्हि पढवियले जैशी मैना ।
अजुन घडी पहिलीच अंतरीं, कसा तुझे मनिं द्रव येइना ? ।
जिव तोडुन जिवलगे सांगतों तरि तुला उपतिष्ठेना ।
अम्हि तर अति अत्याधिर, वेडे झालों नवतीच्या रसपाना ।
बोल तर एकदां आम्हांसी शव्द सखे लाजिरवाणा ।
तेवढ्यानेंच मन शांत करुन मग जाऊं आपल्या स्वस्थाना ।
भीड सख्याची पडतांच सखीनें कृतनिश्चय मनचा केला ।
तयारून मंदीर आवघें सखा एकांतामधें नेला ।
सावकाश नवतिचा लुटा भर, अशी रजा दे सखयाला ।
**होनाजी बाळा** म्हणे, मारला ठाव अखेरिस बेशर्थी ॥ ४ ॥

आगाजा--लौकिक, कीर्ति; आहारीं--ताब्यांत, छापेंत, स्वाधीन; प्रभंजन—वारा; लाजिर--लज्जित; उपतिष्ठणें--समजणें, उमजणें; लाजिरवाणा—लाडका; तयारणें--तयार करणें, शृंगारणें; रजा—परवानगी; वेशर्थी--पैज मारल्याप्रमाणें, पराक्रमानें.

* * *

## लावणी ३७ वी

हे सुवर्णचंपके सखे, तुजला घडिघडि पाहतों ।
केव्हां भेटशील म्हणुन वाट तुझी धरून उभे राहतों ॥ धृ. ॥
स्त्रीनायकपद योग्य शोभसी तूं सुंदर सगुणा ।

पूर्णचंद्र मुखिं ढाळ जसा बंदर सुरती दाणा ।
अवयव शुद्ध शरिरलक्षणें सामुद्रिक जाणा ।
सकल नारिमधें श्रेष्ठ तुझा दिसतो साधा बाणा ।
स्वतां कुशल, अंगिंच्या जाणसी सर्व खुणाखाणा ।
हात लाविल एक तुला, कोणता पुरुष असा शहाणा ? ।
मनोदयापासून लक्ष तुजवर पुष्पें वाहतों ॥ १ ॥
उंचानिंच नेमस्त लहान बांधा, दंडिं वाकी ।
चिर आवरुन मेदिनी चालतां हळु पाउल टाकी ।
क्षणाक्षणा कुचकमळें हातानें पदराआड झाकी
वेळोवेळीं वेगळ्या तुझ्या शृंगाराच्या नोकी ।
शुद्ध विषय अम्ही लंपट झालों तुजवरते शोखी ।
मनोहरणी वल्लभे अशीच्या पाईं द्यावी डोकी ।
काय बिसाद, जिवाचीं संकटें मरणाचीं साहतों ! ॥ २ ॥
अशि सुंदर निर्माण कोणत्या देवानें केली ? ।
स्वरुप दिसे सकुमार, ओंठ जणुं पवळ्याची वेली ।
बसणें, हंसणें, बोलणें, चालणें मजालसीखालीं ।
भर नौती डळमळित, सदा जणुं मदनानें नाहाली ।
अतिनाजुक लावण्य, प्रथम तारुण्याची कळी ।
वाट चुकुन स्वर्गाची थेट रंभा भूतळिं अली ।
देह वाहतों आपला, तुला प्राणापेक्षां चाहतों ॥ ३ ॥
तुझें आमचें मन जडो, न पडो अंतर कोणे काळीं ।
दर्शनसुख वर्षते जशी पर्जन्याची पाहाळी ।
सर्वांमुखिं चांगली दृष्टिनें जननेत्रीं न्याहाळी ।
तुजविरहित बायका जशा गारा रानोमाळीं ।
ब्रह्मदेवें तप केलें निराकृति जन्माचे वेळीं ।

या परिची निर्मिली सगुण गुणमुद्रा वेल्हाळी ।
**होनाजी बाळा** म्हणे, मागशील तेंच आणुन देतों ।
खुषमर्जी अंतरीं, तुझ्या घरिं नित येतों जातों ॥ ४ ॥

बंदर सुरती दाणा--दाणा-मोती; सुरत बंदरांतून नामांकित मोत्यांचा व्यापार पूर्वी चाले; मनोदयापासून--मनांत इच्छा उत्पन्न झाल्यापासून; नोक—खुबी; शोखी--शौकी, लंपट; विसाद—विशाद, पर्वा; पाहाळी--सर, वृष्टी; गारा—गारगोट्या.

* * *

## लावणी ३८ वी

ज्या दिशीं भेट तुझी ग उदित मन विषयानंदें भ्रमी ।
एकांतीं चाल रतूं, सुदिन आज सण शिमगा पंचमी ॥धृ०॥
मुलायम शरिर तुझें, जैसें भरजरि पैठणचा झुणा ।
पाहुं दे दृष्टिभरि तुझा मुखचंद्रवदन देखणा ।
वाकडी जाउं नको, तुला गडे जिव देतों आंदणा ।
शृंगार कानीं बुगड्या, वाकि, वाकड्या ।
हुर्मोजी नथेला टीक, हिरकणी, हलकड्या ।
राखडी, केतक, केवड्या, जडित लालड्या ।
मंजुळ वाजती पदीं जोडवीं, तोरड्या ।
निर्मळ सुवास लुगड्या, शालेच्या घड्या ।
ठेविसी वासनामधें कस्तुरिच्या पुड्या ।
विपुल धनद्रव्य घरीं, ईश्वरें काहिं न केलें कमी ॥ १ ॥
प्रीतीची तूं आमच्या, हृदयवासिनी जिवाची सखी ।
सणाचे आज तुझ्या वाटतें मुख लावावें मुखीं ।
अशामधें करुं मौजा, आपले प्राण उभयतां सुखी ।
आज हृदयसंपुटीं मारुंदे मिठी ।

अपूर्व सुशिल, सुंदर मुद्रा गोमटी ।
बोलणार शहाणी मोठी, भाषणें मिठीं ।
गौरवर्ण कंबर, जणुं सिंहाची कटी ।
कुंकुम सुगंध मळवटीं, कोर धाकटी ।
पीतवर्ण हाताला अर्गजांची उटी ।
दिवसगत लाउं नको, देतसों घरदारांची हमी ॥ २ ॥
धरितसों पाय तुझे, नको गडे अभिमानानें बुडूं ।
लागलिस गोड अर्धी, शेवटीं कां ग असावें कडू ? ।
होतसें स्मरण तेव्हां ढळ ढळ ढळ येतसे रडूं ।
रूप दिसे जशि इंदिरा सगुण ही शिरा ।
अशि नाहिं कोठें कोणीच पाहिली तऱ्हा ।
भोगितां हलेना जरा, लवे करकरा ।
चुंबितां वदन तें पयघृतमधुशर्करा ।
लागला तुझा हुरहुरा, हेत कर पुरा ।
पेटला मदन, जशि आग लागे कर्पुरा ।
विषय चैतन्य करी, जातसे प्राण, होतों गडे श्रमी ॥ ३ ॥
भोगुन तृप्त करी, वियोगें विष कां गे वाढिसी ? ।
राहिलीस दुर कशी ? जशि हरणी चुकलि पाडसी ।
देउन विश्वास आतां उशाची कां मांडी काढिशी ? ।
गडे तानभुक लागेना, झोंप येइना ।
होतात कठिण या दुःखाच्या वेदना ।
क्षणभरि कोठें करमेना आमच्या मना ।
तुजविशी लागल्या जैशा यमयातना ।
अवताररुपी तूं कांता मनमोहना ।
वर्णितां धन्य जाहलों, पुरल्या वासना।

होनाजी बाळा म्हणे, सुंदरा ही केवळ अनुपमी ॥ ४ ॥

झुणा—रंगीत पातळ, लहान लुगडें. हा माल जुन्या काळीं पैठण येथें नामांकित होत असे; मुलायम—नाजुक, सुंदर, नरम; आंदणा—आंदण, बक्षिस; वासन—उंची कापड. कपडे ज्यांत घड्या करून गुंडाळून ठेवतात अशा बोचक्याला वासन म्हणतात; शिरा—उत्तम, उत्कृष्ट; हुरहुरा—हुरहुर, असोशी.

* * *

## लावणी ३९ वी

करा हो निश्चय शुद्ध, रिकामे दिस वेंऱ्यावाणी जाती ।
दैवानें अनयासें लागला जीव माझा तुमचे हातीं ॥ ध्रु० ॥
मुळ कारण तरि काय ? विकल्पें कान कोणिं तुमचे भरले ? ।
न भेटावें अगदींच अशी मी असत्य कंच्यापरि ठरले ? ।
अभयवचन आपलें प्रथमतां ज्या दिवशीं मजला धरलें ।
तेव्हां हवीशी होते, अतां कां पाणि जसें अळवावरलें ? ।
गांठ घालितां नये मनोमय जवळ असुन जहाला दुरले ।
दहाविस वर्षे सुख न भोगितां हें दैव कां मागें सरलें ? ।
नष्टचर्य पर्याय किति तरी सांगावें भातोभाती ॥ १ ॥
मन मिळल्यावर माझी कळकळ ही तुमच्याकडुन असावी ।
नसल्यावर मी व्यर्थ जाहले स्त्री, शोभा काय दिसावी ! ।
बोलावण्याची वाट पाहातें, मीच कशी गोष्ट पुसावी ? ।
फार दिवस रक्षिले, त्यावरी मग इच्छा कां हो नसावी ? ।
वायुआहार निर्मळ तप करितां स्वामिकृपा संपादावी ।
तें प्रत्ययास येऊन शेवटीं शर्करेची माती व्हावी ।
हेंच काय महदाश्चर्य फळ ! मी तृण केवळ धरिलें दातीं ॥ २ ॥
स्वच्छ टाकितां मला, कोणाच्या म्या उदरामधें शिरावें ? ।
पुरती गरिब असे अनुभवितां, वचनाला कां हो फिरावें ?

'नाहीं अंतर होणार' बोलला, तें भाषण खरें करावें ।
सार्थकता माझी हीच वाटे, आपल्या पाईंच मरावें ।
जी अपल्या अत्यंत प्रीतिची, तिजवर कां शस्त्र धरावें ? ।
ज्या पात्रीं भक्षिली क्षीर, त्या पात्राला कां विसरावें ? ।
प्रीतिस्तव चंदनासारिखा देह झिजवुन केल्या वाती ॥ ३ ॥
कधीं मजकडे पहाल ? एकांतीं उपवासी केवळ राहाते ।
लाउन दृष्ट आकाशीं प्रजा जशि वाट मेघाची पाहते ।
श्रम करुन मिळविलें, टिकूंद्या ही काळजि अंतरिं वाहते ।
लावणिच्या वृक्षास कसें तरि छेदावें आपल्या हातें ? ।
सेवेचा अधिकार, वर्णितें मी तुमच्या पुरुषार्थातें ।
जन्मभर भोगुनी बरोबर मज न्यावें सायुज्यातें ।
जवळ असावें सदा, हाच मी जप करिते दिवसारातीं ।
**होनाजी बाळा** म्हणे, प्रीत ही ब्रह्मलिखित जडली ज्योती ॥ ४ ॥

कंच्यापरी--कोणच्या रीतीनें; भातोभाती—तऱ्हेतऱ्हेनें, विविध प्रकारानें; स्वच्छ--स्पष्टपणें; निश्चयरूप—निश्चयानें; वचनाला फिरणें—वचन मोडणें; वइमान होणें; वाती—काडवाती; लावणीचा वृक्ष--मुद्दाम लावलेलें झाड, सायुज्य--मुक्ति.

* * *

## लावणी ४० वी

मनमोहना गुणनिधी, येकांतामधीं चला नेते ।
जिवाला जीव तुमच्या देते ॥ धृ. ॥
जन्मांतरसंग्रहीं जोडिल्या पुण्याच्या राशी ।
उभयतां त्या आल्या फळाशी ।
कृपाजळाचें स्नान, मला राहणें या पायापशीं ।
कशाला मग व्हावी काशी ? ।

स्वामिपद पाहातां काय कारण इतर जनासी ? ।
असें पुरतें आणा मनासी ।
बांधिलें प्रीतकंकण तुम्ही आपले करीं
घातलें वस्त्र मायेचें शरिरावरी
काढितां कशी तड लागल माझी बरी ?
बारा महिने रमते तुमच्या बराबरी
न भेटतां क्षणभरी अंतरीं मी घाबरि होतें ॥ १ ।
कल्याणाच्या योगें समर्थांचें दर्शन होणें ।
मला भगवंताचें देणें ।
नव निधी अनकुळ सकळ मंडळ कीर्ती जाणें ।
भासतां ईश्वराप्रमाणें ।
खुशाल राहावें तुम्ही, हेंच माझें अवघें लेणें ।
मागणें हें मागुन घेणें ।
राहिले सुखाच्या स्नेहमंडपतळवटीं
पहिलीच विश्वकर्म्यानें लिहिली चिठी
प्रीतिनें शिवानें ठेविली गंगा जटीं
मी तशिच म्हणुन बाळगा झांकल्या मुठीं
त्रिकाळ भेटीसाठिं छंद हा रात्रंदिस घेते ॥ २ ॥
तप करितां स्वहितार्थ गजाचे गंडस्थळिं बसले ।
चांगली अर्धांगी दिसले ।
अमरपतीपद उणें वाटतें सुख पाहुन असलें ।
मनामधें हें माझ्या ठसलें ।
कंच्या गोष्टीसाठीं तुम्हांवरती सांगा रुसले ।
बहुत परोपरी मजला कसलें ।
पूर्वीचें चांगलें हें होतें ठेवणें

मागुन मुखांतिल ग्रास मला जेवणें
' आपली ' असें जनलौकिकास दावणें
अडल्या–भिडल्या–नडल्याची कड लावणें
बोलावणें येतांच निजायाला नेहमीं येते ॥ ३ ॥
येका खांबावरी द्वारका मी केवळ तैसी ।
उतरतां हो खालीं कैशी ? ।
अंगिकारिली तिला म्हणावी लग्नाची जैशी ।
वाढवावी ममता लैशी ।
सत्यवचन करणार आढळली कोण तरी ऐशी ।
लागले थोराचे वंशीं ।
मर्यादशीळसंपन्न अशी आबळा
घडिघडि धरुन पोटाशीं तुम्हि आवळा
ठायिंठायिं उभि राहुनिया पडते गळां
धरुं नये आतां किंचित भास वेगळा
**होनाजी बाळा** म्हणे, माग तुज काय हवें तें ।
भोग सारे पदार्थ आयते ॥ ४ ॥

झाकल्या मुठी- गुप्तपणें, चोरून; गजाचे गंडस्थळी वसलें––भावार्थ––अंबारींत वसण्याचें भाग्य मिळालें. कंच्या–कोणच्या; ठेवणें–संचय, कुणगा, येथें अर्थ पूर्वपुण्यसंचय; लैशी–लईशी–पुष्कळ, फार; आवळा–अवला, स्त्री; भास–संशय, विकल्प.

* * *

## लावणी ४१ वी

जन्मवरी सुखसोहळे उभयतां केले नाना परी ।
छंद सुटेना आतां घडो तुजपाईं कैचे तरी ॥धृ०॥
वेळ घडीचा गुण, धन्य सृष्टीकर्त्याची कृती ।

होणाऱ्यासारख्या गांठि गडे पडल्या दैवागती ।
निधान सौख्यामधें गोड वाटसी हृदयांतर्गती ।
स्त्रीधर्मीं रत अशी तूंच या कलीयुगामधें सती ।
नाहि व्यंग अष्टांग पाहतां उणें कुठें तिळरती ।
वरिं षड्गुण प्रीतिची मिळालिस तूं कांता गुणवती ।
द्वयकुळ उद्धारलों, सखे तूं केवळ सुखवाहिनी ।
स्त्रीपणांत अति योग्य, सगुण, सौम्यरूप, वरदायिनी ।
पाहावें ना, तुजपाई केली सर्वस्वाची हानी ।
अग सखे अवडलिस म्हणुन लागलों छंदीं ।
जाहलों व्यसनाधीन, प्राण घातला बंदीं
जन्मतां अतां तूं अमची शरिरसंमंधी ।
चिरकाल लोभ चालुं दे इथुनया पुढता
कोणते विपद्चा मनिं संशय धरुं नको ।
वाढला द्वेष औध्यासी वाइट जाहलों
तूं तरी येकटी मन निष्ठुर करुं नको ।
स्तव करुनि हृदायिं पदरांत ईश्वरापाशीं
मागणें हेंच कीं आमचे अर्धीं मरुं नको ।
घडि घडि आठवण होतां रूपध्यान हृदयीं स्मरतों गे ।
न गमे, वेड्यावाणी मग भलत्या भरिं भरतों गे ।
आर्जव प्रीतीसाठीं श्रीमंतापरि करितों गे ।
सोडून धंदे सारे तुजमागें आम्ही फिरतों ।
घरिं आपल्या अन्नपाणी पक्ष्यावाणी चरतों ।
तव सुखिं प्रपंचाचें दुःख सारेंच विसरतों ।
स्तन धरितों झोपेंत, न कळतां तुझी सोडितों निरी ॥ १ ॥
कोण कोणाचे आपण ? गांठ पडली स्नेहाच्यामुळें ।

सुख पाहुन मग तुझें झालों भावाबंदाविगळें ।
वरकड निर्गुण स्त्रिया पाहतां वमनापरि कळमळे ।
नावडती त्या सखे, तुसाठीं जिव अंतरिं तळमळे ।
देह निर्मळ नागिणीपरिस त्वाचिकें शरिर कोवळें ।
न सोडावी वाटते, येके ठाईं बांधावे गळे ।
बारमाही सारखी सुखे तुजवळ जीव निद्रा करी ।
येक वेळ चुकतांच विषय थैमान करी अंतरीं ।
नको प्रवासीं जाणें, द्रव्य वाटतें मृत्तिकेपरी ।
तुजविण गोड गडे आणखी कांहीं दिसेना ।
भ्रंशलें चित्त, संसारावरी बसेना ।
हरविषयीं गरज घरदाराची ग असेना ।
प्रीतीचें तुझ्या सुख पाहातां अंतर्ध्यानीं
वाटती जणुं हात स्वर्गाला लागले ।
ध्रुवपदासारखी ममता अढळ असूंदे
भोगुन दुर व्हावें, हें नसें चांगलें ।
विषयानें पीडितां तुझी गडे पाठ निघालों
दुर लोटूं नको सांभाळ वचन मागलें ।
यावर अंतर देतां गति नाहीं मग बरिसी ।
निष्ठुरपणिं येकांतीं कां गे रागें भरसी ? ।
अमान्य वचन आमचें जें करुं नये तें करसी ।
जातिवंत म्हणतांना अवजातींमध्यें शिरसी ।
लटक्या उचलुन करिं दिधल्या त्वां करिं कोमल तुळसी ।
अर्पण केले फिरतां पहा पापामधें जळसी ।
कां गे कंटाळसी स्वस्थ राहुनिया आपले घरीं ? ॥२॥
कांहिं चांगलें नसे तुला द्यावेंसें आमचेपशीं ।

जिव देतो, घे गडे, जशी चंद्राला वाहावी दशी ।
दांतओठ आपले आपण, कां गे निर्फळ निंदिशी ? ।
पदरामधे घेतलें, अतां सोडुन कैसी नांदसी ? ।
जन्मापुन वाळगला रावा, कां मारुन टाकसी ? ।
नये क्रियेला टळूं, उभा गडे परमेश्वर पाठिशीं ।
विषयी होऊन दीन, मुखिं तृण धरिलें दांतामधें ।
सारा वेळ तुजकडे लक्ष अमचें एकांतामधें ।
मन झाले गोसावी, नको राहणें लोकांतामधें ।
परदेशीं तुला निस्पृह घेउन दुर जावें ।
राहिले होप चित्ताचे फेडुन घ्यावे ।
वाटतें तुझ्या उच्छिष्ट मुखांतिल खावें ।
अंगुष्ट नखें करतळ नग निर्मळ सारी
लाउन भाळिं आडव्या कुंकाची चिरी ।
नेसणें शरिर आच्छादुन मर्यादेनें
भोगितां तुझ्या लुगड्याची न ढळे निरी ।
राहिले सगुण याविरहित शोधुन पहातां
अतर्क मति कविच्या झाल्या अंतरीं ।
वर्तुळ चंद्रावाणी, मुखचंद्रकळा चढती ।
गुह्यांतरिं गुण सारे बाहिर दृष्टि न पडतीं ।
आशि प्राप्त होतां वाहे प्रारब्धाची वढती ।
तुजविण गरिब्रावाणी हे नेत्र गडे रडती ।
निर्मूळ पुरती करुंदे या विषयाची झडती ।
स्नेहनात्याच्या योगें ज्या त्या गोष्टी घडती ।
देहतरुवर वाढती, नको छेदुन टाकूं मंजिरी ।
आतां तुझा तुजकडे दोष येइल पापाचा शिरीं ॥ ३ ॥

कां कारितां प्रार्थना ? मी तुमच्या उपकारीं वाढले ।
आतां वायको जशी तुम्हांला, अक्षइ कर जोडले ।
आसलाईच्या मुळें पाश या काजचे (?) तोडिले ।
सापडले वचनांत, अतां सोडा मागिल पुढलें ।
पहिल्यानें भोगुन तुम्ही पातिव्रत माझें मोडिलें ।
सावध व्हावें तुम्हीच आतां, मी भय सारेंच सोडिलें ।
निश्चय तुमचा फार कठिण, पाहतां झाली सीमा ।
प्राचीन अपराधाची करा मजवर यावरती क्षमा ।
स्नेहें संकुळ दिनमणी, किति रिझवून दावावें तुम्हां ? ।
भय धरूं नका, मी कन्या कुळवंताची ।
लावीन उभयतां ही तड स्नेहाची ।
पण तुम्ही दाखवा वाट पुढिल पंथाची ।
संपतां विषय मन काढुं नका मजवरलें
बोललें आपलें करावें खरें ।
जिव दिला, आतां समसमान चित्त असावें
वाजते कोठें तरि टाळी येक्या करें ? ।
वायली नका म्हणूं आपला प्राण आहे तों
कर असे सख्या, कीं सर्वां ज्यामधें वरें ।
प्रारंभीं तर केव्हां मन सत्वाला ढळलें ।
खाउन निंदुं नका हो घ्या भलतेसें मिळलें ।
आपले मर्जीसाठीं व्रतनेमाला चळले ।
मर्जीचें मन आपल्या मजला पुरतें कळलें ।
येथुन संशय सारे कपटाईचे जळले ।
**होनाजी बाळा** म्हणे, पुढें अंतरीं निश्चय बळकट धरी ।
देतों शाबासकी, धन्य तूं कांता सृष्टीवरी ॥४॥

कैचे तरी—कांहींहि, काय वाटेल तें; दैवागती—दैवगतीनें, दैवयोगानें; तिळरती—तिळभर, रतीभर सुद्धां; एखाद्याची पाठ निघणें--एखाद्याच्या आश्रयास जाणें, त्याच्या पाठीशीं जाणें; अवजात—नीच जात. अर्पण केले फिरतां—अर्पण केलेली वस्तु फिरून परत घेतलीस तर. रावा--पोपट. क्रियेला टळणें—दिल्या वचनाचा भंग करणें; निस्पृह—इतर गोष्टींचा लोभ सोडून देऊन. होष--मूळ पर्शियन शब्द 'होष.' त्याचा अर्थ, उत्साह, जोम, शुद्ध, भान असा आहे. परंतु येथें 'हौस' असाच शब्द मुळांत असावासा वाटतो. चिरी—रेघ; अतर्क--गुंग; असलाई--अकृत्रिम, शुद्ध, नकली बनावट नव्हे. पतिव्रत-- पातिव्रत्य; वायली—वाइली, निराळी, पृथक; भलतेसें—या जुन्या शब्दाचे ऐतिहासिक वाङ्मयांत अनेक अर्थ संदर्भानें घ्यावे लागतात. येथें अपूर्व असा अर्थ घेतां येईल.

* * *

## लावणी ४२ वी

आता कां गे दुरदुर पळसी ? ।
आण वाहातों तुला, अलिकडे ये गे अंमळसी ।
दैव प्राधान्य उभयतांचें ।
म्हणुन भारजा रत्न लाभलिस तूं कुळवंताचें ।
आता भय काय लोकांताचें ? ।
नको लाजेनें मरूं, बोलणें काढ एकांताचें ।
पहा कौतुक भगवंताचें ।
तुझ्या सुखापुढें अधिक काय तें सुख श्रीमंताचें ।
असा जिव रिझला तुजवरि ग ।
टाकुं दे हात शरिरावरि ग ।
दिवस जाती वर्षापरि ग
सखे तुं होतां विटाळसी ॥१॥
कां गे मन तरी इतुकें भ्यालें ? ।

तुझ्या सुखाचे पाइ विरोधी जन अवघे झाले ।
येउं नये दैवासी आलें ।
होतां इश्वरी कृपा, काय मग दुष्टांचे चाले ? ।
सांग कां तरी ऐसें केलें ? ।
शरिर मातिचें पहा, यामधें काय तुझें गेलें ? ।
वासना प्राणाच्या पुरुं दे
तुझे स्तन कुरवाळुन धरुं दे
जिवा आवडेल तसें करुं दे
व्यर्थ लाजेमुळें तरमळशी ॥२॥
धन्य मर्यादेचें पाणी ।
तुंसारखी पाहतां दिसेना स्त्री लाजिरवाणी ।
पाहतां मुख पवित्र वाणी ।
अधोवदन चालतां खालतीं नेत्राची पाहणी ।
बोलणें अति मंजुळवाणी ।
विषयकाळिं वाटशी सखे तुं अमच्याहून शहाणी ।
दिसे रुप, थेट जशी रंभा
शरिर जणुं कर्दळिचा गाभा
एकांतीं किति पडते शोभा !
स्वाभाविक आहेस मोठी आळशी ॥३॥
भोगितों तुजला दिसरातीं ।
लहान शरिर, नेमस्त बिजांकुर, असलाचे जाती
नाहिं मन चंचल कल्पांतीं ।
परपुरुषाचे विषयीं, जशी निर्मळ गंगा वाहाती ।
सगुण नवरत्नाची ज्योती ।
कोट्यावधि काळज्या तुझें मुख पाहतां दुर होती ।

कल्पना नाहिं अजुन मेल्या
करुं नये त्याच क्रिया केल्या
म्हणुन या थरीं गोष्टि आल्या
दिलेल्या वचना कंटाळशी ।।४।।
मनामधें तूं अमची म्हणतों ।
सांगशिल जरि तरी जमिन या बोटानें खणतों ।
प्रत्यहीं भेटतां शिणतों ।
दुसरी स्त्री भोगितां तुझे गुण चित्तामधें आणितों ।
दिवस आयुष्याचे गणतों ।
काशि पुरशिल जन्मास, दिसोंदिस यासाठीं क्षिणतों ।
ज्या पाहतां मग होतों वेडे
सुधेपणिं कां गे अजुन न घडे ?
बोलणें मात्र तुझें सुगडे !
करुन मुख तिकडे कां वळसी ? ।।५।।
कां हो मग असें म्हणतां माला ? ।
ये म्हणतां क्षणिं सिद्ध उभी तुमच्या संकेताला ।
कोणत्या मी चुकले बेताला ? ।
ऊन भातासारखी नका दडपुं, पदरीं घाला ।
खेद का मजविषयीं आला ? ।
करिन देहाची शेज, येत जा नित येकांताला ।
येतां क्षणिं उठुन उभी राहतें
प्रीतिनें मुख तुमचें पाहते
शपथ सौभाग्याची वाहते
घ्या हो, देते उचलुन तुळशी ।
**होनाजी बाळा** म्हणे, व्यर्थ कां पुरुषाला छळसी ? ।।६।।

भारजा--भाया, स्त्री. तुंसारखी—तुजसारखी; लाजिरवाणी—लज्जेमुळें अति सुंदर दिसणारी अशी. नेमस्त--प्रमाणशीर; विजांकुर असलाचे जाती— भावार्थ असा कीं, तुझें शरीर लहान असलें, तरी तें चांगल्या जातिवंत वृक्षाचेंच रोप आहे खास ! असल—अस्सल; जमिन या बोटानें खणतों—अशक्य गोष्ट असली तरीही तुझ्या शब्दाखातर करण्यास मी मागें पुढें पहाणार नाहीं. साध्या बोटानें कां कोणास जमीन खणतां येणें शक्य आहे ? तथापि तुझा हुकूम झाला तर तीहि गोष्ट मी करीन. मग त्यांत माझीं बोटें मोडलीं तरी चालतील. गणतों—मोजतों. भावार्थ--एक एक दिवस मोजीत कसे तरी दिवस लोटतों. दिसोंदिस—दिवसेंदिवस, दररोज; क्षिणतों--क्षीणतों, झुरतों; सुगडे--मूळ शब्द सुगड ( विशेषण )—चतुर शहाणा. येथें सुगड हें संबोधन आहे.

* * *

## लावणी ४३ वी

कसें फुटलें प्रारब्ध ? कोपला हरिहर मजवरता ।
ऐन भरामधें आले तों सखये, गत झाला भर्ता ॥धृ०।
मजप्रमाण धुंडितां स्वरुप या सृष्टीवर नव्हतें ।
सुखामधें चांगली पतिसवें आजवरी होतें ।
कशि कोणाची लागली दृष्ट माझ्या सौभाग्यातें ? ।
दैव भंगुनि कसें आलें ग बाई मरण भ्रतारातें ? ।
धनतर माझे गोत, आतां तें काय असुन नुसतें ! ।
पतिरत्न हरपल्यावरी नारीस कोण पुसतें ? ।
तें पहा कुठुन माझ्याच आलें संचितीं ।
मी केळ जळाले दुःखाग्नीचे संगतीं ।
बाई नाहीं ग शुभ अधिकार अतां मजप्रती ।
बसतां निंचित मज हवा वाटतो पती ।
मग आपले स्तन मी चुरते आपल्या हतीं ।
मन आशावंत, विषयावर माझी प्रिती ।

चांगला पुरुष पाहतांच सहजागती ।
म्हणवेना होइल कीं काय चंचळ वृत्ती ।
परिणाम शुद्ध लागेल कोणत्या रिती ? ।
गेले असते सती, न केला आधीं विचार पुरता ॥१॥
मुकले सौभाग्यास तेजहीन स्वरुपावर आलें ।
नाहिं कपाळीं कुंकु, विशोभित चंद्रवदन झालें ।
वैधव्याचें दु:ख या दैविं कुठुन लिहिलें ? ।
पतिवरची मीच अगोदर कां ग नाहिं मेले ? ।
निराश्रित मज टाकुन अक्षयि प्राणपती गेले ।
असें दुर्धर हें पाप पूर्वजन्मिं मी काय केलें ? ।
त्याचेंच हें फल प्राप्त भोगणें मशीं ।
साऱ्याच गोष्टिनें पहा नाडलें कशी ?
'पति पति' म्हणत रडतां जाते दिननिशी ।
मासोळि जळाविण मी हुरपळते तशी ।
वय नवटदशा, तारुण्य बहर मुसमुशी ।
नुकताच होता प्रारंभ माझे नौतिशी ।
इतक्यांत सखा वारला, मि झाले कशी ।
हें कसें आवडलें भगवंता तुशीं ? ।
जाउन बसते अंधारिं सणाचे दिशीं ।
मी दु:खित मानसीं, कोणावर न ये रागें भरतां ॥२॥
अयोग्य झालें जनीं, न पहाती मुख माझें नयनीं ।
घरांतील माणसें सारीं मजवर पडलीं फिरुनी ।
सासुसासरा, आप्त आणिक दिर, भाऊ, पिता, जननी ।
कोणींच शकुन घेईना, त्यागिलें मज सर्वत्रांनीं ।
श्वानापरि हें जिणें जातसें आयुष्य दिनरजनी ।

स्वस्थ अता निर्वेध असावें परमेश्वरभजनीं ।
मी असा जिवाला धिर आपल्या देतसे ।
तरि दु:खशमन होइना, अतां करुं कसें ? ।
स्वामींचें स्मरण होतां जीव तळमळतसे ।
झोपेंत सखा दृष्टिपुढें माझ्या दिसे ।
धरिलें कवळुन मज, असा भास होतसे ।
मग सावध होउन बाई मीं हळहळतसे ।
देह अशा दु:खाच्या वणव्यामधें जळतसे ।
समजाउं कितींदां ? मला जाहलें पिसें ।
देहभान दिवस कीं रात्र मला हें नसे ।
उगिच जन्मले, असे व्यर्थ हा भार सृष्टिवर्ती ॥३॥
उत्तम सण संक्रांति आणि त्या गौरि चैत्रमासीं ।
सुवासिनी शृंगारयुक्त फिरताती त दिवशीं ।
थव्यांमागें थवे जाती बायकांचे अति उल्हासीं ।
मी पाहुन त्याकडे न दावी मुख आपलें त्यांसी ।
जाहली रुपाची माती, फार वाईट वाटे मजसी ।
हाय हाय रे ईश्वरा, काय हें अणिलें अदृष्टासी ? ।
मजहुन आयुष्य कसें उणें झालें स्वामिला ? ।
अनिवार कहर शिरिं शोकाचा जाहला ।
असा काय पूर्वजल्मिचा दोष लागला ? ।
कीं विवाह काळीं दिस नव्हता चांगला ? ।
नुसता डाग सौभाग्याचा लागला ।
मी हवा तसा कधिं नाहिं सखा भोगला ।
राहिली आशा, रडतांना जिव भागला ।
**होनाजी बाळा** म्हणे, नारिला उपाय यापरता ।

नाहीं दुसरा, अतां आराधी जो कर्ताहर्ता ॥४॥

मजप्रमाण--माझ्यासारखे; धनवर—संपन्न किंवा विपुल; गोत--नातेवाईक; परिणाम--शेवट. पतिवरची—पतीच्या ऐवजीं; नवटदशा--तरुण वय किंवा तारुण्य; शकुनांत घेणें—एकायाशीं संबंध ठेवणें, बसणें, बोलणें;

* * *

## लावणी ४४ वी

सोडून मज पलिकडे निजा, येवढा वेळ रमले ।
रात्रंदिस बेजार, तुम्हांसी रत होतां दमले ॥धृ०॥
अडविउभी नका दडपुन धरूं तनु निर्जिव कवळी ।
कठिण शरिर तुमचें, तशामधें मी केतकि पिवळी ।
अढळ भांग विखुरला कसा, कुंकुम पुसलें भाळीं ।
नथ झाली वाकडी चुंबितां वदन अधरपवळी ।
लवलवित करचरण मुरडितां देह पातळ चवळी ।
जिव दुसऱ्याचा वघा, तुम्ही किति करितां चोळाचोळी ! ।
फुकट मिळालें तरी मिष्ट भोजन थोडें घ्यावें
गोड ऊस लागला म्हणुन काय मुळवाढें खावें ?
ठाणबंद भोगितां, कसें तरि मग बाहेर जावें ?
कार्याकारण घ्यावें करून, बहुतापरि श्रमले ॥१॥
न्हाण आल्याच्या आधीपसुन तुम्हि छळिलें हो भारी ।
वळस्वार घातली तेव्हांपुन मजवरती स्वारी ।
सालोसाल दरमहा घेउन मज निजतां शेजारीं ।
नरम–कठिण ओळख, पितळ–सोनें दोन्ही न्यारी ।
उंच वस्त्र चोळटूं नका हो, मी गजनी कोरी ।
सर्व परी अति वर्ज, करुं नये नारीवर जोरी ।
कंटाळल्यावर विषयसुखाची मग नाहीं गोडी

फार सोस वावगा, प्रीतिची लहर बहार थोडी
चतुर विचक्षण आपण उभयतां हंसाची जोडी
घडोघडिं वदो किति ? जागृतिनें डोळे भरले ॥२॥
सरलि वाट, ताठली पाठ, कां अठ येवढी धरली ? ।
पोकळ झाली वेणि, राखडीमुद माथ्यावरली ॥
काढुन तरि घेउं द्या कंचुकी कांठाला चिरली ।
मर्यादा करण्याचि यापुढें काय सिलिक उरली ? ।
निस्तेज दीन दिसे मुखश्री अगदींच उतरली ।
मदन शांतवा, अतां जवळ मी नाहीं असें मोजा
येक शयन, येक चित्त, एक मन तुम्ही केल्या मौजा
बहुत जिकिर ठीक नव्हें, जीवन हें परक्याचें समजा
कांहिं तरी उमजा, अंगाला पाझर थबथबले ॥३॥
उद्यां हौस पुरवा पुरती, आज तनमन विटलें ।
सुरतसमायिं हैराण, वस्त्र हें नेसूंचें फिटलें ।
सापडलें ऐतें जसें धन कुबेराचें लुटलें ।
मोहनमाळ सर, मुक्त पदर हे कंठ्याचे तुटले ।
इतकें करतां तरी तुम्हांला नको कधीं म्हटलें ? ।
ज्याचें त्यास भोगणें, कोणाला तें नाहीं सुटलें ।
नदर वाहिला प्राण, घेतलें शिर कापुन हातीं
जशी इनाम जहागीर तुमची वतनाची खोती
मी सुरंग लालडी, तुम्ही तर येक दाणामोती
स्वसंतोष भरनवतिजळावर, ती कमळण उमले ।
**होनाजी बाळा** म्हणे, दर्शनीं कामज्वर शमले ॥४॥

अधरपवळी—पोवळ्यासारखे ओठ; बळस्त्रार—बलत्कार असा मूळ पाठ असावा. वलत्कार म्ह॰ वलत्कारानें; न्यारी—निरनिराळी; गजनी—

अर्ध सुती व अर्ध रेशमी, एका बाजूनें रंगीत, वर पट्टे किंवा रेघा असलेलें कापड. असें कापड पूर्वी गझनी येथून येत असे; म्हणून तशा प्रकारच्या कापडाला गजनी म्हणण्याची पद्धती पडली.सर्वपरी अतिवर्ज्य–अति सर्वत्र वर्जयेत्. जोरी–वंळजोरी; जागृतीनें—जाग्रणानें; अठ—हट्ट; सिलिक-शिल्लक; मोजा—समजा, धरून चाला; जीवन हें परक्याचें समजा—दुसऱ्यालाही जीव असतो, हें लक्षांत घ्या. नदर वाहिला प्राण तुला—माझा प्राण नदर म्हणजे नजर केला आहे, अर्पण केला आहे. येक दाणामोती—येक म्हणजे एक, म्हणजेच एकैक, अपूर्व. दाणामोती—मोत्याचा दाणा.

* * *

## लावणी ४५ वी

मज भोगा.हो, व्यर्थ जातो भरनवतीचा रुतू ।
मदन अंगिं साचला, चला एकांतिं उभयतां रतूं ॥धृ०॥
आज तुम्हांला येत असे काकुळती मी येवढी ।
मनाजोगती तुझ्या, तुं माझ्या एकांताचा गडी ।
करि तळमळ जिव, केवळ झाले तुमच्याविण बापुडी ।
चला निजूं खोलींत घट्ट घालुनि द्वाराला कडी ।
कठिण विषय हा, झुरझुर पाझर, थरथर कापे कुडी ।
नरम दुशालेपरी करा माझे शरिराची हो घडी ।
बळकट कवळुन मज धरा
करि धगधग जिव घाबरा
मरणाचा निश्चय खरा
पुरती मारा धरुन अपराधावर, कर ठार तूं ॥१॥
कवळे दोन्ही फार कठिण कुच हृदयावर हलती ।
रुप नाजुक, साजरी जशी मी पुष्पामधें मालती ।
मन ध्याई तों तुम्ही करुन घ्या मज उलथीपालथी ।

चारि प्रहर दमुं नका, मला निजवा आपल्याखालती ।
ऐकन आपली स्वामि जशी जी आज्ञा सांगाल ती ।
तुमचे मर्जीसाठीं वस्त मी देते मागाल ती ।
 उठवुन करिं धरिते वळें
 लुगडें करितें मोकळें
 त्या वेळे जीव तरमळे
स्नेह मोहो जाहले, प्रीत करुन विषयाचा डेरा मथूं ॥२॥
कां बोला ना ? तुम्ही फुकाचे मशी सुखाचे रहा ।
मीच बडबडते, व्यर्थ जसें लेकरु करितसे व्यहा ।
आणखी रांडा किती भोगितां दहा प्रकारच्या दहा ? ।
मजपासी मन थंड सदोदित, परकांतेची चहा ।
तप्त सुवर्णापरी करितसे या शरिराचा दाहा ।
द्रव सुटला शरिरांत, हात घालुन लुगड्यामधें पहा ।
 धडधडा हृदय धडकतें
 आवळुन मांड्या दडपते
 जीव पक्ष्यापरि झडपितें
प्रीत विघडतें ही निष्कारण, व्रतें कोणतीं व्रतूं ? ॥३॥
पंचम दिवशीं सूख जिवाला विषयाचें वाटतें ।
लौकर गळतां तुम्ही तेव्हां मन माझें कंटाळतें ।
वसुन मंचकावरी असूं मी नेत्रांतुन गाळिते
आटवण होते, तेव्हां दुष्ट वेळा तेवढी टाळते ।
या काचणिनें मी शरिरानें दिवसेंदिवस वाळतें ।
कोणाजवळ सांगावें ? असा जिव नित्य उठुन जाळितें ।
 मग धरिली उठतांक्षणीं
 कांता सुंदर लक्षणी

स्थिर झालि हंस पक्षिणी
लाउन झुरणी हे प्रियकरणी, मोहिलेस फार तूं ।
**होनाजी बाळा** म्हणे, आतां कर आमचा पूर्ण-हेतू ॥४॥

कुडी--देह; मन ध्याई तों—मनाची इच्छा पुरी होई तों; मथूं—मंथन करूं.

* * *

## लावणी ४६ वी

रात्रींतुन चारदां करुं नका, अजुन गळां कां पडतां ? ।
नको नको म्हणते, तरि कितिदां मजवरते चढतां ? ॥धृ०॥
असा पुरुष भोगणें मला हें दुःख सोसवेना ।
किति नाजुक मी आहे सख्या, हें आण पुरतें ध्याना ।
कां छळितां तुम्हि ? मला सुखाची झोप घेउं द्या ना ।
किति समजुन सांगते, तरी कांहिं माझें ऐका ना ।
मला भोगिल्याविण कंचा दिस येकही टळेना ।
असे घडि घडि जेव्हां तेव्हां मला कष्टवितां राहा ना ।
धरुन खवाटे किती लववितां ? शरिर माझें दुखतें
मुद्या आणि जोडवें हातांतिल मानेला रुपते
असें श्रमविल्यामुळें सकाळीं मुख माझें सुकतें
व्याकुळ होते फार सख्या, संग तुशी घडतां ॥१॥
वय तिसामधें तुम्ही, वर्ष मज सोळावें सरतें ।
करूं लागतां तेव्हां फार मी कासाविस होते ।
वर बसल्यावर तुम्ही, खालतीं मी फार तरमळते ।
जिव घ्यावा नारिचा मात्र येवढें तुम्हां कळतें ।
रोज उठुन भोगणें असें हें न मानवें मज तें ।

मोठ्या जिवावर दोन वेळ मी तुम्हांजवळ निजते ।
तिनतिनदां तरि कां हो लुगडें माझें वर करतां ?
बळकट कळ लाऊन दर वेळे स्तन रगडुन धरतां
तेव्हां येतसे राग, परंतु नये रागें भरतां
घडी न जातां मधे येक तुम्हि लागलेच भिडतां ॥२॥
हळुच करा, पुरुषार्थ आपला नका दाखवूं येव्हां ।
तोंड वेडेवांकडें मी करिते कळ निघते तेव्हां ।
बाहेर जाउन येते, विसावा येक वेळ घ्यावा ।
पाय होतिल मोकळे, फिरुन कडि दाराला लावा
असें वाटतें या जंजाळांतून सुटेन केव्हां ।
तुम्ही मनांत म्हणतसाल, पुरता प्राण हिचा घ्यावा ।
कितिक उशिर लागेल तुम्हांला तरि सांगा आतां
असें पुसूं लागलें मी म्हणजे 'उगिच रहा' म्हणतां ।
जाति प्राण जिवलगा, अहो मी मेले चरफडतां ॥३॥
थांबा हो, संशय वाटतो जाहले मी शिऊंनयेसी ।
तरि दूर व्हा ना, आतां तुम्हापुढें गत करुं मी कैसी ? ।
कसें वाइट वाटेना ? मनाला येईना किळशी ।
शेवटल्या प्रेमांत म्हणतसा, तुं थांब अमळसी ।
आशी दुसरी कोणाची वायको निजल तुम्हांपासी ? ।
मीच म्हणुन ऐकते गोष्ट जी तुम्ही म्हणतां तैसी ।
अतां च्यार दिस बरी मी तुमच्या कामांतुन गेले
स्वस्थ सुखाची निजन येकली, बरें येवढें झालें
सत्तेचा घेईन विसावा, तुम्ही निजा उगले
उजाडलें, मी जातें अतां, तुम्ही येतां कीं लवंडता ? ।
**होनाजी बाळा** म्हणे, नारिचा पति आहे आवडता ॥४॥

कष्टवितां राहा ना—कष्टविल्याविण रहात नाहीं; किळशी—किळस; उगले—मुकाट्यानें, निमूटपणें.

* * *

## लावणी ४७ वी

जिव जाई तों मला भोगिलें, अजुन किती छळसी ? ।
पुरे करा हो सख्या, अतां मी जहाले विटाळसी ॥धृ॥
मध्यरात्र लोटली, दीपदर्शनीं मला धरलें ।
अत्यवस्थ हें काय शरिर माझें सर्व विदारिलें ।
ढिलावले कटिवसन, शुभ्र पातळ रुधिरीं भिजलें ।
अशी निर्बळा निरुपाय, नित मी दुःख सोशितां गांजलें ।
कोमळ ल्वण्या माझ्या भोगितां आज फार उभगले ।
त्रिरात्र वर्जुन मला करा, बाकीचें पुढें राहिलें ।
चोळितां उरावर स्तन रुपते आंगठी
तुम्हि फार मोठे, मी अगदिंच किं हो धाकटी
धरधरुन नका करुं मांड्यांची फाकटी
काहाड मिठी मानेची ? राहुन राहुन कितिदां गळसी ॥१॥
फिरफिरुन ओढुन अलिकडे धरतां पोटासी ।
भिजवेना माझ्यानें, आलें दुखणें, जाले आडमुसी ।
लक्ष वेळ श्रम करुन काय फल ? रस नाहीं त्यासी ।
प्रीतिवर्म थोडकें, पहा दिग्गज आवळला अंकुशीं ।
द्वाड लागली सवय, कोणाचे गुणनिर्गुण शिकसी ? ।
कुठवर सोसूं ? सख्या कधिं लेकुरपण टाकिसी ? ।
तोडिले घोस, मोडिले काप कर्णिंचे
लटपटित मोकळे नग झाले वेणिचे
रुपतात वाकि, वाजती वाळे चरणिंचे

येवढे हाल मरणाचे असतां मज कांशि आवळसी ? ॥२॥
मीच निजूं गुंतले, आतां केव्हां सोडाल तरी ? ।
खिळखिळित अष्टांग, हल्लक जिव झाला शरिरांतरीं ।
सत्तात्रळें गवसून जशी व्याघ्रें धरिली बकरी ।
उभयतांचे भारानें गात या पलंगाचे करकरी ।
ऐकावी रदबदल, बहुत मन माझें त्रास करी ।
रत लंपट घेतली लुटुन जशी ती कमळण मधुकरीं ।
वीट करुं नका जी, मी आनवा नारी कीं
घोंगडी शाल किंमतीस नव्हे सारखी
युक्तिनें करा, तुम्हि गुणिवर्धन पारखी
देह कांतला चरखीं, तुझ्या बसले नेहमीं जवळशी ॥३॥
हलुं उठुं तरी कशी ? जाचते मानेला हासळी ।
सुटुन गेल्या चहुकडे दुडपेट्या, तन्मणी, गरसळी ।
उघड्या दोनी भुजा, उर, पाठीवर सरली चोळी ।
गोरे गाल, हनवटी मुके घेतां जाली हुळहुळी ।
आजच काय जाहलें ? अशीच वर्तेन वेळोवेळीं ।
कोठें दाखवा अशी दुजी तर विरळा स्त्रीमंडळीं ।
व्हा स्वस्थ, हेत पुरल्यावर नये गजवजूं
षण्मास येथुन मजपसी नका हो निजूं
चाकरी कठिण माझी, जन्मोजन्मीं अशी रिझूं
उभयतां एकांतीं निवळसी ।

**होनाजीबाळा** म्हणे, तूंच एक मर्जी सांभाळशी ॥४॥

दीपदर्शनीं—दिवेलागणीपासून. नित— नित्य, नेहमीं; उभगणें—उबगणें, कंटाळा येणें, वीट येणें; आडमुशी—गुद्मरलेली, घाबरी, जीव कोंडल्यासारखी. गात—लाकूड किंवा लाकडे; वीट करणें—राग करणें किंवा कंटाळा

करणें; आनवा—अमोलिक; उत्कृष्ट; कांहीं वैशिष्ट्य असलेली; दुडपेटी—दागिना विशेष.

* * *

## लावणी ४८ वी

ये ग ये सखे पलंगावरती ।
जिव धीर न धरती ॥ ध्रु० ॥
गोरा देह ओतीव कंचन कैसी । जशी उंच मुकेसी
भरलें तारुणपण आलें शिगेसी । कधीं भोगुं देसी ?
अवघ्या नारींचीं रूपें दिपविसी । तुं पद्मिणवंशी
उचलुन घ्यावी कडेसी । कांहिं मग नको, वासना मरती ॥ १ ॥
तुझी ग गोड प्रीत मोठी कळली । जशी जिलबी तळली
पाहतां दिव्यानन, दृष्टी वितळली । मति अमची चळली
अवघ्या भोगुन तूं मात्र वेगळाली । तीच आज मिळली
दैवी प्रीतिरस गळली । जाते घडि सुखाची सरती ॥ २ ॥
फिरलें मन, तुजला गडे राखावी । काशि तरि टाकावी ?
प्राणीमात्रानें वाखाणावी । चांगली म्हणावी
घालुन दरवडा ग चोरुन न्यावी । कुलपीं ठेवावी
अजुन किती विनवावी ? । देखुन तुला लोक बावरती ॥ ३ ॥
केवळ बोलणें रासिक रसवाणू । जशि मंजुळ वेणू
धरिलें ब्रीद, हें नको लटकें मानूं । कां करसी नानू ?
**होनाजी बाळासी** नये अनमानूं ।
विषयाची ××× ××× ××× अशी सारा दिवस वानुं ।
बसली चरक जिव्हारीं पुरती ॥ ४ ॥

मुकेसी—जरतारी, भरजरी, सोनेरी बुट्या असलेलें कापड; अवघ्या भोगून तूं मात्र वेगळाली—इतर अनेक स्त्रियांचा उपभोग घेतला, परंतु तुझी मजा कांहीं

वेगळीच आहे. रसवाणू—रसभरित, रसपूर्ण; वेणू—मुरली, वासरी; त्रीद—वाणा, प्रतिज्ञा; नानू—कांकूं करणें; अनमानणें—नकार देणें; वानणें—वर्णन करणें; चरक—चटका, चरका.

* * *

## लावणी ४९ वी

पाक सुरत कामिना ही गजगामिना । त्रिलोरी जणुं ऐना लखलखी ।
तुला पाहतां जिव माझा सुखी ।। धृ० ।।
सौम्य वदन, वय निटस, कंचुकी तटस, चालतां अटस पदर बांधणें ।
तुझ्या स्वरुपाचें पडे चांदणें ।
देउं उपमा कोणती ? नव्हेस नेणती, जाणतीस वत्तिस गुण शोधणें ! ।
कपाळीं तिळ हिरवा गोंदणें ।
हसत सदासर्वदा, सधन संपदा, धरुन अतिमर्यादा नांदणें ।
जरब नयनाची, विषय भेदणें ।
गोजऱ्या पोटऱ्या दुही मांड्यांचा जवा
तोरड्या शुभ्र जोडव्यास उजळा नवा
सर्वांगि नरम गोरे गाल, दुधाचा खवा
गोड शर्कराधुवा प्रीत आनवा, देखतां जेव्हां तेव्हां सारखी ।। १ ।।
आशि अबळा निर्मळा, कंठ कोकिळा, वाटोळा टिळा कुंकुम लाविशी ।
जाशि नागिण तूं फोफावशी ।
कुरळ वेणिचे बाल, अंगावर शाल, लाल हलकडी नथ सरसावशी ।
उमर पहिली दिसते बेविशी ।
मदनबाण निर्वाण सतीचें वाण, ठेवितों प्राण गहाण तुजपशीं ।
भोगुं देशील कोणत्या दिशीं । ?
सकुमार मनोरम फार सरस रूपडें

लागता जरा उन मुख होतें तांबडें
नको चालुं सखे अनवाणि, लागतील खडे
जन वेडेवाकडे, ज्याहालीं तुजकडे दृष्ट लागेल गडे उघडे नखीं ॥२॥
तूं पुतळी त्रिनसुलाख, अगदीं निलाख, दिसे चाख झाक मनमोकळी ।
सडक पातळ जाइची कळी ।
हिरकणी साधि, मुदि घालि कांधिमधिं, गळ्यामधें गोपाची साखळी ।
गुलाबी फूल सुगंध पाकळी ।
ज्ञान कळा चतुरशी पाहिली तुशी, विलासी जाशि राधा गोकुळीं ।
जन्म जाहला सुमायेचे कुळीं ।
सौंदर्यनिधी मद कामोद्भव भोगिना
सुरसभास्थळींची केवळ दिव्यांगना
लावितां पडोसा लाखामधें लागेना
महासात्विक वासना, कोणा सोसेना मधुर रस नारी भाषण मुखीं ॥३॥
मान्य करी लवकरी, समज अंतरीं, किति तरी परोपरी पढवितों ।
तुला आवडले तसे घडवितों ।
जातों मरुन तुजवरुन, नको जाउं दुरुन, धरुन कर वाटेमधें अडवितों ।
तुझे पाईं तप सारें बुडवितों ।
घरिं येऊन, लाडें घेउन, एकांतीं नेउन, लावुन कडी खोलीमधें दडवितों ।
हवा तितका पैसा उडवितो ।
हे पूर्व दत्त फळ पुण्याचें कंदणें
दैवानसार ही नार हातीं लागणें
आहे चंद्रदिवाकर तोंवर सुख भोगणें
**होनाजी बाळा** म्हणे, रहा भलेपणें, जिणें तुजविण नको आणखी ।
बऱ्या अपल्या जाहल्या ओळखी ॥ ४ ॥

पाक़सुरत--अतिसुंदर शरिराची; ऐना--आ़रसा; निटस वय--कोंवळें

किंवा तरुण वय, असें कत्रीला म्हणावयाचें असावें; तटस--घट्ट; अटस--घट्ट, आवळून; नेणती--अज्ञान; वत्तिसगुण शोधणे--हें सर्व संबोधन आहे. जवा--सांधा किंवा जोड किंवा मेळ म्ह० सिमेट्री. शर्कराधुवा--धुतलेली साखर किंवा मळी काढून शुद्ध केलेली साखर; आनवा--विशेष किंवा अपूर्व; वाल--केस; बेविशी--विशी--वाविशींतील; रूपडें--रूप; ज्याहाली--उग्र, कडक; उघडे नखीं--तुझ्या पायाचें नख उघडें दिसलें तरीसुद्धां लोकांची त्याला दृष्ट लागेल; मग तुझा चेहरा दृष्टीस पडला तर विचारावयासच नको. पुतळी--संपूर्ण सोनें असलेलें एक जुनें नाणें. (याची किंमत सुमारें ४ रु. असे). विनसुलाख--सुलाखणें म्हणजे परीक्षा करणें. सोन्यास भोंक पाडून त्यांत भेसळ नाहीं हें पाहण्याची जी क्रिया तिला सुलखणी म्हणतात. हें काम पूर्वी टांकसाळींत किंवा सराफाकडे जे लोक करीत असत त्यांनाच 'सुलाखे' असें आडनांव पडलें. येथें विनसुलाख याचा अर्थ लाख नसलेली पुतळी असा घ्यावयाचा. निलाख--लाख वगैरे भेसळ नसलेली. चाख--चोख; गोपाची--गोफाची; सुरसभास्थळींची--इंद्राच्या दरवारांतील; पडोसा--तुलना, साम्यता; तप--पुण्य; कंदर्णे--ठेवा, संचय, कुणगा, पुरून ठेवलेला निधी.

* * *

## लावणी ५० वी

निखळ वेड लागलें, तुंसाठीं जिव काढुन देतों ।
दोचौ दिवशीं जपुन खपुन लपलपुन घरीं येतों ॥धृ०॥
जडुं नये जडली जोड, जोडितां मन अपलें मिळलें ।
न घडावें तें घडलें, घटित कसें ब्रम्ह्याचें टळलें ? ।
हाच शकुन वाटतो, दिवस गडे नशिबाचे उजळले ।
या केल्या प्रीतिचा शेवट तूं करशिल हें कळलें ।
सर्व नारी तुजखालिं, असें रूप नाहीं ग आढळलें ।
स्नेहसंगतिच्या योगें मोति जणुं हंसानें गिळलें ।
नको अतां दुर वसूं, जवळ ये, तव अंकित होतों ॥ १ ॥

निष्ठुर जन घातकी, कर्म केलें बाहेर फुटतें ।
न बोलतां तुं हसुन सखे ग मन अमचें विटतें
शब्दाच्या फासण्या नको ग घालुं, काळिज तुटतें ।
तुझ्या घरि येउं नये आम्हाला हें तरि कसें सुटतें ? ।
रात्रंदिस पेडवा चक लागली ल्चक शरिर कटते ( ? ) ।
त्वां न भरावेंस रागें म्हणुन तिळ तीळ रुधिर अटतें ।
झुरझुर झुरझुर झुरून उदासिन, नित वारा खातों ।। २ ।।
कामातुर अतिचतुर तुझें मुख अरुणोदयिं पहावें ।
एक पलंगावर आपण मिलाफित, कधिं ग असें व्हावं ? ।
मोहनी मंत्र मुठ हृदयिं मारालिस, दुख कुठवर साहावें ? ।
धंद्याला आग लागो, तुला सोडून कैसें रहावें ? ।
आजकालचे न, हो वर्ष हे ओळखिला दाहावें ।
ऐवज मोबदला बदल शिर पुष्पापरि वहावें ।
जसें जसें बोलशिल तसें तसें आम्ही सोसुन घेतों ।। ३ ।!
धुंद मदन एकांतीं गोड भाषण ऐकुन तोंडीं ।
कसा पुरुष तुजपुढें होतसे वाघाची मेंढी ।
सुवर्ण धातू काचित, पितळ तांबें खंडोखंडी ।
ज्यांनीं विषय त्यागिले पाहुन तुज त्यांच्या मुरकुंडी ।
योग पडतां घाडि दु:खाची, यम जैसा दंडी ।
उपकाराच्या योगें तुला प्राणाची कुरवंडी ।
**होनाजी बाळा** म्हणे, काठिण सुटणें मायामोह तो ।
विरहरसामधें लुब्ध जसा मिन पाण्यावर पोहतो । ।।४।।

निखळ—संपूर्ण; नशिबाचे दिस उजळलें—नशीब उघडलें; सर्व नारी तुजखालीं—सर्व स्त्रिया तुझ्यापेक्षां कमी दर्जाच्या; शरिर कटतें —शरीर तुटतें, क्षीण होतें; ऐवज मोबदला इ०—मोबदल्याबद्दल ऐवज

म्हणून प्रत्यक्ष शीरही तुझ्या पायावर वहावयास तयार आहे. सुवर्ण धातु इ०–सुवर्णासारखी धातु क्वचित् मिळावयाची; एऱ्हवीं तांबें, पितळ, इ० क्षुद्र धातु खंडोगणती मिळतातच. मुरकुंडी—मुरकुंडया. वळतात. भावार्थ विषयवासना त्याग केलेले संयमी साधुलोकही तुला पाहून विषयलंपट बनतील. कुरवंडी—दान.

* * *

## लावणी ५१ वी

गांवा जातां अतां, तुम्हाविण मला येथें कोणी नाहीं ।
दृष्टी पाहिन कधिं फिरुन हे पाय अंबाबाई ? ॥ धृ० ॥
परवा जातां निघुनी, असें मी काल ऐकिलें कानीं ।
सुमुहुर्तानें आहे उद्यांचा दिस मुक्काम प्रस्थानीं ।
निचिंत अजचि रात्र बोलते मी जोडूनया पाणी ।
सांगा आण वाहुन राजसा, याल कितिक दिवसांनीं ? ।
कसें करून राहविते, परंतु भर देउन साऱ्यांनीं ।
जायाचें ठरविलें, अतां तुजविण मी पडले रानीं ।
गेल्याचें सुखरूप लिहुन वर्तमान धाडा मजला
दुरावल्यामुळें पडल हा माझा विसर तुम्हांला
देहासहित हा प्राण सख्या, मी केला तुझ्या हवाला
कां वियोग योजिला ईश्वरें, हें मज न कळे कांहीं ॥ १ ॥
जायाचें ऐकिल्यापसुन दिनरात्र काळजी करिते ।
जेवणखाण विसरले, नाहीं मन माझें धंद्यावरते ।
कोठें अहा तुम्ही म्हणुन पहात मी नित्य घरामधें फिरते ।
न दिसासे जाहल्यावर अर्धे क्षणामधें घाबरते ।
आशी टाकुन येकली जातसा तुम्ही दुर देशावरते ।
पुढिल अठवून अंतरीं, अतांच मन गहिवरतें ।
पाहुन सख्या तुजकडे येतंस जळ माझ्या नेत्रांसी

राहिन येथें मी, परंतु माझा जिव लागेल तुजपाशीं
आणिक दु:ख मज नाहीं, मुख्य मी अंतरले पायांसी
आहे तशी यापुढें असुं द्यावी प्रीत माझे ठायीं ॥ २ ॥
येवढा वेळ पतिराज गोष्टी मी ज्या ज्या सांगितल्या हो।
हे बोल माझे अवघे आपल्या ध्यानांत असुं द्या हो।
दिसगत जर लागली तुम्हांला निघुन यावयाला हो।
मग मुळ शिबिका त्वरित पाठवुन मज तिकडे तरी न्या हो।
सुखदु:खाचे मार्ग असे हे सर्व निर्मिले ग्या हो।
तरि येकहि प्रतिशब्द जिवलगा मशि बोला ना कां हो ?।
प्रवासांत गेल्यावर येणें घडेल फार उशिरानें
घरिं नसल्यावर तुम्ही, राहुं मि कोणाच्या आश्रयानें ?
यावर सांगा, फिरुन आतां कधिं भेट होइल दुसऱ्यानें ?
कायावाचामन करुन हें हो लक्ष तुमचे ठायीं ॥ ३ ॥
नको चिंता सुंदरी करूं, तुं अवडतेस आम्हांला।
शब्दगौरवें तुझ्या फार संतुष्ट सखे जिव झाला।
थोड्या दिवसांसाठीं कष्टी कां करितेस मनाला ?।
जाउन माघारें लवकर घरिं येतों सण शिमग्याला।
नको मोठ्यानें रडुं प्रियकरे, डोळे पुस पदराला।
उजाडलें बोलतां, आतां अम्ही जातों प्रस्थानाला।
अति अवघड वाटतें, जा कसें मी हो म्हणावें अता ?
मिठी मारून पोटाशीं पतिला धरि कवटाळुन कांता
पाणी आलें डोळ्यांस उभयतां एकमेकांकडे पाहतां
पति उतरुन खालती आल्यावर पाईं ठेविली डोई।
**होनाजी बाळा** म्हणे, कशि तरि चार दिवस उगी राही ॥४॥

प्रस्थान—प्रवासास निघण्याच्या वेळीं शुभ मुहूर्त नसल्यास तत्पूर्वी एकाद्या

शुभ वेळीं शेजाऱ्याच्या घरीं मुक्काम करणें याला प्रस्थान म्हणतात. पाणी—हात, कसें करून राहवितें इ०—मी तुम्हास कसेंही करून राहविलें असतें. मूळ पाठवणें—बोलावणें पाठवणें; शिबिका—पालखी.

* * *

## लावणी ५२ वी

क्षणिक सुखाचेसाठीं मागशिल प्राण तरि द्यावया—
सिद्ध आम्ही झालों यांत गडे संशय उरला नाहीं । राजसवदने ।
या नरजन्मीं येउन आणखी तुजविण नलगे कांहीं ॥ धृ० ॥
सौख्यउदय पाहा सखे नवल परि हे नशिबाचे ताले । राजसवदने ।
चिंतलेच तुज, असें सगुण स्त्रीरत्न हताशीं आलें । राजसवदने ।
तरि तुझें अमुचें सुख पुरें असें नाहीं अजून मन धालें । राजसवदने ।
नको मिळले सोडुं हाताचे, जाती सुखाचे दिवस—
तुझ्या उपकारीं, प्राण तरमळे नाभींचे ठाईं । राजसवदने ॥१॥
वाटाशि आम्हाहुन अधिक योग्य, धन्य काय तुजपुढें नारी । राजसवदने ।
आशि आम्हांस प्रियकर नेहमीं जवळ हवीस शेजारीं । राजसवदने ।
जातां जवळुन तुझ्या घराकडे जिव पाहातों माघारीं । राजसवदने ।
फिरतों नित्य व्यवहारी, परंतु स्मरण तुझें—
पाउलापाउलीं गडे होतसे आमच्या अंतरध्याईं । राजसवदने ॥२॥
दाखवुन किंचित सुख सखये, आतां नको करूं माजी । राजसवदने।
धर निश्चय बळकट, प्रीतजल तृषांतिताला पाजी । राजसवदने ।
अमचे उपाईं जें मागशील तें उभें द्यावया राजी । राजसवदने ।
काळजींत जीव तुझ्या घराकडे, नाहीं—
पहात आपलें स्वहित, सोडिलें प्रपंचास पाणी ग तुजपाईं। राजसवदने॥ ३॥
चांगट नट गुण अविट पाहतां तूं रूपवंति दारा । राजसवदने ।
संसार विषय तुजमुळें सखे आम्ही सोडीला सारा । राजसवदने ।

संकटीं पडले प्राण, लागुंदे विषयसुखाचा वारा । राजसवदने ।
इष्काप्रति ईश्वरा मति दे म्हणे **होनाजी बाळा**—
आतां प्रतिपाळ कोण तुजाविणें करिल तें पाही । राजसवदने ॥४॥

अंतरध्याई—अंतःकरणांत; माजी करणें—रद्द करणें किंवा त्याग करणें; तृषांतित—तहानेला, तृषा लागलेला.

* * *

## लावणी ५३ वी

येतिल स्वामी कधीं कधीं ? ।
यासाठीं धाय धाय रडते बसुन अंगणामधीं मधीं ।।धृ०।।
फार दिवस जाउनी जाहले, गेले तरि कोणिकडे ? ।
येत्याजात्याला पुसते, पर कोणी सांगेना सुधी सुधी ॥१॥
संसारामधें अम्ही दोघेजणे, नाहीं तिसरे कोणी ।
त्यांतुन ते दुरदेशिं राहिले, मला टाकिली जुदी जुदी ॥२॥
रात्र होत दिड प्रहर, औशिचा मदन पेटतो जेव्हां ।
तें संकट वैऱ्यास नसावें, मी धरुं किति अवधी अवधी ?॥३॥
मी सख्याला फार अवडती प्राणाहुन पलिकडे ।
कसें झालें भगवंता न कळे, नवल घडविता विधी विधी ॥४॥
कांहिं दिशिं घरधनी आले, मग **होनाजी बाळा** म्हणे ।
असाच निश्चय ठेव निरंतर सखे पतीच्या पदीं पदीं ॥५॥

सुधी—सरळ, सरळपणें; जुदी—अलग किंवा एकटी, निराळी; अवधी धरणें—दम खाणें; विधी—ब्रह्मदेव.

* * *

## लावणी ५४ वी

रात्रंदिस डोळे शिणले या हो माझे घरीं ।
पाहते वाट पक्ष्यापरी ॥ धृ० ॥

पाहिले मला तुम्हि आधीं वसवसून ।
भोगिले एकांतामधें कसकसून ।
अंतर पडलें तरी कधिं मजपसून ? ।
त्रिन अन्यायी रुसून तुम्ही कां जातां मजवरी ? ॥ १ ।
हा काल प्रीतिच्या रसें लोटिते ।
झड घालुन भलत्या मिषें भेटते ।
भोगावें तुम्हांला असें वाटतें ।
दुःख जवळ नेटतें जेव्हां विषयाचे अंतरीं ॥ २ ॥
येऊन उभी द्वारापसी राहते ।
भिरभिर वाट चौदिशीं पाहते ।
निर्मल आण तुमचेविशी वाहते ।
कामज्वर साहते, असा कधिं पावेल श्रीहरि ? ॥ ३ ॥
श्रम जाहले समजावितां या मुखें ।
का द्वैतभाव दावितां पारखे ? ।
X तोल सगुण उभयतां सारखे ।
**होनाजी बाळा** म्हणे, सखे ही प्रीत चालिव पुरी ।
तुसाठीं जीव आमचा हुरहुरी ॥ ४ ॥

भलत्या मिषें—निराळीच सबब किंवा सोय काढून.

* * *

## लावणी ५५ वी

जन्म जाइ तों आतां तुझीच म्हणविते ।
प्रीतिचे मेघराज, धनि माझे महाराज ! मी
दासी तुमची भाज, आज विनविते ॥ धृ. ॥
तुम्ही न बोलतांच मशि हंबरते गाय जशी
हशि खुषी दिशिं निशीं हनुवटीसी हात लाविते ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत,
अनुक्रम 29975 वि: ११
क्रमांक 2350 नों: दि: 30/12/50

कर सख्या विषयहरण, मग येउं दे मरण तरण
शरण तुझें धरून चरणतीर्थ सेविते ।। २ ।।
नको तुझी तनसोडी मला, प्राण वाहिला रे तुला
रोज घरिं येत चला, मी बलाविते ।। ३ ।।
मी लबाड, द्वाड, खाड, तुझी मर्जि अति कडाड
तरि कुऱ्हाड शस्त्र काढ, शिर फोड आपल्या हातें ।। ४ ।।
**होनाजी बाळा** करि छंद रसिक चालीवरी, श्रीहरिचे
पाय धरी, शिरीं लाविते ।। ५ ।।

भाज—बायको; कडाड मर्जी—कडक मर्जी, रागीट स्वभाव.

* * *

## लावणी ५६ वी

भोग दे जिविच्या गुणग्राही ! ।
ठेविला प्राण तुझे पाईं ।। धृ० ।।
केली सेवा आजवर म्या हो ।आतां जें मागेन तें द्या हो
फावल्या वेळे समयीं या हो । भेट मज गरिबाची घ्या हो
माझें भाषण तरि ऐका हो । जाशि मैना करिते टाहो
नाहीं मागत विशेष कांहीं ।। १ ।।
येथें कां मन तुमचें जातें ? । कोणीकडे न्याल तेथें येतें
चित्त पहिलें प्रशस्त होतें । आतां पातळ दिसतें नातें
नग्न मी हृदयावर घेतें । उरासि धरुनी मुके देतें
तुम्हिच शिरिमंत, मी अन्याई ।। २ ।।
हेत मजवर तुमचा कैसा । जसा जळीं बक धरितो मासा
प्रीतिची असले तर पोसा । उपद्रव लागेल तो सोसा
रोज भोगा घटका तासा । कसोटीं देह माझा घासा
लागली प्रीतिची मिठाई ।। ३ ।।

सख्या तूं मम जिविच्या जिंवना । तुझी कांता राजिवनयना
करि चटपट जिव हा राहावेना । निथळतें जळ माझ्या नयना
**होनाजी बाळा** म्हणे, मना आलीस पुरती
अमच्या ध्यानीं रहात जा सुखी बारमाही ।। ४ ।।

अन्यायी—गुन्हेगार; चटपट—चुटपुट, हुरहुर.

* * *

## लावणी ५७ वी

येणें जाणें का रे वर्जिले सख्या माझे घरीं ?
तुला मी काय बोलले तरी ? ।। धृ० ।।
प्रीत होती तुझी माझी तेव्हां जें चलन वळण हें कसें ? ।
तुला मजविण क्षण करमत नसे ।
दिवसांतुन शतवेळ मजकडे येत होतां राजसा ।
अतां कां मन निष्ठुर मज फारसें ? ।
मी स्वरुपावर लुब्ध होउन कि रे तुजभोवत फिरतसे ।
भुकेली धनद्रव्याची नसे ।
इतकें असून चांडाळा आणसी दूषण माझे शिरीं ।। १ ।।
बहुत प्रयत्नें स्नेह उभयतां आहे ऐता जाहला ।
आतां नको अंतर देऊं मला ।
संतापामधें शब्द एखादा असन बोलले तुला ।
तोंच तुज राग वाटतें आला ।
दगलबाजी तुशीं नाहीं करून पु × × नि संशय आपला ।
शपथ वाहते, एकांतीं चला ।
असत्य वाटेल तरी सख्या घे लेख लिहुन मज करीं ।। २ ।।
मी वेडी, मजला कळतें काय हें तुज मुळापसुन ठाउकें ।
तुझ्या संगतीनें वर्ततें सुखें ।

ग्रं. क्र. ८१२ ... २०१

तुजविण मज नावडती जिवल्या आणिक पुरुष पारखे ।
येत जा तुम्ही पहिल्यासारखे ।
विषयाचें लाविलें वेड हें त्वा मलाच इतुकें ।
आतां बोलत जा हसल्या मुखें ।
कशासाठीं धरिलांत अबोला रागें भरून मजवरी ? ॥ ३ ॥
सोड अलेला राग जिवाला, चरणिं डोइ ठेविते ।
आणिक जिव अपला संकल्पिते ।
आजपासुन सांगितलें ऐकुन हवी तशी वागते ।
परंतु एक ऐका सांगतें ।
तुम्हि न जावें परकीकडे येवढें द्या हो वचन मागतें ।
खचित सांगा मजला काय तें ।
**होनाजी बाळा** म्हणे, बोलणें येथुन आतां पुरे करी ।
समजलों राग नाहिं अंतरीं ॥ ४ ॥

पारखे—परकें.

## लावणी ५८ वी

भोगुं देशिल तरी सुंदरी तुझ्या करिं विकले जाऊं ॥धृ०॥
रूप साऱ्यामधें शिरा उत्तम बहुत गुण योग तुजमधें गडे भरले ।
अति सुंदर वदनाची ठेवण, चित्र जसें भिंतीवरलें ।
रोज दृष्टीनें पाहातां पहातां मन अमुचें तुजवर फिरलें ।
निश्चय तुज भोगावें असें मग हृदयांतरि पुरतें ठरलें ।
या काळजीनें अजवरते
क्षिण जाहलों शरिरानें पुरतें
अणिक नको काहीं तुजपरते
शेजेवरते कधिं एकांतीं शरिर तुझें उघडें पाहूं ? ॥ १ ॥

ठीक सुरेख ठेंगणी रुपानें, गौरवर्ण सुंदरशी ।
पुरुषाच्या वासना फिराया भाव प्रीतिचे तूं करशी ।
म्हणुन शरण तुज आलों उताविळ होउन तरि कां दुर धरशी ?।
न लाजतांना अतां राजसे वैस येउन अमचे सरशी ।
नको उगेच अमुचें मन मोडूं
चार दिवस प्रीतिनें दवडूं
आहेस तंवर हा स्नेह गडे जोडूं
मग सोडुन हें वेड कधिंमधिं हात येउन नुसता लाऊं ॥२॥
आलिस यौवनामधें, उभार स्तन उभे कंचुकीआड दिसती ।
कोमल मुख नाजुक अप्रतिम, आम्हां ती सारा वेळ मुद्रा हसति।
विषय कुशलतेचे गुण अवघे तुझ्या करतळामधें वसति ।
कधिं सुखानें भोगुं तुला ? गडे, व्यर्थ काय पाहाती नुसती ? ।
फार गांजिलें या घोरानें
जसे द्रव्य नेलें चोरानें
पाहत फिरावें रानोरानें
तसे विषयजोरानें आम्ही गडे तुझ्यामागें धावत येऊं ॥३॥
कां ग सुटेना विषयद्रव तुला ? किति बोलावें सांग आतां ? ।
एक एक जातिल दिवस निघुन हे, नाहीं पुढें कांहीं पाहतां ।
कोण अर्धी जितील ? कळेना देह त्यागुन स्वर्गी जातां ।
गेल्यावर हा प्राण अपेश हें सखे तुझ्या येइल माथा ।
मग नारीला संकट पडलें
गुप्त रूपें होतें तें घडलें
उभय चित्त मग पुरतें जडलें
**होनाजी बाळा** म्हणे, सापडलें रत्न तयाला उळगाऊं ।

तुझ्या करिं विकले जाऊं—जुन्या काळीं मालकाला आपला गुलाम कोणालाही

वाटेल त्या किंमतीस विकतां येत असे. घरचा गुलाम व घरचे गुरूं दोन्हीं सारखेच. येथें भावार्थ मी तुझा गुलाम होण्यास तयार आहें; भाव—आदा किंवा हावभाव; उभार--जोमदार; पाहाती--पाहतेस; जिंतील—जिंकेल; उळगाऊं--उलगणें म्ह० द्रवणें किंवा पाझरणें. चंद्रकांत मणी पाझरतो हें प्रसिद्धच आहे. तशा रत्नासारखी तूं 'उळगाऊ' रत्न आहेस असा भावार्थ.

* * *

## लावणी ५९ वी

जन्मवर बांधली मी तुमची अशी म्हणते नेहमीं ।
तरी मशि कां हो वाकडे तुम्ही ? ॥धृ०॥
सुखी असा हो, मशि दु:खाचे दिवस घालवूं नका ।
चित्त वाराकडे लावूं नका ।
बालमित्र मम प्राणप्रीतिच्या माझ्या अर्धेलिका ।
तुला घडि घडि घडि म्हणते सखा ।
मी मैना सकुमार, नवाजिक तूं पोपट बोलका ।
गोड नांवानें मारिते हाका ।
विनयमूर्ति जशी तुम्हांला घ्या सापडले रेशमी ॥ १ ॥
नको निर्फळ मशिं रुसुं, तुम्हि मला सौभाग्याचे निधी ।
कारणें शीर वाहिलें पदीं ।
ठेवुन हातचें काम तुमच्याजवळ येते मी अधीं ।
तरी कां मग म्हणता हो जुदी ? ।
जें अवघड सांगतां त्यास मी मागें हटले कधीं ? ।
विकुन या, न्या बाजारामधीं ।
अशी कंचि ऐकेल दुसरी स्त्री लोकाची हो मी (?) ॥२।
कोण अतां दुसरा ? ईश्वराठाइ तुम्हा मोजितें ।
जेवितां तुम्ही मग जेविते ।

उणे शब्द लोकांचें बोलणें मुकाट्यानें सोशिते ।
फार तुमच्या रागाला भिते ।
विचारल्या विरहीत काय मी करिते आपल्या मतें ? ।
पाजितां तितुकें पाणी पिते ।
जे तुम्हांस तें मला, सदा तुमच्याच विचारांत मी ॥ ३॥
दान प्रीतीचे, म्हणुन पद किती आदरानें धरूं ? ।
करा प्रतिपाळ जसें लेकरूं ।
मूळ प्रीतीचे तुम्ही निर्वाहक, कशी तुमचेविण तरूं ? ।
जसें वनवासामधें पाखरूं ।
कसें राहवतें ? आतां उभयतां न ये कंटाळा करूं ।
याच मार्गानें शेवट करूं ।
**होनाजी बाळा** म्हणे, आराधुन मूळ पुरुषाला नमी ।
देव तुजकडे, नको होउं श्रमी ॥ ४ ॥

बाराकडे--बारा वायकांकडे; अर्धेलिक--अर्ध्याचा मालक. अर्ध्या वाट्याचा हिस्सेदार; नवाजिक--नामांकित; जसें वनवासामधें पाखरूं--ही उपमा बरोबर नाहीं. कारण वनांत पाखरास सोडल्यास त्याची चैनच. त्याला निराधार वाटण्याचें काय कारण ? उलटपक्षीं होनाजी बाळानेंच दुसऱ्या एका लावणींत दिलेली उपमा अति समर्पक आहे. ती अशी " जसे जहाजावरले पक्षी दुजें स्थळ नाहीं." जहाजावरील पाखरूं कितीही लांब उडून गेलें तरी त्याला अखेर परत त्याच जहाजावर आश्रयास यावें लागतें ! नमी--नमन कर, पाया पड.

* * *

## लावणी ६० वी

सखे, तुझ्या चांगुलपणाची काय तारीफ तरी सांगावी ? ।
प्राण व्यर्थ तुजपुढें, खरा जिव लावुन तुला गडे भोगावी ॥धृ०॥

गोरा रंग गोजिरा शिरा ही तऱ्हा तुझ्या गडे स्वरूपाची ।
जोबन कवठें जशीं, उरावर तंग चोळी मिन्याची
वहरदार थोडकेंच हसतां मोती हलती कांपाची ।
मर्यादेशील आहेस, वाटते तूं लाडकी मायबापाची ।
सुगंध वेणीमधें खोचली पुडी कस्तुरिच्या नाभाची ।
पवित्र दिसशी कशी भोगितां नाहि कल्पना पापाची ।
शंभरदां फिरफिरुन पाहतों, तरि वाटे आणखी पहावी ॥१॥
चाल तुझी हळुहळु झुकावित पाइं जोडवीं न वाजती ।
पंगतीमधें वाढतां तुझ्याकडे टवकारुन सारे पहाती ।
सापिट गव्हाचें जसें तशा मृदु मांड्या, निर्मळ उर छाती ।
गोलदार बाहुटे, घातल्या घट्ट वाकि वर गुजराथी ।
अम्ही पुरुष तुजपुढें गरिब, तूं सखे आम्हाला धर हातीं ।
सुख भोगुन शेवटीं तूंच हो अमच्या प्राणांची साती ।
रोज घराशी अणुन एकिकडे प्रीतीनें अलिंगावी ॥२॥
लाल रंग तळहात, कोवळे पाय, नौतिचें वय थोडें ।
राजि व्हावयासाठीं देतसों अणुन तुला ताजे पेढे ।
समागमाचा पहा कसा गुण, गंगेला मिळती ओढे ।
हीच कल्पना इथें लक्षितां अक्षइपद हातीं जोडे ।
पडुन मूर्ख जाहलों तुंसाटीं वेड्यापेक्षां अम्हि वेडे ।
जिवंतपणिं भोगुं दे, काय मग मेल्यावर गेले गाडे ।
जन्मोजन्मीं हीच ईश्वरापशी अशी स्त्री मागावी ॥३॥
प्रसन्नतेची गुढी अतां दे, उपकाराला जीव देतों ।
दो घटकेची मौज, फारसे तुझें काय नेतों ? ।
घेतों सलामतीचा वहार तुझ्या, गडे तोंडाकडे पाही जो तो ।
प्राप्त कोणाची नाहीं, आपल्या मनामध्यें साखर खातों ।

निलाजऱ्याचे × × तुझ्या घरीं तिनतिनदां धावुन येतों ।
नको हाडें घोळसूं, कृपा कर दिल अमचा व्याकुळ होतो ।
**होनाजी बाळा** म्हणे, प्रयत्नें करून हाताशीं लागावो ।
हीं सुंदर चांगल्या फुलाची कळी सुवासिक हुंगावी ॥४॥

कस्तुरिच्या नाभाची--कस्तुरी मृगाच्या नाभींची. त्या मृगाच्या नाभींत कस्तुरी असते. त्या नाभीला नाफा असेंही म्हणतात. नाफा--म्हणजे कस्तुरी मृगाचा अंडकोश; सातीं--सांगातीण अगर साथीदार; मेल्यावर गेले गाडे--ही जुनी म्हण काय आहे तें कळत नाहीं. भावार्थ, 'वरातीमागून घोडे' असाच आहे. सलामतीचा वहार घेणें--शुभ शकून घडणें. भावार्थ-तुझें तोंड ज्याच्या ज्याच्या दृष्टीस पडतें, त्याला त्याला शुभ शकुन झाल्यासारखा वाटतो; प्राप्त--प्राज्ञा किंवा हिंम्मत; घोळसणें--घुसळणें; दिल--काळीज, अंतःकरण.

* * *

## लावणी ६१ वी

अमृतवेळा चांगली, एक प्रहर निशी भागली ।
हालविते उठा, भोग द्या, येव्हांसी झोप कशी लागली ? ॥धृ०॥
कोमळवदना, तुझ्या प्रीतीची, आजपावेतों चालिवलें ।
नाही लटकी होणार, मला तुम्ही हातीं धरुन जर घालिवलें ।
जीव देउन लाविल्या देहाचे दीप कां हो तरि मालिवले ? ।
आज निजले डाव्या भुजीं
अवगुण असल तर त्यजी
नाकीचा वाल मी तुझी
पदरजीं भुकेले विषयसुखाला चित्त मनवृत्ती चांगली ॥१॥
कधिं येशील मजकडे ? पाहतों वाट तुझी अवशीपहाटीं ।
तुझ्या वियोगामुळें शरिराची जाहली फाटी ।
नका वैरता करूं, अहो मी खाइन आग तुमचेसाठीं ।

काय बोलूं तिनदा मी लगू ?
अवकृपेमधें कशी जगूं ?
नको प्रचीत विषाची बघूं
बाळगुन आशा राहिली, थोडक्यासाठीं कशी डागलो ? ॥ २ ॥
आंतबाहेर हिंडत दुःखाची घडी कशी म्या कंठावी ? ।
धीर धरिते, सारी रात्र मला हवी तशी तुम्ही लाटावी ।
नाहीं वेडीवाकडी, शाबुत प्रीत माझी तुजला ठावी ।
पहा माझ्या स्वरूपाकडे
पाण्याचे जसे बुडबुडे
हे दिवस न येती पुढें
वय चढे दिसोंदिस, तुला शिकवितां जीभ माझी भागली ॥ ३ ॥
ताहान लागली मला, प्रीतीचें जल पाजावें आपहातें ।
दृष्टी पडतां तेव्हां तुम्हांकडे मी गायीवाणी पहाते ।
शेवट पुरता करिन, शपथ मी तुमच्या पायाची वाहते ।
सोन्यास पितळ म्हणतसा
पुढें मागें बऱ्यावर असा
**होनाजी बाळा** म्हणे हंसा
भरवसा देउन अंतरीं परोपरी बरि सुंदरी भोगिली ॥ ४ ॥

वैरता--वैर; आग खाणें--अग्निदिव्य करणें; लगु- लघु असें कत्रीस म्हणावयाचें असावें; लघु म्ह० लहान, क्षुद्र, अज्ञान; आपहातें—आपल्या हातानें.

* * *

## लावणी ६२ वी

किती लाजुन पळतेस अम्हांला ? कां म्हणशी तूं नका नका ? ।
घडेल तेव्हा संग घडो, पर तूर्त तुझा घेउं दे मुका ॥ धृ० ॥
गौरवर्ण मृदु अंग सुंदरी पाहुन मन तुजवर झुकलें ।

हास्यवदन सर्वदा टवटवित, गाल जसें केळें पिकलें ।
दोन्ही स्तन गटगटित चोळिच्या आंत कसे जाउन लिकले ।
क्षणक्षणा वरखालीं पहातां पापि नेत्र अमचे थकले ।
अम्ही शहाण्याचे वेडे जाहलों, भुल पडली अमच्या अकले ।
त्यजुन वायका घरच्या प्राणी कितिक प्रपंचाला मुकले ।
मोठे मोठे धनवान तुसाठीं यत्न करुन पाहुन चुकले ।
वहुतांनीं ठेविली अशा पर नाहिं कोणाचे गडे विकले ।
हा वहर गेल्यावरी सुंदरी घरीं वसून मारशील हाका ॥१॥
स्वयंभ रत्नाचीच खाण तूं, अशी दुसरी विरळाहि नव दिसे ।
धन्य पित्याचा गर्भ प्रसवली माय तुला तुशी राजसे ।
मुखड्यावर नौतीचा तजेला, कहर पाचऱ्या दिशीं दिसे ।
तेव्हां निरखुन पाहतां अमचें वीर्य गळेल वाटतें असें ।
तुझा समागम नित्य असावा, हें दैवी अमच्या नाहीं कसें ? ।
घे कागद गडे लिहुन तुझ्या घरीं अम्ही राहतों चाकर जसें ।
तें तर फारच दूर, येव्हांशी काय तुला सांगून फुका ? ॥२॥
भुजा तुझ्या गोंडाळ, हतामधें गोटपाटल्या झळकती ।
अखुड पाउलें टाकी तशा निघाली चालशी गजाकृती ।
नेसुन लुगडें साफ, स्वच्छता तुझी सांगावी किती ? ।
कवळुन धरल्यावर सोडावी असें वाटेना अम्हांप्रती ।
विषयमदाचें मोहळ सखे तूं, नाहिं तुला तुजयोग्य पती ।
काय करावें ? अम्हि चरफडतों, तूं पडलिस भोळसरा हतीं ।
मर्यादेचा सागर भरलिस, नाहिं कमी गुण यावरतीं ।
हें लक्षण पहावें या बायका तुझ्या घरिं येउन राहती ।
तुझे वदन चुंबितां गोड किती, जसा श्रीखंडाचा भुरका ॥३॥
उष्ण काळीं मार्गानें चालतां जिव करितो पाणी पाणी ।

तशी तुयझवर प्रीत असे गडे, तूं आतां अमची राणी ।
प्रेमाचा पुर अला अम्हांला, गत झाली वेड्यावाणी ।
पुढें अतां नको पाहुं, आसपास नाहीं कोणी ।
यापाइ कांधाइ करशील. तरी न सोडूं निर्वाणी ।
हे नलगे सांगावें, मुळचि तूं आहेस पक्की शहाणी ।
वळ पुरुषाचें पाहून पडली मग त्याच्यापुढें उताणी ।
मन धालें, उभयतां मिळालीं तीं जैशी साखरलोणी ।
**होनाजी बाळा** म्हणे, बरें जाहलें, पार नाहीं अमुच्या सुखा ।
दिली सोडुन, मग गेली घरामधें, पदर लाविला तिनें मुखा ॥४॥

लिकणें—लपणें; एकाद्याचें विकणें--एकाद्याचें साधणें; नव--नव दिसें म्हणजे दिसत नाहीं; गोंडाळ--गोल किंवा गोलदार. कांधाई—कांगावा.

* * *

## लावणी ६३ वी

पुरें कर नटपण तुझें, समजले चित्तामधें प××ले आणुन ।
घडुं नये तें घडल्याचें अंतीं अतां जशी काय म्हणुन ॥ध्रु०॥
तूं पाहिले गुण टाक, पदरचें काय तुझें जातें यामधें ? ।
पहा प्रियकर मग किती लागते जशी शर्करा पयामधें (दह्यामधें) ? ।
पहिल्यापेक्षां गोड प्रीत गडे तुझी उतरत्या वयामधें ।
लवणरुच्या पहावी कालच्या दिशीं विरजल्या दह्यामधें ।
प्राणापेक्षां × × आवडती बहुत हजारो स्त्रियांमधें ।
× × यावर उभे राहिलों म्हणुन तुझ्या अम्ही कह्यामधें ।
भरगची किनखाप प्रीतीचा सखे असा मधें टाक विणुन ॥१॥
तूं प्रीतिचें आगर, भरती आली समुद्रावाणी ।
उंच खरेदी माल कराया आलों जसे बंद्रावाणी ।
तूं खोलींत येतांक्षणीं रात्रौ दीप दिसे चंद्रावाणी ।

अशा रुपास्तव वेडे होउं तुज मागें सीतारामचंद्रावाणी ।
अपली ही म्हणतांना ठरशिल अप्रमाण शुद्रावाणी ।
व्यर्थ वर्णिली म्हणूं तुला मग खोट्या जरी पदरावाणी ।
घे, केला देह नदर आमचा, सर्व विषय घेतला छिणुन ।।२।।
तूं सोन्याची भिंत, गिलावा नक्षीकाम वरकरणीचें ।
कमळ जसें मुख तसें सर्वदा स्वरुप नव्हे वरकरणीचें ।
बहुत निबिड द्राक्षापरि हलती काप घोस तव कर्णींचे ।
निर्मळ मन किति स्वच्छ, पहावें पाणी जसें पुष्करणींचें ।
धातुपुष्ट तूं सखे औषधी झाड जसें गोखर्णीचें ।
कर आता येक चित्त मधुकरापाशीं जसें मधुकरणीचें ।
लपवावी वाटते जसें तें द्रव्य जामिनिं ठेविती खणुन ।। ३।।
इतकें जाहलें तरी सुंदरी कां ग अजुन न मन पाकळतें ? ।
वर वर म्हणशी मी साधी, पण मनामधें सारें कळतें ।
सर्वत्रा नारींचा अंश तूं, असें रत्न कोठें मिळतें ? ।
कसेंहि झालें तरी शेवटीं पाणी उतरणीला वळतें ।
पुरे स्पर्श येकदां, दहादां काय भोगल्यानें मिळतें ? ।
मी मी असें म्हणूं नको, विधिचें घटिताक्षर कोठें टळतें ? ।
किति प्रयत्नें स्नेह जाहल्याचे दिवस मनामधें पहा गणून ।।४।।
तूं जल्माची धनिण, तुसाठीं प्राण शरिरांतुन काढूं ।
× × खा उभा करी केशरी भात तुझ्या पात्रीं वाढुं ।
नव्हे काळवट, गौरवर्ण तूं चिकण जमिन जैशी शाडू ? ।
दोन्ही निर्लेप सोवळ्यांतील जैसे बुंदी लाडू ।
विषय विषम तुजविषयीं आमच्या हृदयीं पेटला हा कडू ।
किती चुकविशील ? भले भेटलों अम्ही दर्दाचे खिलाडू ।
**होनाजी बाळा** म्हणे, उभयतां करा देहाची घडी दुणुन ।

तूं परमेश्वरी अंश, अमच्या गेलिस हृदयांतरिं भिनून ।।५।।

नटपण--कपट; लवणरुचा--मिठामुळें येणारी, चव. लवण म्ह० मीठ. रुचा--चव. भावार्थ-आदले दिवशीं विरजलेल्या आंवट दह्याला मीठ लावलें म्हणजे जशी न्यारी चव येते त्याप्रमाणें वयस्कर झालेल्या तुझ्या-माझ्यांतील प्रीतीचा प्रकार आहे; किनखाप—सोनेरी, रुपेरी जरीच्या वेलबुट्टीचें काम केलेलें रेशमी कापड. वाणी--व्यापारी, सौदागर. भारी उंची मालाची आयात परदेशांतून होत असे. अर्थात् त्या वेळची मोठीं वंदरें म्हणजे घाऊक व्यापाराच्या मोठ्या पेठा होत्या. भारी उंची मालाला ऐतिहासिक कागदपत्रांतून ‘ वंदरी माल ’ असें म्हटलेलें आढळतें. मोठे मोठे वाणी म्हणजे व्यापारी तो उंची माल खरेदी करण्यासाठीं वंदरी व्यापारपेठांत हमेशा जात; वंद्रा—वंदराला; आपली ही म्हणतांना--या शब्दांपुढें ‘ जर ’ हा शब्द अध्याहृत समजावा; अप्रमाण--खोटी, बेइमान; काप--स्त्रियांच्या कानांत घालावयाचें भूषण; घोस--एक अलंकार; द्रव्य जमिनिं ठेविती खणुन--जुन्या काळीं द्रव्य जमिनींत खुणेनें पुरून लपवून ठेवण्याची पद्धत रूढ असे; पाकळणें--द्रवणें; सर्वत्रा--सगळ्या; घटिताक्षर—विधिलिखित; कडु—कंडु, दाह; दर्दाचे खिलाडू-तुझ्या दुःखाचे किंवा रोगाचे वस्ताद; दर्द--दुःख किंवा रोग; खिलाडू—वस्ताद.

* * *

## लावणी ६४ वी

भाउवंद गणगोत आम्हांहि तुंच आमची सारी।
तुजपरते सुख अणिक दिसेना या नरसंसारीं ।।धृ०।।
तुजविषयीं अम्हि अधिर, फार दिस जिव पडला बंदी ।
येकांतांत निर्वेध सुखाची येइल कधीं संधी ? ।
निसंग रत बापुडे अम्ही तर या पडलों फंदी ।
देखुन शक्ती कसे लागले दाव्यावर दंदी ? ।
सर्वत्याग पावलों विमरथ (?) (विनार्थ?) प्रीतीच्या छंदीं ।
तुजपाशीं तिष्ठतों ईश्वरापुढें जसा नंदी ।

अनंत जन्मोजन्मीं निजुं दे येकांतीं शेजारीं ॥१॥
पाहुन आशी गुणवान सकळ संधान विसरलों गे ।
उतराई व्हावया दिसेना कांहीं तुझ्या जोगें ।
तुजकरितां व्याधिस्त व्यापिलें शरिर विषयरोगें ।
आठोप्रहर येक × × येकांतीं चल निजूं दोघे ।
आणिक वनचर व्याघ्र जसा फिरे दरवेशामागें ।
नेशिल तिकडे तसे नेतों, मग निष्ठुर कां गे ? ।
कृतनिश्चयता ठेव आपला देव साहाकारी ॥२॥
इक्षुदंड चरकांत तसा देह तुझे कारणीं लावूं ।
वाइट कीं चांगलें, अतां हें नको सखे पाहूं ।
वागविलेस आजवर जसा तळहाताचा वाऊ ।
तें आठवावें, काय प्राण हा मेला तुज दाऊं ? ।
विषय कांच लागला जसा तो चंद्राला राहू ।
तसे गरिब जाहलों जिवलगे, दूर नको जाऊं ।
शरण अलों, दे दान, जसा पांगुळ हाक मारी ॥३॥
मनची हौस कधीं पुरल ? बुडालों या प्रीतीपाईं ।
ओहोळी कोहोळी रडे जशी का चोराची आई ।
उगेच बसतां स्वस्थ, अम्हांला घरिं करमत नाहीं ।
हृदयांतर्गत सखे होतसे काळिज दो ठाईं ।
अंतरता मायबाप जैसी मुल पाजी दाई ।
त्यापरि माया करी, यावरी मग नको कांहीं ।
विषयप्रसादें ऐक बोलतों या गोष्टी च्यारी ।
**होनाजी बाळा** म्हणे, चालूं दे प्रीत परभारी ॥४॥

लागले दाव्यावर दंदी—दंदी म्हणजे दावेदार किंवा वैरी. दाव्यावर लागणें म्हणजे दावा धरणें; वाऊ-फोड; पांगुळ-पहाटे दीनवाणेपणीं हाका मारून भिक्षा

मागणाऱ्याची एक जात; पांगुळ--पांगळा असाही अर्थ; ओहोळी काहोळी— चोर झालेला मुलगा सरकारी पारिपत्याच्या भीतीनें प्रगट होऊं शकत नाहीं. त्याला ओहोळा-काहोळाच्या आड दडून बसावें लागतें. त्या मुलाच्या आईचें अंतःकरण त्याच्याकरितां तुटत असतें; म्हणून ती रात्रीं-बेरात्रींही चोरून त्याला हाका मारीत फिरते. तशी तुझ्याबाबत माझी स्थिती झाली आहे. लौकिकांत तुला माझ्याशीं उघडपणें संबंध ठेवणें शक्य नाहीं आणि मला तर तुझ्यावांचून करमत नाहीं; म्हणून तुझी गुप्तपणें गांठ घेण्याची मी सारखी आटा-पीट करितों.

* * *

## लावणी ६५ वी

प्रियकर माझा गुणिजन रावा । छानछबेला दृष्टि दिसावा ।
या सुखशयनीं नित्य असावा । कधिं दर्शनलाभ देतो ? ॥१॥
वर्षाची मजला साजणी घडी जाती । धन स्वप्नीचें लाभ नसे ।
जागृत होतां कुठें न दिसे ग बाई । पती गेले असें मजला जाहलें गे ।
बाइ मज त्याची याद होती ॥ २ ॥
वाटे उदासी माझ्या मनाशीं । दुःख अंतरींचें सांगुं कुणाशीं ? ।
आग लागो या सर्व धनाशीं । शरिराची जाहली माती ॥३॥
ध्यास सख्याचा करितां आले ग बाई । दृष्टी पडतां प्रेमें डोले ग बाई ।
**होनाजी बाळ** गुणी जन बोले बाई । काशी म्हणे हो शांत वृत्ति ॥४॥

याद—आठवण.

* * *

## लावणी ६६ वी

बीज तसे अंकूर भासलिस, गुण घेउनि उठले ।
सकळ रुपाचें तेज सखु तुझ्या वदनीं एकवटलें ॥ धृ० ॥
मीपण मिरवुनि सदा नुरे जें नटपणांत नटलें ।

तुझे नटपणापुढें तयाचें मन संशय फिटले ।
किंचित् न फुटे भ्रम अशा या वृत्ती संधींत ठसले ।
उभे थव्याचे थवे पाहुनी तुज हृदयीं चाठकले ।। १ ।।
अमरपुरीचा समुदाय तुझा ग नारी भाव दिसला तसा ।
साधुनी पाहतां हावभाव जिकडे डाव पावे (?) असा ।
फोडुनी चित्तांतील भाव बसविला आव न कळे असा ।
नाहीं याचा भंरवसा रसा नेशिल हृदय वहाली ।।२।।
येवढी चांगट असुन राखिले त्या वजन आपल्या ।
तिळतुल्य तव स्वरूप पाहुन तुज आपल्या ।
आधीं विषयवासना जयाच्या सर्वांगीं दिपल्या ।
त्या पश्चात्तापाच्या योगें विरहित तप तपल्या ।
तसेच तव सद्‍गुणे दुर्बुद्धी समूळ खपल्या ।
मनशांतीच्या वळे कल्पना तूं रंगीच्या वपल्या ( ? ) ।।३।।
निर्मळ गंगेचें नीर तसें मन स्थीर दिसलें तुझें ।
मधें मळाजळ सामिर वाटतें क्षीर प्रियकर रसे ।
तद्वत तव देहास धीर वहुत गंभीर स्नेहरसें ।
**होनाजी बाळा** म्हणे, अशी पाहुं वृत्ती धाली असे ।।४।।

नुरा—चढेल किंवा उन्मत्त; मीपण —गर्व किंवा अहंकार; चाठकले—चटकले. म्हणजे चपराक खाल्ली किंवा तडाखा खाल्ला.

* * *

## लावणी ६७ वी

चला सखी येतो सर्व जाऊं त्यजुन गोकुळ या श्रीरंगाचे मागें मागें ।
रात्री मोहुनीया नंद यशोदेसी ।
नेती अक्रुर हरिलागी मथुरेसी ।
दृष्टी कैचा मग पडेल हृषीकेशी ? ।

जातो स्वाम पूर्ण काम शाम राम धाम ग्रामीं या तमाम अग्नी घ्या गे॥ १ ॥
गोकुळींच्या हत्त्या कीं सर्व आतां ।
अक्रुरा, ह्या पडतील तुझ्या माथा ।
नको नेऊं मथुरेसी जगन्नाथा ।
असें बोलु त्या नीधान म्लानवाण जाण दान, आण घालोनी प्रमाण त्याचे घ्या गे ॥२॥
दिसे अक्रुर हा क्रूर मोठा बाई ।
यानें बोधुनिया नंद—यशोदाही ।
नेतो आमचा जिवप्राण शेषशायी ।
हा रे जळ येक आम्ही मीन तयाविण दीन लीन हीन लक्षणाक्षिण अम्हां लागे ॥३॥
सखे क्षणभर रथ नाहीं थांबविला ।
कसा दुर्जन हरि दूर लांबविला ।
जिवा अक्रुरें चिताग्नी झोंबविला ।
गिती **होनाजी बाळा** गाये, धायपाय साहे लाहें सर्वथा हे न्याय मागे ( ? ) ॥४॥

अग्नि घेणें--जोहार करणें; प्रमाण--वचन, शपथ; गिती—गीती, गाणें.

* * *

## लावणी ६८ वी

“ तुझी प्रीत अरे प्राणविसाव्या, आली सुसमयीं घडुन ।
जोडा एकसारखा, गेली हिरकणी कोंदणीं जडुन ॥ धृ० ॥ ”
“ आपला जोडा एकसारखा हें एकांतीं बोलसी ।
परंतु जिवाची खूण सांगतों आम्ही आतां तुजपशीं ।
चतुर स्त्रिया मैत्रांच्या सखये फार चुकाविती मशीं ।

पडल गांठ अवघ्यांची येकदा, युक्त सांग कांहीं अशी ।
नको कल्पना धरूं परस्त्री अम्ही मानतो कशी ।
ही अंतरची खूण साजणी तूं अवघी जाणशी । ''
" पति कायावाचामनें कोणा कारणें ।
कां हो प्राणसख्या, पहातां त्याचीं लक्षणें ? । ''
" सखी विषयविलासीं कामिने, करुन साधनें ।
मोहिले पतिस त्यांनीं आपल्या सद्गुणें ।
म्हणवून राजअंगणों जाती मीपणें ।
त्यावरुन तयांचा मला गर्व हरवणें ।
मोठा निजध्यास चित्त त्याकडे । सारा वेळ मला चैन ना पडे ।
जेव्हा इतक्यास इच्छिले घडे । तेव्हां निरसेल आमचें सांकडें ।
रात्रीं स्वप्नांत उभ्या मजकडे । यालागीं विचार कोणता गडे ? ।
अगदींच झालें भ्रांत, करी निभ्रांत आम्हां तुजकडून '' ॥ १ ॥
" प्राणसख्या प्रियकरा उभी सन्मुख जोडल्या करीं ।
स्वधर्म माझा हाची करावी सेवा आजन्मावरी ।
मला आज नाह्याशी सख्या ! जायाचे परके घरीं ।
तिथें जमा होतील हो तुमच्या मैत्रांच्या सुंदरी ।
पालखींत मी बसेन सख्या, तुम्ही धरा तबकडी करीं ।
सैरंध्रीच्या वेषें चला तुम्हि मजसंगें सत्वरी ।''
ऐसें म्हणतां सजली केवळ विजली । शृंगार भूषणें अंगावर घातलीं ।
ती कर्ण फुलें चांगलीं कार्णी शोभलीं । मुक्त लडा मोती नक्षत्रें भासलीं ।
शिरीं टोप घालितां वरी अपूर्व दिसली ।
केकती मुद राखडी केसामधिं गोंविली ।
बरवा वेणीचा साज आगळा । कुहिरि मच्छकच्छ आणि आवळा ।
शोभे तन्मणी तेजस्वी गळा । कंठा मोत्याचा घाली आवळा

गजरे हातीं, रुळ चरणीं धुळधुळा । वाजे चालतां कुंभिस्थळा ।
अशा प्रकारें नटुन सिद्ध स्वारीस उभी गडबडुन ॥२॥
चरणी चाली चालाया सिद्ध शिबिकेची धरुन तवकडी ।
पालखींतल्यापेक्षां खुबसुरत बनली फाकडी ।
इष्कीयार सावकार होते शहरांत छबेले गडी ।
तनमन होउनी तिला दृष्टी पाहतात उठुन घडिघडि ।
"मी बोलन पालखींआंतुन तुशि सैरंध्रे आवडी ।
पुढला विचार सांगन चित्तापुन तुजला घडोघडि ।
मी उटणें तुमचे हतों लावविन पर्ती ! ।
मग पूर्ण करा राजे विच्छा असेल चित्तीं" ।
हा नेम करून निश्चिती हो शीघ्रगती ।
पालखींत आपण, सैरंध्री पायीं चालती ।
"ही नविच कोण दिसती ?" अवघ्या पुसती ।
"माहेराहुन धाडिली मज सेवेप्रती । "
असें सर्वत्राला बोलली । वेगीं नाहावया आपण बैसली ।
जवळी सैरंध्री बोलावली । फरमास मग तिजला सांगितली ।
"उटणें सर्वांगाशीं लावी चांगली ।" तेव्हां तिनें हारसे व्हये भरियली।
"आज्ञा प्रमाण तुमची मजला, उभी कासोटा भिडुन " ॥३॥
सखी म्हणे सखीयासी, " आहे ही अमक्याची अंतुरी ।
बरेवजे हिशी उटणें लावी सैरंध्री सुंदरी " ।
' आज्ञा प्रमाण तुमची ' म्हणून मग उटणें घेउन करीं ।
हृदयावर हात फिरवुन फिरवुन ते कुचाग्र कुस्करी ।
ऐसी म्हणत करून उटणें तिशी लाविल्यावरी ।
दुसरी ऐना होती मांडी तिची स्वहस्तें चुरी ।
आपुले हातीं घेउनी फणी ते शुभलक्षणी ।

शृंगार नभीं तळपताती सौदामिनी ।
स्वरूपें कोमळ कांता गोजिऱ्या ।
अवघ्या चातुर्य गुणें बहु बऱ्या ।
भाळीं कुंकाच्या रेखुन चिऱ्या । येकापेक्षां येक बनल्या चिऱ्या !
उमतीमधिं नटचंचल वावऱ्या । कोणासी वश न व्हाल खऱ्या ।
परंतु अपुले कुच चुरविले तुम्ही सैरंध्रीकडून ॥४॥
भोजनशाळेंमधिं सुवासिक पक्कान्नें निर्मिलीं ।
घालुनिया रांगोळ्या, पाट मांडून पात्रें मांडिलीं ।
दिवाणखान्यामधें बिछाइत अति अपूर्व घातली ।
भोजन झाल्यापाठीं मंडळी त्या संन्निध बैसली ।
सर्वांची स्वामिनी हळुच मग हास्यवदन ।
"जळो चतुरपण तुमचें ! नाहीं सैरंध्री अजुन वळखली ! ।"
सैरंध्री वेष पाहुनी खोचल्या मनीं ।
खालीं पाहता अवघ्या लज्जित होउन मनीं ।
या वेव्हारालागुनी, रात्र ते दिनीं ।
राहिली मागली चार घडि जाणुनी ।
मग सर्वांची स्वामिनी ते शिविकासनीं ।
बैसली, सांगातें सैरंध्री कामिनी ।
आपल्या सदनांत येउन पोचली । दोघे चित्तामधिं आनंदली ।
हर्षें सखि सख्यानें धरियेली । येकांता हृदयीं कवटाळली ।
"इच्छा त्वा बरी आमुची पुरविली ।" घ भावुली तुला प्रसवली ।
हे जोडी निर्मिली विधीनें लक्षामाधिं निवडुन ।
**होनाजी बाळा** म्हणे, प्रीत चातुर्य उभयतांकडुन ॥५॥

मैत्र—मित्र; मशि—मला; पडल—पडेल; कल्पना—संशय; पति काया-वाचामनें इ० नायिका नायकास म्हणते कीं त्या स्त्रिया सर्व पतिपारायण

आहेत. त्यांचें सत्त्व पाहण्याची दुरिच्छा तुम्ही कां धरतां ? राजअंगणें जाती— त्यांना राजस्त्रियांकडून बोलावणीं येतात. कारण काय तर त्या कायावाचामनें पतिपरायण असलेल्या कुलवंत स्त्रिया आहेत म्हणून असा भावार्थ; मीपणें— अभिमानानें, गर्वानें; जेव्हां इतक्यास इच्छिले घडे--जेव्हां या इतक्या सर्व स्त्रियांची अब्रू घेऊन मी त्यांचें गर्वहरण करीन तेव्हांच माझ्या मनाची रुखरुख संपेल; सांकडें—संकट, चिंता; तवकडी--पालखींत बसावयाची जागा असा अर्थ कोशांत दिला आहे; परंतु येथें भावार्थ पालखीचा कठडा असा दिसतो; सैरंध्री—अंतःपुरांतील दासी, ही गरती असून श्रीमंतांच्या घरीं वेणीफणी वस्त्रालंकारादि रचना इत्यादि कामें करते; टोप--केसांचा टोप. पुरुषाला स्त्रीवेष घ्यावयाचा आहे म्हणून; केकती--केतकी, केवडयाचें पान; आगळा--विशेष; रुळ—स्त्रियांचें एक पादभूषण, नूपुरासारखा; चांदीचा दागिना, कुंभि--हत्ती; स्थळा--भावार्थ असा दिसतो. कीं अशी सजून ती गजगामिनीप्रमाणें चालली; चरणीं चालीं—चरण चाली, पाईपाई; शिविका--पालखी; खुबसुरत--देखणी; इष्कीयार--रंगेल, इष्कबाज, शौकी; तनमन होणें—तन्मय होणें; कावरेबावरे होणें; घडिघडि--वारंवार, वेळोवेळीं; नेम--संकेत; शीघ्रगती--जलदीनें; मज सेवेप्रती–माझ्या चाकरीसाठीं मजबरोबर हिला माहेरच्या लोकांनीं पाठविली आहे. वेगी—जलदीनें; फर्मास--आवड, आपल्याला विशेष पाहिजे तें; हारसे– हर्ष; व्हये भरीयली—'होय' असा होकार भरला; कासोटा भिडुन--कांस खोवून, बद्धपरिकर होऊन; अंतुरी–बायको; बरेवजे—चांगल्या रीतीनें; दुसरी आइना होती--नंतर दुसरी एक ऐन्यासारखी म्हणजे आरशासारखी तेजस्वी रूपवती होती. तिची मांडी ती सैरंध्री चोळूं लागली; चिऱ्या--चिरा–चौरस दगड. त्याप्रमाणें प्रमाणबद्ध शरिराच्या; उमती--तारुण्य; भोजन झाल्यापाठीं– भोजन झाल्यानंतर; खोंचल्या मनीं—मनांत लज्जित झाल्या; घ भावुली— ग वाहुली.

* * *

## लावणी ६९ वी

तूं बस या पलंगीं राजसा ॥धृ०॥

आहा मदन वृत्तीहि त्यागिली । दुरिता शिराणी भागली ।

क्रिया आपुल्या मागली । विषय मोहनी चांगली ।
मुर्ती तुझी म्या भोगिली । चटक इष्काची लागली ।
समजुन पुरता भरवसा ॥१॥
तीक्ष्ण मर्जि पाहिली । सुक्ष्म तनु कां मायली ।
मंदिरांत घडि ही साहेली । आज म्या तुमची वाहेली ।
वृत्ती विषयाची राहिली । मग तुम्ही दुसरी वाहेली ।
हें पाहुन हा जिव पिसा ॥२॥
प्रीत दुसरी कुण गांठली । मज भीड सन्मुख वाटली ।
ती वेळ सवखे लोटली । कंचुकी दर्वश (?) दाटली ।
मग दुःख शरिरीं वाटली । इने (?) रुता सवती थाटली ।
रंग नवतीचा पहा कसा ॥३॥
आणले गुंफुन हारतुरे । तुम्ही सख्या विष्की पुरे ।
दिसतां छेब्रदार खुब झुरे । करा अशी कीर्त जगीं उरे ।
**होनाजी बाळा** कविश्वरे । हे रामा अंदु चातुरें ।

दुरित—पातक; शिराणी—आनंद, समाधान, तीव्र इच्छा; तीक्ष्ण—करडी; आज म्या तुमची वाहेली—आज मी तुम्हांस मला अर्पण करून घेतलें आहे; दुसरी वाहेली—दुसरीला बोलावलें. वहाणें—बोलावणें, हाक मारणें; सवखे—सौख्यें; विष्की—इष्की, रंगेल.

* * *

## लावणी ७० वी

“ राजबनसी बावरे मुशाफर तुम्ही कुठुन आला जी ? ।
झोपेच्या वहरांत, लाल बागांत गर्क झाला जी ॥ धृ० ॥
वारुसहित देखिली नवलपरीची नवीन मुद्रा हो ।
शालजोडी अंथरुन सुखाची वर केली निद्रा हो ।
मी होउन निर्लज्य काढिले मुखावरिल पद्रा हो ।

आशावंत मन झालें पहावया तुमच्या मुखचंद्रा हो ।
नवी उमेद कोवळी दिसती वय चौदा पंध्रा हो ।
कोण वक्त शिरीं म्हणुन प्रवासा आलेत राजेंद्रा हो ।
कोणे देशीं राहणार खासगत वस्ती कोणे ठिकाणीं ? ।
घेउन मुशाफर वेश निघाला टाकुन आपली राणी ।
फार कठिण परदेश, परस्थळीं रांडा मोठ्या तुफानी ।
मोहुन वऱ्या जिवलगा तुम्हांला घालतील घाला जी ॥१॥ ”
म्हणे मुशाफर, “ अम्ही सुंदरी पंछी परदेशी ग ।
फार भिउन चालतों, नसो रत परके सेजेशीं गे ।
करून खुशामत अमुचीं आपुले मंदिरास नेशी गे ।
वखत गुजरल्या शिरीं सखे मग तूं अतर देशी गे ।
येउं खरे येकदां तुझ्या सदनासी निश्चयेसी गे ।
यावर मग परंतु माघारें लाव प्रतिज्ञेशीं गे ।
आम्ही येकले पंछी, आमचा कोण इथें आहे वाली ? ।
शोध करुनिया पाहे सखे तु नको फिरूं भवतालीं ।
त्या आधींच व्राहेरल्या सांगितल्यास स्त्रियांच्या चाली ।
याउपरी साजणी पाहे पुरता तालामाला हो ॥२॥ ”
“ म्या न केले व्रतनेम, होता ईश्वर पुजिला पूर्वी हो ।
म्हणवुन अशी लाभली मूर्ति मजला तुमची बरवी हो ।
उभी विनविते निर्लज्यपणें मी केवळ निरपर्वी (?) हो ।
नको तुम्हांव्यतिरिक्त मला धनमालाची चरवी हो ।
संग करिन येकदां, हेच म्या केली जोडी सर्वी हो ।
परिस झगडतां लोहा लागतां तो सुवर्ण करवी हो ।
अंत:करणापासुन मी सर्वस्वें तुम्हांस राजी ।
बहुत वेळ झाला आतां, तुम्ही सत्वर चला, उठा जी ।

राहुन रात्रेची रात्र इच्छा तृप्त करावी माझी ।
पहा वसंत नवतीचा ना फार मानी गुलाबा हो ॥३॥ ”
म्हणे मुशाफर, “ ऐक सुंदरी, तूं प्रतिष्ठ भार्या गे ।
गोवुनिया वचनांत दावाशील ममतेचा पर्या गे ।
वाट स्त्रियाची जात, बहुत सावध अपुल्या कार्या गे ।
कवटाळणी पहा कशा नाहीं जोडा तुमच्या धैर्या गे ।
आम्हीं येकले गडी, तुझी दिसती चंचळ चर्या गे ।
देऊन भाक इमान पाडशील फशीं करून क्रिया गे ।
आम्ही मुशाफर रमते केवळ येक वचन भावार्थी ।
पडूं नये पडली गाठ तुझी या ठायीं सखे ज्या अर्थी ।
नेउनीया रंगमहालीं सखये पाहे, नको होउं परती । ”
**होनाजी बाळा** म्हणे, लुब्धलें मन तव स्वरुपाला हो ।
बापु गुणीचे गुण नित्य नूतन सर्वत्राला हो ।। ४ ।।

वक्त–कठीण प्रसंग; तुफानी–दांडग्या,वालंट घेणाऱ्या,फसविणाऱ्या; परदेशी–परमुलुखांतले; पंछी-पोपट, आवडता पक्षी; नसो रत––रत होत नसतो; मग तूं अंतर देशी–मग तूं अंतर देशील; परंतु माघारे लाव प्रतिज्ञेशीं––तुझ्या सदनासी निश्चयेसी येकदां येऊं खरें परंतु मग प्रतिज्ञेशीं म्हणजे प्रतिज्ञेप्रमाणें आम्हांला सुखरूप माघारें लाव; कारण या गावांत आमचा वाली कोणीं नाहीं; धन-मालाची चरवी––पैशाचें डबोलें; पहा वसंत इ०––वसंत ऋतु हा गुलाबाचा अव्हेर किंवा अवज्ञा कशी करील ? पर्या––मार्ग, वाट; वाट––चतुर, हुषार; कवटाळणी––कपटी; रमते मुशाफर–मौजेनें रमतगमत मुशाफरी करणारे; परती––पराङ्मुख, पाठविणें.

* * *

## लावणी ७१ वी

कां हो घ्या ना विडी ? अशी कोण नार फाकडी ? ।
रोज मजविशी घातली अढी अढी ।। ध्रु. ।।

पहिले दिस तूं कां रे विसरला ? ।
ममता लावुन कां दुर झाला ? ।
चित्तापासुन सांगा मजला । समजाविते तुज घडोघडी ॥१॥
असें मजला जरि ठाउक असतें ।
पहिलेच मी तुजलागीं कसते ।
आढी धरून तुजवर कां रुसते ? । प्रचीत आली रोकडी ॥२॥
कोण सवत पाहेली मजवरते ? ।
मोहिले तुजला अजवरते ।
इष्क लागला तुमचा तिजवरते । उमज आतां तातडी ॥ ३ ॥
असें उत्तर ऐकून सख्यानें ।
हृदयीं धरिली सखी हर्षानें ।
**होनाजी बाळाचीं** प्रिय कवनें । जाती अमृतघडी ॥४॥

विडी--विडा; कसते--कसोटी पहाते.

* * *

## लावणी ७२ वी

प्राणविसाया जातो कीं बाई ।
टाकुनिया ममतेच्या प्रवाहीं ॥ धृ० ॥
मी तुझी वनिता प्रियपात्रा । कां मला त्यजितोस सुपात्रा ? ।
साजिऱ्या या राजिवनेत्रा । चल सुखशयनीं कोमलगात्रा ।
आज ही हारुषाची रात्री । चुकी नसल घडली तिळमात्रा ।
आले हो किंचित चुकी घडली नसे ।
कां करितां अपमान ? आजही आइका लवलाई ॥१॥
माझी विनंती गुणरासी । ऐकतां यावें महालासी ।
कां आली हृदयांत उदासा ? । बरी ममता असतां खासी ।
या रीती असतां कां जासी ? । लक्ष हा आवघा तुजपासी ।

सत्फी धन्य मातला । पंचसुराचा झेला । (?)
आरे हो पद पाहुनिया डोंगरीं झुरतो मोर ।
पाण्यावाचुन सुखली जाई ॥२॥
कीं कोण्या सवतीवर रिझला ? । फारच हा तिजसाठीं सजला ।
हा मला खचितार्थ समजला । घोकणी करीत हा देह झिजला ।
रोग ह्या शरीरीं उपजला । घ्या सुरी, कापुन जा मजला ।
आरे हो मज मारुनी अपुले करीं ।
मग जावें स्वामीराज । आरे हो तरी मी दासी खरी ।
सर्वज्ञान सिरताज । कितीतरी वर्णू चतुराई ॥३॥
निवळले लई विषई नारी । नवनवती जाती सारी ।
उभी हो चपला दारीं । आली गुणिवंताची स्वारी ।
करूनि खासी सेज तयारी । उडविलो रात्रिची वहारी ।
आरे हो **होनाजी बाळा** गुणी । नितगाती छंदी ।
आरे हो ऐकुनिया शत्रु खजीलें जाहाले वेजार ।
कासिनाथ सिरा छंद गाई ॥४॥

* उदासी—उदासीनता; लक्ष—हा शब्द येथें पुल्लिंगी वापरला आहे; ममतेच्या प्रवाहीं—ममतेच्या पाशांत.

* * *

## लावणी ७३ वी

मी किती करूं मनधरणी माझे धणी ? ।
चालवा लळा, दिली या शरीराची हमीं ॥धृ०॥
चंदन बटाऊ पहाया जी । उभी राहते ।
लागलें विछेत प्राण प्रियकराच्या हातें ।
अशी लावुन माया जी । सोधुनीं पहाते ।

नटदार छबेला पाहुन तरमळते ।
कांही तरी येऊं द्यां माया जी । हजर होते ।
शेजारीं निजा मज कवळुनी एकांतें ।
तुम्ही दगलबाज बेईमान जी । अंतःकरणीं ।
वाहिला प्राण म्हणे रत्नाची खाणी ॥१॥

पोषाख करा हिरवा हो आवड माझी ।
पेहरवा मी करिते गुलाब प्याजी ।
अपहस्तें खोवीन मरवा जी । आवड माझी ।
मज ध्या मांडीवर, करा हो इष्कबाजी ।
गुलबदन ज्योत आरवा जी । शरीर पाहा जी ।
आतां गेंद हाताळा चित्तापुन मी राजी ।
घातला इष्क फासा जी । मी हरणी ॥२॥

खुरबान करिन हा प्राण सख्यापाशीं ।
कधीं येतिल माझे गुणराशी ? ।
म्हणे **होनाजी बाळा** विलासी ।
आले साजण तुझिया मंदिरासी ।
आतां भोगित जा सुखें तयासी ।
काशिराम म्हणे करित जा सेवा ।
नयनीं दावा । कधीं पाहिन मी प्राणविसावा ? ॥३॥

पेहरवा—पेहराव; प्याजी—कांद्याप्रमाणें गुलाबी रंगाचा; गुल्बदन—एक प्रकारचें रेशमी कापड, गुलाबाच्या फुलासारखा सुंदर देह असणारी स्त्री; ज्योत—तेज, कांति; अरवा—अपूर्व, विशेष; खुरवान करणें—अर्पण करणें; चंदनवटाऊ—लैला-मजनूप्रमाणेंच हे मोहना व चंदनवटाऊचें प्रणयी युग्म.

* * *

## लावणी ७४ वी

राजपुत्र अति चतुर आकाशीं जैसा गभस्ती ।
बहुत सखीसीं प्रीत राहिला गंगातीर वसती ॥धृ०॥
सर्वगुणसंपन्न बत्तीस लक्षणी राजपुतळा ।
राजचिन्हमंडित सुशोभित ऐश्वर्याची कळा ।
आचारशीळ अतिपवित्र जैसा अग्नि नित्य सोवळा ।
धीर उदार विशेष, अखंडित वसे हृदयीं कळवळा ।
सर्व उपाधीरहित निर्मळ प्राशुन गंगाजळा ।
शचिर्भुत तैसाची प्रतापी पुण्या आगळा ।
पहा सूर्यवंशींचा राव जसा हरिश्चंद्र अयाध्येपुरीं ।
केवळ शांतीचा सिंधु जाणता सर्व कळाकुसरी ।
निष्कलंक त्याची राणी सुलक्षणी, चतुर बहुत मंदिरीं ।
आनंदमय अंतरीं उभयतां चित्तासी स्वस्ति ॥१॥
एक चित्त, एक प्राण, दोन देह असा उभयताचा धडा ।
सखी सुवर्ण आंगुठी, सखा तिजवरिल हिऱ्याचा खडा ।
स्वरूपवान दोघेहि घालती एक एकावर झडा ।
सन्मुख झरुक्यामधें नेत्रसंकेत करिती क्रीडा ।
पुर्व वेश पालटोनी हिंडती रात्रीं ग्रामीं निधडा ।
गुप्तची मवजा पाहाती, दोहीचा एक मनांतिल वढा ।
लघुपत्र केकती सखी, सखा गुलचेमन हाजारा सिरा ।
शिरीं कलगी आर्णाक सिरपेच चमकतो, वर मोत्यांचा तुरा ।
कार्नी चौकडा, कंठीं हार पाचुचा दिसे साजरा ।
सखा हिरकणीचा हिरा चाले प्रीतीच्या सीरस्ती ॥२॥
कोणी येक दिवसीं अलौलिक गोष्टीचा ताला ।
उभयतास वाटलें म्हणुन सारीपाट मांडीला ।

तशा येकांतामधें उभयतां पण आचुक केला ।
पतीस सुंदर म्हणे, " पणीं जर जिंकीलें तुम्हांला ।
तरी मग गंगाजळिं तुम्ही स्पर्शावें हो स्तनाला । "
पती जिंकीलीया हाच सखीचा निश्चयें पण ठरला ।
पण करून खेळता डाव सखीनें पाहा अवाचित जिंकीला ।
हासुन म्हणे स्वामीला, "स्तना स्पर्शा आपुले हास्ती" ॥ ३ ॥

गंगाजळीं स्पर्शावें स्तनाला ही खाचित बोली ।
कसें स्पर्शावें जनादेखतां अशी मसलत पडली ।
येके दिसीं स्नानासी सुंदरा गंगाजळीं शिरली ।
दहा वीस सखीयांमधें कटाईत ती उभी राहिली ।
राजपुत्र चतुरानें वातमी आधिंच होती ठेवली ।
दूर जाऊनिया आपण बुडि मग गंगेमधिं दिधली ।
भवत्या सख्यास न कळता सखी अंगुष्टी दाविली खरी ।
खुण समजतांच आखड सखी बसली जळाभीतरीं ।
स्पर्शून स्तनास दाहावेंसि हातावर निघुन आले बाहेरी जी जी।
फारच खुषी अंतरीं सख्याकडे सखी पाहुन हासती ॥ ४ ॥

अशी पाहुन चतुराई सखीच्या आनंद चित्तासी ।
तेव्हां नेत्रसंकेतें खुणावी अपुले स्वामीसी ।
इतुकें झाल्या कृत्य आले आपुल्या रंगमहालासी ।
नाना परी पकान्नें पाक सदनीं निर्मुन खाशी ।
आनंदांत प्रीतिनें उभय बैसले भोजनासी ।
भोजन झाल्या समयीं आले येकांत मंदिरासी ।
हिरवा करून पोशाख उभये बैसले मंचकावरी ।
घालोनी मुखामधें विडे विनोदें रमती नाना परी ।

विद्वान गुणसंपन्न होता एक पुरुष गंगातीरीं ।
**होनाजी बाळा** म्हणे, तरी चतुराई उघड दिसती ॥५॥

गभस्ती—सूर्य; धडा—निश्चय; झरूका—खिडकी; निधडा—निःशंक; वढा—ओढा, इच्छा; लघुपत्र—कोवळें, छोटें पान; केकती—केतकी, केवडा; गुलचमन—फुलांची बाग; शिरस्ती—शिरस्त्यानें, रस्त्यानें, पद्धतीनें. अलोकिक—चमत्कारिक, आश्चर्यकारक, कौतुकास्पद; ताला—ताळा, प्रत्यय, खात्री मेळ; करावा—करीन; आखड—आंग आखडून.

* * *

## लावणी ७५ वी

घडि घडि नको बोलूं जनीं, वर्म हें कळेल सख्या रे सजणा ॥धृ०॥

सारखें वय तुझें न माझें म्हणून लोकीं कीं भास पडला ।
जल्पती दुष्ट नित मनीं जेव्हांपासुन संग्रह घडला ।
यामुळें जिवलगा जसा दुधामधिं लवणखडा पडला ।
उभयतां तसें घडलें कीं । तुजपदीं चित्त भुललें कीं ।
पदरीं तुमच्या पडले कीं । मन तुम्हांकडे वोढलें कीं ।
दुष्ट निंदिती बघुन आपणा ॥१॥

चार दी स्वस्थ रहा घरीं सगुणनिधी तूं गुणपात्रा ।
बोलतां आपण उभयतां तर्क बांधुन ठिवती अंतरा ।
कल्पना आणुन मनीं तुज विनाविते कोमलगात्रा ।
घनबिंदु सुप्त आकाशीं । चातकी इच्छी तयासी ।
त्यापरी लक्ष तुजपाशीं । सख्या रे मम नेत्रींच्या अंजना॥२॥

पूर्वींच्या संमंधावरून अर्पिले तनु तुजला आपले ।
लागला जिव्हारीं वार, दुष्ट तुजविशीं फार जपले ।
तुजसाठीं किती राजसा मी पूर्वीं तप तपलें ।
या शहर पुण्याची वस्ती । तिनदां नको घालुं गस्ती ।

वरे वाटे गरिब दिसती ।
मनीं कर पुरती चवकशी प्राणरंजना ॥३॥
कळूं नये स्नेहाचें वर्म करून वदकर्म जनालागी ।
पडूं नये कोणाचे भरीं शोध तूं करी हृदयाजागीं ।
साजणा, असावें गुप्त येकांतीं आपण विषयालागीं ।
गुणगुजगोष्टी प्राणविसाव्या । सांगितल्या जीवीं धराव्या ।
**होनाजी बाळा** गुणि राव्या ।
बाळा नारायण म्हणे, तुझे गडे बहुत रसिक रसना ॥४॥

भास पडणें—बोभाटा होणें; दी--दिवस; गस्ती--पहारा, येरझारा; हृदयाजागीं--हृदयाच्या ठिकाणीं.

* * *

## लावणी ७६ वी

नूतन आकृती आलबेली छेलछबेली ।
पाहुन बळें झर्डी पडून संगत केली ॥धृ०॥
पदरीं द्रव्यसंचय कांहीं पाहिला नाहीं ।
सद्गुणावरून रत झाले मी तुमचे पाईं ।
मी केली असेल असलाई कमअसलाई ।
तुमचें मन तुम्हांस देतच असेल ग्वाही ।
अंतर मजपुन सहसाही न घडलें कांहीं ।
अरे प्राणसख्या, या गोष्टीस साक्षी विठाई ।
अति सुकुमारा, नाजुक पुष्पाच्या झेल्या ।
बसुन एकांतीं नाना परी क्रिया केल्या ।
विसरल्या कैशा? कांहींच न शेवटा नेल्या ।
एकांतीं हृदयीं कवळितां कळा कुशळता × × दाखविल्या।
मी तव वचनाची भुकेली स्नेहाची मेली ॥१॥

पहिले दिवसीं चित्त न मिळतां मग मनीं सरली चंचळता ।
गेले दिस छळतां ।
या उपर येऊं लागला दिवस मावळता ।
तिळतिळरात्रा जाती तळमळतां, आतां कां छळतां ? ।
वळकट धरले पदरासी, आतां कुठें पळतां ? ।
उगेच रागें मजवरी तुम्ही तरी कां हो भरतां ? ।
असा काय अन्याय तुमचा तरी केला म्या हो ? ।
उभे कां बाहेर ? बरे वजेनें घरामधिं या हो ।
आज कुणीकडे मर्जि उदेली ? ॥२॥
गुणिजना तूं गुणिजनराव्या, प्राणविसाव्या ।
उभयतां द्वैत कल्पना मनांत नसाव्या ।
या इथल्या स्त्रिया कळलाव्या अतिसद्भाव्या ।
परिचयावरून त्या पुरतेपणीं मज ठाव्या ।
या गोष्टी श्रवण कराव्या. जीवीं धराव्या ।
समजून उमजून त्यांच्या मैत्रिक्या कराव्या ।
चतुर तुम्ही असोन सर्वज्ञ, गुणांची राशी ।
असुन रात्रंदिस सेवेसी उभी तुजपाशीं ।
नसून अपराधी, मजवरी रुसून कां जाशी ? ।
यामार्गे करून पाहिली बहुत बदफैली ॥३॥
मुख न पाहिल्या मनिं झुरते, घोकण्या करिते ।
वरखालीं पाहुनीया तुमच्या मरणीं मरते ।
मार्जिनेंच भाषणें करिते, भिऊन आचरिते ।
सांगितली गोष्ट चित्तापसुन जीवीं धरते ।
घार होऊन भवतीं फिरते, पाय नित्य स्मरते ।
तुम्ही आपलें मजला वेड लावलें पुरतें ।

अलिकडे तुमची अति ममता पातळ झाली ।
द्रष्टपण सोडा आज, उठा, चला रंगमहालीं ।
बसुन येकांतीं उभयतां आनंदाखालीं ।
अंग भिजविन आणुन सुगंध तेल चमेली ।
म्हणे **होनाजी बाळा**, तूं लक्ष्मी सजेली ॥४॥

असलाई कमअसलाई--सच्चेपण आणि कपट; वरे वजेनें--बऱ्या रीतीनें; मैत्रिकी--मैत्री.

* * *

## लावणी ७७ वी

अहो मुशाफर, घर सोडुन तुम्ही आला प्रवासामधीं ।
निजा स्वस्थ, थकला असाल कीं पथ चालतां पदीं ॥धृ०॥
चांगुलपणा विशेष अप्रतिम हें वय नूतन असे ।
पती गेले टाकून परदेशीं, येतिल संशय नसे ।
काय जगासी कारण अपला स्वधर्म अपणा दिसे ।
बोलूं नका भलतेंच, भासतें तुम्हां लागलें पिसें ।
इंद्रपदा इच्छुन राज्य करूं म्हणशी स्वलाभमिषें ।
तपसामर्थ्याविण तुला तें प्राप्त होइल कसें ? ।
वाटचे वाटसरू तुम्ही ।
पडतसा व्यर्थ कां भ्रमीं ? ।
राहिला परके आश्रमीं ।
विषयाचे अनुक्रमी लुब्ध होउनी अहो गुणनिधी ।
वरळतसा हें काय गोष्ट घडणार नाहीं जी कधीं ॥१॥
जातां गांवावरून अधिं ज्या गृहीं चंद्र पाहिला ।
तें घर चुकलें असाल, येथें व्यर्थ येउन राहिला ।
विषयअंध होऊन बोलतां तरी कसे भलतिला ? ।

मी नाहीं बाहेर निघतां पडियेले दृष्टी कुण्या सवतीला ।
तूर्त आहे माहेरीं, सभवते भाऊवृंद चौकीला ।
रात्रंदिवस जपतात उभे न राहूं देती गल्लीला ।
लौकिक वडलांचा आहे ।
येवढाच मोठा संशये ।
न घडे मशिं तुमचा स्नेहे ।
धरुन मनामधिं भये चालते लवुन भजुन मी अर्धी ।
याउपर मज न कळे कपाळीं काय लिहिलें विधी ॥२॥
कपाळ फुटकें पूर्वजन्मीचें कोण पाप संग्रहीं ।
असा पणामधें टाकुन गेला तो भ्रतार निर्दयी ।
कोण जिवाची सखी केली असल तिचे आग्रहीं ।
गुंतुनिया वचनास राहिला म्हणुन करतो हयगयी ।
नाही साधिला उदीम म्हणुन पडला अशा संशयी ।
किंवा होउन संन्यासी फिरतो अलख म्हणत अक्षई ।
कुळिवंत स्त्रियांच्या रिती ।
स्वामीचरण वंदिती ।
व्यभिचारपणा निंदिती ।
या सुकुळीं निश्चिती निर्मिल्या मर्यादेच्या हादी ।
न भरतां ही आली जवळ वाटंते आयुष्याची अवधी ॥३॥
मध्यस्थ घालुन दुसरीं भाषणें करितां नाना परी ।
असे स्त्रियांसीं फासूं शिकला करुन कवायत बरी ।
यापेक्षां सायास न प्रयत्न उदंड केले जरी ।
घडे प्रीत येकदां पूर्वींच्या ऋणानुबंधें खरी ।
चतुर अढळला म्हणून राहविले दुसरे दिशीं मंदिरीं ।
न कळे उद्यांची घडि काय येइल हृदयमंदिरीं ।

कल्पुन तुम्हां इतुके ।
चतुराइ करूं कौतुकें ।
भाषण म्या केलें मुखें ।
आज भोगिला सुखें, असा नाहीं चतुर अढळला कधीं ।
**होनाजी बाळा** म्हणे, धन्य एक तूं ज्ञानाची निधी ॥४॥

हादी--हद्दी; फासूं--फसविण्यास, फशी पाडण्यास; कवायत--कपट.

* * *

# सगनभाऊ

## लावणी ७८ वी

“ नवीच रांड गळां पडली कोण ? ।
खरें सांग मजप्रती ? नाहींतर देइन प्राण ॥धृ०॥
कोण्या स्थळीं आज विलास केला ? ।
‘ मागें येतों परतुनी ’ वरीच भुलथाप देउनी गेला ।
केवळ तुम्ही पुष्पाचा झेला ।
मुखचुंबन सवतीचें रुतलें एकदंत झाला ।
सख्या माशीं सत्यवचन बोला ।
नेत्र दिसती आरक्त, कोठें कैफांत धुंद झाला ? ।
हा ऐसा इष्क राव तुम्हां लागला कुठून ? ।
नित नवीच रांड एक रोज पाहतां उठून ।
मी असतांना परकीवर पडतां झटून ।
हटून दूर वसा कीं मर्जींत ।
नष्ट जात पुरुषाची कळून आली पुरतीच बेइमान ॥१॥ ”
“ ऐक नारी, खरी आमची गोष्ट ।
बाळपणींचा मैत्र, त्याची कधीं नव्हती झाली भेट ।
काल अवचित पडली गांठ ।
त्यानें नेलें घराप्रत, नारी, तूं नको मानूं खोटं ।
वाढिलें पंचामृत ताट ।
भोजन झाल्यावर डाव मांडिला सारीपाट ।
असे खेळ खेळतां रात्र झाली चार प्रहर ।
जागृतीमुळें नेत्रावर चढलें जहर ।

दे पलंग टाकून, येते झोपेची ल्हर ।
लहरीवर येती लहरी जाण ।
नको छळूं मजप्रति, घडीभर होऊं दे निद्राशयन ॥२॥"

"बराच करूं शिकलासी मनधरणी ।
बोलणें मानभावाचें, कळून आली कसाबाची करणी ।
काल सवत पाहिली म्या दुरुनी ।
जात होती पाण्याला घागर उदकाची भरुनी ।
चला हो, दाविते मनगट धरुनी ।
मग पहाल खालीं, हात जोडूं लागाल तिच्या चरणीं ।
अशी रांड तुम्हांला कोण मिळाली मुढ ? ।
तिच्यापुढें राव करितां लई गोष्टीची गडबड ।
हे रंगढंग चालणार नाहींत माझ्यापुढं ।
बोढे सवतीचे आज घेइन
भल्या बापाची लेक कधीं न मी उगीच राहीन ॥३॥"

"नको करुं झाला बोभाट ।
तमासगिर मिळतील बरे जनलोकाचा थाट ।
समजलीस मजला तूं रागीट ।
तुझी आण आजपासून जाईना परकीच्या इथं ।"
वस्ताद सगनभाऊ म्हणे गुणीजन ।
उभयता रंग मिळालें मन, लक्ष लावूनी ऐका ध्यान ।
सदा गात भजनांत बजाबा गातो अज्ञान ॥४॥

जहर—धुंदी, नशा; जागृतीमुळें—जाग्रणामुळें; बोढे घेणें—हा महानु-भावी वाङ्मयाच्या काळाइतका जुना वाक्प्रचार आहे. वैराग्यनिष्ठ महानुभाव भिक्षु, पोटावर गच्च पट्टा आवळून बांधतात. त्यायोगें अन्नोदक आहार कमी

कमी होत जातो. अत्यल्प आहार घेऊन शरीर शुष्क करण्याचा तो त्या पंथांतील एक विधी आहे. महानुभावांचा ' वोढा घेण्याचा ' प्रकार स्वेच्छेचा असतो. येथें मात्र लावणींतलि नायिका आपल्या सवतीला बलात्कारानें वोढा देऊं इच्छिते ! धरण्यापारण्यास बसून दुसऱ्याला अन्नपाणीहि न घेऊं देतां त्यास हैराण करून आपलें म्हणणें त्यास कबूल करण्यास लावण्याचा जो आततायी प्रकार जुन्या काळीं रूढ होता त्याचाच अवलंब करण्याचा येथें नायिकेचा हेतु दिसतो. महानुभावी वाङ्मयांत ' वोढा ' असाहि शब्द येतो. त्याचा अर्थ ओढाताण असा आहे. येथें तोहि अर्थ उत्तम शोभेल; थाट-- जमाव; जाईना—जाईन ना.

* * *

## लावणी ७९ वी

" सांगा सांगा या श्रीहरीला " गोपी म्हणताती ।।धृ०।
" जात होतों आम्ही मथुरेसी ।
आडवा होतो हा हृषीकेशी ।
हे दु:ख सांगावें कोणासीं ? ।
मुरली वाजवितो गे कान्हा या कुंजवनांत ।
भुलविल्या गोपी साऱ्या, काय सांगूं मी मात ।
असा चेटकी ग हा कान्हा यशवदे माते ।
दुड दुड धावुन येतो जवळी हृदय कवळी ।
बोल मवाळी गडी गोपाळ घेऊन संगाती ।। १ ।।
एके दिवशीं गोपी साऱ्या ।
जात होतों आम्ही परभाऱ्या ।
दुरून मारितो पिचकाऱ्या ।
कळंबाच्या वृक्षावरुनी हेरून येई ।
झाली गर्दी बाई रंगाची यशोदेबाई ।
गर्क आम्ही झालों त्या ठाईं, सांगावें काई ।

धावून धरितो आम्हांस तिनदां ।
सच्चिदानंद श्रीमुकुन्दा झिडकावुनिया टाकी ॥२॥
नित वेढुनीया छळितो आम्हां ।
काय म्हणावें घनश्यामा ।
टाकुनी जाऊं तुमच्या ग्रामा ॥
कंटाळा अवघ्या गोपिसी या श्रीरंगाचा ।
दहीदुध मागतो, आम्हांसी घरीं धाक पतीचा ।
गोपाळ लावितो पाठीशीं, करी नाश दह्याचा ।
पेंद्या सुदामा वडजवाकडा, मोठा ठकडा थट्टा करूनिया जाती." ॥३॥
बोले यशवदा, " अरे जगजेठी ।
कां रे लागतोस गोपीपाठी ? ।
घेई घोंगडी हातांत काठी ।
घेउनिया जाई वनासीं गाई—वत्सांसी ।"
उठले तात काढ (?) हृषीकेशी समजून मनासी ।
दावी मति सगनभाऊशीं छंद गाती विलासी ।
प्रसन्न झाला रुखमिणीवर, छंद प्रकार रामा हरी गुण गाती ॥४॥

मात—हकिगत, गोष्ट, प्रकार; वडज—विद्रूप, कुरूप; वाकडा—व्यंग असलेला, अष्टावक्र; तात—बाप, नंद.

* × *

## लावणी ८० वी

हे कमळिणी, सखे साजणी, कां आज अली बोलाऊं ? ।
चल म्हणतो पाण्या जाऊं ॥धृ०॥
पाण्या जातांची तिनें पाहिलें, रात्रीं रंग कैसा झाला ? ।
पतिसंगें नाहीं रमला ।
खरें सांगतें, जिवलग गडणी राजा पलंगावर आला ।

झोंबत होतें पदराला ।
बहु प्रीतीनें विडा चाविला, टेकुन बसले छातीला ।
तसाच डोळा लागला ।
स्वामी निजले, निचिंत पडले, उठविते सेरसेरमावु (?) ॥ १ ॥
खरें मला हें भासत नाहीं, शरीर सारें खरवतें ।
नाहीं घडला एकांत ।
मुखकमल टवटवित दिसते डोळ्यामधिं चंद्रज्योत ।
झळक मारती गालांत ।
किल्ल्यावरती हल्ला चढला, जोबन नाहीं गवबस्त । (?)
नाहीं जुळले कुस्तींत ।
झटापटीची खूण वेगळी, कां करतीस च्याऊम्याऊ ? ।
सांग नको संशय ठेऊं ॥ २ ॥
असो परंतु चक्क पुसतों, वंधा तुझा कीं भ्रतार ? ।
तूं जनुं दिसतिस हिंवर ।
तें कांहीं नाहीं रणमंडळांत पंचहत्यारी रणशूर ।
गगनीं जैसा शीतकर ।
रात्र तुम्हांला उभयतां गेली कशी पलंगावर ? ।
कामचेतना बरोवर ।
तूं आवडती पति नावडता चल उभयता रंग पाहूं ॥ ३ ॥
पनघटावर पाणी भरलें, शिरीं घागर भरपुर ।
चल बाई झरझर ।
येकांताच्या ठाईं गोष्टी सुंदर पुसती मजकूर ।
कां नाहीं घडला व्येव्हार ? ।
स्त्रीपुरुष आम्ही दोघें निजलों, झोपेची आली लहर ।
प्रकाशला गगनीं शुक्र, जाग्रत होतां मनांत भ्याले

गजबजला सारा गांवू, सगनभाउचे गुण घेऊं ॥४॥

गडणी—मैत्रीण; वंधा—पौरुषहीन, नपुंसक; हिंवर—हिंवराच्या झाडाच्या छायेंत वसूं नये असा संकेत आहे; कारण त्याची छाया निषिद्ध आहे; पनघट—पाणोठा, पाणी आणण्याचा नदीचा घाट.

* * *

## लावणी ८१ वी

सख्या, तुझ्या प्रीतीची गोडी लागली । चालवा प्रीत चांगली ॥धृ.॥
लहानखुरी अटकर बांधा नाजुक । मुखचंद्र अमोलिक ।
आवड तुम्हांला, जवळ बसा सन्मुख । आज पहा माझें कौतुक ।
इष्क बिंबला, घालि मुखामधिं मुख । मग जिवा वाटलें सुख ।
जाऊं नको सजणा, मी पलंगीं येकली । आज कां माया टाकली ? ॥१॥
तुम्हीं नटनागर, मी मैना चांगट । कां करतां मजवर हाट ? ।
शहर पुण्याचे गुंड लई चेंगट । कर लवकर मजवर सुट ।
घटकेंतुन घरीं येतां लई झटपट । नवतीची मांडली लुट ।
कवळुनी धरितां कंचुकी दाटली । लुगड्याची निरी फिटली ॥२॥
सखु ठकडे, ठकपणा किती दाविसी ? । माया ममता लाविसी ।
विष्कबाज तूं, कधीं अम्हां भेटसी? । नूतन नवती पंचिसी ।
तूं कमळण, आम्ही भ्रमर लुब्धलों तुशी । रंग पाहुन झालों खुषी ।
घावी उजवी गुढी, आशा लागली । ज्योतिस ज्योत रेखली ॥३॥
एकांतीचें गुज तुम्हां सांगते । मर्जी पाहुन वागते ।
वेड लागलें मला, वचन मागतें । सारी रात्र किं हो जागते ।
रावबनसीच्या गळ्या मिठ्या मारते । मग आनंदांत भोगते ।
सगनभाऊ म्हणे विष्कबाज भेटली । रामाची भ्रांत फिटली ॥४॥

नटनागर—रूपसुंदर; चांगट—चांगली, सुंदर; हाट—जोरा, हट्ट; पंचिसी—

विशी—पंचविशींतली; उजवी गुढी देणें--संमती देणें, कौल देणें, देवास कळा लावला असतां उजवा कळा सोडल्यास संमती असते.

* * *

## लावणी ८२ वी

जैना मैना गैहैना जीवना लखाची ।
पांचजणी कोण कोण आवडीची ? ।।ध्रु.।।
आपण उभयतां बनकळी डाळिंबीची । रात्र ही हवहावई दारूची ।
पंचारतीला होई आज्ञा स्वामीची उठा, बघा मौज होळीची ।
न्यारे न्यारा नखरा बनू जणू यकच गठी ॥१॥
सरपाटील तुम्ही जुमेदार अंबीर । मज न कळे याच्यावर ।
काय पांघरू मी ? नेसूं कोणचें चीर ? ! अस्सल नकल बरोबर ।
ताडपत्री मी पांघरेन कपाळभर ।
गाठी द्याया होइल उशीर, मला शोभेल कीं साखरेची गाठी ॥२॥
जैना मुखरणी चवघीजणी नव्हा पुढें, नका जाऊं, उभे रहा ।
बिरबड्याचे लोक झुकले, मागें पहा। झोंक पाहून करिती हाय हाय ।
माझ्या मनांत हा । पुष्पे नऊ दाहा ।
मारूतीरायाला वाहा । होळी पुजाया झाली एकच दाटी ॥३॥
वाजत गाजत होळीला पोळी लागली । उभयता ज्योत रेखली ।
गांठ शेल्याची नारीनें सोडली। पति मोहरे, मागें चालली ।
नासीकर बुवाची आज्ञा झाली । बाजू द्या थापर गेली ( ? ) ।
सगनभाऊ म्हणे, देव भक्ताच्या भेटी । जशी तूपसाखरेची गाठी ।
नागरपंचमीस नाग पुजाया एकटी । होळी पुजणार बोले मिठी ॥४॥

ताडपत्री--तांबड्या किंवा इतर रंगाच्या व पांढऱ्या चौकटी असलेलें एक प्रकारचें रेशमी लुगडें, शेला;याचा तंजावरकडे प्रचार आहे; मुखरण--स्त्रियांतली पुढारी; बिरबड्याचे--बडोद्याचे; चीर--वस्त्र.

* * *

## लावणी ८३ वी

सख्या, चला बागांत बागांत खेळुं गुलाला ।
तुम्ही रामभक्त, मी स्मरते रामाला ॥ धृ० ॥
आला राव शिमगा, अहो राव शिमगा, आज होळी ।
करूनीया रंग खेळूं खेळीमेळीं ।
उठा वसा मेण्यांत मेण्यांत वनमाळी ।
आवड मला मोठी पहाण्याची अशा वेळीं ।
लाल करा पोशाग पोशाग वनमाळी ।
वृज गोकुळची मी गवळण चंद्रावळी ।
बरोबरच येते, अहो राव येते, पुढें चाला ॥ १ ॥
आलो लाल बागांत बागांत ऐका जी ।
मांडूं सारीपट, जवळ वसते खुषमौजी ।
जुगूं नका फाशाला फाशाला मोकळा जी ।
हारजीत खेळूं एक डाव चौरसबाजी ।
मात करा मजवरती मजवरती आहे राजी ।
कळे तशा मौजा करा इष्कबाजी ।
मात माझी झाल्यावर पुढें बोला ॥ २ ॥
भर मुठी गुलालाच्या गुलालाच्या फेकीते जी ।
अबिर बुका लावूं, हळू फासा टाकिते जी ।
मारिन जुक अठराचे अठराचे मागते जी ।
नयन कट्यारी राजहंसा रोखिते जी ।
नजर नको गेंदावर गेंदावर झाकिते जी ।
विडा घेउन लोळा, रंग हिरवा रोहोकिते जी ।
प्रीत ठिवा मजवरती मजवरती, धरिन शेला ॥ ३ ॥
मजा झाली डावाची सारीपाट ।

पुरे करा खेळ, आटपा हो नटबाट ।
नवे नवे दागिने, नवा थाट ।
नवी द्यावी वस्त्रें, खुप धरली तुमची वाट ।
भरून मारा पिचकारा पिचकारा सुख वाट ।
नका धरूं कवळून, वर लागुन गेली चाट ।
गाठ पडे, ठरवा ठरवा पंचमीला ।
सगनभाऊ गाती संभाळुन सुरताला ॥४॥

खुषमौजी--आनंदानें; चौरसबाजी—सोंगट्याचा किंवा गंजिफाचा डाव.

* * *

## लावणी ८४ वी

मीं लेकुरवाळी । अंगसंग हा पुरे करा हो, मुख कुरवाळी ॥ धृ० ॥
शरिर अशक्त । त्यांत सासुसासरे वाडिल, दीर झाले विभक्त ।
नसे संशय यांत । पहिल्यासारखी प्रीत चालवणें, झाले इथुन पोक्त ।
बाळ थान पेतं । उठुन विडा द्यावयास येते, मोठा कठिण वक्त ।
चढली काळूखी, तोंड चुकविलें, नाहीं पडलें काळी ॥ १ ॥
वांजखडा घेते । पुष्कळ द्रव्य खर्च करूनीया मोकळी राहाते ।
आतां कोणास भिते । मला नांदणें प्राप्त जीवाला आप दुःख देते ।
लाजुनी जनातें । हालत पाळणा जे ते म्हणते पोट पिकूं परते ।
जें करणें तें मजकडे पाहून आपल्या करची मळी ॥ २ ॥
बरी बोलून खरी । आपण उभयतां क्रिया केल्या जाऊन कृष्णातीरीं ।
मानेवर सुरी । कोण ठेवली होती मजला सांगा राजेश्वरी ।
चिकी आल्या आजवरीं । चव लागली जिवाला तुमच्या तृप्तता शरीरीं ।
विकले जाऊं तुझे पायीं गे संसाराची होळी ॥ ३ ॥
विकले जाऊं नका । काया दान तुम्हांला केली ।
अर्पण मजला विका । प्रार्थना विषय कल्पना ऐका ।

शोधुन पहावा समर्थाचा शिक्का ।
मग महालांत झुका । हेतु प्रीतीनें गोष्टी सांगेन, हासुन देइन मुका ।
सगनभाऊचे गुण करुणाकर तारक वनमाळी ॥ ४ ॥

वांजखडा—गर्भधारणा न व्हावी म्हणून स्त्रिया कांहीं औषध घेतात तें; जिवाला आप—आपल्या जिवाला; परते—पुन्हां; आपल्या करची मळी—मी आपल्या हातच्या मळाप्रमाणें स्वाधीन आहे; चिक्की येणें—वयांत येणें.

* * *

## लावणी ८५ वी

ठकु, दर्शन दे, पाहुं दे तुझा मुखडा ।
अंगणीं मुशाफर फंदी फाकडा ॥धृ.॥
गोरीपान ज्वान राधा । वय लहान, नूतन आलें न्हाण, सुबक बांधा ।
शिणगार करून साधा । तन्मणी, ठुशाबाळ्या, बुगड्या सुद्धां ।
इष्काचा कैफ सदा । तुझी प्रीत करून मनमानेसा सवदा ।
करिं वांगडया पाटल्या काशीकडल्या ।
लाल पिवळ्या शुभ्र हिरकण्या जडल्या ।
आम्ही गिऱ्हाइक पहाया मुरकुंडा पडल्या ।
खर्च करूं म्हणतों पैसा रोकडा ॥ १ ॥
चतुरे राजसवाणे । रंगली बत्तीशी, दंत अनार दाणे ।
नासाग्रीं नथणीनें । मोठा जुल्म केला, सुरती मोती दाणे ।
उरीं उसासले चिमणे । शुभ्र कांचोळीं, गरतीचें लेणें ।
कंबर बारिक, पोटऱ्या नाजुक, गोऱ्या ।
पदीं साखळ्या करंगळ्या नेऱ्या ।
दिव्य मुखरणी येईनात आतां कोणी सामोऱ्या ।
बोलणें रसिक, गोड बर्फीचा तुकडा ॥ २ ॥
प्रीतीचा पाढा वाच । दुर्बळपण जाइल संसाराची आच ।

धर शब्द जिव्हारीं साच । केल्यानें होईल, नित मोहरा दे पांच ।
जुमडयाला मरवापाच । गोऱ्या रंगावर हिरवी पैठणी काच ।
मैत्र नगरी नांदती गजभारानें। डुब करुन घे वस्ता ने आळंकारानें ।
वाजऊं डऊर वहारानें । श्रीमंत वसंत चंद्रबुंदखडा ॥३॥

बोले शब्द येउन स्त्रिया । ‘ द्वारांत उभे कां ? माडीवर या ।
गुणग्राहिक गुणवर्या । वसवसा इष्क हा सांगितला पर्या ।
मी आज्ञांकित भार्या । उभयता प्रीत हो कर राया ।
सुख तुम्हांला, सुख हो मजला नित्य असो ।
चित्तवृत्तीहि संपत्ती गुणीवंताच्या नित असो । ’
कृष्णकृपेनें अधिक अधिक ममता असो ।
म्हणे सगनभाऊ, घ्या दिपवाळीचा विडा ॥४॥

ठकी--मोह पाडणारी; ठकु—संबोधन, सुंदरी; ज्वान--जवान, तरुण; करून—करूं; मन मानेसा सवदा—तुला पसंत पडेल असा सवदा करूं, म्हणजे तूं म्हणशील तितके पैसे तुला देऊं; मुरकुंडा--उडया; अनार दाणे—डाळिंबाचे दाणे; नासाग्री नथणीनें मोठा जुल्म केला--नाकांतल्या नथीनें तर आम्ही बेहोषच होऊन गेलों; चिमणे—चिमणे स्तन; लेणें—पेहराव, अलंकार; करंगुळी--पायाच्या करंगळींत घालावयाचें चांदीचें वेढणें; जुमडा—बुचडा; गजभारानें—दिमाखानें, ऐश्वर्यांत; डऊर—एक वाद्य; पर्या--प्रकार.

* * *

## लावणी ८६ वी

विषय पुरे कर हा, मला सोसेना जाचणी ।
प्रीत नको, जीव घातला काचणीं ॥धृ.॥
मुखीं मुख लावूनी निजतां ।
पाहाते मनामधिं इथें ज इ सा पुरता ।

लाजते तुम्हांसी कमी कांहीं नसतां ।
भवते फिरोनी जीव घातला काचणीं ॥१॥
तुम्हां विषयाची फारच गोडी ।
वाट मी पाहाते आंगणीं खडी ।
सेज फुलांची केली पलंघडी ।
आवळुनी धरितां, जीव घातला काचणीं ॥२॥
शेज फुलांची केली आसनीं ।
टाकून गेला सखा, शोधला कोणी ? ।
वाट मी पाहाते उभी आंगणीं ।
हार तुरे गजरे घरीं गुंफिती माळणी ॥३॥
आज सख्या लवकरीचा बेत म्हाली ।
आरास म्या केली तिसरे ताळीं ।
काय पाहिलीस हवा, फुलल्या केळीं ।
**सगनभाउ** गाती, गुणी चाहती रंगणीं । ॥४॥

ताळ—मजला;

* * *

## लावणी ८७ वी

सख्याचीं पत्रं सायंकाळीं । वाचुन पाहाती गुणवेल्हाळी ।
प्रस्थान प्रातःकाळीं । तुज गृहीं येतां ।
सख्याची सखी सांगती सखीला । माझा भोगता खुषी झाला।
रात्री येतो आज वस्तीला । तुज सांगितलें ।
आज्ञा रसवंती राजस । माझ्या मनांत होती हौस ।
पाहून झाले जगन्निवास । भाग्य उदवलें ।
साधा शिणगार तऱ्हेचा करिते । तरी ते पान्यामधिं रस भरिते ।

आडवी जाते बनुन त्वरित । तारा चमकली ।
डोळे भरून मजकडे पाहाते । पाऊल चोरून बरोबरच तें ।
आदरें गुजगोष्टी सांगते । राजसरंगा ॥१॥
दीप—समयांची रोषनाई । सखि म्हणते राजा पाही ।
तिथून गुप्तरूपें लवलाही । सख्याच्या अंगणीं ।
बालंपेचाचे पागुटें । दुपेटा हिरवे नक्षे बुट्टे ।
अंगावर ज्वाहार चमचमाट । सूर्य गगनीं ।
बुधि त्या करची राजसबाळी । मस्तक चरणावरती पुतळी ।
ठेवून सखा धरि करकमळीं । या सुखशयना ।
किंचित धरित पदर घेऊं । मराठमोळा आपला दाऊं ।
रोख पंछीवरता ठेऊ । स्ट (?) चित्ताजोगा ॥२॥
सिद्ध सैंपाक पाक । पाक्क पकवान्नाचें नाम ।
जाणे खाज्या करंज्या फेण्या । हातामधिं तेलपोळी ।
घिवर, घवले, मांडे, बुंदी । केशरी भात मिठा सुगंधी ।
शर्करा घाद्धन सिद्ध । करिती पुरणपोळी ।
शाखा करदुळींच्या पुरचांची (?) । आणिक
कवळी सैंग चवळीची । भाजी हिरवीगार मेथीची । वांगीं सगळीं ।
झालस्या (?) पुस्पाच्या (?) हरजिनसी । रांगुळी घालुनीया पात्रासी ।
सख्यां उठा भोजनासी । अहो जिवलगा ॥३॥
चोपाळ्यावर बसला फाकडा । एक झोक्यास एक विडा ।
कलगीशेजारीं केवडा । सख्याला लागा (?) ।
असे पांच विडे गोविंद । मुखांत घालितसे सुगंध ।
प्रीतीचा कलमे न लगे बोध्य । असा रंग होवा
येक झोक जरी साधिला । पतिस स्या (?) झोक्यास अंतर पडला ।
जिंतिले राजबनसी घावरे । हारविले गर्वा ।

सखी म्हने दासी होउन राहीन । जिकडे जाल तिकडे येईन ।
क्रिष्णाबाई तुंगभद्रा पाहिन । याच प्रसंगा ।
**सगनभाउ** गातात जी दरदी कोण दशा सांगा ॥४॥

भोगता--भोग्या, भोग घेणारा; शिणगार--शृंगार;उदवणें—उदयास येणें; खाजी--एक मिठाई; खाजी—करंजी.

* * *

## लावणी ८८ वी

सारी रात्र भोगिलें, हौस नाहीं पुरली, धरलें करीं ।
अरुण उदय जाहला प्रभाकर, पहाटे उठा लवकरी ॥धृ०॥
भोळ्या राजसा, भांगी पुरसा आती तुमचा स्नेहे ।
मायेनें गोविलें, परंतु मला बोलतां न ये ।
मन तुमचे खोसीवले, खुशाल झाला सुकात दीहे ।
आतां उजाडेल, कशी मी जाऊं ? मला वाटते भये ।
मायबाप भाऊबंद दीरभावाचे जपती हाये ।
न कळे, बातमी त्याला कळेल, पडला असेल संशये ।
आधिं म्या सांगितलें, नाहीं आयकिलें तुम्ही ।
गोवुन व्यसनीं मला कसें पाडलें भ्रमीं ? ।
इतके कां हो सख्या, मसाठीं व्हाल श्रमी ?।
ठसलें कीं हो आज मनामधिं करा योजना बरी ।
तुम्हा दुख देणार नाहीं, दुःख भोगीन शरिरांतरीं ॥१॥
उठून बसावें प्राणविसाव्या, नका कवेमधिं धरूं ।
जीव माझा कासावीस होतो, आतां मी काय करूं ? ।
हात काढा, छातीवर जोबन घेतलेस चुरचुरू ।
आंग चुकवून एकीकडे होतां पुढं येतां सरसरू ।
धनलोभ्याला अवचित गवसे जशी मालाची चरू ।

तसे गवसले कांहीं तुम्हांला निजवितां धरधरू ।
सख्या लई गोडी तुम्हां विषयकर्माची ।
वेळघटका चुकली नित्यनेमाची ।
शपत घालीन आतां राजारामाची ।
रोज यायाची आस्ता, नका हो मोडूं राजेश्वरी ।
दुसरे दिवशीं चैन भोगा वरल्या माडीवरी ॥२॥
सखा म्हणे, हे राजसवदने, कशी जाशील येकटी ? ।
शिणगांरामधिं डुग पीतांबर पिवळा कसला कटी ।
पुष्कळ देतों मोती पोवळी हिऱ्याची आंगठी ।
मर्जी आमची सखे, भरूं पुतळ्यामोहऱ्यांनीं वटी ।
आणिक येक सांगतों तुझ्या पाठची बहिण धाकटी ।
येक रात्र कर माय तु चा (?) पुढें विचार सेवटीं ।
आज्ञा द्यावी मला राव राजेन्द्र धनी ।
बुरखा देऊन मला पाठवा सुज्ञानी ।
माझी बहिण आहे मजपशीं शाणी ।
दोघी बहिणी मिळून मनसुबा बसुन करूं क्षणभरी ।
अस्त्रीचरित्र अधिक राजा हीकराम आनला आम्ही ॥३॥
आईक सुमित्रा परमपवित्रा देह तुला आर्पिली ।
वनभोजनास जावें, पण वेळ आस्ता राहिली ।
गुप्तरूपी न कळे कोणाला महालांतून येकली ।
बापा जिव्हारीं लागून गेला, आठवण करूं लागली ।
खुशी होऊन आपल्या बहिणीला हर्षयुक्त भेटली ।
मागिल साकल्य वर्तमान अवघा सांगूं लागली ।
चिंता नका करूं, मी बोलेन बरवे ।
नेसवीन सासुला उंच पातळ हिरवें ।

तुजवर हेत आहे, दोष काहाडीन मी सरवे ।
**सगनभाउचें** कवन ववण मोत्याची कशी ग रसभरी।
उभे थव्यावर थवे, चुकवती मालाच्या लावणी ।।४।।

भांगी पुरसा--'भांगभुरका' असा वास्तविक पाठ पाहिजे; भांगभुरका--१ उधळपट्टी व नासाडी; २ भांग, गांजा अशा चैनीच्या पदार्थांवर केलेला खर्च; स्नेहे--स्नेह; जपती--जप्ती, टपणूक, जपणूक, लक्ष; भावार्थ--माझ्या हालचालीवर दीरभावजयादि मंडळी 'जप्ती' ठेवून आहेत. नकळे--न जाणो; मसाठीं--मजसाठीं; चरू--हंडा; माल--धनमाल; राजेश्वरी--राजेश्री; वटी--ओटी; मजपर्शी--मजपेक्षां; हीकराम--विक्रम राजा.

* * *

## लावणी ८९ वी

लाडे लाडे बोले लाडके लाड माझा चालवाल काय ? ।
घडी पैठणीची मोडता वेळे मजला बोलवाल काय ? ।।धृ०।।
मित्र सुजाणा मनमोहना मन पवना वारू ।
संगीन जोडे एकाहून एक चढी धनी माझें तारू ।
भंडार भरपूर काळकंठकंदुर जगन्यांत पसरूं ।
कृपा तुम्हावर एकनाथाची त्रिकाळ कारभारू ।
बादशाही अकबर करून गेले अकबरीत मोहोरू ।
तुम्हीं अगाध, तुम्हीं सागर माझे ठिवला पडीभारू।
मच हे (?) ताजवा वजनी बरोबर आजपुन तोलवाल काय ? ।।१ ।
पैठणकर गंगातीरकर तुम्ही वचनी परिनिष्ठ ।
सिद्धसाधक शोधा, नाहीं यास्तव वचनीं एकनिष्ठ ।
काळ्याचे पांढरे पावला शहरांत बोभाट ।
ब्रीद आपलें सांभाळा, करणी करितां अचाट ।
गोरे भुरके निटस नेटके गाल, कवळे ओठ ।

झटपट जातां लटपट येतां मुके मटामट ।
माझ्या पिठांत मीठ निर्मळा गोर्डीत काल्वाल काय ? ।।२।।
मित्र सुजाना, ये मनरंजना, नाहीं इष्काला जात ।
मायारूपी भगवान इष्कबाजी करून ते जात ।
मन हें चांडाळ, मन हें ओढाळ, मन जगीं म्हणत सुजात ।
मन मारिते, मन तारिते, जीव हा करितो घात ।
हाटखोर हाटले, बोलत नाहीं, कां करितां अपराध ? ।
शिक्षा करिन तुम्हांला आणून कबजांत ।
इंग्रेजी सवाल फेकले मजलीस पोहोचवाल काय ? ।।३।।
इष्कांत गोड कांहीं पुसते तुम्हांला खुणगांठ आंतरची ।
त्यांतील वर्म जाणित नाहीं वस्तु सारसाची ।
मागें पहा, पुढें पहा, खालीं पहा, वर पहा, वाट या जायाची ।
पिंड प्रचीती शाधुन पहावी आण एकनाथाची ।
मागील जी गाठडी घेतली परत करा आमुची ।
यावर सजना दम काय तुमचा, घडी मोडाल पैठणीची ।
जल्मा येउनी नामस्मरणें विठ्ठल जागवाल काय ? ।
**सगनभाउ**च्या कवित्वा रावबाजीला ऐकवाल काय ? ।।४।।

पडिभार—आदर, वडिवार; परीनिष्ठ--सच्चे, एकनिष्ट; सारसाची--अस्सल, हीण वगैरे नसलेली.

* * *

## लावणी ९० वी

जय श्रीमंगलमूर्ति नमो पूर्ण कृपाळा ।
दीन दयाळा स्मरतां यावे रे बापा ।। धृ. ।।
जयश्री सिध्दविनायक तो ज्ञानदीपा ।
इच्छा धरितां शक्ति पुरे निर्गुणस्वरूपा ब्रह्मा विष्णु त्रिपुराणें स्मरती बापा ।

स्मरती इन्द्रादिक शेषशाही यदचारी ब्रह्मकुमारी
सहित यावें सहित तया वेळे बापा ॥ १ ॥
हर हर विश्वपति परस्परा त्रैलोक्य दाता ।
ज्याचा चिरंजीव मोरया त्रिनेत्रसुता ।
विलंब न करी सत्वर यावें हृदयीं पद धरितां ।
यमचिंता प्राप्त होईल उपाय न चाले रे बापा ।
व्यास बोलले सत्यस्वभावें रे बापा ॥२॥
गणगंधर्व देवगण शंकर भोळा ।
समर्थ श्रीगुरू बृहस्पती ऋषींचा मेळा ।
नारदतुंबर स्मरती तवरे जाणुन सोहोळा ।
प्रवेशले चतुर्भुज एकदंत जयवंत आलापुन श्रीराग ।
प्रथम देवा प्रेम न मायले मायबापा ॥ ३॥
पाहुन देवसभा तृप्त तुशी गणराजा ।
जयजयकार पुष्प वर्षती वर महाराजा ।
संतमंडळीस विनावितो विठ्ठल राजा ।
जय गुरू सिद्धनाथ आदिनाथ सांप्रदाया ।
**सगनभाउ** म्हणे रसिकपदीं लागुन गाई हरीगुण गाई रे बापा ।
जय श्रीमंगलमूर्ति नमो नमो पूर्ण कृपाळा दीनदयाळा स्मरता यावे रे बापा ॥४॥

* * *

## लावणी ९१ वी

वरखालीं पाहूं किती तुजला ? माझा पिकला ऊर ।
हाड फासुळ्याचा चुना सजणा रघत साहिना उर ॥धृ०॥
सख्या माशिं बोला, काल गेला होता रात्रीं कुठें ? ।
विषय प्रीत झाली मजला, कपाळावरी घर्म सुटे ।

आतां कां हो कण्हतां ? हळूच म्हणतां, कशी पडली तूट ।
आसी करनी करी घाटशिखरीं जाउं पाहातां दुर ॥१॥
याच्या काळजीनें शिरा हिरव्या पिवळ्या झाल्या माझ्या ।
आता जवळ वसते लाजिरवाणी गोर्डीत कांहीं तरी माझ्या ।
थोराघरचं केनं पदरीं पडल आशा कीर्ति तुझ्या ।
माझी लाज आबरू ठेवा, नका ठेवूं, तुमच्या चरणीं शिर ॥२॥
सख्या तरफडते, बरबडते, माझ्या ज्वानीचा पीळ ।
रती मास गुज खिळल रोग. फुटल मुरमाची खिळ ।
सूक्ष्म होऊन निजून राहाल जगीं नासली नीळ ।
सत्यवचनाची सगुणसाची दृष्ट द्या दूरवर ॥३॥
लिंवलोण उतरी सुगर सुकरीं सखा पोटाशीं धरी ।
प्रेमें मोहो आला, आनंद झाला, दिला शालू जरी ।
मुख कुरवाळून सखा ओवाळून नेला सेजेवरी ।
खुण हीच शाओरी कृपा असावी **सगनभाऊ**वर ॥४॥

नीळ नासणें—बभ्रा होणें, दुर्लौकिक होणें.

* * *

## लावणी ९२ वी

नको सख्या वरखालीं पाहूं, मला चांगले पाहात जा ।
जाईल काया, राहील माया, खेळीमेळीनें राहात जा ॥ध्रु०॥
पहिले साल गुजरलें, दुसरें तेंहि साल भरत आलें ।
भली भलाई कर कांहीं प्राण्या, मी तर गेले मारले ।
चवथा वाटा गुण शिकवले, तीन वाटे गुण चोरले ।
मी काय जाणे , गरीब बिचारें मोहुन शरीरा भाळलें ।
कवळी पानें पिकलीं गजरी सुवर्ण तफक भरयेले ।
त्यांत कल्पना चुकली थकली, आटला नाहीं फिरले ।

आधींच कोण होती इवशी ? त्यांतील अर्थ घेत जा ॥१॥
पूर्वींची कथा माहित असतां आणिक सांगते ऐकणें ।
नको सख्या भरूं रागें, मजवर हेत बरवा ठेवणें ।
काळ निमित्तें काढून आणिले तीवर सासुबाईनें ।
मायबाप पति ते अंतरले आणिक सखे मेव्हणे ।
प्राल्ब्धापुढें उपाय नाहीं विधात्याचें बोलणें ।
ब्रह्मवाक्यें कधिं चुकेना, दृष्टि पडलें शहर पुणें ।
म्हणुन दाखले देऊं कुठवर ? नरढे घर दुध्यांत जा (?) ॥२॥
प्राणाहून प्राणसखे तू गहिरी शब्द चाळले ।
उत्तरासी प्रतिउत्तर दिधलेस ते आम्हां भाळले ।
आता फुंकून पेतां ताक म्हणती, मन दुधाला पोळलें ।
जशी वर्तणूक होईल तैशी ओलेंही जळतें वाळलें ।
मान्य तुझ्या बोलण्यास मैत्र बरें विघ्न टाळलें ।
जोत परंतु निगून गेली काय प्रेता कवटाळलें ।
हींच अक्षरें पुढें आठवून नित हृदयीं लिहित जा ॥३॥
असें दाखले कुठवर देतां म्या तर शिर घेतलें हातीं ।
अंतरगुण उभयतांस ठावीं प्रीतीचीं लक्षणें किती ।
राग भाग हा सोडुन द्यावा, उभे राहुन धरिले हातीं ।
आजपासून अंतर पडल्यावर केल्या क्रिया लागती ।
मला ओवाळून टाका सख्या वुनतरे जवळ बाहील्या दुती (?) ।
आतिरति रतीनें छकाविले शोधक श्रोते जाणती ।
**सगनभाउ** म्हणे, जन्मा येउनी विठ्ठल हृदयीं ध्यात जा ।
तुकारामाचे अभंग लाघवी रामा मजेवर गात जा ॥४॥

तफक—तबक; आटळ—अटळ, होष्यमाण; अति रति—अतिरथी; रती—विषय, लोभ.

* * *

## लावणी ९३ वी

ध्यास तुझी आस, धरली कास, मन उदास, जरा हृदयीं धरा ।
कधिं याल माझ्या माहालीं ? दिल खुशाल करा ॥ध्रु.॥
काय चुकी झाली? पदरीं घाला, मी स्नेहाची भुकेली ।
धरिन शेला, तुम्ही परस्त्रीच्या माहालीं ।
काल गेला, या दिसून आल्या चाली ।
तरमळे जीव, शरीर घाय झाली लाही, आतां कांहीं धीर धरा ॥१॥
तप्त शरीर झालें, तुला पाहतां म्या हारतना केलें (?) ।
अंत पाहात ममतेचे मारून भाले ।
कुठें जाता म्यां फार प्रेत्न केले ।
तुम्ही तरी नटबाट, करिन थाट, धरिन वाट जरा पलंगी बसा रे ॥२॥
तुझ्या जीवासाठीं खोरी सेऊनी, उभी द्वारीं थाट करूनी ।
आज न्हाले, जाऊ मंदिरांत सदनीं ।
करूं मौजा आज दोघे आनंदानीं ।
करूनी अंगसंग. उडवी रग, तू पतंग, जरा पलंगीं ठरा ॥३॥
प्रीत उभयताची असू द्यावी, माझी आण गळ्याची ।
मजा व्हावी **भाऊ सगन**च्या गुणाची ।
प्रसंगास ध्यायी मजा हवी, रामा गाई, नवी चाल शिरा ॥४॥

खोरी होणें किंवा खोरीस येणें—नुकसानींत येणें, क्षीण होणें, अपकीर्ति किंवा दुर्लौकिक होणें; खोरी सेवणें—दुर्लौकिक पत्करणें; शिरा—उत्तम, उत्कृष्ट.

* * *

## लावणी ९४ वी

( पहिलीं दोन कडवीं गहाळ )

माय यशोदा पिता नंद । तुम्हां वश कसा झाला गोविंद ? ।
चिरंजीव बोले नारद । वसुदेव–देवकीनीं भोगिला बंद ।

देवकीपोटीं बाळ मुकुंद । सख्या मामाचा त्यानें केला वध ।
सोडविलें वसुदेवाला । रामराजा वैतागून गेला ॥ ३ ॥
बह्म कर्म वर्म ठेवा । कोठें निजलाशी ? जागा शोध लावा ।
चंद्रभागा गंगा देवा । मायसरस्वती व्रत ठेवा ।
भ्रष्ट झाले जीवा शिवा । कृपा असुं द्यावी साधुसंत ठेवा ।
**सगनभाऊ** बोले चोख्याला । जेऊं घाला म्हणे बाप विठोबाला।
पति माझा जोगी झाला । रामराजा वैतागुन गेला ॥४॥

बंद—कैद.

* * *

## लावणी ९५ वी

घ्या गोविंदविडा तुम्ही सजणा ।
न्हाण आल्यास झाला येक महिना ॥ धृ. ॥
उभी केव्हांची द्वारीं सजणा, मजकडे कां हो पहा ना ?।
तुझ्या सुरतीला लंपट झाले, तूं एक मोती दाणा ॥ १ ॥
विषयामधिं लंपट झाले, कळ मजला साहिना ।
सख्या आंगासी घर्म सुटलें, मांडीवर कां घ्या ना ? ॥ २ ॥
कडेवर घेतां, मांडीवर न्हेता, हात बगलेंतुन द्या ना ।
उजव्या हस्तें गेंद चोळितां, मुखचुंबन कां घ्या ना ॥ ३ ॥
संगामध्यें रंग उडविला, रिझली राघूमैना ।
**सगनभाऊ** म्हणे, गंमत झाली सांगा लक्षुमणा ॥

* * *

## लावणी ९६ वी

चैत्रपालवी झाडागणिक फुटते हिरवी पिवळी ।
नार नव्या नवतीची नवळी ॥ धृ० ॥

छाती मुखवटे भुजा बाहुटे, कर कर्दळीचा कंद ।
आखार कंबर बारीक अरुंद ।
भुवया कमाना, डोळे हिंगुळे, गाल गुलगुलीत बुंद ।
दोन्ही कुच कुसंब्याचे गेंद ।
पेंडी तनमणी खिचडी ( ? ) करोनी लोलक हा बिलंद ।
नाकीं नथ चमके गोविंद ।
नार भरपणांत, नाहीं यौवनांत, आले दिवस जवळी ॥१॥
खांद्याहून पदर रुळतो भुईवर, उघडे दोन्ही आंगठे ।
चोळीवर चमके काठ गोठे ।
राव्यावाणी नेत्र गरगरा मारी संगीन सपाटे ।
दरदरा घाम अंगांतुन लोटे ।
स्वार पायदळ हुजरे बारगीर अंबीर मोठे मोठे ।
वेडे झाले पाहून गेंदगोठे ।
तान्हेल्यास पाणी, भुकेल्या जेऊं घाल, आम्हां भोजन पाणी ॥२॥
शके १७३९ ईश्वरी नाम संवत्सर ।
म्हाणुं मोत्यानें पठी पसर ( ? ) ।
शहर चिनापट्टणका सुरूंग पैठणका पेठेचे कवीश्वर ।
चुणगे शब्द सुंगधी केशर ।
काय जेऊं घालूं ? कसे जेवितां आंबेमोहोराचे खासर ।
अस्सलची कधींच येइना सर ।
बोललीस रसाळ, कर मन उसाळ, बाध प्रीतीच्या पवळी ॥३॥
गेलें मन मिळून शर्करा आळुन दुधामधिं मिसळलें ।
मजवर लई लई मन पाघळलें ।
चमचमाट बिजलीचा थाट, ढगांतुन कोसळलें ।
कसे दयाळा दिवसा दिवटी पाजळले ? ।

केली गरदी रविवारांत, आली बुधवारांत ।
पाहातांच विचारीं पडले, खोचले मनांत ।
दुलदुला शिपाई सैन्यांत, गेला भिडुन रणांत ।
तशी चपला चमकुन माणिक चौकांत ।
उज्जनीचे मुशाफर तेथें उभे भररस्त्यांत ।
एकावर एक रिचवले अशी पाहात मूर्त ।
धीर धरून सावरूं उठले, माघारीं उलटले ।
नार जखमी करून आम्हांला कुणीकडे गेली ? । ॥३॥
या जेजुरीचे बनसी छब्रदार ल्हिमासी ।
रथांतुन मुशाफर बुंदखडा गेली घेउन घरासी ।
श्रृंगारून मंदिर खासी सुंदर विश्वासी ।
सुस्वभाव दावुन आपुला भोगिले तयासी ।
नवें कवन आणुन रसासी, जडणी बुंद खासी ।
दयापूर्ण नाथ प्रसन्न बाळा राघुसी ।
गुणी **सगनभाऊचे** चुटके पाहा, अचुक फटके ।
गातात रसिक रसेले गर्द सभा झाली ॥४॥

* * *

## लावणी ९८ वी

तूं गुल्यानार गुलपरी बोले मैना ।
ही इष्क जखम भाल्याची भरुन येईना ॥धृ०॥
ल्हानखुरी जान तयारींत ओठ शिरा ।
नाजुक रुपडें, कंठावर हिरव्या शिरा ।
दंडभुजा कशा पहिला माल कोरा ।
चिमणे जोबन यानें केला आमचा मारा ।

आम्ही हुशार झालों, लाजुन ठेर ज़रा ।
हे वीर बडुदे गुजराथेचा वारा ।
आम्ही छंदी फंदी इष्कबाज शोकी
झालो गर्क शरिरावर पाहुन नोकी
तुं नटबाजिंदी दक्षिणची शोकी
तुझें चलनवलन पाहुन आनंद मना ।
आम्ही पाहात आलों हा तिसरा महिना ॥१॥

तुझें नाव जैना, गुणग्राहिक नाव तुझं ।
प्रीत कोण्या रीतीनें करशील ? सांग मज ।
दीप लाव आतां, भरली तिन्ही सांज ।
लक्ष्मुची वेळ, गोडस बोल आज ।
शिक्क्याची देवघेव करणें लागे आज ।
वचनाचे तोंडे पुढें पडले मोज ।
या माया प्रपंच संसारासाठीं
आतां कुणी कुणाचें नाहीं ग शेवटीं
मोहोनी घालुनिया कर गे लुटालुटी
आतां उशीर कां गडे ? पाहुं नको चवना ।
चाल देवदर्शना, तटली सकळ सेना ॥२॥

आहो राजअंबीरा, तुम्ही लोक गाढे ।
कीर्तवान तुमचे मुलखांत पवाडे ।
उत्तर ऐकावें निवांत निवाडे ।
आपली पट्टराणी सोडून भलतीकडे ।
प्रीत कशी करावी ? पहा त्या चंद्राकडे ।
ज्योतिशी ज्योत मिळाल्यावर भ्रांती उडे ।
असें काय बोलावें ? समजुन जैना बोल,

छाती मुखवटे भुजा बाहुटे, कर कर्दळीचा कंद ।
आखार कंबर बारीक अरुंद ।
भुवया कमाना, डोळे हिंगुळे, गाल गुलगुलीत बुंद ।
दोन्ही कुच कुसंब्याचे गेंद ।
पेंडी तनमणी खिचडी ( ? ) करोनी लोलक हा बिलंद ।
नाकीं नथ चमके गोविंद ।
नार भरपणांत, नाहीं यौवनांत, आले दिवस जवळी ॥ १ ॥
खांद्याहून पदर रुळतो भुईवर, उघडे दोन्ही आंगठे ।
चोळीवर चमके काठ गोठे ।
राव्यावाणी नेत्र गरगरा मारी संगीन सपाटे ।
दरदरा घाम अंगांतुन लोटे ।
स्वार पायदळ हुजरे बारगीर अंबीर मोठे मोठे ।
वेडे झाले पाहून गेंदगोठे ।
तान्हेल्यास पाणी, भुकेल्या जेऊं घाल, आम्हां भोजन पाणी ॥ २ ॥
शके १७३९ ईश्वरी नाम संवत्सर ।
न्हाणुं मोत्यानें पठी पसर ( ? ) ।
शहर चिनापट्टणका सुरूंग पैठणका पेठेचे कवीश्वर ।
चुणगे शब्द सुगंधी केशर ।
काय जेऊं घालूं ? कसे जेवितां आंबेमोहोराचे खासर ।
अस्सलची कधींच येइना सर ।
बोललीस रसाळ, कर मन उसाळ, बाध प्रीतीच्या पवळी ॥ ३ ॥
गेलें मन मिळून शर्करा आळुन दुधामधिं मिसळलें ।
मजवर लई लई मन पाघळलें ।
चमचमाट बिजलीचा थाट, ढगांतुन कोसळलें ।
कसे दयाळा दिवसा दिवटी पाजळले ? ।

छातीवर डुलत बोलत चालत मेहुणपुऱ्यांत वळले ।
सजणाच्या नाहीं वचनाला टळले ।
या हो घरांत, गेले मंदिरांत, सर सर सखा कवळी ।
**सगनभाऊ** म्हणे, विठ्ठल राउळीं ।। ४ ।।

* * *

## लावणी ९७ वी

माशुक उभी रंगमहालीं, कधीं उतरेल खालीं ?।
कवळी कळी डाळिंबाची टवटवीत लाली ।।धृ०।।
गोरा रंग तुझा पाहुनिया आम्ही आलों धाऊनिया ।
चौगर्दी लाल पसरले मधिं बोले मुनया (?) ।
मी इष्कबाज रोखुन वाटा पाहावयास मुखवटा ।
कैका ये प्राणअवस्था, किती द्वार धरूनिया ।
पावेल इष्कपेचाचा मार पेच त्याचा ।
तसा डोल तुझ्या शरीराचा नाजुक बनुनिया ।
उजव्या गालावर तीळसा चमकतो ग नीळसा ।
दोन्ही नैन विखारी कहरी रोखित निघाली ।। १।।
रत्नखचित कंकण करिंचे, खोदिव जडिताचे ।
उंच बऱ्हाणपुरचा शालु बुटवेल तऱ्हेचे ।
वाणी उदमी राजीन्द्राचे, देहभान तयाचें ।
त्या प्राणवल्लभेसाठीं उभे हाटून केव्हांचे ।
गेले होष उडून कितीकांचे, बोलेनात वाचे ।
लोथींवर लोथी दुरुस्ता घेरले केव्हांचे ।
सरदार चार ते गुंगले, घोड्यावर गुंगले ।
जिकडे नेत्राचा गरका, तिकडेच धुम केली ।।२।।

केली गरदी रविवारांत, आली बुधवारांत ।
पाहातांच विचारीं पडले, खोचले मनांत ।
दुलदुला शिपाई सैन्यांत, गेला भिडुन रणांत ।
तशी चपला चमकुन माणिक चौकांत ।
उज्जनीचे मुशाफर तेथें उभे भररस्त्यांत ।
एकावर एक रिचवले अशी पाहात मूर्त ।
धीर धरून सावरूं उठले, माघारीं उलटले ।
नार जखमी करून आम्हांला कुणीकडे गेली ? । ॥३॥
या जेजुरीचे बनसी छबदार ल्टिभासी ।
रथांतुन मुशाफर बुंदखडा गेली घेउन घरासी ।
श्रृंगारून मंदिर खासी सुंदर विश्वासी ।
सुस्वभाव दावुन आपुला भोगिले तयासी ।
नवें कवन आणुन रसासी, जडणी बुंद खासी ।
दयापूर्ण नाथ प्रसन्न बाळा राघुसी ।
गुणी **सगनभाऊचे** चुटके पाहा, अचुक फटके ।
गातात रसिक रसेले गर्द सभा झाली ॥४॥

* * *

## लावणी ९८ वी

तू गुल्यानार गुलपरी बोले मैना ।
ही इष्क जखम भाल्याची भरुन येईना ॥धृ०॥
लहानखुरी जान तयारींत ओठ शिरा ।
नाजुक रुपडें, कंठावर हिरव्या शिरा ।
दंडभुजा कशा पहिला माल कोरा ।
चिमणे जोबन यानें केला आमचा मारा ।

आम्ही हुशार झालों, लाजुन ठेर ज़रा ।
हे वीर बड्डे गुजराथेचा वारा ।
आम्ही छंदी फंदी इष्कबाज शोकी
झालो गर्क शरिरावर पाहुन नोकी
तुं नटबाजिंदी दक्षिणची शोकी
तुझें चलनवलन पाहुन आनंद मना ।
आम्ही पाहात आलों हा तिसरा महिना ॥१॥
तुझें नाव जैना, गुणग्राहिक नाव तुझं ।
प्रीत कोण्या रीतीनें करशील ? सांग मज ।
दीप लाव आतां, भरली तिन्ही सांज ।
लक्ष्मुची वेळ, गोडस बोल आज ।
शिक्क्याची देवघेव करणें लागे आज ।
वचनाचे तोडे पुढें पडले मोज ।
या माया प्रपंच संसारासाठीं
आतां कुणी कुणाचें नाहीं ग शेवटीं
मोहोनी घालुनिया कर गे लुटालुटी
आतां उशीर कां गडे ? पाहुं नको चवना ।
चाल देवदर्शना, तटली सकळ सेना ॥२॥
आहो राजअंबीरा, तुम्ही लोक गाढे ।
कीर्तवान तुमचे मुलखांत पवाडे ।
उत्तर ऐकावें निवांत निवाडे ।
आपली पट्टराणी सोडून भलतीकडे ।
प्रीत कशी करावी ? पहा त्या चंद्राकडे ।
ज्योतिशी ज्योत मिळाल्यावर भ्रांती उडे ।
असें काय बोलावें ? समजुन जैना बोल,

उत्तरासी प्रतिउत्तर द्यावें अनमोल
हा कवळा हरबरा दोही नखानें सोल
आतां उशीर कां गडे ? पाहुं नको चवना ।
चल देवदर्शनास, तटली सकळ सेना ॥३॥
ऐकुन घे साळू, दक्षणचे वाणी ।
स्त्रीपुरुष चांगले मस्त गजावाणी ।
द्रष्ट भेट होतां शरीराचें पाणी ।
कबजांत आणून पुढें ठेव साखरलोणी ।
ऐकुन घे गडे दक्षणचे वाणी ।
दम काय पुढें जातील हिंदुस्थानी ।
टुक दर्शन द्यावें, हा एक मोठा लाभ
उभयतां असुं द्या भरमाभरमी लोभ
विषयाची करम समजत नाहीं जरा
चतुराशिवाय घडोघडी समजुत होईना ।
म्हणे **सगनभाऊ** दरदीच्या आलें मना ॥४॥

* * *

## लावणी ९९ वी

डाकुरजीनें चित्ताजोगा हौसेचा जोडा ।
भाग्याची मी मृत पावले, चुकल जन्म चढा ॥धृ०॥
जाण तयारींत, शान फाकडी, निशाण जरीपटका ।
नित्य नवा पोषाक भरजरी, सोनेरी पटका ।
राघुपुढें उभी बनून साळु दक्षण फटका ।
शुभ नक्षत्र मुहूर्त पाहिजे सोन्याची घटका ।
बावनकशीच्या कशीं उतरली भरियली घटका ।
तुर्की उतरले किंचित थोडे, जीव थोडा थोडा ॥१॥

ऐका सख्या शिरताजा आणुन नारी कसणी कसल्या ।
काळ्या सावळ्या गोऱ्या भुरक्या कसा लाऊन कसल्या ।
नावासारखी द्यावी देणगी सोन्याच्या हसळ्या ।
हें समजुन धनी मान्य करावें, कल्पना ठसल्या ।
तुकी उतरले किंचित थोडे जीव थोडा थोडा ॥२॥
मधु मंजुळ कोयाळ टाहो फोडून बोले ।
रसवंतीचें गोड अक्षर कधिं कोणीं केलें ? ।
ज्या झोकावर रावराजेन्द्र पहा कसे डोलविले ।
ठावें नाहीं तुम्हां, पाही, मी नथजडाव ल्याले ।
नाहीं तर उगाच रुसल्या फुगल्या जाणत नाहीं मुद्दा ॥३॥
प्रसन्न झालों, माग साजणी, पुरविली इच्छा ।
कंगन देऊं कां देऊं साखळी ? देऊं शाल गुजरातीचा ? ।
कर जोडुनीया उभी सुंदरी, पाया इष्काचा ।
हें समजुन मान्य करावें प्रश्न सद्गुरूचा ।
**सगनभाऊ** जेजुरीचा वागवी ब्रीद नाम तोडा ।
रामा कवीच्या गुणावरती फंदीचा जीव वेडा ॥४॥

* * *

## लावणी १०० वी।

' नित रावजी जातां पाहातां, कुठें तुम्ही राहातां ?' ' सखे करितों फेरफटका ' ।
' भरलें वेड दोड, सवती बोलती गोड गोड, तिचा लागला तुम्हां चटका ॥धृ०॥
तुमच्या पायापाशीं लक्ष सदोदित असे, पक्षावाणी वाट पहाते ।
देतां धापा, मारतां गपा, यांत काय नफा ? मी जीवीं आपल्या खाते ।

कां करिता असें ? कसें भरलें तुम्हां पिसें ? जसे बोलतां
रागा हाते ।
माझी नवी नवती पतिविण व्यर्थ जाते ।
नेसतो (?) नखरा पाहाल, हुवाल खुशाल, भाल (?) आज
चवथा दिवस न्हाते ।
करा खटपट, पटपट मी पाया कीं हो पडते ।
विषयव्यथा लागला बाण ।
नाहीं देहभान, होई भणभण ।
कळ वटींत, लाही भट्टींत जशी, जातो प्राण ।
धरा मशी, जी होईन खुशी, नको अनमान ।
मेळवीन करीन सन्मान, देइन अधाराचें पान, जाण आहे
हीच घटका ॥१॥

* * *

## लावणी १०१ वी

भीमातीरीं गुलजार अतिपवित्र, पाहुन वसविलं चांगलं
फुलशहर ॥धृ०॥

हे मीच नी (?) सुरेख । विश्वासु माणसें सांगती कीर्तीचें कौतुक । दक्षणचे नाथ । स्वराज्याचे धनी कीं ब्रह्मपुरीचे ब्रह्मादिक । जें करणें तें अचुक । गंगातिर पैठनीं उतरला फुलशहराचा झोक । वाणी उदमी सावकार । द्रव्य पदरचें देउन वसविलं चांगलं फुलशहर ॥१॥
मम चित्तांतिल भावू । आश्वासन तुम्हि देतां सखया करिता जरी जीव लाऊं । नको सासरत्रास जाऊं । उभयतां माहेरीं तर्थिरूप आपलें दिलदर्याऊ । फुलशहर कसें पाहूं ? । हरप्रेत्न करू परंतु अप्सरा बनून जाऊं । श्रीमंतासमोर । बाच्छाई मुजरे करून देखिलें लखलखित गोपुर । ॥२॥

राव गेले स्नानासी । डागिने घालिते प्रियकरा पोषाख आभासी । मी बनले हरभासी । अति गुलजार करून मोहिले त्या रावराजींद्रासी । मग बोले सख्यासी । कर जोडुनी विनविते प्रियकरा, मी चरणाची दासी । दिली अटकेवर । **सगनभाऊ** म्हणे कीर्त इथून लागली कट्यार॥ ३॥

फुलशहर—पुण्याजवळ दु. बाजीरावानें नवीन वसविलेलें फुलगांव; भावू—भाव, इच्छा; दिलदर्याऊ—उदार हृदयाचे, मोठ्या मनाचे, सागरासारखे विशाल म्ह. उदार अंतःकरण ज्यांचें आहे असे; आभासी—झगमगीत.

* * *

## लावणी १०२ वी

दुर्बिण घेऊन हातीं चंद्र न्याहाळी तुझा वरवा ।
माझ्या मनची आवड सख्या, पोशाक करा हिरवा ।।धृ०।।
चवथा दिवस अहो सिरताज जाते न्याहा ।
चाक पाक येते बनुन, नका पाठवूं बोलवाया ।
केस वाळवीत उभी, न कळत याल चोरुनीया ।
आणि आपल्या नादांत हळूच कुच धराल धावुनीया ।
एक नोक नेत्राची दावीन ऐसी गुणीराया ।
इष्कउबाळा होतो, आज वागांत चला राया ।
नाभीकमळापासून मंचकीं बसून मन स्थिरवा ॥ १ ॥
स्नान करून मी आले, उभी मी जोडून दोन्ही कर ।
मी अपल्या सेवेस असावी दृष्टीसमोर ।
चवथ्या मजल्यावरी हवाशिर जागा सुंदर ।
आपण मला सांगाल अलंकार करिन शृंगार ।
हिरवा दुपेटा, हिरवी पगडी कंगणीदार ।
मुक्तुरा शिरपेच चवकडा, मोती दाणेदार ।
आणीक एक सांगते, शिरीं खोवीन दवणा मरवा ॥ २ ॥

पुण्यवान तुम्ही पुरुष, बसा चोपाळ्यावर विलासीं ।
आपुन मला सांगाल, थाट करिन रंभा जैसी ।
कमी काय केलें स्वामीनें, वस्त्र हरजिनसी ।
शृंगारामधिं डुब चमकली जडावाची अरसी ।
चुकल्या जागीं करा संज्ञा करिते पेरवा ॥३॥
नित उठुन चोचल्या छबेल्या परस्त्रीकडे जातां ।
लुंडमुंड मुरकुंड स्त्रियांच्या चित्राकडे पहातां ।
धरी आवळूनिया मला छबेल्या मुखचुंबन घेतां ।
मी फिरते भवतालीं, उशीर कां ? बसा पलंगावरता ।
मी कमान मुलतानी, तुम्ही तीर, जोडा संपूर्णता ।
लक्ष लावूनी बसा, सख्या, मी आहे तुमची कांता ।
**सगनभाउचें** कवन ऐकतां खुशी जाहले आरवा ॥४॥

सिरताज—एक शिरोलंकार; न्याहा—प्रभा, तेज, कांति; जाते न्याहा—प्रभा फांकते; उबाळा—उकाडा, धगधग; संज्ञा—सूचना; पेरवा—पेहरवा, पेहराव; चोचल्या—चोचले करणाऱ्या; कमान—धनुष्य.

* * *

## लावणी १०३ वी

हाका मारू मारू जीव त्रासला गे ।
सखा बाहेरी कां बैसला गे ? ॥धृ०॥
रात्र करमिळी कुठें जागलासी ? ।
शीण चढला मोठा, भागलासी ।
बरें कपट हें करूं लागलासी ।
कां रे नारू मोठा भासला गे ? ॥१॥
पूर्वी लिहिलें होतें सटवीनं ।
तींच अक्षरें हृदयीं साठवीन ।

तुज प्रीतीची निशा पटवीन ।
लुटवीन लई माल साठविला गे ॥२॥
खुशी रंगबहार रंग खेळलासी ।
नूतन स्त्रिया तूं नखऱ्या मेळवीशी ।
वस्त्र अलंकारा देउनी बोलवीसी ।
दुजा नाहीं असा कुठें भासला गे ॥३॥
एक आज्ञा तुं ऐक राजहंसा ।
रात्रीं नको येऊं, स्वस्थ यावें दिवसा ।
**सगनभाऊ** म्हणे हें जगणें वाशा ।
सत्यवृत्तांत आसभास लागे ॥४॥

वाशा—व्यर्थ.

* * *

## लावणी १०४ वी

मन धरितां करितां अर्जी ।
वरकांतीं रक्षितां मर्जी ॥धृ०॥
संतोषाचा उदार तुमचा नाहीं घेतला कर जी ।
शोध करूनी पाहील तो शोधिक वरकड मतलबगरजी ॥१॥
नाहीं गोष्ट एखादी विषादीं पडूं न वरचेवर जी ।
विष्कपथ जहराचा पेला पचवून राखा गरजी ॥२॥
स्नेह घडल्यावर प्रीत जडल्यावर ठेवू नको अंतर जी ।
मात करून प्यादा गेल्यावर काय करिल मग फर्जी ? ॥३॥
**सगनभाऊ** म्हणे विकल्प त्यागुन विठ्ठल हृदयीं स्मर जी ।
कवी कान्हु म्हणे पडल्या प्रसंगीं समया प्राति सादरजी॥४॥

मन धरणें—मर्जी संभाळणें; मतलबगरजी--मतलबसाधू; गोष्ट विषादी पडणें--मनाविरुद्ध घडणें; पडूं न--पडूं नये, न पडो; राखा गरजी--मला गरजवंताला संभाळून घ्या; गरजी--गरजू, गरजवंत.

* * *

## लावणी १०५ वी

नटली नट गजभारी करूं फार स्नेह संग चांगला ।
बाण जिव्हारीं भेदला । तुजकडे पाहतां सर्व मश्चित मन गार ॥धृ०॥

मंजुळ बोले, गर्कन डोले, नागिणा जशी । चमकत चाले, नैन लाले, नोक मारसी । नार समतोले गेंद गोले कामिना जसी । अग नारी ! विषय चेतला ॥ १ ॥

करुन शिणगार नोकदार फाकडीचा । गळा हार धमके, हिरा चमके राखडीचा । माशूक मुखडा, हाले आंकडा हालकडीचा । अग नारी, भोगावी तुला ॥२॥

अंगीं चोळी तंग, गोरा रंग गोजिरवाणा । शोभे शालु हिरवा दिसे बरवा साजिरवाणा । कोणाची तूं अबला ? तुझा बोल लाजिरवाणा । अग नारी, भोगावी तुला ॥३॥

समजुन सार सुगर नार चतुर अंगीं । हर्ष उभयतां, नसे द्वयता त्या प्रसंगीं । **सगनभाऊ** गाती, सभा च्याहाती त्या प्रसंगीं । छंद कान्हूचा भला । बाण जिव्हारीं भेदला ॥४॥

गजभार--अति गर्विष्ठ, येथें 'रूपगर्विता' असा अर्थ; नोक--टोंक, अणी; नोंक मारणें--टोंकानें भोसकणें; समतोले--सारख्या आकाराचे, एकासारखे एक, सिमेट्रिकल; धमकणें--खालीवर होणें, छातीवरील हार श्वासोच्छ्वासागणिक वरखालीं होतांना दिसत आहे; लाजिरवाणा--लाडका, लाडिक.

* * *

## लावणी १०६ वी

गोविंद माधवजी इच्छा पूर्ण करा माझी ।
सीतापति रघुनाथ रावण वधून लंकापुरी ।
भक्त बिभीषण दान हें दिधलें, दिधली कंचनपुरी ॥१॥
लवांकुशाच्या वेळे सीता गेली ऋषीच्या मठीं ।
चिरंजीव श्रीरामबाळे अरण्यांत एकटी ॥२॥

हरिश्चंद्र राजानें स्वप्नामधीं राज्य दीधलें ।
संपत संतत त्यागुन विश्वामित्रानें छळियलें ॥३॥
पुणें सिद्धनाथाचे **सगनभाऊ** कवीश्वर पुरा ।
दास रामजी श्रीदअधिकारी गवळा कांपे थरथरा ॥४॥

* * *

# सातप्पा

## लावणी १०७ वी

राम राम घ्यावा कविचा राम ।
मेहेरबान सलाम बाच्छाई मुजरा जाण ।
आदिनाथ निरंजन स्वामी आदेश तयाला ।
ब्रह्मरूप ब्राह्मण तयासी साष्टांग केला ।
नमो नारायणबाबा सिवा शरण शिवभक्ताला ।
जये जये जये गोपाळ सिवडा पलंगासी आला ।
इथून झाले षेडदर्शन ! त्यांत आले चारी वर्ण ।
अठरापगड व याती प्रमाण । गुह्य चहु वर्णापासुन ।
शास्त्र पुराणीं पाहा जाऊन । भेद उमजावा चातुर ॥१॥
रामनाम हें काढुन झालें ऐका चातुर ।
शिवाचे हृदयीं जन्मलें हें राम अक्षर ।
मस्तकापासुन झालाय आमचा अिस्तार ।
रामनाम हें नाम ठेविलें त्या शिवशंकरें ।
असें हें रामनाम थोर । शिळा तरल्या उदकावर ।
ध्रुव प्रल्हाद वाली वानर । मुक्त झाली आहिल्या नार ।
हृदयीं धरावा राम तो ॥२॥
रावण वीर, गर्वे फार, परंतु भक्त ईश्वराचा ।
सीतेशक्तीकारणें क्षय झाला त्या क्षत्रियाचा ।
रामरूपीं मिळाला, घडला संबंध पूर्वीचा ।
वैर भजन तत्समान ऐका निर्णय तयाचा ।

पहा तें जरासंधानें । वैर कृष्णासी केला त्यानें ।
तो मर्दिला राजीवनयने । अरूपरूपीं झाला भिन्न ।
रामकृष्ण नाहींत दोन । येकची म्हणावा देव तो येकची ।।३।।
राम राम म्या ऐसा केला लहानथोरासी ।
पाच तुम्ही परमेश्वर, सकळीक आणा मनासीं ।
आम्हांसी द्यावी आज्ञा, जाऊं आपले आश्रमासी ।
शांतलिंग गुरू भेटला ज्ञानी आम्हांसी ।
हा वरप्रसाद त्याचे कृपेचा । धोका नाहीं कळिकाळाचा ।
**साता गवळी** कवि पुण्याचा । दक्षिण देशीं धोशा त्याचा ।
झोक डफावर जरिपटक्याचा । नित्य करी दावा कवींशीं ।।४।।

* * *

# बाळा बहिरु

## लावणी १०८ वी

जाते सासऱ्या, कां तरी कष्टी निजला ? ।
अंतःकरणापासुन रजा द्या मजला ।। ध्रु० ।।
रसिक रसेल्या प्राणसख्या, या जवळी ।
जगा ज्योत मी सुंद्र राजसबाळी ।
काढ मुखांतुन अधर वदन कवटाळी ।
तुझि आठवण, घातली कुसंबी चोळी ।
रडत फुदत हृदय धरुन कवटाळी ।
तुझि प्रीत तोडिना मी कवणे काळीं ।
अक्षयीं रहाते, असा ईश्वर कोठें पुजिला । ।।१।।
जाते समयीं आलें पुसायासाठीं ।
दोन तऱ्हेच्या सांग छत्रेल्या गोष्टी ।
सद्‌गादित होऊन धरावें पोटीं ।
चैन पडल की काय गेल्यापाठीं ।
आवड तुला पाह्याची रे मला मोठी ।
कुठवर वर्णू ? प्राण उरला कंठीं ।
द्वारी तुमचा मैत्र कीं कुजबुजला । ।।२।।
प्राणवल्लभा, असुन पराची जाया ।
गोउन वचनीं कशी लाविलिस माया ? ।
जसा कर्दळी कोंब तशी तुझी काया ।
या उपरांतिक कधीं गवसल भोगाया ? ।
चंचलवृत्ती करावी सखया ।

कवळुन धरिते, मुखीं घालते विडिया ।
सख्या तुझे धारानीं प्राण हा झिजला । ॥३॥
वहुत प्रकारें अर्जवीन मैत्राला ।
दोहो महिन्यांचा खाचित वायदा केला ।
पिवळा पीतांबर अपहस्तकीं नेसविला ।
देउन अलींगन घालवीत गेला ।
**बाळा बहिरुचें** कवन विषाचा प्याला ।
गावुन वचनीं अग्नींतुन निघाला ।
धोंडीराज म्हणे चातुर ऐकुन रिझला ।
तुकाराम विश्राम जिवाचा भजला ।।४।।

* * *

# गंगु हैबती

## लावणी १०९ वी

दे गा पायीं जागा पंढरीच्या पांडुरंगा ।
शरण तुला मी आलों अरे जगदीशा ।
सोडवी मजला भक्त–भव–भय–भंगा ॥१॥
मंत्रहीन क्रियाहीन दीन देवा ।
कृपा करी रुक्मिणीच्या मानस-रंगा ॥२॥
जडमूढ उद्धरिले पतित जनाला ।
माझी नये करुणा कैशी तुजला अभंगा ? ॥३॥
धावण्या द्रौपदिच्या हरि धावलाशीं ।
पुरवुन वस्त्रें तेथें झाकिलें अंगा ॥३॥
म्हणे **गंगु हैबती** क्षमा करी आतां ।
महादेव गुणी लीन स्मरणीं प्रसंगा ॥४॥

भक्तभवभयभंगा––आपल्या भक्तांच्या भवभयाचा भंग करणाऱ्या, भक्तांचे भवसागरांतून तारण करणाऱ्या.

* * *

## लावणी ११० वी

चालीव प्रीत माझ्या सजणा । प्राणसख्या गुणिजना ॥धृ०॥ माया ममता लाउन वचनीं गोउन मशीं जिवलगा । आशा फारशी लाउन जाशील देउन कुणीकडे दगा । मजपरीस तुला सवत चांगली कोण मिळाली ठगा ? ॥चाल॥ तिनें मोहनी घातली तुजला । पाहुन तिशीं तूं रिझला । म्हून त्यजिलें सख्या मजला ॥चाल॥ आतां काय मी करूं ? । किती ही भर नवती आवरूं ? । दावा राजहंस

पांखरूं। जाऊन चरण कुणाचे धरूं ? ॥चाल॥ सवतीनें घातली मोहनी, नेला स्वामी माझा फितवून। कोणाप न्यावी फिर्याद ? कोण माझी दाद देइल बेगीनं ?। ज्यापाशीं न्यावी फिर्याद तोच बाई बसला रुसुनशान। किती समजाऊं ? परी उमजेना ॥१॥

या रंगमहालीं शेज तुंसाठीं ठविली करून। साजुक नाजुक कळ्या पिवळ्या हेत मनाचा धरून। चार प्रहर म्यां वाट पाहिली, नाहीं पाहिली फिरून (?) ॥ चाल ॥ रंगमहालीं शेज सुकली। सख्या, तुम्ही रात्र कुठें करामिली ?। कोणची सवत गळा पडियली ? ॥चाल॥ मर्जी कठिण कां केली ?। सख्या, कांहीं चुकी मजपासुन झाली। म्हणून कां निजला राजमंदिरीं ? ॥ चाल ॥ म्या करून कुल्पी विडे तूंसाठीं तबक ठेविले भरून। येणार नाहीं बोललास माझे नेत्र आले भरून। रंगमहालीं तुझी सय होतांच उलथुन पडलें पलंगावरून। किती हात जोडूं, परि उमजेना ॥ २ ॥

काय माझा अन्याय ? कां हो रुसला मज दुबळीवर ?। नाहीं बोलल्ये तुम्हां, कां हो टाकिलें कीं माझें घर ?। सुरतपाक मी असतां मन कां जातें दुसरीवर ? ॥ चाल ॥ नको दगा मशीं देऊं, सख्या, मी किती तुला समजाऊं ?। तुम्हांविण शरण कोणाप्रति जाऊं ?। ॥ चाल ॥ प्राणसख्या राजसा, आतां क्षणभर तरी पलंगीं वसा। करा तरी संग, होऊं द्या ठसा। सख्या, मी कमान, तुम्ही तीर कसा ॥ चाल ॥ आनंदाच्या वर्षामधिं सख्या तुझी मर्जी बिघडली कशी ?। आजवर चालली प्रीत, आतां भेटली कोण विवशी ?। नाहीं घेत पानाचा देठ, चला रंगमहालीं, झाले मी खुशी। विनंत्या करी सुंदर कामिना ॥ ३ ॥

करी विनंती, सुंदर सजणा, सोड मनाची अढी। सुरतपाक सकुमार सडक सडपातळ मी फुलछडी। नको झिडकाऊं मला, बसुन

घे प्रेमसुखाची विडी ।। चाल ।। चाल सख्या रंगमहालीं । बोलले **गंगु हैबती** बोली । सुंदर पडली तुमच्या ख्यालीं ।। चाल ।। बसून पलंगावर सख्याला वारा घाली सुंदर । सख्या, तूं लूट ज्वानीचा बहर ।। चाल ।। कवि विश्वनाथ कवि म्हणे विठु लक्ष्मुण देश दक्षण । मलुद सुगुचे छंद, ख्याल कटिबंध, घ्यावा ऐकुन । वैरी झाले नादान, लागला बाण, खोचलें मन, पळ सुटला धाक दुर्जना ।।४।।

रिझला–रिझलास; कोणाप–कोणापाशीं; दाद देणें–दाद घेणें; सध्यां 'दाद घेणें 'असा वाक्प्रचार रूढ आहे; पण जुन्या काळीं 'दाद देणें' असाच वाक्प्रचार रूढ होता. दाद म्ह. फिर्याद किंवा तक्रार. अशा दाद–फिर्यादी स्वीकारण्याचें काम एकाद्या अधिकाऱ्याकडे दिलेलें असे. त्यानें ती 'दाद' सुलतानाकडे दाखल करून निर्णय घ्यावयाचा असे. त्यावरूनच 'गाऱ्हाणें दाखल करून घेणें' या अर्थी 'दाद देणें ' असा वाक्प्रचार रूढ झाला; वेगीनें–त्वरित, लवकर; उमजेना–समजेना; पानाचा देठ–पान; विडी–विडा; ख्याल–चैन सुखोपभोग; नादान–निष्प्रभ, पराभूत.

* * *

## लावणी १११ वी

रात्रीं तळमळते, छपरपलंगीं नीज येईना ।।धृ०।।
चिरली काचोळी कुसुंबी दंडीं अवचित उर पहातां ।
अपुल्या अपुणच तुटली गुंडी पलंगावर बसतां ।
पडते पहाटेची गुलाबी थंडी संनिध पति असतां ।
जातो नित रुसुन परके ठाई भोगावे कुणी दावा ।
—ये समई प्राणविसावा, कळ साहिना ।।१।।
सगळे मखमुली बिच्छोने महालीं करउन मी नटलें ।
वरती मऊ असुन परांची न्याहाली तडफडुन उठले ।
पहातां सदनाकडे तलखी जाहाली, पाझरहि सुटले ।

फिटलें नेसूचें ग लुगडें सारे कापिले असे,
नाहीं धीर, जाहले अधीर अशी, जीव जाईना ॥२॥
पहिल्या रंगाची ऐन अमदानी, पुरवावी हौस ।
चौदा वर्षांची उमर भर नवती, भोगाचे दिवस ।
तिंदा मज टाकुन जातो तो भुवनीं, वाहेरला सोस ।
देई मुखचुंबन प्राणविसाव्या, आणु बळे अविलिंबे घडवी—
येकांत आनंदाखालीं मला राहावेना ॥३॥
रात्रा तडफडती उरली थोडी, निर्दय तो पुरता ।
आतां काय घेऊन निजाची गोडी श्रमले चुरमुरतां ।
**गंगु हैबती** म्हणे चीर फेडी, वस चढुन वरता ।
गाती महादेव प्रभाकर इलमी कुणा भेइना ॥४॥

अमदानी—समृद्धता; पहिल्या रंगाची ऐन अमदानी—तारुण्याच्या पहिल्या प्रमत्त भरांत मी आलें आहे; चीर—वस्त्र.

* * *

## लावणी ११२ वी

अर्धे उरावर पदर नदर तुझी गर गर गर फिरे भवतालीं ।
ठमकत चमकत चाल चालशी हंसतमुखें नखऱ्याखालीं ॥ध्रु०॥
शहर पुण्याचे रस्ते हवाशिर, संगिन कामें चिरेबंदी ।
सकुमार पाउलें, झडल तुझी बोटावरची रंगमेंदी ।
हळु चाल, हळु चाल, जोडा घाल, गडे नरम जरीचे तिनबुंदी।
नको नाक नेउं वरते, कळले उष्ण न सोसे तुज अगदीं ।
वेव्हार झाला बंद, दिसा बुधवारामधीं पडली मंदी ।
विनपैशाविण लोक धावती शहाणेसुरते रणफंदी ।
सदा हस्ती मस्तींत मस्त तशी धुंद होउन बाहेर आली ।
नार नव्हे नागीण मुसाडी मारित जाते मतवाली ॥१॥

गोजिरवाण्या गोऱ्या पोटऱ्या, पातळ नितळ नीट कांडें ।
दातीं धरुनिया दोन्ही चालतां रस प्यावा जाउन तोंडें ।
मांडया पडतां दृष्टी चिरांतुन, शरिर होईना मग थंडें ।
तगमग करितां प्राण ठेवावे वाटत बांधुन दोरखंडें ।
चहुकडुन डळमळित झळाळित कोंबडीचें केवळ अंडें ।
चरकीं धरूनिया विधिनें उतरलें सुवर्ण जैसें आज भांडें ।
सर्वांगामधिं व्यंग नसे, कशि नखोनखीं भरली लाली ।
कंबर पाहुन सिंह मस्तकीं येकांतिं बैसुनि धुळ घाली ॥२॥

चंद्रहार पोटावर मिरवे, पदरांतुन मारी लहरा ।
वर मोत्यांचा सुढाळ कंठा, शुभ्र दिसे वर उर सारा ।
कुचजोडी संगीन चेंडू, निवाऱ्यास धरला थारा ।
अण्या दोन्ही समसमान लाविल्या, कंचुकींतुन करिती मारा ।
अवळुन कवळुन भोगुं पलंगीं, असा कधीं येइल पहारा ।
शरीर जाते जळुन रुपाचा दृष्टीं भरुन पहातां तोरा ।
पिवळें दिसतें अंग, पाचवें आजच नहाणें घरिं नहाली ।
निर्मळ कांती, कोमल काया, ऋणानुबंधें अजि पाहिली॥३॥

रत्नजडित माणि पेंडी हिऱ्याचीं, चकचकाट कंठाभवतीं ।
ओठ लाल पवळ्याच्या वेली, मधीं झळकती दंतपंक्ति ।
घोसदार नासाग्र, नथेवर सर्जेच्या शोभा देती ।
कसुन भुवया नैनबाण मारितां चुराडा होय छाती ।
ज्याचे दैवीं असल पलंगीं तोच हिची भोगील नवती ।
काय इतरांचा पाड ! होइल कीं जीवाची सगळ्या माती ।
**गंगु हैबती** म्हणे खुशालींत भोगी पति रंगित महालीं ।
महादेव कविराज कवीचे छंद रासिक गोडया चाली ॥४॥

तिनबुंदी जोडा—बुंद याचा अर्थ तळ किंवा खालचा भाग असा कोशांत सांपडतो. यावरून कातड्याचे तीन तळ घालून शिवलेला जोडा असा अर्थ संभवतो; वेव्हार-बाजारांत चालणारी देवघेव; मुसाडी-मुसंडी; मतवाली-चतुर; चरक-लेथ; अण्या-टोकें, अर्थात कुचाग्रें; पहारा-समय; सर्जाची नथ-नथींचा एक प्रकार.

* * *

## लावणी ११३ वी

छपरपलंग शृंगारुन कां ग घरीं नाहीं प्राणसखा ग? ॥धृ०॥
मज घालुन प्रपंचघोरीं गेले साजण सखे नौकरीं
होतों दोन जीव संसारीं, झाली फुटाफूट निर्धारीं।
सांगती कधिं न वज (?) भारी, परतशील कधिं माघारीं ?।
काय करूं या इतर सुखा ग ? ॥१॥
रूपसुंदर सगुणा रे, तुजवाचुन भोगुं कुणा रे ?।
जळो मखमुली विच्छोना रे, तळमळते नीज येइना रे।
राजस कुणि जाउन आणा रे, किति आवरूं तरुणपणा रे?।
हरल्या बाई तहानभुका ग ॥ २ ॥
केलि स्वारी ऐन हिवाळी, वाईटबरी करून दिवाळी।
तधींपासुन नाहीं शुद्ध हे जाली, आहे (?) पुरतें पाप कपाळीं।
धाडिते पत्रें सांजसकाळीं, कसें करित असेन रुतुकाळीं ?।
मारिते भलत्यातें हांका ग ॥ ३ ॥
लागलें पिसें पुरतें मनीं रात्रंदिवस चुरमुरते।
बोलते हसुन वरवरते धीर देउन काम आवरते।
तूं तिकडे मी इकडे मरते, भेटशील कधीं ? वाट पाहाते।
नका भरूं कुणि भांग टिका ॥ ४ ॥
**गंगु हैबती** म्हणे तो हौशी गुणसगुण राजविलासी।

मन मानले त्या देशीं भोगितो सुख, नाहीं उदासी ।
महादेव गुणरासी करि जडण प्रभाकर खाशी ।
नाहीं जोडा आणिक तुम्हां ग ॥५॥

वाईट वरी–वरी वाईट; आणिक–दुसरा अन्य.

* * *

## लावणी ११४ वी

पती वयानें लहान, सखे मनसमाधान होइना ।
कधिं ग चंडाळ पुढें घेइना ॥ धृ० ॥
भुइंत चालला दिसंदिवस, मज वरणभात भासतो ।
न्याहाळितां लपुन बैसतो ।
शोध करुन रंगमहालीं नेतां हृदयांतरिं त्रासतो ।
पदरचा काय माल नासतो ? ।
निजविलें जर बळानें जवळी तरि वरवर ठाशितो ।
उराचा काल (?) गाल चावितो ।
मी तारुण्यपणामधिं पट्टी ।
पाडास आलि ग निंब्रोटी ।
सख्यावर मर्जी खट्टी ।
पहाटीं पहाटीं येउन निजतो, दुःख मला साहिना ॥१॥
हौस मनामधिं बहुत राहिली, वृथैव जातें वय
वाटतें सासुदिरांचें भय ।
नपूंसकाशीं लग्न लाविलें, बापआइ निर्दय ।
साधिलें वैर, नाहिं संशय ।
खाते पिते उदंड, होते करुन सर्वी हयगय
राहिलें दुरचे दुर, हाय हाय ।

मी कर्माची पुरती हीण ।
कोणाचें न घेतां रीण ।
पती पाहतां होतो शीण ।
तरुणपणाची कलकल भारी, मरण देव देइना ॥२॥
दूध गाईचें खुराक लाउन दंड काढवी वळें ।
कधिं ग प्रत्ययास येतिल फळें ? ।
व्हावि चेतना म्हणून ठिवलीं पक्षियातिचीं कुळें ।
जसा मीन आमली (?) उदकीं गळे ।
चैन पडेना, जाति पलंगीं वर्ष ठिकाणीं पळे ।
सुचेना कांहीं विषयामुळें ।
कामातुर होउन पडे ।
नित पलंगावर तडफडे ।
जिव जातो, कर्मा रडे ।
दुःख येवढें होउनि पुढाइत, दाद कुणी देइना ॥३॥
किती दिवस तरी धीर धरावा ? पती जन्मवर असा ! ।
आलि खुब भरास नवती रसा ।
पाहुन उराकडे पाणी गळतें डोळ्यांतुन पसपसा ।
धरिन मी हात कुणाचा दिसा ।
**गंगु हैबती** म्हणे, साजणी, अधर्म करसी कसा ? ।
मनाला तरि दे दिलभरवसा ।
महादेव कविची तऱ्हा ।
पदरचना ज्याची शिरा ।
गुणिराज कवीश्वर पुरा ।
म्हणे प्रभाकर, ऐक साजणी, कां मनोरथ पुरविना ? ॥४॥

वरणभात—भाताच्या ढिगावर वरणाचा ठिपका असतो त्याप्रमाणें. स्त्री मोठी स्थूल ऐसपैस, आणि पति खुजा किंवा किरकोळ असला म्हणजे त्यांच्या

जोडीला 'वरणभात' म्हणण्याची बायकांतली पद्धत आहे; पुढाइत–पुढाकार घेणारा; दिसा–दिवसा, भरदिवसा.

*   *   *

## लावणी ११५ वी

कुणासवें खेळूं रंग तुम्ही तरी सांगा ॥ धृ० ॥
छेलछबेली तो रंगेला गुलहौशी ।
लंपट झाला कोठें निश्चयें परकीशीं ।
घालती गळ त्याच्या मैत्रिणी, धरती त्यासी ।
मजकडे कैचें मन? लवंडून द्या रंगा ॥१॥
मोत्यांचें पातळ, मोत्यांची चोळी ।
घालुन तंग अंगीं जिव तळमळी ।
कोणास दाऊं नखरा? प्रियकर नाहीं जवळी ।
न्हाणीत असतां तेलें लावीना तो अंगा ॥२॥
वसंतपंचमी आज, सण सुना जातो ।
मंगलदायक रुसुनी गेला कां तो?।
घालुनि पाखर कोणी आणा घरीं संगाती तो ।
संचित माझें फुटकें, नका लाऊं मोत्यें भांगा ॥३॥
पंच प्रकारें वाढुनि ठिवलें ताट ।
घालुनि रांगोळी, तिष्ठते, पहाते वाट ।
**गंगु हैबती** म्हणे, पुढे करी सखये पाट ।
महादेव प्रभाकर म्हणे, येकचित्तें वागा ॥४॥

पांखर—खोगीर; येथें भावार्थ त्याला लगाम घालून म्हणजे समजावून, शुद्धीवर आणून मजकडे परत आणा.

* * *

## लावणी ११६ वी

साडि नेसूंद्या, धीर धरा तुम्हि, नका घाबरे करूं
दाणादाण पांघुरणें किती फिरफिरून तरी आवरूं? ॥धृ०॥
येकीकडे जाउन बसुन मी साडी नेसती बरी।
लपत लपत येऊन, असडितां प्राणविसाव्या निरी।
शोध करा बाहेर, कसा दंडक आहे घरोघरीं।
सा चौ महिन्या कुठे नागवी करावी तुम्ही क्षणभरी।
नित्य उठुन हें काय पाडितां रगत माझे उरीं।
परदुःख वाटे सितळ, नाहीं फळ विनवुन नाना परी।
तुम्ही मतलबगर्जी गडी।
कां बसून खा ना विडी?।
अमळ तरि उघडा कडी।
घडिभर दुर असा, नका कवटाळुन मजला धरूं।
प्रौढ अतां वय विसांत, सखया, अजून कां लेकरूं? ॥१॥
लाल कुसुंबी चोळि काल संक्रांतसाणिं रे घातली।
अंगासरशी आधिं तशामधिं मीच हातें घेतली।
निघेल अंगांतून कशी? बाजुबंदात कुठें रे गुंतली?।
सकुमार देखणी रुपानें जणुं पातळ पुतळी।
हिरवी मला शोभते म्हणुन शेलारि उंच घेतली।
कंठि गळ्यांतिल बळानें धरितां पहा कुचास रुतली।
किति येकेक सांगुं तरी?।
वाटते नवल अंतरीं।
निजा तुम्हिच पलंगावरी।
विनोदानें बोलते, दुःख मानुन रागें नये भरूं।
मजा येक वेळ, बिलगुं धावतां, वृथैव हे फिरफिरू ॥ २ ॥

शेज फुलांची सर्व विखरली, परांच्या चुरल्या उशा।
न्यहाल्या गिर्द्या जिकडे तिकडे, सांग दिसेना धुशा ।
अव्यवस्त पहा अपुण उभयतां, काय जहाली रे दशा।
कुठें वळविला हात ? कुणापाशि युक्ती शिकला अशा ?।
मर्दे करुन उन्मत्त, धुंद होऊन दाटला नशा ।
सोड अतां जिवलगा, जळो ही खोड तुझि रे अवदशा ।
मी नाजुक चापेकळी ।
भोगावी मिजाजीनं तळी ।
कां तिंदा पडशी गळीं ? ।
जिव तळमाळि, किती नीट हातरुण हांतरू ? ।
निजुन उभयतां छपरपलंगीं शाल वरुन पांघरूं ॥ ३ ॥
वसा स्वस्थ दुर, सख्या नेसुं द्या शेलारी पैठणी ।
नाहिं इची बरी दशा भिजली आर्धींच बारीक फणी ।
नाहिं शुद्ध राहिली, बोलले असेन येखादी उणी
इथच्या इथें विसरून करावें शांतवन ये क्षणीं ।
जिथें प्रीत अति दाट तिथें होतच आहे नवेपणीं ।
दोन दिवस गेल्यावर सखया विषय करावा कुणी ? ।
**गंगु हैबती** कवि चतुर ।
म्हणे पुरुष कामातुर ।
करी स्त्रियेस दिलगीर ।
धीर निघेना ज्यास तो नर कृश होइल झुरुझुरू ।
महादु प्रभाकर म्हणे, अधिर परि स्त्री असे कल्पतरू ॥४॥

धुशा—घोंगडी, पांघरण्याची धाबळी किंवा ब्लँकेट; मिजाज–ऐट; बारिक-फणी शेलारी–तलम पोत असलेली शेलारी.

* * *

## लावणी ११७ वी

जिवलग जीवीचा बाई छान छबेला ॥धृ०॥
किति तरी जीव हा बाई कसुनि कसावा ।
आनंद सुखाचा प्राणी पलंगीं असावा ।
कोणे सवतीनें मोहुन प्राणविसावा ।
फिताउनि नेला गे फिताउनि नेला ॥१॥
काय आहे दुसरेपाशी काया हे सोन्याची ।
हिरे जडउनी बसली असल मिन्याची ।
म्हणोनिया सांड केली असल जुन्याची ।
पाहा घात केला गे पहा घात केला ॥२॥
नये मज धुंडित जातां रात्र अंधारी ।
कोणि तरी जवळी आणा, असेल शेजारीं ।
खुशालीनें बक्षिस देइन तुम्हां निर्धारीं ।
शिरपाउ शेला हो शिरपाउ शेला ॥३॥
म्हणे **गंगु हैबती** प्राणप्रियेसी ।
रहा गडे सावध अपुले क्रियेशीं ।
सुखी राखो देव तुम्हां असें अस्त्रियेशी ।
महादेव भोळा, महादेव भोळा ॥४॥

अस्त्री—स्त्री.

* * *

## लावणी ११८ वी

मैत्र मोत्याची जात, जिवा विश्रांत, बोले हरघडी । मैत्र समयाच्या पारीं घालितो उडी ॥धृ०॥ तुम्ही ऐका चित्त देउनी, स्थिर होउन बसा । एक थोडासा दृष्टांत आठवला कसा । एका राजाची कन्या,

तिचें नांव गजरा आली भररसा। चांगुलपण रंभा पुतळी जैशी उर्वशा ॥ चाल ॥ त्या राजाची कुवरा कीं गजरा नार। सोळा-वर्षांची उमर, रूप दाणेदार। नेसली पैठणी साडी, तुटती तार। अंगीं किनखापाची चोळी जरी-जरतार। कपाळीं लाविली टिकली कुंकाची कोर। वेणींत गुंफिला साज पक्का शेर। उभी होती रंग-महालांत, तळीं बाजार। तो वाण्याचा मुलगा आपल्या दुकानावर। तो मदनाचा पुतळा कीं पाहुनी डोळा झाली वेडी ॥१॥

त्या राजाच्या कन्येनें उचलून खडा टाकिला दुकानावर। हळु हळु बोले वचन कीं गजरा नार। म्हणे वाण्याचा नंदन खडा राव आला कुणीकुन पाहे चवभवता। गपगपा झाकले नेत्र वरती पाहातां ॥ चाल ॥ ती राजकन्या त्याला खुणवी स्पष्ट। आज यावें रंग-महालांत, करावी खेट। खुण एकतांच वाणी कापे लटपट। फिरून धरी अवसान हिय्या बळकट। होती मुजऱ्याची गडबड कचेरी घनदाट। मग भवता पाहुन तसाच शिरला नीट। ताळा ताळांच्या चारी वेंधला वाट। होती गजरा नार, जाऊन धरी मनगट। तो सर्वांगीं वैसून मनासी मन गेलें मिळून टाकी पलंघडी ॥२॥

एक प्रहर रात्र झाली. रयत गेली, उठले राव। 'काय करिते आमुची गजरा नयनीं पहावं'। लावली होती कवाडं, चाले झडकरी सत्यभाव। 'तूं माझे गजरे लेकी, कवाड उघडावं'। पित्याचा शब्द ऐकून 'बरं नाहीं झालं, कसं करावं?'। त्या वाण्याच्या काळजानें सोडिला ठाव ॥ चाल ॥ अशी शंभर वर्षं पूर्ण मुदत भरली। त्या झरुक्याच्या बाहेर होती झगली। लावली कीं झरुक्या, तिथंच लपण केली। मग कवाड उघडून पिता घेतला महालीं। गुज-गोष्टी सांगतां पित्यासी निद्रा आली। कांहीं केल्यानें जाईना, मनीं दचकली। होता मार्गेश्वराचा महिना, थंड पडयेली। थडथडा उडे,

अंगाची काय गत बनली । त्या भुजंगशेट वाण्याची सुदबुद गेली । देवाचें स्मरण करितां बुद्ध आठवली । त्या खांबाला पागोट्याची वेठी घाली । मग तसाच उतरुन दुसऱ्या ताळीं उडी घाली । त्या खांबाला शेल्याची वेठी घाली । मग तसाच उतरुन तिसऱ्या ताळीं उडी घाली । त्या खांबाला पंचाची वेठी घाली । मग तसाच उतरून चौथ्या ताळीं उडी घाली । त्या खांबाला काचाची वेठी घाली । मग तसाच उतरून पाचवे ताळीं उडी घाली । पाय टाकुन धरणीवर चाले तातडी ॥ ३ ॥

मग झाला प्रात:काळ, मेळामेळ जनलोकांचा । वर पाहूं लागले झगरा पांघरुणांचा । लोक म्हणती, 'कोण चोर धीट मनाचा ?' । एक म्हणतो, 'पोशाग भुजंगशेट वाण्याचा' ॥चाल॥ अशी गुणगुण गेली राजाच्या कानीं । शिपाई धाडिले चवधे चव ताळांनीं । कचेरीपुढें त्येला आणिला बांधोनि । न पुसतां त्याचें शिर द्यावें उडवुनी । त्याच्या जवळ होता बाप, होइना धनी । राज्याप उभा प्रधान कर जोडोनी । 'भरल्या पोटीं मारावा जेवूं घालोनी' । आई देत असे शिव्या मनीं तळपुनी । कोण जेवुं घालील याला ? पीडा आम्हांला घरबुडी ॥ ४ ॥

अस्त्रीच्या (?) अरे, तूं पुढें पुढें नको येऊं । तुझें मरण आलें जवळी आतां नको भिऊं । गेला बहिणीच्या घरला, ' ऐक सत्यभामे, घाल तूं जेऊं ' । तेव्हां बाहिण म्हणे, ' तोंड नको आम्हांला दावुं ' । गावामधिं सखेसोयरे लागला राव घरोघर पाहूं । जन बोलत फटफट, जाचणी बहु ॥चाल॥ सोईरे समस्तांनीं अपमान केला । ते मांग म्हणती 'सावकाराच्या मुला । काय तुझें जिणें ! कोणी जेवूं घालिना तुजला'। 'या गावामधिं एक मैत्र राहिला । त्याच नाव जाखु शिंपी, माहित सर्वांला । त्यासी भेटायासी आमचा हेतु राहिला' । ते मांग

घेउन गेले त्याच्या घराला । ते म्हणती 'तुजला आणिला भेटायाला'। गेला घरांत, फुटका थाळा ऐवज निघाला । वाण्याच्या इथं नेऊन शिधा आणिला । स्वयंपाक करून दोघे बसले जेवायाला । कसा काय झाला वृत्तांत सांग तू मजला । येकुणेराच्या पडती गळा, रडती खळखळा जीवाचे गडी ॥५॥

तुझा नाहीं साधला लाग, जाऊं कचेरीसी । दोघे मैत्र मिळून गेले राजापाशीं । 'कर जोडून विनंति ऐका राजेश्वरी गोष्ट थोडीशी । गरिबाचा करावा न्याय, होईल मन खुशी ॥चाल॥ हा सावकाराचा मुलगा तुमचा अंकित । आहे बाळपणापुन याची आमची प्रीत । पायापुढें करितो अर्जी, येक रात । गुजगोष्टी सांगतां पुरेल आमुचा हेत' । त्या दरबारामधिं कुटाळखोर होत । 'काय जामीन घेतां पाहुनी याची शपथ ? ' । ते मांग म्हणती ऐका हो श्रीमंत । 'या सावकाराचं गावांत धनवर गोत । कोणी जेऊं घालीना, पडला त्यावर वक्त । तुम्ही द्यावा सोडुन, आम्ही जामीन होत ' । दिला मुचिलका लेहून, आला घेऊन जिवाचा गडी ॥ ६ ॥

तुला सांगतो मनसुबा नको रे उभा जाय म्हालासी । नाहीं भोगिली सुंदरा जीवाला मुकशी ॥ चाल ॥ तसाच उठला तांब्या घेतला हातीं । मग लगबग लगबग गेला लोहारा घराप्रती । 'एक सवा शेर खिळ्यांची करून दे गणती' । लोक झाले सामसुम काळोखे रातीं । ठोकित चालिला खिळे सफेली वरती । ती गजरा नार चवथ्या ताळीं होती । 'ऊठ ऊठ गजरे, तुला चढली सुस्ती' । तवा गजरानार सावध होऊन बसती । चहुकून समयाच्या सारिल्या ज्योती । त्या वाण्याच्या नवतीचा रसकस घेती । म्हणे, ' गजरे, झालों मरणाचा सांगती, आहे आम्हां तातडी ' ॥ ७ ॥

अरे भगवंता, तुला कशी येईना कनवळा ? । मैत्राचें दुःख

आठवुन पडली गळा । ‘ तुझ्याकारितां करिन मी मरणाचा सोहळा ’ । चाल । मग निरोप घेतला त्यानें त्या समयीं । उतर उतरतो खिळ्यावरून, पहा चतुराई । उपटोनि खिळे डबऱ्यामधिं खवी । असे चारी ताळ उतरून आला लवलाही । शिंप्याशीं म्हणे ‘ बरी सांगितली सोई ’ । गुजगोष्टी सांगतां उदय झाला रवी । मग मांगाची राव झुंड आली त्या ठाई । ते मांग म्हणती ‘ चोर आमुचा आणुन देई ’ । तवा शिंपी सावकाराच्या मुलास दावी । चालविला रस्त्यांतून जनलोक पाही । त्या पाणवठ्यांच्या नारी म्हणती ‘ अगबाई आतां वधिल पुतळा या रांडेच्या पायीं ’ करती वढाताडी ॥ ८ ॥

मांगानं दिली तस्ती, बहु घाबरला । मैत्राचें दु:ख पाहुन शिंपी गहिवरला ।।चाल।। तो सावकार म्हणे, ‘मैत्रा जा घरास । हें आमुचं दु:ख, आम्ही भोगूं सावकाश ’ । तेव्हां शिंपी म्हणूं लागला त्या मांगास । ‘ मैत्रासी वाचवा, कापा माझ्या मानेस ’। हा वर्तमान गेला गजरेच्या कानास । केला मर्दाचा पोशाक त्या समयास । हातीं समशेर ढाल दिली मुंढ्यास । उतरली माडी, तळीं आली पागेस । सजविला घोडा त्यावरी बैस । घोडा उडवीत उडवीत आली त्या ठायास । त्या लोकाला म्हणती पैस । काय दोघांच्या शिरीं आपेश कापितां नरडी ।।९।।

मांग घेऊन आले दरबारीं, ‘ ऐका राजेसरी । हा वाण्याचा मुलगा तुमचा कीं हो चोर ’ । शिपाई म्हणे, ‘ ऐसे सांगतां राजा ग्रंथ होईल थोर । हा शिंपी वाणी आहे कीं मईतर ।। चाल ।। ‘दोघासी वाचवा, कापा माझी मान’। जन म्हणती, ‘हा शिपाई कुठला कोण ? । दोघांकारिता हा कां आपला देतो प्राण ? ’। राज्याप उभा प्रधान कर जोडून । ‘एकाकरितां तिघांचा कां घेता प्राण ?। फेडाल हा अपराध घाल उसनं ’। राजानें प्रधानाचा मान्य करून त्या तिघा-

जणासी त्यानें दिलें सोडून । **गंगु हैबती** मजलशीं गातो गान । राजाराम सभेमधिं डफ झोडी ॥१०॥

मैत्र मोत्याची जात-दोन उंची मोत्यांच्या जोडीसारखी अपूर्व अशी ती मित्रांची जोडी होती; समयाच्या पारीं-संकटाच्या वेळीं; विश्रांत-विश्रांति, विरंगुळा; हारगडी-हरघडी; कुत्ररा-कन्या, कुमारी; तुटती तार-तारे तुटल्यासारखी ती झळकत होती; साज पक्का शेर-पक्का शेर वजनाचे दागिने; खेट करणें-आलिंगन देणें, समागम करणें; ताळ-मजला. वेंघणें-चढणें; राव-राजेसाहेब; सत्यभाव-निःशंक मनानें; झपली-झांकण, आच्छादन; लावली कीं झुरक-झरोक्याला लावली; झुरक-झरोका, खिडकी; लपण करणें-लपून बसणें; वेठी घालणें-वेढा देऊन गांठ मारणें; मेळामेळ-जमाव, गर्दी; झगरा-फरारा, फऱ्याचें कापड खूप मोठें असतें. निशाणाचें फडकें त्या मानानें लहान. झगार असा मूळ शब्द आहे. त्याचा अर्थ अभ्रपटल भुजंगशेट वाण्याची कापडें पांढऱ्या ढगासारखी हवेंत तरंगतांना लोकांना दिसत होती. चव ताळांनीं-चारी दिशांस; होइना धनी-हा माझा मुलगा आहे असें म्हणण्याची प्रत्यक्ष बापाचीहि हिंमत झाली नाहीं; राजाप-राजाजवळ; येकुणे-राच्या-एकमेकांच्या; राजेश्वरी-राजेश्री, महाराज; धनवर-पुष्कळ, अमूप; मनसुबा-युक्ती; सफेली-भिंत, तट; कनवळा-कींव; मरणाचा सोहळा करणें-वाजत गाजत सती जाणें; डवरा-खळगा, खड्डा; सोई-युक्ती, सोय; वढाताडी-ओढाताण; आकांत; तस्ती-त्रास, छळ; म्हणती पैस-पैस पैस, म्ह. वाट द्या वाट द्या म्हणूं लागली; आपेश-आरोप; फेडाल हा अपराध, याल उसनं-हें पाप कोठें फेडाल ? हें उसनें कसें परत कराल ?

* * *

# अनंत फंदी

## लावणी ११९ वी

अगे अलबेले ! रूप तुझें किति वानूं ?
उगवला जसा भानू ।। धृ० ।।
हतांत सोनीयाचे छिल्ले ।
मुखड्यावर हळदीचे डिल्ले ।
खाउन माजूमीचे झिल्ले ।
दोन्ही जोबन बनले किल्ले ।
किल्ल्यावर कधिं होतिल हल्ले ।
उभेच नीट निबर, जरा नाहिं ढिल्ले ।
पाह्याला बिसनीचे महले ।
कोट्यावधि पतींचे भल्ले भल्ले ।
अघाव जाणे ( ज्याणे ) रुपये दिल्हे ।
इतुक्यालाही झल्ले बिल्ले ।
खाउनिया शिर कल्ले खुल्ले ।
तपस्वियाणें तप मोकल्ले ।
साधूचें साधूपण गेले ।
अतीरथी हे कुल नागवले ।
अशिच्या पाई हजारों मेले ।
साखर वाटिति पल्ले पल्ले ।।१।।
मारि नैनांची भुरोड ।
अलम उभी रस्ता करोड ।
गुल बशहरामध्यें येकाचि अरोड ( ओरड ) ।
त्याहून मला लागली मिरोड ।

मी विषयाचा पक्का दरोड ( दरोडेखोर ) ।
म्हातारपणीं ज्वानीची परोड ।
अतां प्रीतीची घाली फरोड ।
मग विषयाची नरडी मुरोड ।।२।।
गोरिगोमटी मुखावर मुद्रा ।
लाउनिया हरिद्रा ।
नथ शोभे नाकिंच्या छिद्रा ।
दूर करी अमुच्या विषयदारिद्रा ।
हतभर जर साडीचा पद्रा ।
वारा न लागे जिचिया पद्रा ।
अवंतराच्या दैवीं भद्रा ।
**फंदी अनंताचे** कवितेला जन हे मुकेले ।।३।।

अलबेली–सुंदरी; छिल्ले–(?) छील असा शब्द कोशांत सापडतो. त्याचा अर्थ " चांदी सोनें इ. धातूंच्या सुताची गोल कडी असा दिलेला आहे. छल्ला असा शब्द रूढ आहे; त्याचा अर्थ हाताच्या बोटांत घालावयाची अष्टपैलू सोन्याची आंगठी, सल्ला; ( संस्कृत छल्ली–लता हिं. ) डिल्ले–छाप (?); ढिल्ले–ढिले. बिसनी–बाजारबसवी, व्यभिचारिणी; महल्ले – मोहल्ले; अघाव–आगाऊ इल्लेविल्ले देणें–फसविणें, वाटाण्याच्या अक्षता लावणें; शिर कल्ले खुल्ले–शिर केलें खुलें (?) कुल–सर्व; भुरोड–कटाक्षांची फेर; अलम–जनता; बशहरामधें–सर्व शहरभर; आरोड–ओरडा, आवाई, वार्ता; दरोड–दरोडेखोर; परोड–परवड दुर्दशा; मुरोड–मुरड, चेप; दैवीं भद्रा येणें–लाभ होण्याचा योग असतांहि तो न होणें असें दुर्दैव.

* * *

## लावणी १२० वी

आजि कां गे रुसलीस ? सांग सुंदरी । बोले हसुन, चाले थटुन राजमंदिरीं ।। धृ० ।।

कुरळ केश विस्कळीत जाहाले कां गडे ? । माझी आण तुला सखे, तूं पाहे मजकडे । सुरत तुझी पाहूनि मला लागले वेडें । नित्य येतां हसुनि मशीं बोलशी बरी ॥१॥

तुझे प्रीतीची मला आवड फार गे । तुझेसारिखी दुजी नाहीं नार गे । वय वरुषें पंधरांत सकुमार गे । रसति गेंद भरून आले ते उरावरी ॥ २ ॥

आज काय चुक जाहाली ? सांग साजणी । रात्रीमधीं येणें जाहालें, रुसशी म्हणउनी । ऋतुस्नात होति माझी घरिं कामिनी । अंतर हें पडलें सखे तुं क्षमा करी ॥ ३ ॥

नेसुनि शेलारी लाल कंचुकी । रत्नखचित नग प्रकार परोपरिचे कीं । नेला सखा मंदिरांत, वसला मंचकीं । गातो **फंदी** छंद कटिबंद हे करी ॥ ४ ॥

वोले–बोल; चाले–चाल; वेडें–वेड; रसति–रसरशीत; गेंद–स्तन; नगप्रकार–विविध प्रकारचे दागिने.

* * *

## लावणी १२१ वी

सांब कधीं कृपा करील ? तो येइल गृहीं ग स्नेही ॥धृ०॥

या घरा उलटोनी जावें माघारा । जल्दी कुचाची करा त्वरा । ममता मजवर असों द्या जरा ॥मनोहरा॥ जाल मास बारा । रामा । कुठवर दम धरील दारा । ही तनु चंग, रंग ढंग संग करिल नीसंग, रंग भंगल्या न ये मग ॥ १ ॥

या जीवा बहू क्लेश जाले केशवा । चरणांबुज दाखवी माधवा । करुणा येऊं दे तुज येधवा । जगदीशा । मी मनांत झुरतें । रामा । पक्षापरी वनांत फिरत्यें । कीं हनु कटीयार कारगार, वार करुं आरपार, फार नार घार जाहाली ॥ २ ॥

पारीखा जाहालासी लोकांसारिखा। कधीं येसी घरा संसारीं का। विषयाची ढाल उभारिनास कां ?। येकदम। ग्रहकुटुंब पाहाया। रामा। अहो दिनरात्र हाची ठाया। श्रीहरि धांव पाव, दाव माव, करुनी उपाव, लाव डाव घाव, धांव तूं ॥ ३ ॥

श्रीहरि स्मरतांची स्वामी आले घरीं। नाना विलास करी सुंदरी। घेउनी गेली निज मंदिरीं। सखयाला। रंगमाहालीं नेलें न्हाऊनियां उदेल तेलें। कीं **फंदी आनंद**, बुंद छंद पद करी, कडी बंद, तुंद धुंद फुंद यांतची ॥ ४ ॥

स्नेही–प्रियकर, पति; या घरा उलटोनी जावें माघारा–आधीं घरास परत या व नंतर वाटल्यास पुन्हां कूच करून स्वारीस जा; चंग–चांगली; रंग भंगल्या न ये मग–एकदां रंगाचा बेरंग झाला म्हणजे पुन्हां तसा साधणार नाहीं; येधवा–येव्हां, या वेळीं; हनु–हाणूं, मारूं; कटियार–कट्यार; कारगार–कारेगार; मूळ पर्शियन शब्द कार्गर; त्याचा अर्थ परिणामकारक, लागू, घातक; घार झाली–घारीसारखी झडप घालण्यास टपून बसली, अधीर झाली; पारीखा–परका; ढाल–झेंडा, सैन्याचें मुख्य मोठें निशाण; ठायां–टाहो; माव–करामत; उपाव–उपाय; डावघाव–घावडाव, उपाय, युक्ति, शक्कल; डाव घाव लाव–परिणामकारक उपाय शोधून काढ; बुंद छंद–छंद बंद; कडी बंद–कटिबंद.

* * *

## लावणी १२२ वी

पतीविणें जीव व्याकुळ मोठा। माझी मान कापुनिया बारवेंत लोटा ॥धृ०॥ जीव व्याकुळ होतो आबाजी। कसा असेल सखा परदेशीं प्रवासामाजीं ?। सासुसासऱ्याला गांजी। राहावेना आतां माझ्यानं, मराया राजी। बोलावुनि आणा, पत्र त्याशीं धाडा जी। जाळुनि करा चुना, रंगमहाल पाडा जी। लक्षुमी करा फना, पाठी लागी वाडा जी। कां हो गेलां प्रवासामधीं ? घरीं काय तोटा ? ॥ १ ॥

कोणे सवति तुला वीरमौली । पोटजाळी ईशी पायांत काशि रे भवली ? । इतकी तरी काय नीसवली । कशी काय तुला गत जाली ? बदलली नवली । कसा कोपला रामचंद्र बा गे ? । जीव हा धोपला, राजेंद्र नाहीं गे । कशीशी हो, पळा भोगेंद्रना (?) बाई गे । मजलागीं गर्मी जाहाली, पाजा घोटा ॥२॥

इतक्यामधीं जासुद आले । सांगती, पति लष्करांत गारद जाले । पोशाख वळखिले शेले । उभीयान आंग टाकीलें जोतीयाखालें । करी शोक, ' हाय हाय, आतां काय राहूं गे ? ' । रडे नार धाय, 'आतां काय पाहूं गे ? । चंद्रभागे माय, तुला देह वाहूं गे । आतां मी सती जातसें, यांत नाहीं तोटा ' ॥३॥

' हरगीस नाहीं राहायाचें । साहित्य करा मामाजी, सती जायाचें । बोलिल्यें मी कायावाचें । तरी सती सगळ्यांत समाधान जीवाचें ' । आणुनी लाकडें रचिलीं सरणा जी । घालुनी सांकडें पावे सुमरणा जी । लाउनी काकडे जोडुं हात चरणा जी । **फंदी अनंताचा** कोरडा सवाई सोटा ॥४॥

बारव–विहीर; आत्राजी–मामंजी; लक्षुमी करा फना–सर्व संपत्ति वाटून दान करून फन्ना करून टाका; पाठी लागी वाडा जी–हा वाडा म्ह. हें घर मला खावयास उठल्यासारखें वाटतें, पति नसल्यामुळें; वीरमौली–वशीकरण विद्या जाणाणारी; निसवणें–धीट होणें, निर्लज्ज बनणें; भवली–भोंवली; नवली बदलणें–मर्जी फिरणें; धोपला-कोंवून गेला, गुदमरून गेला;गर्मी–काहिली, उष्णता; गारद–नष्ट, ठार; जोतियाखालें–जोत्याखालीं; हरगीस–बिल्कूल, निखालस; साहित्य–सती जाण्याचें साहित्य; घालुनि सांकडें पावे सुमरणा–ती सती गेली, देवत्व पावली. आतां तिला सांकडें घातलें किंवा संकट घातलें आणि तिचें सुमरण म्ह. स्मरण केलें कीं ती नवसाला पावते.

* * *

## लावणी १२३ वी

गेले टाकुनिया, सुंदरी आकांत करी। जिवाला श्रम होतो भारी ॥धृ०॥ नूतन वय माझें, भरजानीचा भडका। जसा म्हैसा मारि धडका। तुला चाकरीची इतुकी तरी आवड कां?। घरीं माहासुर पैकाअडका। कशाला ल्स्कर?। त्यावरी पडों द्या तस्कर। थोडकीच दौलत खुसकर। पत्रें धाडिते नारी ॥१॥

कठिण मन केलें मजविषयीं प्राणपती। तुला पत्रें धाडूं किती?। तू नाहींस मंदिरांत, मंदिरांत मंदमती। तुझी मज वाटतसे ख्याती कशाची निद्रा। तूं नाहींस धैर्यसमुद्रा। त्यामुळें कपाळीं भद्रा। रुद्रा, तूं पाव तरी ॥२॥

ऐक सये बाई, कोपला गे कंसारी। मला सुख नाहीं संसारीं। असें नित्यानि पतीचें दुःख नवसारि (?)। भज्या कैची वा चव सारी (?)। फजीती मुत्रलक। काय घोडा उडवुनी अबलख। दप्तराशीं नसल्या तबलक। कागद चहूंकडे चारी ॥३॥

निराशा जाहली, मग सुंदर वावरली। महा सक्रोधें सावरिली। गेली पंढरीला, देवाभोंवतीं फिरली। विठोबावर रागें भरली कीं जाहाली तंवर। पावले स्वामी चीतांबर। ब्राह्मणाशी वाटी पीतांबर। शत गोदानें करी। छंद **फंदी अनंत** ललकारी ॥४॥

त्यावरी पडोंद्या तस्कर—तस्कर—चोर, दरोडेखोर. भावार्थ आग लागो त्या लष्कराला. तें लुटलें जाऊं दे; थोडकीच दौलत खुसकर—थोडी दौलत असती तरच ती सुखाला लागते. खुसकर या ऐवजी मूळ पाठ 'सुखकर' असण्याचा संभव आहे; मंदमती—हें प्रियेनें प्रियकराला रागानें विशेषण दिलें आहे; ख्याती—बहादुरी, शहामत, शहाणपण, 'काय तुझें शहाणपण सांगावें' असें टोचून म्हटलें आहे; कपाळीं भद्रा येणें—लाभ होण्याची वेळ असतां लाभ न होणें. त्यावरून भद्रया कपाळाचा, दळभद्रया इ० शब्द आले आहेत;

रुद्र—शंकर; नवसारि भज्या कैची वा चव सारी? — सुरत—नवसरीकडचा एकादा भज्याचा प्रकार कवीला अभिप्रेत आहे कीं काय? तिखट किंवा मीठ नसलेल्या गुजराथी भजाला काय चव असणार? त्याप्रमाणें पतिवांचून हा संसार अळणी वेचव झाला आहे; तवलख—कागदपत्रांच्या पुडक्यास त्यांतील कागद विस्कळीत होऊ नयेत म्हणून वांधलेली फीत किंवा दोरी, किंवा त्या कागदांवर घातलेले चामड्याचें अगर कागदाचें कव्हर. दप्तर—ज्यांत कागदपत्र ठेवतात तो रुमाल; मद्दा सक्रोधें सावरली—म्ह. तिनें शोक टाकून दिला. क्रोध धारण केला म्हणजेच तप करण्याचा निश्चय केला. त्या निश्चयाच्या योगानें ती सावरली म्ह. शुद्धीवर आली; तंवर झाली—रागानें बंवर झाली.

* * *

# दादू गोपाळ

## लावणी १२४ वी

परअस्त्रीचे हो पाईं जिवाची खोरी होइल तत्क्षणास। चांडाळ कोण दुर्जन करील अभिलाष ? ॥धृ०॥

गुजरण चंद्रवदनी नार। चंद्र गवळी तिचा भ्रतार। त्याच्या द्रव्यासी नाहीं पारावार। पांचशा गवळ्यांचा सरदार ॥ चाल ॥ त्या पांचश्या गवळ्यांचीं वेगळीं घरं। आणीक गाईम्हशींचीं खिल्लारं। संगें घेऊनिया दलभार गेला चाकरी। घरीं टाकुनी चंद्रवदनी प्रियकर प्यारी। धन्य ईश्वराची कळा कीं चांगुलपण, तिला रूप दिलें भगवंतानं। तिच्या स्वरुपाचें पडे चांदणं राजमदिरीं। जशी परी रूपसुंदरी ल्याली अलंकार उशन (?) वसन भरजरी। कटि कसुन पिवळा पितांवर नेसुन कीं पदर सावरी। बुट्टेदार कंचुकी ल्याली सुबक जरतारी। लखलखाट चमके ज्वाहार, गळ्यामाधिं शोभे चंद्रहार। आणिक जडिताचा करून शिणगार करून परोपरी। माथां मुदराखडी कळाकुसरी। कानीं करंजफुल, वाळ्याबुगडया, हातामाधिं तोडे, गोठपाटल्या। पायींही पदी तोरडया ल्याली गुजरी। अनवठ विचव्याचा झनकार नाद किलकारी। सांडुन शिरीं भवराची छाया (?) सासुला म्हणती घेऊनी या या। जाते दहि दूध विकाया उदापूर नगरीं। दहा पांच मिळून आम्ही जातो नगरच्या नारी। ती सासु म्हणे गुजरीस, ' नको जाऊं उदापुर नगिरास। तिथें उदेभान राजाचा पुत्र मवास ' ॥ १ ॥

गुजरण चंद्रावदन राजस कह्या प्राणीणा ( ? ) झाली उदास। तिनें जायाचा घेतला सोस। उदापूर नगरी कच्ची सहा कोस॥चाल॥

दहा पांच मिळुन गजघाट शिरीं घेऊन दह्याचा माठ। येऊन पोहचला एकच थाट उदापुर नगर। चवकांत मारी किलकारी गुजरीनार। आठपेठा गल्लोगल्लीं, दही घ्या म्हणुन सांगूं लागली। तिच्या स्वरूपाची मात काकली गेली दुरवर। दुररस्तो जमला थाट, पहाती जनसार। वाणी उदमी दुकानदार आणिक मोठाले सावकार। लागली जखम काळजापार, झाले कीं चुर। गपगपा झाकले नेत्र पाहतां नूर। जग म्हणती, अरे भगवंता, अशी निर्मिली सुंदर ही कांता, नार गवळ्याची ही पतिव्रता रूपसुंदर। धन्य धन्य प्राणी असला इचा भ्रतार। राजदरबारीं पोहचली मात अशी एक गुजरी आली शहरांत। तिला पाहून या पडली भ्रांत नको घरदार। ऐकून राजपुत्रास धरवेना धीर। हालकारा करून तयार बोलावून आणिली गुजरी नार। तिचें रूप पाहुनिया अनिवार राजकुमार। ‘दह्यासहित ज्यानीचें मोल बोल करार। आम्ही सौदागर व्यापारी सौदा करूं चाल महालास। जें मागशिल तें देऊं, नाहीं खुमास’॥२॥

गुजरण म्हणे रे राजाला, ‘ऐका। सव्वा लाख दह्याचा पैका। बोल ऐकून लागला चुरखा। ज्यानीचें मोल सांगूं काय मूर्खा ॥चाल॥ आहे पातिव्रत्य माझा धर्म सांगते तुला। धर कांहीं शरम अशा, गोष्टीनें भोगाशिल कर्मघात जीवाला। तूं येकुता येक पुत्र आहेस राजाला। ईश्वरी दया तुजवरी सातीजणी स्त्रिया राजमंदिरीं कीं जैशा सिंहल्द्वीपच्या परी विषयभोगाला। आग लागो, हें परद्वार व्हावें कशाला। जळो जळो हें चांगुलपण कशाला दिलें हे भगवंतानं। संचिति काय लिहिलें ब्रम्ह्यान कळेना मजला। हें संकट कसें ओढवलें, सांगूं कोणाला। आतां सांगते, गोष्ट कर जतन परावी नार जीवाला घतण, अशा गोष्टीनें पावले पतन, मुकले प्राणाला। हें पुरतेपणीं शोधुन पहावें मनाला। लंकापति रावण, पहा तयाची गती

झाली कोण। राज्य बुडविलें, सीतेच्या पायीं कुळक्षय झाला। कीचक द्रौपदीला लुब्ध झाला जीवासी को × × नांव बुडवील पतिव्रतेस डाग लावील त्याचा कुलक्षय होईल जाइल भंगाला। इंद्राला पडली भगें सर्व अंगाला'। अशी बोलुन गुजरी नार निघून चालली मुळ ठायास। ऐकून जखम लागली राजपुत्रास ॥३॥

राजा म्हणे, 'ऐक नारी, तुजवर नाहीं करीत बळजोरी। खुशीचा सवदा करूं परद्वारीं। तुला सोन्यामधिं मढवीन सारी ॥ चाल ॥ नारी, ऐक सांगतो तुला, बोल येकदां करूं दे सल्ला तुझ्या ज्यानीचा पाहूं मासला चाल एकांतीं। मला चैन पडेना, फेड मनाची भ्रांती। बहु रोजी स्वीक्ति (?). रूपरंग पाहुन झालों मनामध्यें दंग, तुझा आमचा घडेल कधिं संग ? वाटती खऱ्याती ? तूं नको करूं अनमान चतुर गुणवती। रूप स्वरूप तुझी ही काया। सांडून प्रेमसुखाची छाया येक दिवशीं अंतीं जाइल वाया होइल माती। ही दोन दिवसाची जानी ही नवनवती। तूं सोडून अवघी लाज जर काय होशील आमची भाज। या नगरीचं करिशील राज्य संगातीं। पट्टराणी करीन, छत्र धरीन तुजवरतीं। हें पुरतें पहा शोधून मनाला, मग तूं कर मान्य वचनाला। साती स्त्रिया लावीन सेवेला तुझ्या ग दिनरात्रीं। मम संगत अवघे भोगावी संपत्ती। तूं चांगुलपणांत राजसवाणी काय गवळ्याची घरजिनगाणी। जंगलवस्ती कोण्या ठिकाणीं कंटक रहाती। तिथें कैचें सुखसोहळे विलास होती'। नाना परी बोधिली ऐके ना झाली उदास। मग उतावळपणीं तिला जाऊन धरली पदरास ॥४॥

गवळण म्हणते, 'राव राजींद्रा। विनंती ऐका सुखचंद्रा। तुला काय कमी आहे भाग्येंद्रा ?। सोड जाऊं दे, नको धरूं पदरा। ॥ चाल ॥ माझे संगातणीं पहातील वाट, ओसरुन जाईल अवघा हाट, शिरीं धरला दह्याचा माठ, काय करुं याला ?। दिनमान होइल

अस्तमान घरीं जायाला । किती बोलू वारंवार? अरे मूर्खा कांहीं धर सुमार, किती सांगशील तरी पडीभार गोष्टी मजला। आग लागो तुझे धनद्रव्याला, हवें कुणाला ? । तुझ्या घरीं राजसंपत्ती महाल मुलुख सवेयु (?) पर तियाची विशाद सांगूं काय तुजला । माझ्या घरीं निवंता नाहीं धनद्रव्याला । तुझ्या घरीं हत्ती घोडे लाव लष्कर पालखी पागा दास चाकर । माझ्या घरीं गाई म्हशींचीं खिल्लारं गणीत नाहीं त्याला । हिऱ्याची लागली खाण, कोण पुसतो माणिक-मोत्याला? । तुझ्या पट्टराण्या सातीजणी तशा माझ्या दासी कुणबिणी नित्य राबती सदा निशिदिनीं घरकामाला । मी जशी राधा गोकुळीं तसे सुख सोहळे भोगी त्याला कर्दनकाळ माझा भ्रतार । पांचशा गवळ्यांचा सरदार राजदरबारीं कुल अखत्यार । त्याचा बोलबाला तुज-सारखे चाकर आहेत सेवेला'। अशी ऐकून लागली जखम राजपुत्राला हा जिव गेला तर जाऊं हात लावीन इच्या मालास ॥ ५ ॥

तिला बळजोरी हस्तकीं धरली । परसद्वारीं नेऊन बसविली । चंद्रवदनी मनीं घाबरली । पाव गिरिजापति, लज्जा हरली ॥ चाल ॥ रोजना पदरा । भयाभित झाली, कापे थरथरा । प्रवास कठीण आहे ईश्वरा, बरी गत नाहीं । वनांत जशी व्याघ्रानं अडविली गाई । भक्त कैवारी शंकर भोळा करुणा आली कणवला । झाला सुवर्णाचा कावळा आला त्या ठायीं । भगवान तिनं वळखला लागली पायीं, मग नेत्रींचें अंजन काढी, पत्र लिहिलं बहु तातडी । कावळ्यापुढें ठेविली घडी, धांव ह्या समयीं । प्राणपति मला भेटवी आणुन लवलाही । पत्र घेऊन काग उडाला एक दिवसांत, जाऊन पोहचला पत्र दिलें चंद्रगुजराला वाचून पाहीं । समजला सर्व वर्तमान बसल्या ठायीं । त्या घडी करुन तयारी भर मजलीची करून स्वारी येऊन पोहचला उदापुर नगरीं सकळ शाही । शहरामधीं नाकेबंदी केली ठायीं ठायीं।

पांचशे गवळी घेऊन संगें चंद्रगुजर येउनि अंगें रायापुढें होउनी नि:संग बोलला कांहीं । 'निर्वाण गुजरीसाठी करीन लढाई' । चंद्रहंस बोलावून आणला राजसभेस । जाऊं दे सोड गुजरीला, नको लावूं दोष ॥ ६ ॥

मग बोले राजकुमार 'गवळ्या, पहा पुरता सुमार । गुजरी नाहीं तुला देणार, लखाखित आहे खड्गाची धार ॥चाल॥ तीन हातांचा नेम निर्धार । ज्याची फत्ते होईल समशेर । त्यांनीं न्यावी गुजरी नार घराकारण' । असा सभेमधीं बोलला राजनंदन । खड्ग घेऊन अतिलवलाही म्हणे, 'अरे गवळ्या, सावध होई' हातामधिं हात मारले घाई करुन संधान । तीन हात ढालेवर चुकवले गवळ्यानें । गवळी उठतां पडली भ्रांत एक हातांत करावा घात येऊन गुजरीनें धरला हात 'द्यावा सोडून । हा एकुलता एक पुत्र राजाकारण' । उदेभान राजा-नृपती चंद्र गुजराची करी विनंती, 'बरी आज मेहेर केली मजवरती दिलें जिवदान। ही गुजरी माझी कन्या गुणनिधान' । त्याला पोशाख दिला भरजरी । मोत्या—पवळ्यांनीं ओटी भरी, करी बोळवण । त्या दिवशीं मुक्काम केला बागामधीं जाऊन । गुजरी गेल्यावर राज-पुत्रास लागला ध्यास । अदघडी पडेना चैन झाला उदास ॥७॥

गेला घेउन गुजरी नार । लागली जखम काळजापार । फुंद आवरेना विषय अनिवार । प्राण द्यावया केला निर्धार ॥ चाल ॥ गेला उठुनी माडीवर अंगामधिं घातलं बखतर, तेलामधीं भिजवून सारं अग्न पेटवला । धडधडा चेतूं लागला, कंठ सोकला । मग येउन सदरेम्होरं पहाती अवघे लहानथोर, म्हणती राज्य बुडविलें घर, प्राण सोडिला । नगरामधीं अकांत झाला कहर वर्षला । प्रेत पुत्राचें पाहून नयनीं शोक बहु केला मायबापांनीं । 'बरी ईश्वरा केलीस करणी, कुलक्षय झाला । हा पुत्र नव्हें दुष्मान, यानें कसा वाद साधिला' । राजकुमार मृत्यु पावला, बातम्या गेल्या चंद्र

गुजराला । गुजरीसहित परतुनि आला राजसभेला । म्हणे, ठीक नाहीं झालें, आग लागली दर्याला '। मग चंद्रगुजर समजून चित्तीं । बोले गुजरी, 'तयाच्या संगें जावें साति । सांगतों तुजला, जनामधिं लौकिक होइल सांगायला ' । तिला जायाची आज्ञा दिली पतिचरणास येउन लागली, मग संसारीं उदास झाली पदर टाकिला। तिनें जाउन मांडी दिधली त्याच्या उशाला । नगराबाहेर केली खायी सातीजणी स्त्रिया आल्या त्या ठायीं त्यामधीं आठवी गुजरी पाही । करी गलबला । रामराम बोलूं लागली त्या वेळेला । उडी घालति येउन एक एक रडति अवघे नगरचे लोक दुःखामधीं बहु झाला शोक पाहे काय त्याला (?) या विषयापायीं बहूजण मुकले प्राणाला । **दादू गोपाळा** कवी मोरु मोती अण्णाजी म्हणे, राज्य दिलं उदेभानानं चंद्र गवळ्याला । सात जन्म भ्रतार पुढें होइल गुजरीला । कवी **विठ्ठल** गुणीजन म्हणे ऐक चतुरास । पुतळीने कथा सांगितली भोज राजास । पर अस्त्रीच्या हो पाई जिवाची खोरी होईल तत्क्षणास ॥ ८ ॥

अस्त्री–स्त्री; खोरी–हानी, नुकसानी; दलभार–सैन्यसंभार; जवाहार–जवाहीर-अनवठ–पायाच्या अंगठ्यांत घालावयाचा रुप्याचा दागिना; विचवा-पायाच्या अंगठ्यांत घालावयाचें वळें; किलकारा–आवाज, आरोळी; मवास–दांडगा, बैकैदी, गुंड; गजघाट–जमावानें; काकली-कुजबूज, आवाई; हालकारा–जासूद, निरोप्या; करार–पक्के, नक्की; खुमास–गुमान, पर्वा; चुरखा–चटका, चरका; एकुता–एकुलता एक; घतण–घातक; खुशीचा सवदा करूं परद्वारीं–तुझ्याशीं व्यभिचार करण्याकरितां काय मागशील ती किंमत देईन; जानी–तारुण्य; भाज–बायको; मम संगत – माझ्याबरोबर; हाट–बाजार; पडिभार गोष्टी–दिमाखाच्या गोष्टी; रोजना पदरा-डोळ्याला पदर लावून रुदन करूं लागली; अंजन–काजळ; काग–कावळा; शाई–सैन्य; निर्वाण गुजरीसाठीं–गुजरीसाठीं निर्वाण पदावर उभा आहे. प्राण गेला तरी बेहत्तर; तीन हातांचा नेम–दोघांनीं एकमेकांवर तीन वार करावयाचे असें ठरवून द्वंद्व खेळूं; घराकारण–घराला, घरीं; घाई–घाव; मेहेर–कृपा; फुंद–स्फुंद; आवेग; बखतर–जाड डगलें.

* * *

# विश्वनाथ

## लावणी १२५ वी

साजुक नाजुक कळ्या पिवळ्या गुंफुनी आपहस्तकीं । प्राण-विसाव्या बैस मंचकीं, तुस खोवीन मस्तकीं ॥ धृ० ॥

सत्य वचन इमान, प्राण संकल्प करीन तुजवरून । नाहीं तुसी बैमान कापलीस मान हातिं शिर धरून । तुझ्या पदरची दासी जिवलगा सनद देत्यें करून । तुळशी-पत्र भंडार दिवस रविवार घ्या मुठ भरून । लागली चटक या जीवा प्रियकरा । मज मैनेच्या रावघा प्रियकरा । तुजमज सारिखा जवा प्रियकरा । चालवा कीं माझा ळळा, पडीलें गळां पाहूनी वस्त कीं ॥ १ ॥

तुझी काळजी मला जीवलगा जासुद पिटीला येथुन । बराणपुर पैठण थेट पोशाख आणिलें तेथुन । अंगावाणी चंदेरी महमुदी सांगीतल्या म्यां आंतुन । ज्यावरी तुमची रीज बुजली त्याची आणीवल्या तेथुन । देइन जीवासी जीव प्रियकरा । जाण पैशावर चाचव प्रियकरा । मी तशी लालुची नव्हे प्रियकरा । खोटी असेन तुजविशी करावी चौकशी आजी पुस्तकीं ॥ २ ॥

नाना परीचे पदार्थ पुरवीन बसल्या नाना परी । शहर पुण्यामध्यें कराव्या मौजा झोक लाउनी भरजरी । मुखचंद्राची प्रभा तेज अमोल तनु गोजिरी । स्वरुप पाहातां मुखरण पद्मीण झुरते बंगल्या-वरी । नको जाउं कुणाचें येथें प्रियकरा । घ्या दृष्टीचा ताईत प्रियकरा । या सवती मला माहीत प्रियकरा । वेड्या होउनी तुज भवताल्या घालीतील गस्त कीं ॥ ३ ॥

जाइजुई सेवंति मोगरा बरा पांच हिरवा । केतकी-महतकी मालती दवणा पलंगावर भरवा । लावा गंध केशरी कपाळीं, मधीं टिळा भरवा । पाहा माझी चतुराई गुंफिला तुरा नजर ठरवा । कवी **विश्वनाथ** गीरि म्हणे गुणिजना । गुंफिला तुरा युक्तिनें गुणिजना । आदि माया आदिशक्तिनें गुणिजना । म्हणे विठोबा, नांदे लक्षुमण निजामपुरीं वस्ती कीं । मलुदसु कवी बाळ करिती कवन शिरां दस्त कीं ॥४॥

आपहस्तकीं–स्वतःच्या हातानीं; तुस–तुला किंवा तुझ्या, कदाचित 'तुरा' असेंच मुळांत असेल; प्राण संकल्प करणें–प्राणाचा संकल्प करणें, प्राण ओवाळून टाकणें; कापिलीस मान इ०—जरी माझी मान तूं कापलीस तरी सुद्धां; सनद–लेख, लेखी करारपत्र; जवा–जोड, जोडी, संयोग; वस्त–अपूर्व अशी वस्तू; अंगावाणी—फुलें किंवा कशिदा काडलेलें अंगरख्याचें एक विशिष्ट सुती कापड; चंदेरी–एक विशिष्ट कापडाचा प्रकार; महमुदी—कापडाचा एक विशिष्ट प्रकार; आंतुन—अंतस्थ किंवा गुप्तपणें, किंवा 'आंतुन' हे 'इथून' या मूळ शुद्ध शब्दाचें नकलकारानें केलेलें अशुद्ध लेखनहि असूं शकेल; रीझ—आवड. रीझ बुजणें-प्रीति जडणें; पैशावर चाचव असणें–पैशाकरतां जीव तोडणें, कंजुष असणें; बसल्या—म्हणजे बसल्या जागीं; झोक-पटका किंवा पागोटें कांहीं विशिष्ट अकडीनें फिरवून बांधणें, येथें 'भरजरी' हें झोकाचें विशेषण समजावें; महतकी—हें कोणचें फूल कळत नाहीं; ठरावा–ठरवा, स्थिर करा; शिरा दस्त कीं—शिरावर वरदहस्त ( दस्त–हस्त ) आहे.

* * *

# शेखभाई

## लावणी १२६ वी

या सजणाविण साजणी लागली झुरणी, मला करमेना । कधीं भेटसी साजणा मनमोहना ? ॥ धृ० ॥

बारा वर्षांची उमर, जानीचा भर, सुरत चांगली । या सजणानें मैत्रीनें प्रीत लाविली । काय सांगो चांगुलपण, गेलें लुबधुन, होत्यें धाकली । मायबापानें माजीच गोर गाइली । हळदिचा डाग लागला । भ्रतार लष्करा गेला । संग त्यांनीं फुसविला । माजी हेतु होइना त्याला । किती वाट पाहूं त्याची सख्या सजणाची, दृष्टी पडेना॥ १ ॥

मी संचीताची खोटी सुख ललाटीं नाहीं मजला । या जानीचा नवतीचा भर चालला । येती मदनाचीही लहरी पलंगावरी कैफ घेतला । कसें दुसमाना त्वां दु:ख दिलें मजला ? । जासुद धाडी तांतडी । कागदाची पाहतां घडी । जीव सोडुनी जातो कुडी । आकाशाची करवेल चौघडी । मेरुची बांधवेल पुडी । सुऱ्याची मोड-वेल नरडी । या मनाची अनिवार वोढी, चालली घडी धीर आवरेना ॥ २ ॥

नारीनें पत्रिका लिहून जासुद पाठविले लष्करा । गेली मंदिरीं दु:खें, नीद्रा आली तिला । आला सपनामधीं भ्रतार पलंगावरी कवटाळिला । वोले केसानें त्वां माजा गळा कापिला । सपनामधीं भोग दिला । तो गर्भ राहिला तीजला । नव महिने जाले त्याला । तिचे उदरीं बाळ जन्मला । विपरीत वाटे लोकांला । पाळण्यांत घालुनी बाळ हालवी नार गाते बहुगुणा ॥ ३ ॥

जासुद गेले लष्करा तिच्या भ्रतारा सांगे खबर । झाली खुशाली

लष्कर फिरलें माघारं । घरा आला तिचा भ्रतार, भेटे सुंदरा, झाली दीलगीर । त्यानें बाळक पाहिलें पलंगावर । 'कवणाचा पुत्र आणिला ?' । नार बोले भ्रताराला । 'तुम्ही सपनीं माझ्या आलां । सपनामधीं भोग दीला । तो गर्भ मला राहीला ' । विपरीत वाटलें त्याला । ही नार जात वेमान, पतीवाचुन वाळक होइना ॥ ४ ॥

तिनें बाळक धरिलें हातीं, घेउन गेली मग राजाकडे । त्या पंचाच्या मग बाळक ठेविलें पुढें । पंचांनीं न्याय केला, बाळ पाहिलें, त्यासी नाहीं हाडें । हें रगताचें मांसाचें अवघें भांडें । हाड नाहीं त्या बाळाला । नाहीं गेली परद्वाराला । स्वपनाची अवस्ता हिजला । खोटें केलें भ्रताराला । दोघें पाठीवर्ली घराला । जेथें पांचमुखीं परमेश्वर, तुटला घोर, लेश राहीना ॥ ५ ॥

हें रगतमास आईचें, हाड बापाचें, असें बोलती । शीव-शगतीला अंतर आहे किती बसलां सभा चातुर पाहा यामधीं खरें खोटें किती । बोले तुऱ्यानें कलगी धरिली हातीं । दोघांचें जालें येकचीत । सुखें गेली आपल्या माहालांत । छंद राजोरी नगरांत । **शेखभाई** करी कवीत । शेटी रुद्रापा बोलत । त्याला नागेश शरणागत । हे कलयुगीचें कवीत बोलिलों तरी तुम्ही:ध्यानीं आणा ॥ ६ ॥

गोर—गळा, मान; गाइली—गोविली; गोर गोविली–गळा गुंतविला भावार्थ—आईबापांनीं अगदीं लहानपणींच लग्नाच्या पाशांत माझा गळा गुंतवून टाकला; संगत्यांनीं—संगतीच्या सोबत्यांनीं; हेतू—आठवण, स्मरण, ओढ.

* * *

# गोपाळ

## लावणी १२७ वी

नीरद नील तनु, रूप मनोहर, सगुण मूर्ति साजिरी । विरहत वृजीं परम गोजिरी ॥ धृ० ॥

शामळ कोमळ कांती अतसी कुसुमोपम चांगली । शिशुरूपें नंदांगणीं रांगली । ज्याला स्तावितां दशशत वदनें शेषाचीं भागलीं । मूर्ती ते गौळ्याघरिं वागली । रडुनीं मागतो दहिं दूध लोणी । म्हणे मज भुक लागली । धरुनी वृत्ती बहुत रागेली । धन्य धन्य ते व्रजजन ज्यांची दैवदशा जागली । जे वहु जन्मार्जित मागिली । बाळक्रीडा नाना परि दावी । अपार कीर्ती किती वदावी । दामोदर घे बांधुनी दावीं । लीळा नाटकी हरी । नीजजन भवाहिरद संहरी । काळी घोंगडी खांदीं शोभे, करीं वेताची छडी । गाई चारित कालिंदी थडी । सिदोरीचें पाठीवरि शिंकें, दधीवोदन आवडी । लवणशाखा नाना परवडी । पेंदा सुदामा वडदवाकुडा वेष्टित गोप गडी । बोली बोलत बहु बोबडी । आशें मुलें गौळ्यांचीं ठकवुनी गाई पाठी धांवडी । सिदोऱ्या अवघ्यांच्या सांवडी । गाळीप्रदानें गांडु भांडु । मुलें ताडीती म्हणती लबाडु । हुतुतु हमामा चेंडूदांडू । खेळत नाना परि । व्रजवनिताला पदरीं धरी ॥ २ ॥

दधी पय नवनीतघृत गौळ्यांघरीं खातो करुनी चोरी । त्याला सांगत आपली थोरी । मी ब्रम्ह्याचा बाप कमळा ते आमुची अंतुरी । आपण निजतों शेषावरी । शंखासुर म्यां वधिला पृष्ठीं धरिला मंदर-गिरी । धरणी धरिली दाढेवरी । हिरण्यकश्यप दैत्य मारिला होउनि नरकेसरी । वामन तो मी बळीचें द्वारीं । तीन सप्तकें पृथ्वीदान ।

दिधली वधिला दशानन। तो मी नंदाचा नंदन । भक्तांचा कैवारि । जाणे आहे मथुरापुरी ।। ३ ।।

ह्मत जाणोनियां राधेचें प्रौढपणातें धरी । तियेचे पूण मनोरथ करी । अतिवृद्धा वक्रा कुब्जा ते केली अब्जेपरी । वयसा गुण लावण्यें वरी । उग्रसेना मथुरे स्थापितो कंसाचा अरी । चहूंसांला न कळे थोरी । पांडव पाळक जाला बाळक नंद यशोदे घरीं । उंबरा चढतां टेंका धरी । विश्वाचा जो आत्माराम । पतीत पावन ज्याचें नाम । गोपाळांचें पुरवी काम । नामें जगदोद्धारी । जो गजगणि-केला उद्धरी ।। ४ ।।

अतसी--जवस किंवा अळशीचें रोप; अतसी कुसुमोपम कांति--जवसाच्या फुलाप्रमाणें सुंदर कांति, तेजस्वी स्वरूप; दैवदशा जागली--दैव उघडलें, सद्भाग्याचे दिवस प्राप्त झाले; निजजन भवद्विरद संहरी--आपल्या निजजनांवर म्हणजे भक्तावर होणारा भवसंसाररूपी द्विरदाचा म्ह. हत्तीचा हल्ला परतवितो; दाधिवोदन--दहिभात; नाना परवडी--नाना प्रकारच्या; लवणशाख-लोणचें; वडद-वडज--वडज म्ह. कुरूप, विद्रूप. वडज हा एक व्यंग असलेला कुरूप असा कृष्णाचा बाळमित्र होता. आर्श-खोडकर; लवाड्ड-लवाड; वज्रवनिताला-गोपींचे पदर ओढतो; अंतुरी-नवरी, वायको; ते-ती; अब्जेपरी—आंबुजेपरी, कमळासारखी सुंदर; गजगणिकेला-म्ह. गजेंद्रासारख्या हत्तीला व गणिकेला म्ह. वारयोषितेला.

* * *

# रामा काशी

## लावणी १२८ वी

बहुतां दिवसांनीं स्वामी आले घरीं । मी दुरसि जाहलें, काय करावें तरी ? ॥ धृ० ॥

वरुषाची मोहीम आले करून । चांडळ पालव आला मला ऋतु भरून । गुणी प्राणविसावा हेत मनामधिं धरून । सर्वार्थि तयाची मर्जी गेली फिरून । चोराची गत, मी मनांत गेलें झुरून । या प्रेम-रसांमधिं हृदय गेलें भरून ॥ चाल ॥ नीरउपाव जाला, काय करूं साजणी ? । नवरत्न भोगित्यें वीषयभोग येउनी येउनी । आजी पडला अैसा वाटे माझे मनीं, अहो मनीं । हे च्यार दिवस महिन्याचे आले तरी ॥ १ ॥

महिन्याचें महिन्या पालव येतो मला । हा वेळ साधुनी वैरि कसा गे बाई आला । बारा महिन्यांमधीं दिवस आजी चांगला । आज रात्रीं उभयतांचा व्हावा सल्ला । ही अडचण आली, काय करूं लाजेला ? । शेजेवर नीद्रा कशि लागेल स्वामीला ? ॥ चाल ॥ रंगमाहालीं आतां येतील कीं प्राणेश्वर । मग काय करूं विचार, मी तरी दुर । मग बोलाउनी दासीला तिनें सत्वर सत्वर । या आर्से-माहालामधीं बिछाना करी ॥ २ ॥

कचेरी करुनी बरखास्त अहो गुणीजना । रंगमाहालीं सखा तिनें नेला वोवाळून । कुंकूमरहित कामिना वळखिली खुण । कां दुर बैसलीस सांग आम्हां कारण । सरशाला बसलि लज्जित होऊन । मी आहे दुरसी, दिवस जाले तीन ॥ चाल ॥ या संवच्छराचे परी

दिवस आजी आहे । गुणी प्राणविसाव्या मला शीवतां नये, अहो नये । मग उदईक चवथे दिवसीं नाहीन तरी ॥ ३ ॥

प्रात:काळीं तेंव्हां उठोनी मग सुंदरी । करि स्नान, घालिती पाणी आंगावरी । लगबगा करुनी पोशाग तिनं भरजरी । जडीतांचे जव्हार घालिती अंगावरी ॥ चाल ॥ अस्तमान होइल केंव्हां मला साजणी । गुणी प्राणविसावा आणा कोणी गे शयनीं । मी आनंदांत निजेन मंचकीं घेउनी घेउनी । गुणी **रामा काशी** छंद नवा नित्य करी ॥ ४ ॥

दुरशी–अस्पर्श; पालव येणें–पदर येणें; सर्वार्थ–सर्व तऱ्हेनें; भोग–संकट; सला–संयोग, संगम; सरशाला–अगदी टोंकास, लांब; जव्हार–जवाहिर.

* * *

## लक्ष्मण

## लावणी १२९ वी

कशी आली गे वैरीण होळी, जीव तळमळी । पती येतिल कोणे काळीं ? ॥ धृ. ॥

सण शिमगा मोहरे आला कसा राहीला । कांहीं करुणा नये सयाला । कोणे सवतीनें फितवीला । जवळ बसवीला । अन्नपाणी भावेना मजला । आतां घरोघर सखया रंग करिती । आपुलाल्या स्वामींसी खेळती । चुवाचंदन चर्चिती । डोलती तिच्या अंगणीं केळी-नारळी । गळ्यांत फुलांच्या माळी ॥ १ ॥

येक नेसली पातळ, दुसरी केवळ, तिसरी ल्याली काजळ । चवथिच्या गळ्यामधीं हार रूप सांवळें । पांचवी बहू वेल्हाळा । सहावीनें

घागरी भरिल्या । सातवींनं झाऱ्या दिल्हा । त्या अवघ्या मिळोनी चालिल्या दिली आरोळी । खेळतो जसा वनमाळी ।। २ ।।

लागली तुकनचे चरणीं कर जोडुनी । पती येतां देखिलें नयनीं । सये अनंद जाला मनीं, ऐक साजणी । सुखदु:ख गेलें विसरूनी । बोले धर्मा खेळतो शिमगा । डोलत्यें आपले जागां । मानाजी संतु भोगा । **लक्षुमण** कहे डोल है । दगा अखर काळीं । हरी नाम वाजवा टाळी ।। ३ ।।

सयाला–सख्याला; चुवाचंदन–चुवा–चंदनापासून बनविलेला एक पदार्थ. ‘ चुवाचंदन कस्तुरीहो मैलागिरी ’; माळी–माळा.

* * *

# आत्माराम

## लावणी १३० वी

दाउनीया दर धरसी पदर, कां अधरचुंबनातें ?। मजसी तुला काय नातें ? ।। धृ. ।।

कुलांगना मी, परवनीता आतळसी करानें । बळत्कारें वहु निकरानें । मृन्मय घटवत् स्त्रीवपु हें स्पर्श विटाळानें । पुरलें तेची क्षणीं जीणें । पथींच धरिशी केवळ हा अविचार । वय सान, तुला कां कामाचा संचार ? । हें कर्म नव्हे कीं बरें, करी सुविचार । विजन नव्हे कीं पाहातें जन, कशी जाऊं सदनातें ?। केवी जनां दाऊं वदनातें ? ।। १ ।।

कृष्ण म्हणे तूं ‘ परवनिता’ तरी ‘ परपुरुषा ’ पाहीं । मज तुज हेत नसे कांहीं । मुळचें नातें तुझें आमुचें सर्व देती ग्वाही । अष्टादश

चारी साही । पाहातें जन म्हणसी तरी तो मी । धरा आप वायु तेजो व्योमीं । हे प्रभा रवी-मंडळा किंवा सोमी । स्वयं प्रकाश चाळक मीचि स्थिरचर जनातें । मजला सर्व असे नातें ॥ २ ॥

कामिनी म्हणे तूं गोष्टी अचाटा सांगसी मज कान्हा । तूं नंद वसुमतीचा तान्हा । सान मुलांचे संगें चोरुनि नवनीतपयपाना। गोकुळीं छंद करिसी नाना । पौगंडदशा तुझी कीं रे जलद शामा । तूं जाई, खेळ ईटुदांडु हमामा । या न करीं चेष्टा आम्हां, न येतां कामा । आत्मारामें चिद्गोपाळें हरिलें कुमनातें । चिन्मय दिधलें सुमनातें ॥ ३॥

दाउनिया दर-धमकी देऊन, भीति दाखवून; दर-भीति; आतळणें-धरणें, पकडणें, ओढणें; पुरलें-नष्ट झालें, संपलें. भावार्थ--स्त्रीचा देह ( तिची अब्रू ) हा मातीच्या घड्यासारखा नाजूक आहे. त्याला परपुरुषाचा स्पर्श झाला कीं त्याच क्षणीं त्याच्या जीवनाचा नाश झाला असें समजावें; सान-लहान; अष्टदशचारी साही-अष्टादश पुराणें, चारी वेद आणि षट्शास्त्रें; पौगंडदशा-बाल्य व तारुण्य या दरम्यानचें वय.

* * *

# भवानी साळी

## लावणी १३१ वी

येक राजा चंद्रभान चंपावत नगर। तेथें वामन ब्राम्हण, कमळजा नार ॥ धृ. ॥

वामन ब्राम्हण हो शिवभक्त । शिवभक्त त्याला सोमवारचें व्रत । अहो व्रतपूजा करितो देवळांत। तेथें आली अकस्मात मदनपुतळी । तिचा गोरा वर्ण अधीक चांफेकळी । तिनें सदाशिव पुजिला तिळ-

तांढुळीं । तो भटजीबावा उभा देवळाजवळी । त्याला पाहुनशान इसली राजबाळी । करि लुगड्याचा गुंडाळा ठेवी शिरकमळीं । असी खुण दाउनी गेली वरचेवर । तो भटजीबावा मनीं करी विचार ।। १ ।।

घरासी आला वामनभट, अहो भट । आपुल्या स्त्रीसी सांगे गोष्ट, अहो गोष्ट । ‘ देवळा आली येक परिवंट । तिनें पुजिला निळकंठ सदाशिव भोळा । होता नवरत्नांचा हार तिच्या गळां । ती मजकडे पाहुन हसली राजबाळा । शिरिं ठेउनशान गेली चंद्रकळा । जशी वीज चमकली गेली वरचेवर । कधीं भेटेल ? मजला धरवेना गे धीर’।।२।।

कमळजा म्हणे, ‘ ऐक तूं आतां, अहो आतां । मुगुटमणी तिचा पिता, अहो पिता । बंगल्या दरवाज्यावरतां । तेथें जावें प्राणनाथा, वेगि तांतडी । त्या मुगुटमणीच्या म्होरे पातडें सोडी ’ । तेथें आली येक सुंदर, त्या पाहुन डोळे मोडी । त्या समोर बसली होती घेउन चुनखडी । तिनें चुन्याची वाटोळी रेघ वोडिली । तेथें तांदळाचे ढीग केले चार । येका ढिगाचें मोडुनी गेली शिखर ।। ३ ।।

रेग वोढिली ती अयाळ नगर, अहो नगर । तांदळाचे ढीग चार, अहो चार । देउळ अंबेचें मोडकें शिखर । खुण दाविली तेथें यावें संध्याकाळीं, इशारत केली । त्या ब्राम्हणाला चटपट लागोनी गेली । जाहाला संध्याकाळ, दिवस अस्तानें बुडी दिली । देवळांत बसला, अर्धरात जाली । तेव्हां सुंदर आली, जशी वीज चमकली । ती एकाएकीं देवळांत रिघाली । त्याला पाहुनशान संतोषली नार । म्हणे, ‘चातुर शाहाणा बुद्धीचा सागर’ ।। ४ ।।

नाना परि कौतुकें केली, अहो केली । गांवांबाहीर गस्त आली, अहो आली । दोघें देवळांत धरियेली । सुंदर कामिन बोलली त्या ब्राम्हणासी । म्हणे, ‘सख्या सजणा, पुढें गत होईल कैसी ? ’ । तो बटेश्वर म्हणे,

‘ मला काय पुससी ? ’। ती म्हणे, ‘माजी खुण कैसा उमजलासी ? ।
तो म्हणे, ‘ घरचे रांडेनं पाडीलें फांसीं ? । सुंदर हात लावी कपाळासी ।
म्हणे, ‘ बैला रे, त्वां कसें घेतलें घर ?’। सांग नगरामध्यें कोठें तुझें
मंदीर ? ’ ॥ ५ ॥

ब्राम्हण म्हणे, ‘ ऐक साजणी साजणी । मारवाड्यांत कमळजा
राणी, अहो राणी । तुजसारिखी चातुर शहाणी । सुंदरा काय करिते
करणी ऐकोनी उत्तर । हळुच येक बोलाविला गास्तिकर । ती म्हणे,
‘दादा, ऐक माजें उत्तर । मनांत विकल्प धरूं नको थोर । जा,
मारवाड्यामध्यें हांका मार । कोणाचें वढाळ गुरुं चुकलें थोर ?। तेणें
वळइ नासली येक मातबर । तेणें गाई गोविली आपणाबरोबर । नाहीं
दिवस उगवला सोडुन न्या लौकर । मग कळेल धन्याला, येइल
कानावर ’ ॥ ६ ॥

तेव्हां तो जाउनीयां म्हातारा म्हातारा । मारवाड्यांत पिटी डांगोरा ।
‘ कोणाचें वढाळ गुरूं चुकलें थोर ?। तेणें वळई नासली येक मातबर ।
तेणें गाई गोविली आपणाबरोबर ’ । तेव्हां त्या सुंदरीनें आइकिलें
उत्तर । कोणाचें वढाळ गुरूं धरिलें कोणी । त्या चतुर नारिनें धाडिलें
सांगोनी । मग सोळाही शृंगार करी पद्मीण । घे पंचारती, निघाली
तेथुन । तेव्हां येतां देखिली त्या गस्त-करानं । ‘ तूं कोठुन आलीस ?
जा मागें फिरून’। ती म्हणे, ‘नवस म्या केला कठीण । हा चुकल्यावर
अवघीं जाती मरून । जसी जात्यें तैसी येत्यें वरचेवर ’ । मग देवळांत
ती प्रवेशली सुंदर ॥ ७ ॥

मुगुटमणी कन्या बोलिली ‘काई, अगे काई । बरवे घर घेतलें बाई,
अगे बाई’ । कमळजा म्हणे ‘ चिंता नाहीं ’ । मग सोळाही शृंगार
दिले उतरून । ‘घे पंचारति, जा वेगीं येथुन’ । असा कावा करुन
दिली तिला लाउन । दिवस उगवला, नेलीं दोनी धरून । ती सज्ज

दारीं उभी केली नेउन । लोक म्हणती, 'या राज्याची बरवी करणी । दोघें अस्त्री पुरुषें आणिलीं धरुनी' । वेताळ म्हणे विक्रमा कर उगवणी । या दोघींत नार कोण चतुर शाणी ? । म्हणे **भवानी साळी** जुनेरकर । त्या ब्राम्हणाची फार चातुर नार ॥ ८ ॥

परिवंट–वरवंट, वरवंटा, सुंदर स्त्री; पातडें–पंचांग; पातडें सोडणें–सविस्तर हकीकत सांगूं लागणें; मुकुटमणीच्या म्होरे–राजकन्येसमोर; घर घेणें–नाश ओढवून घेणें; वळई–जमीन, शेत.

* * *

# बिरोबा

## लावणी १३२ वी

कोणी शोध करा सखयाचा । दावा राघो मैनेचा ॥ धृ. ॥

सखे मी बाळपणापासुन । माहेरिं कीं होते आजुन । कामिंले पोरांमध्यें खेळुन । तारुण्या वयामधीं येउन । सासरा आला मज घेउन । आनंद जाहाला बहु दारुण । वेळ वक्त पाहुन दिवसाचा ॥ १ ॥

बारा वर्षें जालीं लग्नाला । हळदीचा डाग नाहीं गेला । पती माझा छालछबेला । टाकुनी कोणीकडे गेला ? । कोणी आणा गे जिवलग जीवीचा ॥ २ ॥

आरसा घेउनि सखुबाई । श्रींगार करीत लवलाही । चार समया जळति ठांई ठांई । पलंगावर हातरली जाई । येथें आसरा नाहीं कोणाचा ॥ ३ ॥

सुंदर व्याकुळ जीवाशीं । असें कळलें तिच्या सजणाशीं । धावुनी आला गुणीराशी । भोगिली नार मंदिराशीं । कवी बिरोबा राजबनसी । ख्याल गातो दखनदेशीं ॥ ४ ॥

* * *

## लावणी १३३ वी

हाय मोरे लालन का होइन जोगन । अज बैरागीण वाई ।
सख्या गुणि रत्नाचे पाई ॥ धृ. ॥
स्वरूपसुंदर हें लावण्य मूर्त खाशी ।
ईश्वरें घडीवली ऐशी ।
तनु माझी ग बहु केली ग सायाशीं ।
उणी नाहीं तीळ ठेवायासी ।
माझ्या स्वरूपाचा जोडा ग राजबनसी ।
टाकुन गेला परेशासी ।
चाल । वय द्वादश वर्सांत । नवे नवतीच्या भरांत ।
कमळण आली रसास । कोण घेइल सुवास ? ।
सख्याविण काय करूं ग ? । किती जीव मुठींत धरूं ग ? ।
कसें दर्यामंदि तारू ग । थडीस कोणी लावा ग बाई ॥ १ ॥
येक चंद्रमा, भवतीं नवलाख तारा ।
त्याविण शून्य हो पसारा ।
काय मंदिरीं जळूनी काट भारा ? ।
दीपकावाचून अंधेरा ।
व्यर्थ रिकाम्या जमा करून गारा ।
लाल नव्ही, अवघ्या दूर सारा ।

चाल । मोराचें चांगुलपन झुरे पाहुन आपले पायासी ।
जी गत बाई माझी हिकडं ती गत असल तिकडं त्यासी ।
ही काया हंसाविण ग ।
कौत्री फे ( ) फळावाचून ग ।
स्वामीविण मंदिर सुनें ग । धुंडाळी दिशा दाही भला ग ।।२।।

कोणासी दावूं सोळा शृंगार करून लेणं ? ।
दैवा निघेल ग ऊन । (?)
लोढतिवाशे रंगम्हालीं ग जमखाने ।
सख्याविण अवघें सुनें ।
अतां नाहीं मजला या मंदिरीं ग रहाणें ।
गावाबाहेर माझें ठाणें ।
चाल । धनदौलत हीं अवघी द्या लुटुन ब्राह्मणासी ।
हत्तीघोडे हरणे रावे द्या सोडुन पक्ष्यांसी ।
जरीठाणं माझं घ्या ग । सखयांनो तुम्ही ल्या ग ।
खुशाल अपले घरीं रहा ग । आता मी वैरागीण बाई ग।। ३।।

असें ईश्वरा तुवा माजें काय केलें ? ।
पूर्वसंचितीं हेंच लिहिलें ।
स्वामी माझे मार्गि कां अंतरले ? ।
जिवा लागले प्रेमभाले ।
दत्तात्रिया गुरूचें सुमरन केलें ।
चित्तमन लक्ष येक धरलें ।
चाल । कवीराज महाराज **बिरोबा** बोले नारी आले साजण मंदिरीं ।
खुशाल मौजा कर सुंदरी ।

सिदराम ल्हेरीचे ख्याल चुनदे । गलीत हो कविराज विलंदे । धोंडी फकरू कवि बाजींदे । तात्याजी खंडु खुब तर्क करून गाई॥ ४॥

सुंदर–सुंदरा, सुंदरी.

* * *

# सखाराम

## लावणी १३४ वी

आम्ही राजहौंस पक्षी सहज आलों मुंबई शहरासी ॥ धृ. ॥

पाहिलें स्वरूप मनोहर आंगावर ज्वार फार सजली । कोण्या राजींद्राची नार बत्तीसलक्षणी कनकपुतळी ?। कशी ठुमकत चाले जपुन, गांठ आड अकस्मात पडली । चाल । सखे मर्जी आमुची आहे । त्वां धरावा आमुचा स्नेहे । मनीं नको धरूं सौंशय । सांग रंगमहालीं कधीं नेशी ? ॥ १ ॥

तुं अगदींच दिसतीस ल्हान नहाण आलें वरुषा-महिन्यांत । आंगीं विषयबाण चेतला त्वरीत ने आपुल्या महालांत । चाल । जीव तुजवर झाला खुशी । लागलें लक्ष तुजपाशीं । आहे ईश्वर याला साक्षी । देखिली रंभा तुज जैशी ॥ २ ॥

या दों दिवसांचा भर निघोनी जाइल आतां सखये । भ्रांशिली मती कां तुझी ? गांठ एकांतामधीं पडु दे। जोबन खुब आले भरून नवतीचा रंग खुलुंदे । चाल । आम्ही रोखून तुजशीं थाट । नव्या रस्त्यामधीं पडली गांठ । गळ्यामधीं कंठा दुहेरी थाट । मिठी मारावी सखे तुजशीं ॥ ३ ॥

चाल । मोराचें चांगुलपन झुरे पाहुन आपले पायासी ।
जी गत बाई माझी हिकडं ती गत असल तिकडं त्यासी ।
ही काया हंसाविण ग ।
कौत्री फे ( ) फळावाचून ग ।
स्वामीविण मंदिर सुनें ग । धुंडाळी दिशा दाही भला ग ॥२॥

कोणासी दावूं सोळा शृंगार करून लेणं ? ।
दैवा निघेल ग ऊन । (?)
लोढतिवाशे रंगम्हालीं ग जमखाने ।
सख्याविण अवघें सुनें ।
अतां नाहीं मजला या मंदिरीं ग रहाणें ।
गावाबाहेर माझें ठाणें ।
चाल । धनदौलत हीं अवघी द्या लुटुन ब्राह्मणासी ।
हत्तीघोडे हरणे रावे द्या सोडुन पक्ष्यांसी ।
जरीठाणं माझं घ्या ग । सखयांनो तुम्ही ल्या ग ।
खुशाल अपले घरीं रहा ग । आता मी वैरागीण बाई ग ॥ ३ ॥

असें ईश्वरा तुवा माजें काय केलें ? ।
पूर्वसंचितीं हेंच लिहिलें ।
स्वामी माझे माशिं कां अंतरले ? ।
जिवा लागले प्रेमभाले ।
दत्तात्रिया गुरूचें सुमरन केलें ।
चित्तमन लक्ष येक धरलें ।
चाल । कवीराज महाराज **बिरोबा** बोले नारी आले साजण मंदिरीं ।
खुशाल मौजा कर सुंदरी ।

सिदराम लहेरीचे ख्याल चुनदे। गलीत हो कविराज विलंदे। धोंडी फकरू कवि बाजींदे । तात्याजी खंडु खुब तर्क करून गाई॥ ४॥

सुंदर–सुंदरा, सुंदरी.

* * *

## सखाराम

### लावणी १३४ वी

आम्ही राजहौंस पक्षी सहज आलों मुंबई शहरासी ।। धृ. ।।

पाहिलें स्वरूप मनोहर आंगावर ज्वार फार सजली । कोण्या राजींद्राची नार बत्तीसलक्षणी कनकपुतळी ? । कशी ठुमकत चाले जपुन, गांठ आड अकस्मात पडली । चाल । सखे मर्जी आमुची आहे । त्वां धरावा आमुचा स्नेहे । मनीं नको धरूं सौंशय । सांग रंगमहालीं कधीं नेशी ? ।। १ ।।

तुं अगदींच दिसतीस लहान नहाण आलें वरुषा-महिन्यांत । आंगीं विषयबाण चेतला त्वरीत ने आपुल्या महालांत । चाल । जीव तुजवर झाला खुशी । लागलें लक्ष तुजपाशीं । आहे ईश्वर याला साक्षी । देखिली रंभा तुज जैशी ।। २ ।।

या दों दिवसांचा भर निघोनी जाइल आतां सखये । भ्रांशिली मती कां तुझी ? गांठ एकांतामधीं पडु दे। जोबन खुब आले भरून नवतीचा रंग खुलुंदे । चाल । आम्ही रोखून तुजशीं थाट । नव्या रस्त्यामधीं पडली गांठ । गळ्यामधीं कंठा दुहेरी थाट । मिठी मारावी सखे तुजशीं ।। ३ ।।

बोध जाला चित्तापासून सखा रंगमहालीं तिनें नेला । उभयतांची जाली खुशी, आनंदें विड्या देती त्याला । म्हणे **सखाराम** राघो मुशाफर पंची समजावीला । चाल । ठेवावी ममता बरी । अशी माझी विनंती स्मरी । कुशा छंद गातो तरा खासी ।। ४ ।।

* * *

## बाबू सवाई

### लावणी १३५ वी

उठ चातुरा, उभी भिजले द्वारीं ।
नाहीं बोलतां रात्र चालली सारी ।। ध्रु. ।।
पांयी पैंजण वाजती रुणझुण । येळ गस्तींचे पारे रे झाले दोन ।
कांहीं बोलतां लोक येती धावोन । रात काळोखी, मला पडेना चैन ।
तो भ्रतार निजला रे पलंगावरी ।। १ ।।
सारा शृंगार भिजुनी झाला नास ! कुंकु पुसुनिया, भिजले रे माझे केस ।
शेला बारिक चिकटला अंगास । हात कापती, मुंग्या आल्या पायास ।
तो भ्रतार रागें भरेल तरी ।। २ ।।
हातीं तवक घेउनि उभी कामिण । काडी कुलुप आसरे माझी सजण ।
**बाबू सवाई** रंग तंग मस्तान । रंग सालंगर जाणेल मनींची खुण ।
ते प्रीतीची लाउनि तकमक दोरी ।। ३ ।।

गस्तींचे पारे–गस्तींचे पहारे; तकमकणें–कासावीस होणें, कलकलणें; प्रीतीची तकमकदोरी इ०–प्रीतीच्या दोरीचा फास विव्हळ करणारा असतो, तडफावयास लावतो.

* * *

# आप्पा यशवंत

## लावणी १३६ वी

आम्ही आलों तुला पाह्यला, मुखडा दाऊं। नको तिंदा लाजत जाऊं ॥ धृ.॥

देवानं सार तुझी आमची ग पडली गाठ। शनवारीं पहिली भेट। अर्धी मुखडा दाउनी मागें फिरविलीस पाठ। पुढें गेलीस नीट नीट। खुणाविलीस पाणीवठ्यावरी बोलुनी दाट। तो मनांत राखुनी थाट। खाणखुण दुसऱ्यापासीं घेतलें नाऊ ॥ १ ॥

खाणखुण ज्यापशीं पोचविली सारी। तो प्रियकर आमचा नारी। त्याचे आमुचे येकांतीं तुजपरभारी। भाषण जालें बुधवारीं। घेतली शपत वाहुनी आम्हांस विचारी। मग पाडिलों अणिक विचारीं। भेटली समक्ष तूं पदर सरसाऊं ॥ २ ॥

तूं आपुली केवळ, नोहेस परकी कोणी। हितगुज सांगाया कानीं। आमी आलों मासला नवा वगाया छानी। करतीस लाजल्या-वाणी। लाविलेस जीवीं नेत्रांचे पटके दोनी। काळजांत पाणी पाणी। आम्ही दर्दी कराया गर्दी सरकुन येऊं ॥ ३ ॥

अशी भीड धरशील तर उपाय आमुचा नाहीं। केल्यापेक्षां भर पाही। आम्ही जरिपटक्याकडिले, तुं लगीसवाई। येकदांच फिरऊं द्वाई। कविराज **आपा येशवंत** ठाई ठाई। माहांसुर नौकेमधिं गाई। म्हणे हुसन छापुन ? करे वालीवर लाऊं ॥ ४ ॥

दाऊ–दाव, दाखव; पटके–फेंक, हात; नेत्राचे पटके–दोन नेत्रांच्या भाल्याच्या फेकीनें जिवाला दोन जखमा केल्यास; महासुर–महशूर; नोक लाऊन—ऐटीनें, नोकझोकांत.

* * *

## लावणी १३७ वी

मंगळधामा श्रीरामा, कधीं मजला भेटसी ? ।। धृ. ।।

कैकेयीच्या सत्य कराया पितृवचनातें मानी । चामरें, छत्रें दिधलीं भरता भक्त अभिमानी । अयोध्या सोडुनी जाले वैराग्य चापपाणी । मुगुट कुंडलें काढुनी वल्कलें वृक्षाचीं थाटसी ।। १ ।।

पतिश्रापें सीळा अहिल्या वनीं हो ती उद्धरली । या अरण्यवासामाजीं जय शुर्पनखा वधिली । सुग्रीवास वाळी मर्दुनी त्वां कीस्कींदा दीधली । स्वामी मारुतीच्या राया मम हृदई दाटसी ।। २ ।।

पाषाण तरले नामें सिंधुतुन उतराया । विभीषणासी लंका दिधली हा रावण मुर्दुनीया । तेतीस कोटी सोडविलें बंदींतुन देव जया । हा आनंद सर्वत्रांचा........वाटसी ।। ३ ।

शत्रुचा क्षयो कराया अवतार धरिलासी । ऋषी ब्राम्हण जग रक्षाया जन्मला सूर्यवंशी । महाराज चापपाणी जय अयोध्यावासी । कवि **आपा येशवंताचे** दुर्गुण हे लोटसी ।। ४ ।।

क्षयो—क्षय, नाश.

* * *

# केशव संत

## लावणी १३८ वी

धन्य संन्यासी महातापसी योग्यांचा राव । मुगुटमणी महाराज सुत व्यासांचा शुकदेव । इंद्रपुरींत कीर्तमात अद्‌भुत फांकली । तेतीस कोटी देवसभा इंद्राची घनवटली । थकीत सुरवर गण—गंधर्व दीन-

वदनें जालीं । त्या समई कशी युक्त आठवली । तेव्हां इंद्रानें रंभा आणीवली । काय तियेसी आज्ञा केली ' सिद्धवनासी जाई वहिलां । तप शुकदेवा ढळावें । कार्यसिद्ध करून यावें ' ॥ १ ॥

रंभा विलासी बोले तयासी ' ऐक इंद्रदेवा । माहां माहांसीद्ध ऋषी अगाध देवाधिदेवा । कामाचें पाई चुकला नाहीं शंकर माहा-देव । बोले शुकदेवा कोण केवा । पाराशरासी भग्न घडावा । चंद्र गुरुपत्नीसी न्यावा । रुक्मांगद आणि नारद पाहावा । ऐसे किती एक सांगावें । ब्रम्हदेव कन्ये धरूं धावे ' ॥ २ ॥

घेउनी आज्ञा केली प्रतीज्ञा ना त्याला मोहीन । तरिच रंभारत्न, नाहीं तर धीग माझें जिणें । करून जडीत वस्त्रें भूषणें ल्याली लवकुन । डोलत डोलत गजभारानें । संगीत सुरवर करी गायन, रागज्ञान तानमान । दाखवी कवतुक हावभाव । ' तापशा, नयन उघडावे ॥ ३ ॥

'सांडुन कां निष्काम जालास योगिया । सहा शट् अठराचा चारी वेद, करुनीयां । जपतप साधन केलें क्ष मुद्रा लाउनियां । काम चेतलावो, नये आवराया नेटकी जाया । आली या ठायां तुसीं भोगाया आपुली काया । निजसुख स्त्रियेचें पाहावें । नाहीं तरी जन्मा कां यावें ? ' ॥ ४ ॥

निष्ठुर वचनीं ऐकुन कानीं तेव्हां शुकदेवानं । पाहे कौतुक, उभी सन्मुख, देखीली कामीन । दीप्ती झळाळी कांती कोवळी लोपे नयनानें । 'सांग लौकुन गे कोणाची कोण ? । येथें यावया काय कारण ? आम्ही तापसी योगी दारुण । पाहु नयें स्त्रीयेचें वदन । भगवंतापासी होइल हाण । लौकर उठोनीयां जावें । आणखी नेणो तुझा भाव ॥ ५ ॥

'तुझे प्रतापें बुडाले पापें बहुत थोर मागें। अहिरावण' महिरावण कीचक बंधु अवघे गे। सुंदोपसुंद दोघे बंधु नाहीं चुकले गे। हो हो दूर गे परती सर गे। भस्म जाला भस्मासुर गे। चंद्र कलंकी जाला वर गे। भगें इंद्रासी जाला दाग। कांहीं न चले उपाव। ऐसी स्त्रियांची माव ॥ ६ ॥

'चतुर सुंदर रूपनागर गोमटी। जसें इंद्रायण गोजिरवाणें आंत गे कडवट। तैसें शरीर तुझें अघोर दुर्धन अचाट। अमंगळ पोट नर्क किड्यांचा भरला सांट। मळमूत्राची अवघी मोट'। तेंव्हां रंभेला विशाद वाटे। घेउनी शस्त्र विदारिलें पोट। वनीं सुगंध न समावे। जैसे अष्ट गंध बरवे ॥ ७ ॥

बोले शुक योगी रंभेलागीं, ' ऐकावी मात। बारा वर्षें नर्क भोगिला माते उदरांत। असें जरि ठावें असतें तरी तुझ्या जन्मतों उदरांत। कां गे लज्जीत तूं मनांत?' शुकदेवानें जोडिले हस्त। 'तुझा बाळ मी शरणांगत। पाहा पाहा रवी पाश्चिमे उगवे। नेमा न चळे शुकदेव' ॥ ८ ॥

रंभेचा गर्व हरला, सर्व रंग जाला फीका। नीर्लज्यावाणी लागे चरणीं उगीच आलें कां। केला उपाव सिद्धी न पावे येउनी ठकलें कां?। रंभा गेली वो रंभा गेली स्वर्गलोकां। तिची त्रिभुवनीं जाली टीका। म्हणे **केशव संत** साधकां। कवी अवधुता शरण देखा। कवित्व मतीनें वदलों टीका। ऐसा रचिला कटाव। पाहुन घ्यावा अनुभव ॥ ९ ॥

कीर्तमात–कीर्ति, बोलवाला; थकीत–थक्कित, थक; वहिली–प्रथम, तावडतोब; केवा–पर्वा, मातब्बरी; क्ष मुद्रा–ख मुद्रा, खेचरी मुद्रा. इ० योगांतील एक मुद्रा. दृष्टि भ्रूमध्यावर नेहटून इडा, पिंगला व सुषुम्ना या तीन नाड्यांचा मार्ग जें

कपाळाच्या आंतील छिद्र, त्यांत जिभेचें टोंक वळवून तो मार्ग रोखण्याची क्रिया ही मुद्रा सर्व मुद्रांत श्रेष्ठ आहे. नेटकी-सुंदर; लौकुन-लौकर; हाण-हानी; वर-आकाशांत; माव-कपट; रूपनागर-रूपसुंदर; इंद्रायण-कडु वृंदावन किंवा कवंडलाचें फळ.

* * *

## बापू

### लावणी १३९ वी

नाजुक रुपडा बुंद मुखीं भर मदनाची लाली । नैनांतुन मारी लटक झटक मोहनी जीवा घाली ॥ धृ. ॥

मागें खोपा, कुरळ केश डोइला गे भांगाचा । चालतसे चहुकडे सुगंधी सुवास अंगाचा । भवां कमानामधीं लपविला चंद्र तारकेचा । झुमकेदार नथ नाकीं, चोळीचा रंग अंजरीचा । चंचिपाटी झगझगीत, हार कंठा भर मोत्यांचा । बहु नाजुक सकुमार, होई जीव पाहा तल्लीन त्याचा । भली गे निपजलीस कोठुन, नटुन मारिलें इष्काखालीं ॥ १ ॥

सुरतपाक चमकसी तरुणीपण जोम नसे टळला । तनु शुद्ध कांचनी निमोणा फरमासी ढळला । झुणेवर पातळ पैठणी झोक पुढें जमला । ठमक ठुमक चालणें रंभे पैंजणीं नाद घुमला । बघुन जालों दंग गौस गौसेना यत्न खुटला । बसुन अस्कीचा तीर अंतरींचा पडदा फुटला । तुजसाठीं मी लढुन भिडुन देईन प्राण हालीं ॥ २ ॥

अंबारीचे कळस तसे छातीवर गेंद पाहतां । असे नवतीचे कोंब नाहीं पाहिले उभे राहातां । दों दिवसांचा रंग सखे मागुता

नये घडतां ॥ कोण पुसेना तुला जरा जोवन ढिले पडतां । भल्या भल्या पतिव्रता पाहिल्या परपुरुषा रमतां । समजुनी करीं विलास सखे आमुसी धरिं ममत्ता । नेघे उघड मन करून दुरुन दुरुन खुणाविलें आशा जाली ॥ ३ ॥

लागे ठसका तिला गोड वोलतां उपजे माया । वीर्यताप चेतला भ्रांती पडली भुली रे माया । मुशाफरासी म्हणे तुम्ही मंचकीं या बसा या । घालुनी गळ्यासीं मिठी भोग भोगिती गोष्टी छाया । केली खातरजमा व्यास देवें जसी जैमीनी या । इतरांची काय कथा नारी मोहिती भामया । बापु म्हणे दुर्जना गुरूचें नाम घाला घाली ॥ ४ ॥

भवाकमानामधीं—भवयकमानामधीं. भुवई हेंच धनुष्य, धनुष्याकार भुवयां-मध्यें; चीचपाटी—चिंचपेट्या, एक अलंकार विशेष; निमोणा—नमुना; झुणा—एक कापडाचा प्रकार; फरमासी—मनपसंत; गौस गौसेना—गवस गवसेना, उपाय सापडेना; अस्कीचा—इष्काचा, प्रीतीचा; हाली—हल्लीं, हल्ल्यांत, हल्ला चढवितांना आमुसी—आमच्याशीं, आमच्या ठायीं; भामया—भामाचें अनेकवचन.

* * *

## बाळु नारू

### लावणी १४० वी

तूं नार बतीसलक्षणी सखे साजणी राजअंगणीं राहिलीस उभी करुनी शृंगार । चित्रांतील पुतळी तशी दिसे सकुमार ॥ धृ ॥

लावण्य रूप राजसे, तुजे गे नारी असे, रत्नदीप दिसे, जसा गे नारी रंगमहालीं आयना । सुंदर कांता तूं तशी राजीव नयना । नारी तुझे सुरतीचा डोळ आहे बीनमोल, आम्हां संगें बोल, पाहाती

तुजकडे सकळ सेना । मंजुळ शब्द बोलसी जसी मैना । तुला पाहून जाला येक महिना । येकांत घडों येइना । मन तुझें स्थीर राहिना । तुजसाठीं बांधिल्या पैना । गेली होउनी विद्ध नार मोहना । तूं तशी हेत मनीं धरून, प्रीत हे करून, उगिच भरिं भरून दिवस चाळवण्या लाविशील फार । रंग गेल्यावरी नाहीं कोणी फुकट पुसणार ॥ १ ॥

शृंगार रोज नित नवा तूं करितेस जेव्हां दीसतेस तेव्हां जशी गे इंद्राची रंभा पुतळी । वर्णितां रूप वनिता राजसबाळी । द्वादश वरुषांचें वय, दिसत आहे सोय, नेणतपण होय, निपट कांचन काया कवळी । धरी धुंद गेंद जोबन उरस्थळीं । तटतटीत आंगीं कांचोळी । शृंगार करी वेल्हाळी । भांग टिळा तेज झळाळी । बारिक कुंकवाची चिरी लाविलीस बरी कपाळीं । वरी नैनीं काजळ ल्याली सोगेदार । नाकामधीं नथ सरजाची, झुब्बके चार ॥ २ ॥

बाळ्याबुगड्या करुनि फुलवार, मोतीं सरोसर झुब्बदार तानवडे कानीं । मुखीं विडा रंगला, हंसू लाल वदनीं । त्या चितांकाचे तळवटीं, ल्याली चिंचपेटी, शोभे हनुवटी दिसे गोमटी, जशी चंद्रापाशीं चांदणी । जौमाळ दुलड हार माणीकमणी । दंडी बाजुबंद हे दोनी । हातीं चुडा तरेदार कंकणी । नेसली शालु पैठणी । पदराचा झोक टाकुनी । चाल चाले जशी वीज गगनीं । वांक्या सांकळ्या आणि पैंजण वाजे रुणझुण । चाले ठमक्यानें राजअंबरी डोले गजभार । हुणवट बिचव्यावरी जोडव्यांचा झणकार ॥ ३ ॥

तुझें दिव्य रूप चांगलें दृष्टीं पाहिलें, चित्त वेधलें, म्हणुनि हटाकिलें आम्ही तुजसी । लाउनी प्रीत चाळवण्या कां करिसी ? । तूं खरें सांग साजणी मनापासुनी, प्रीत करुनी पदर धरुनी घरा नेसी । येकांतीं

हेत मनींचा कधीं पुरवीसी ? । सुंदरा म्हणे सजणासी । घ्या वचन दिलें तुम्हांसी । आजी यावें माझ्या मंदिरासी । मनीं इच्छा माझी ऐसी । जाला रंग भोग सजणासी । कवी संतलींग चातुर ब्रम्हअक्षरे दैवीं लिहिल्यावर नाहीं चुकणार । **बाळु नारू** म्हणे त्यानें तिचा घेतला रंगभार ॥४॥

पैना–पैजा; जौमाळ–जवाची माळ; हणवट–दागिनाविशेष; चितांक–दागिनाविशेष.

* * *

# राघो मुशाफर

## लावणी १४१ वी

शोक करित्ये कोमळ भाजा । दृष्टी पडो गुणि राघव माझा ॥धृ.॥

वय माझें द्वादश वरुषांत । रति गजबजली हो जाई भरांत । उभी होत्यें आंत माजघरांत । सय जाली कीं हो, आल्यें दारांत । या वेळीं असता गे मंदिरांत । भोगित्यें आवडी हो सुख शरीरांत । चळ भरला, मुकलें कीं पति–तेजा ॥१॥

तीन बंगले माझ्या ग पतीनें । बांधुनी ठेविले हो हर युक्तीनें । तीन ठाई तीन खासे बिछोने । लोड तिवाशा हो बुंद जमखाने । पडदे जरीबाब सलोने । आंत बसले कीं हो बहुत मजेनें । हुदकाला (?) कोणासंगें करूं मौजा ? ॥२॥

दुःख आपुलें तरी सांगुं कुणासी ? । किती आवरूं गे आतां या मनासी ? । अंतरले कसे राव आम्हांसी ? । कां चुकविलें हो मज गरिबाशीं ? । शोध करा, भेटवा गे हंसासी । मी रत जाहालें हों या स्वरुपाशीं । श्रम हरति पाहतां गे क्षणिं राजा ॥३॥

पावन जाले देव मल्लारी । अवचित आले हो साजण दारीं । लगबग धाउनि गेली नारी । भेटे कडाडुनि कवळुनि धरी । नींबलोण मुखाउनि उतरी । आतां नका जाऊं हो मुलुकगिरी । **बाळ राघो** म्हणे, सेजेवरी रम जा ॥४॥

भाजा–बायको, पत्नी; तिवाशी–तक्या, गिर्दी; जमखाना–सतरंजी; जरीवाव–जर्वाबी, भरजरी;

* * *

# सुभान

## लावणी १४२ वी

रुक्मिणी म्हणे कंसांतका यादवनायका लिहिली पत्रिका, पाहा वाचून् । भावानें दिलें शिशुपाळा, धांव घननीळा, नेई मज हरून् ॥धृ.॥

माझा बंधु रुक्मया खळ परम चांडाळ, त्यानें शिशुपाळ वर योजिला । भीमकाचें राहिलें बळ जाला निर्बळ, पुत्र मातला । हें नये माझ्या विचारा, भुवनसुंदरा, करावी त्वरा, उशिर लावीला । रात्रीचा दिवस करून यावें धावून आमुच्या नगराला । तुं म्हणशील मोठी धीट, मानिशील वीट, तरी ही गोष्ट न ये कामाला । तुजवांचुन हे नृपवर पित्याबरोबर मानित्ये त्याला । ये ऐशा समयामधीं कृपानिधी भक्तवछ्छला । साधी लग्नाची हे घडी घालिसी उडी दीनदयाळा । तरीच कार्य साधेल, हेत पुरेल, घालीन माळ हो । आमुचा नवस देविसी आज पुजावें हो । गांवाबाहेर अंबिका, तेथें तुम्ही यावें हो । सकळा दृष्टीवरी नमी जिवेंभावें हो । खरें सांगत्यें, सत्य मानित्यें चित्तापासून । याला साक्ष सूर्य प्रत्यक्ष लक्ष लावित्यें जिवापासून ॥१॥

कमलोद्भवें पत्र वाचिलें, ध्यान लागलें चंचळ अनिवार । केधवां लागेल भ्रांत फीटेल, करी विचार । चटपट जिवा कर्मेना, सुदेव ब्राम्हणा बोले सत्वर । कैसें आतां करावें ? सत्य सांगावें नेम उत्तर । चैद्यादि मागध वीर आले नृपवर मिळोनी थोर थोर रथी झुंझार । येकला येउं कीं सांग कसा तो संगें घेऊं दलभार ? । सुदेव म्हणे श्रीहरी, चला लौकरी, उशिर लावीला । लौकिकीं भाव दाविसी, विचार पुससी अज्ञानाला । तूं जगदात्मा श्रीपती, चैद्य ते किती वधिसी येकला । आतां केशवा माधवा, चला लौकर । मागुन येईल अवघा तुमचा दळभार । मार्ग लक्षीत असेल रुक्मिणी नार । असें ऐकुनी मनमोहन रथीं जाऊन । आरूढला द्विज घेऊन जगजीवन निघे तेथून ॥२॥

कौंडण्यपुर भीमकानें शृंगारुनी स्वस्थ बैसला । वराडी मुळ धाडिलें, लग्न काढिलें अस्तमानाला । चहूं देशींचे ब्राम्हण आले धाऊन नृपनंदन विनवी त्याला । सत्वर लावा हळदी, बोलवा आधीं भीमकबाळीला । मग बारासोळाजणी मिळोनी कामिनी म्हणती, बाई चला । भीमकीचें मनीं घननीळ, करी तळमळ, करवत जिवाला । लावण्य कनकलतिका आणुनी कौतुका स्नेहें न्हाणिली । वेदघोष करिती ब्राम्हण वाद्यें आणुन हळदी लाविली । वाजती नौबती चौघडे घाय लागली । वराडी आले दम—घोश जरासंधादी । पुजुनी सेवती ? जानवसा नगरामधीं । आला वनमाळी साधुनियां ऐसी संधी । सुदेव ब्राम्हण पुढें जाऊन बोले हांसून । रुक्मिणी पद्मलोचनी चक्रपाणिला आलों घेऊन ॥३॥

* * *

# लहरी सिद्राम

## लावणी १४३ वी

स्वप्नीं पुरुष भोगिला हो कीं सांगे चित्रलेखेला ।
मूर्त गोजिरी, तनू सावळी दृष्टी ग म्यां पाहिला ।
वाणासुराची कन्या उका होती चतुर पद्मिनी ।
दिव्य कांती सुकुमार स्वरुप अनिवार बत्तीस–लक्षणी ।
रत्नजडित रंग महाल लाल हा बंगला दिला बांधुनी ।
चित्ररेखा उका दोघी होत्या दिवस करमोनी ।
फुलपुष्पांची शेज करोनी निजल्या ग सुखशयनीं ।
स्वप्नीं अवस्था झाली ग भोग दिला अनिरुद्धानी ।
दचकुन उका उठली । पाहे भवतालीं ।
जिवलग जिवाचे ख्याली । टाकुन गेले येकली ।
उठ ग चित्ररेखे, माझ्या जिवीं चुटका लागला ॥ १ ॥
चित्ररेखा पुसे उकेला, काय झालें तुजप्रति ? ।
नटनाटक सुपात्र देखिला पुरुष सगुणमूर्ति ।
तेव्हां चित्ररेखेनें घेतली दौतलेखणी हातीं ।
सप्त तीं द्वीपें नवखंड पृथ्वी लिहिली ग भिंतीवरती ।
शहाण्णव कुळीचे राजे लिहिले पाहुन तर्कामती ।
तेव्हां उकेला हातीं धरुनिया दावी ती तिजप्रती ।
ती म्हणे हात नही करोनी साजणी ।
चित्ररेखा तत्क्षणीं साजणी । दावी पाताळ लोक लेहुनी ।
पुढे स्वर्गलोक लिहिले उका म्हणे नाहीं हीर
गीर गोला ( ? ) ॥ २ ॥
स्वर्गमृत्युपाताळ तिन्ही ताळ म्या ग लिहिले ।

नाहीं तिच्या मनासी कोणी ग ह्या चित्र मनीं आलें ।
तेव्हा चित्ररेखेनें विचार करून द्वारके लिहिले ।
छप्पन कोटी यादव लिहिले ।
बळीराम काढले लोक अनिरुद्ध चित्रमाधिं काढिले ।
हस्तकीं धरून उकेसी ।
दाविले अनिरुद्धासी । आली मुर्छना, पडे धरणीसी ।
तनू व्याकुळ झाली, कव घालाया गेली चित्राला ॥ ३ ॥
प्राण चालला, व्याकुळ झाला, भेटीव ग सखयाला ।
तेव्हां चित्ररेखेनें आकाशपंथ मार्ग लक्षिला ।
पळ घडि न लावतां सहस्र योजन गेली द्वारकेला ।
तसाच पलंग घेऊन आली अनिरुद्धाला ।
तेव्हा उकेला आनंद झाला, सूर्य प्रकाशला ।
जसा पुनवेचा चंद्र उगवला, पलंगीं उठुन बैसला ।
अनिरुद्ध नेत्र उघडून पाहे कामिनी ।
उका चित्ररेखा दोघीजणी हात जोडुनी ।
लागती त्याचे चरणीं ।
तेव्हां प्रद्युम्न पुत्र बोलला, कसें तुम्ही आणिलें मजला ? ॥ ४ ॥
मी तुमची वल्लभा प्राणप्रियकरा सगुणभास्करा
कर जोडून आर्जविला प्रद्युम्न—पुत्र राज तो हिरा ।
उठा आतां लवलाही, स्नान तुम्ही करा ।
नाना परी पक्वानें करुनी उका वाढी सुंदरा ।
शेज मंचकीं आरास केली फुलपुष्पांची तऱ्हा ।
नेउन बसविला मंचकीं, लावी मोत्यांचा तुरा ।
बहु हर्ष तिचे अंतरीं । भोगविलास नाना परी ।
तो अनिरुद्ध जरवे (?) तरी । राहिला गुंतुन मंदिरीं ।

त्यानंतरा हे कवि करीती चित्रचातुरी खरी ।
**सिदराम लहेरी** म्हणे असा तो तुरा नवरा कलगीला ॥५॥

उका–उषा; लिहिली–चितारली; तर्कोमति–मनाचे तर्क करून; हात नही करोनी–'नव्हे' अशा अर्थानें हात हालवून; तिन्ही ताळ–स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक.

* * *

## लावणी १४४ वी

विनवी सख्या, पहिल्वानकी किति वर्स करिता? सांगा मजपशीं ।
सहज आले रंगमहालांत, मजला आवळुन धरतां कशी ? ॥धृ.॥
लगन हो झाल्यापासुन आजपर्यंत होता दुरदुरुन ।
तेव्हां होतें अज्ञान, सात वर्सांची मी होतें पूर्ण ।
तशीची बोळवण करून आणली मायबापाचे घरून ।
झार्ली पाच वर्सें न मजला × नेलें परतून ।
सासुसासरे जावानणंदाचें राहिलें मन धरून ।
माझी ळळापळती, गेलें माहेरचें सुख विसरून ।
धाकटी नणंद बोलत होती । तुमच्या रंगमहालाचं किती ।
चित्र काढलें भिंतीवरती । तें ऐकुन ठिवलें म्या चित्तीं ।
वारासारा करून आले येकांतीं राव पहायासी ॥ १ ॥
बाळपणापासून आम्ही ग नारी तालीमखान्यामधीं ।
काच्या भिडवून कसरत काढीत होतों आखाड्यामधीं ।
मुगदुल लेजिम फिरवित होतों दोन्ही ग हातांमधीं ।
दांडपट्टा नारी खेळत होतों आम्ही ग गड्यांमधीं ।
बदाम–चण्याची दाळ भिजवुन खातों ग दुधामधीं ।
नित हा अमचा खुराक दुध, आम्ही आहों ग जोरामधीं ।

गुरुचें वचन ऐकून । राहिलों ग धीर धरून ।
पळ होतों ग दुर धरून । पंचविसी आली ग भरून ।
कधीं येकांतीं नाहीं भेटली ग प्रिये तूं आम्हांसी ।।२।।
जसा कर्दळीचा गाभा, तनु माझी ही नव्या नवतीची ।
मी कोमल सकुमार, काया ही ल्हान माझ्या वयाची ।
बळत्कार करुं नका, सख्या ही घडी नव्हे भोगाची ।
जाउन खालतीं पाहुन येते, आण तुमच्या पायाची ।
सासुसासऱ्या जावानणंदा तसे दीर भावजयाची ।
येइल कुणी अवचित, कडी लावुनी येते दाराची ।
का अधीर इतके तरी ?। सारी रात आहे बारी ।
निजा घेउन शेजेवरी ।
घरची जागी माणसें, अतांची घडी टाळा हरकशी ।। ३ ।।
बहु काकुळती येऊन सखयासी सुंदरा अर्जवी ।
मी तुमची वल्लभा, माझी करुणा येउंद्या कांहीं ।
तशिच सोडून दिली, कानोसा घेत गेली ठायीं ठायीं
बंदोबस्ती करून घराची चढुन आली लवलाही ।
तेव्हां देखुन, प्रियानें अलिंगुन धरली तिशीं हृदयीं ।
कवळी माझी काया सख्या प्रीतीनें भोगावी ।
तो ज्वान जवान गडी । आली मदनाची हुडहुडी ।
केली सर्वांगाची घडी ।
घडिघडि येते हो काकुळती, जिवदान द्या हो सखया मशी ।।४।।
इच्छा पूर्ण झाली, कमळीणीवर भ्रमर लुब्धला ।
नव्या नवतीचा भर ज्वानीचा लुटुनशानी घेतला ।
जशी चाफ्याची कळी सुकली, मुखचंद्र उतरला ।
मुखमार्जन करून विडा गंगेरी मुखीं हो घेतला ।

हातीं घेउन दर्पण न्याहाळी ती आपले स्वरुपाला ।
भांग बिजवरा सर्व शिणगार तिनें हो सरसाविला ।
राजहंसाची हंसिनी । जशी हिऱ्यांतील हिरकणी
जे जवी ( ? ) देघे वसूनी ।
**सिदरामा लहेरी,** अरे तुऱ्यावर कलगी झाली खुशी ॥५॥

लळापळती–लाड, कौतुक.

* * *

## लावणी १४५ वी

घडि घडि घडि घडि कां तरी छळतों मशीं रे ? । अशी अन्यायी मी काय तुझी रे ? ॥ धृ. ॥

ऐशी मी लावण्ये नाजुक पुतळी । अंगि नवती भरज्वानी कवळी ।
जशी काय चाफ्याची कळी पिवळी । भ्रमरराया तूं ये रे जवळी ।
घेइ सुवास आतां तरी ह्या वेळीं । आल्या लहरी ऋतुसमय काळीं ।
काय तरी करुणा येउं दे माझी रे ॥ १ ॥

मी असतां नित तुमचे सेवेशीं । तरी कां अंतर देतां हो मशीं ? ।
कसे जातां हो तुम्ही परके अख्रिशीं ? । लावुनी करवत माझ्या जिवाशीं ।
चतुरपणाची नव्हे रीत अशी । अधिं वचनीं कां गोविलें मशीं ? ।
अर्जी परिसावी राजसा माझी रे ॥ २ ॥

चित्त मनरंजना अरे मनमोहना । माझ्या रे जिवींच्या जाणसी खुणा ।
अशा हो मानसांतील कल्पना । मारुनी णत्रंत ( ? ) तुमच्या त्रासेला ।
अशी कोण रांड ही तुमच्या हो नेमा । सादर होईल सेवेसी जाणा ।
अशी कोण ती सर करील माझी रे ? ॥ ३ ॥

अज्ञान तर म्हणे अशा या नेमासी । नारी चुकुं नको त्याच्या सेवेसी । बहु रितीनें कीं प्राणसख्यासी । समजावुन नेला रंगमहालासी ।

जाइ जुइ मोगरा तऱ्हा रे जिनसी । सुखासनीं मज भोगा विलासी । **सिदराम लहेरी** कवि राज विराज रे ॥ ४ ॥

तऱ्हा जिनसी–नाना जातीची, तऱ्हेची.

* * *

## लावणी १४६ वी

तुम्ही कल्पविकल्प सोडा सोडा हो रावजी सोडा सोडा हो । घ्या प्रेमसुखाचा विडा ॥ धृ० ॥

सत्रावी नागवेल पान आणली । देठ कल्पना शिरा काढली । चित्तचेतन हा चुना शांती म्या केली । सुपारी विघ्नाची फोडली । भाव वेलदोडा दोडा हो । झणिं म्या पाठविला विडा ॥ १ ॥

सात्त्विक कात निर्मळ, लाल केवळ । बोधभावाचे आणले जायफळ । अष्टपाकुळ कांदळ (?) । त्यामधें खेळे प्राणेश्वर नाभी–कमळ । त्या स्थानीं मन जडा जडा हो ॥ २ ॥

कुद (?) लवंग या तिखट । बहु निकट विवेकें धर धरले म्या वळकट । क्षमा केली प्रगट, घातली गांठ । तन्मय केलें म्या वळकट । ज्ञानाचा वर्ख दिला नीट । प्रीतीचा जोडा जोडा हो । झणिं म्यां पाठविला विडा ॥ ३ ॥

कवि **सिदराम लहेरी** कवीश्वर ज्ञानी । भेद विड्याचा गाइला त्यानीं । तुम्ही चतुरसभा चतुरगुणी । ऐका बसुनी, पिंडी प्रचेती पहा शोधुनी । सवाइ राघु फकरूचा जोडा जोडा । झणिं म्यां पाठविला विडा ॥ ४ ॥

भेद–रहस्य, रूपक.

* * *

## लावणी १४७ वी

लक्ष्मी फाकडी भली छबली बनली ग । बऱ्या ग तुझ्या गायनकलेच्या चाली ॥ धृ० ॥

वय वर्षे उमर पंधराची नवतीमधिं पुरी । जसा लोट द्रव्याच्या लहरी । खुब पाकसुरत अनिवार ऐन्यामधिं खरी । भली ग नारी मूर्त तुझी गोजिरी । तुझी चाल पाहुन अंबिरी । पडलों भरीं ग लुटपुट केलें त्वा नारी । कैकांच्या हृदयीं चुटका लावलास भली॥ १ ॥

पैठणी साडी नेसोनी झोक लावुनी । भला ग जरीपदर रुळतो धरणीं । किनखापी चोळी कसुनी । कुचाग्रें दोन्ही ग, जसे गेंद भाल्याची अणी । अंगावर कुंल जेरयान जरा न्हाउनी (?) । जडाव मोती हिरकणी । ओठ पवळी वेलीच्या परी बत्तीशी रंगली ॥२॥

पिशवाज जरीचा शेला अंगावर घेशी । तमाशांत उभी राहसी । जसी इंद्राची रंभा नार तूं होशी । सुरतालबंदी खुब धरशी । असे कैक पहायासी तुला येती नारी हौशी । मजलस खुष तूं करशी । चौगर्दा लालीलाल गादी त्वा केली ॥ ३ ॥

ह्या ठाण्या शहराचे लोक अंबीर भले । तुझे ख्याल तमाशे केले । इंग्रजी रुपयांचे तोडे तुला दिले । दैवाचे लाल रंगीले । कवि **सिदराम लहरीचे** ख्याल रसीले । ऐकून कवि छेक झाले । तुरा कलगीवर शिरताजे तुझा एहिवाली (?) ॥ ४ ॥

अंबिरी-राजशाही; लुटपुट करणें-चंचल करणें, वेड लावणें; पिशवाज-कलावंतिणी नाचतांना जो एक विशिष्ट जाकिटवजा पोषाख करतात त्याला पशवाज म्हणतात; छेक-चकित, थक्क.

* * *

# रामा गोंधळी

## लावणी १४८ वी

काळोखी रात्र अंधारी, उभे कां द्वारीं ? । या मंदिरांत, येइल गस्तीची फेरी ॥ धृ. ॥

आज काय चुकलें सेवेला ? पदरीं घाला । तुम्ही दगलबाज, बेइमान कळुनी आला । संकेत मनाचा केला, भरोसा आपला । चोरुनिया जातां लावुन पदर मुखाला । आजवर प्रसंग राखिला, उभी सेवेला । कोणती सवत मिळाली तुमच्या सुखाला ? । चाल । भुललें मी चतुरपणा । साजणा । सांगा बाहेरच्या खुणा । साजणा । घालिते गळ्याच्या आणा । साजणा । उभयतां प्रीत चालवा, बसा शेजारीं ॥ १ ॥

तुम्ही दगलबाज, वेइमान राजीवनयना । मजविशीं कां हा कंटाळा घेतल्या पैना ? । मजपेक्षां मिळाली मैना सत्य जाणा । लागला छंद प्रीतीचा रंगरस सदना । तीनदां रुसतां मनमोहना, पलंगीं या ना । कुठवर समजाऊं ? चटक लागली प्राणा ॥ चाल ॥ चित्तांत येइल तें करा । साजणा । माझ्या कंठींचा हारा । साजणा । नाटकी तूं नट बावरा । साजणा । पसरितें पदर लाजुन, कुणाची चोरी? ॥ २ ॥

गुणी जना तूं गुणिजन राया प्राण विसाव्या । उभयतां दुष्ट कल्पना मनांत नसाव्या । इथल्या रांडा कळलाव्या आहेत ठाव्या । केल्या कर्मा शेवटास न्याव्या । रुपनादर तुमची जाया । येऊं द्या माया । पसरिते पदर, चला हो इष्क करूं या । चाल । आज पहा हो माझी मजा । साजणा । रात्रंदिवस गृहीं येत जा । सजणा । नाहीं आशा धनद्रव्याची, कुणाची चोरी ? ॥ ३ ॥

सांगते, राग सोडा हो, घरीं आज रहा हो । नाना परी दाविन मौजा, मला भोगा हो । मागणें हें मजला हो हृदयीं धरा हो । केल्या

क्रिया शेवटास न्या हो । मज कृपादृष्टीनें पहा हो, लोभ करा हो । रात्रंदिवस करिते अर्जी पयन धरा हो । चाल । चुकी घडली मजकून । साजणा । सांगा हो माझ्या प्राणा । साजणा । आज मनास मिळले साजणा । नाना परी उडवी मौजा करून बेभारी । **रामा** गाई छंद वंद अधिकारी ॥ ४ ॥

पैना—पैजा. रूपनादर—अति सुंदर रूप असलेली. बेभारी—बेवहारी.

* * *

## लावणी १४९ वी

रूप नादर त्याची मी मैना । पति मंदिरीं कां आज येइना ? ॥धृ०॥

कपटपणें कां राग धरूनी ? । नूतन नवती जाती विरूनी । भेट होतां आणा कल्प हरूनी । कां करितां मशिं पैना ? ॥ १ ॥

दास पदरची शोधूनी पहा हो । झाले फिदा, मशीं इष्क करा हो । गुप्त रूपें आज मंदिरीं या हो । झाली सख्या माझी दैना ॥२॥

राग धरूनी मशीं त्यागुन गेला । मज लालडीचा छेलछबेला । कोण सवत भुलली सख्याला ? । मी त्याची गुणगहिना ॥३॥

या रंगमहालीं शेज करुनिया । थाट करुनि उभी वाट धरुनिया । भोग सखा आज हृदयीं धरुनिया । **रामा** म्हणे सोड मनची कल्पना ॥ ४ ॥

कल्प—संशय.

* * *

## लावणी १५० वी

आज या हो मंदिरीं ।
थाट करुनि उभी मी द्वारीं ॥ धृ. ॥
गोड गुणाची मशिं प्रीत करावी ।

शरण आल्यावर माझी लाज धरावी ॥ १ ॥
चंचळ प्रकार सध्या मजवर कां केले ? ।
तुजला पाहतां तप्त शरीर हें झालें ॥ २ ॥
हितगुज माझें आतां किति समजावूं ? ।
धरुनिया पदरीं तुम्हां पलंगीं नेऊं ॥ ३ ॥
मी आसलाची आसलपण किति पाहतां ? ।
दाहा घरचीं दाहा द्वारें पुजितां ॥ ४ ॥
आलक आसल शोधुनी पाहावें ।
दासी पदरची मला पदरीं धरावें ॥ ५ ॥
नाथकृपेनें सखे भरपाई झाली ।
**रामा** म्हणे, तुझी मर्जी मिळाली ॥ ६ ॥

आलक—कपटी, लबाड, गुन्हेगार.

* * *

## लावणी १५१ वी

कां रुसतां हो आतां ? या रंगमहालीं । परगृहीं जातां होते लाही । सोसेना ही ॥ धृ. ॥

प्रीतविनोदें तुला । पदरी धरावें, छंद तुझा कीं मला । गुण आठवावे आज होऊं द्या सला । मज भोगावें, तरमळते मी गुणग्राही । मजकडे पाही ॥ १ ॥

आजवर ममता बरी होती सुखाची । लोळेन चरणावरी, आवड मुखाची । जाऊन धरिते करिं, वेळ रुताची । सेज फुलांची सुकली जाई । दर्शन देई ॥ २ ॥

सुखशयन दे करूं मरजी पाहाते । हेत मनाचा हो धरून लाजुन येते । कां जातां हो दुरून ? चला सदनातें । गुण किती आठवूं लवलाही ? । साक्ष विठाई ॥ ३ ॥

नार छबीली कीं उभी । थाट करोनिया दावी सखयाला खुबी । मन मोहोनिया अवचित उगवे नभीं । आनंदें करोनिया मजा उडवावी ठाई ठाई । रामा गाई ॥ ४ ॥

सला-सल्ला, समजूत, तडजोड.

* * *

## लावणी १५२ वी

सख्या चला बागामधिं रंग खेळूं जरा । सण शिमग्याचा करा ।।धृ.।।

लाली लाल करा पोषाग तुम्ही । रथ सजवून बहु गुणी । आज्ञा करा हो माझे लाल धनी । लाल नेसेन पैठणी । कंचुकी लाल घालिते, आवड मनीं । लाल शोभे तन्मणी । उभयतां जुहार अंगावर लाल शिरा ।। १ ॥

गुलालगोटा घ्यावा लाल हातीं । फेकून मारा छातीं । रंगभरी पिचकारी माझ्या हातीं । तरी करीन या रिती । जसा वृन्दावनीं खेळे श्रीपती । गोपी घेऊन सांगती । गुद होईल, हळुच हातीं कुच धरा ॥ २ ॥

बागामधिं आलों रंग खेळाया । करा कृपेची छाया । शुभ्र पातळ महेश्वरी नेसाया । माझ्या स्वामीच्या बसेन शेजारीं रंग पहाया । भोगा कोमळ काया । सख्या मी कमळण, तुम्ही भोग्या भवरा ॥ ३ ॥

रंग खेळले गोकुळीं वनमाळी । भोगून चंद्रावळी । त्यामधिं राधिका घेऊन जवळी । ती घटका या वेळीं । मला कवळुन धरावें, घ्या जवळी । शांत होईन त्या काळीं । रामजी म्हणे, कृपा करा सुगरा ॥ ४ ॥

गुलालगोटा—पातळ अभ्रकाच्या पोकळ चेंडूंत गुलाल भरून तयार करतात, त्यास गुलाल गोटा म्हणतात. शिमग्याच्या किंवा रंगाच्या समारंभांत हे गुलाल गोटे एकमेकांवर फेकून मारण्याची पद्धत असे. गुद होईल इ०—गुदगुल्या होतील

अशा हळुवार रीतीनें माझे कुच कुस्करा. भोग्या–भोग घेणारा. भवरा–भुंगा, भ्रमर.

* * *

## लावणी १५३ वी

नको नको तुझा संग राजहंसा । जीव जळून गेला, पाहसी तमाशा ॥ धृ० ॥

करुन थाट वाट पाहत बसले कीं । रत्न वाळूमधिं कसें गवसलें कीं । इष्कपेच माझे म्याच वळखले कीं । मोट बांधून दर्यांत लोटले कीं । इच्छा भरून आली, नेत्र दाटले कीं । माया नको लावूं, इष्क दाटला कीं । माझी दया येईल रूख मी सा ( ? ) ॥ १ ॥

शब्द मारपेच बोललीस साळू । स्नेह होईल हा वेळ नको कंटाळूं । इष्क गंजीफा हातीं नको चाळूं । द्यावी उजवी गुढी होऊन कृपाळू । नखाबोटांवर देह नको जाळूं । घे ग पदरामधिं होउन कृपाळू । वचन देउनिया करी गे खुलासा ॥ २ ॥

असे दाखले सांगतां कुणाला ? । जवळ बैसून मुख लाव रे मुखाला । जीव संकेतें केला हवाला । एक महिना आबोलताच गेला । काय केलें कमी ? सख्या खरें बोला । मी दासी होईन तुमच्या सुखाला । क्रिया द्या हो मला द्या हो दिल भरवसा ॥ ३ ॥

आडपडद्याचें बोलणें नसावें । दिवसरात्रीं मजपाशीं असावें । वचन देऊनिया कशास फसवावें ? । आम्ही भोळे, तेथें कपटी नसावें । मिठी मार, द्वैत मनांत नसावें । स्नेह झाल्यावर उभयतां रुसावें । **रामा** म्हणे, फेक इष्क हातीं फासा ॥ ४ ॥

संकेत–निश्चय; क्रिया–शपथ, वचन; फेक इष्क हातीं फासा–हातीं इष्क फासा फेक असा अन्वय.

* * *

## लावणी १५४ वी

जोडली प्रीत नको तोडूं सगुण गुणी राया। केली अर्पण तुला मी काया ।। धृ० ।।

आज काय चुकले सेवेला? पदरीं घाला। कोण्या गोष्टीचा अंतर पडला?। संकेत मनाचा केला, भरवसा आपला। दासी पायाची, पहा मासला। जीव जळून रक्षा झाला, सांगूं कुणाला?। जखमा झाल्याच्या या शरिराला। हितगुज कोणास मी सांगूं पंढरिराया?। सजणा ह्या गोष्टी जीवीं धराव्या ।। १ ।।

मी सासुरवासी गणगोताला त्यजिले। आपुल्या स्वरुपाला पाहुन रिझले। उभयतां प्रीत चालवा म्हणुन मी धजले। मर्जी रक्षितां मी पलंगीं निजले। शिवसांब सदाशिव फार दिवस मी पुजले। विषयाच्या घामानें शरीर भिजलें। आज धरा मजवरी करा कृपेची छाया। पलंगीं गुजगोष्टी मज शिकवाव्या ।।२।।

देह घातला करवतीं, मी सांगूं मजला संभाळा। दासी चरणाची पूर्ण कृपाळा। तुम्ही राजबनसी राजींन्द्रा कोमळ चंद्रा आज्ञा पाळा। माझा पाहून मराठमोळा। मनरतन गुणी माणसा भरोसा आपली कोमळ आमळा (आवळा)। भोग प्रीतीनें बसून मर्शी खेळा। मुखचंद्र तुझा सुकुमार वारंवार उभी मी पाहाया। नको कोठें जाऊं प्राणविसाव्या ।।३।।

धजले—सरसावले, उद्युक्त झाले.

* * *

## लावणी १५५ वी

आम्ही आबरूच्या नारी। सजणा, लाजून उभी मी द्वारीं ।।धृ।।

छेलबटाऊ मी मनमोहना। पाखव्रत मी आहे मनपवना। सुवासिक सुगंध गुलाब दवणा। अपहस्तें मज मारी ।। १ ।।

बाळपणाची प्रीत रसाची । आली घटका मज वेळ रुताची । भेट झाली आज या हंसाची । जाई सख्या परभारी ॥२॥

का करता हित्येय (?) कंटाळा? । नाजुक कांती तुझी वहु भाळा (?) । दुरुदुरु जाशी, नको करूं थाळा । झाले तुजसाठीं खोरीं ॥३॥

आज लई दिवसां मज सापडला । तुजला पहातां विषय चढला । जसा मृगाचा पाऊस पडला । सगनभाऊ अवतारी । **रामजी** ब्रीदाचा अधिकारी ॥ ४ ॥

पाखव्रत-पाक व्रत; पाक–शुद्ध, व्रत-नियम, भावार्थ शुद्ध चारित्र्याची. खोरी–नुकसान पोचलेली. नको करूं थाळा–थाळा–होरपळ–माझा उन्हाळा करूं नको.

* * *

## लावणी १५६ वी

पति नका जाऊं लष्करा राजआंबिरा ॥ धृ० ॥

आज या रंगमहालीं बसाया शेजारीं । तुम्ही गुलाब मी शेवंती माझे अधिकारी । घ्या नव्या नवतीचा बहार, कोणाची चोरी?।चाल। कां सोडून जातां मजला ? । या इष्कानें जीव झुरला । मी स्पष्ट सांगते तुजला । नका अंतर देऊं मजला । आज चला मंदिरीं, बसका दाविते न्यारा ॥ १ ॥

घरीं काय कमी दौलतीसी प्राणविसाव्या? । खुरबाण करीन जीव, भोगा कोमल काया । राव सोडा मनींची आढी, मी लागेन पाया ।चाल। मी शरण कोणासी जाऊं ? । येकली महालीं कशी होऊं? । मुख-चुंवन कुणास देऊं ? । पति जातो, कुणीकडे पाहूं ? । या मंदिरीं, कुणी नाहीं जिवाचा प्यारा ॥ २ ॥

या वतनदारीच्या पेश्यामधीं उमजावें । तुम्ही घरचे आदर (?) बरावर वचन द्यावें । मारिते गळ्यास मिठी, मला भोगावें । चाल ।

ही वेळ रुताची आली । होती शरीरामधीं काहली । झाली धुंद, मनीं घाबरली । राव वनसीनें पाहिली । कवटाळुनी धरितां हुषार जाला चेहरा ॥ ३ ॥

सिद्धनाथ शीघ्र कवीराज कवीश्वर ज्ञानी । नारिनें सजण राहविला कीं, जिवलग प्राणी । चाल । हरी महादु गुणी जन गातीं । बाळ्या वहिऱ्या मनांत झुरती । धोंड्याची तडकली छाती । रघ्या राम्या बाठेल गाती । **रामा** म्हणे होन्या, दूर होय नकट्या चोरा । पति नका जाऊं लष्करा ॥ ४ ॥

वसका—संभोगासन; बाठेल—बदसूर, अशास्त्रीय; होन्या–होनाजी बाळा.

* * *

## लावणी १५७ वी

लावून माया गेला राया । नूतन माझी कोमळ काया ॥ धृ० ॥

कर्मकथा ही सांगूं काई । या शरीराची होते लाही । राव राजेन्द्र माझे शिपाई । टाकून गेले, करूं गत काई ? । भागवून फसविली गाई । किति आवरूं ? आज जातें पराई । जा ग सख्यांनो, आणा तयाला । दृष्टि पाहीन मी लागेन पाया ॥ १ ॥

मी दिनवाणी, काय करावें ? । जाउनिया कवणासी धरावें ? । हें दुख आपलें किती अवरावें ? । धिक् धिक् माझें जिणें मरावें । धनद्रव्याला काय करावें ? । वाटे जीवा पतिराज असावे । मी थोराची कोमळ जाया । गर्वहरण होइल पतिराया ॥ २ ॥

त्याच्या चरणीं लोभ हा माझा । सोडूनिया कसा गेला राजा ? । पत्र पाठवा जलदी या जा । आम्हां सांगा कानिं आवाजा । जासूद जोडी जलदी जा जा । घेऊन या, किती पहातां मौजा ? । फुरफुरल्या आज दोन्ही बाह्या । तनमनधन हें त्याच्या ठाया ॥३॥

ऐकुन ग्लानी प्राणसखीची । खुणमुद्रा ठसली नारीची । स्वारी परंतली पहा रायाची । चमकत पुतळी रंग बहारीची । काय तारिफ सांगूं स्वरुपाची ? । भोग आतां, झाली अग्र देहाची । फडप्रसंगीं उभा गुणिराया । **रामा** म्हणे, कर अर्पण काया ।।४।।

भागवून—श्रमवून दमवून; पराई—तारुण्य; ग्लानी—विनवणूक, काकळूत.

* * *

## लावणी १५८ वी

सख्या तुम्ही चंद्र, मी चांदणी । प्रीत चालूं द्या सदा फिदा, किती करूं तरी मनधरणी ? ।। धृ० ।।

धरीन पदरासी एकांतीं । तीळ तीळ झिजलें मास, आशेची निराशा या वक्तीं । तुम्ही प्राणाचे संगातीं । बसुन ताजवा तोल बिनमोल तुझी कांती । कमळण पाण्यामधिं खुलती । सुवासिक सुगंध, बघुन चोचल्या घाईच्या वक्तीं । मनीं झुरते मोरावाणी । शांत बसा जयवंता बसा येकांत माझे धनी ।।१।।

शपथ घालीन रघुनाथाची । वेड लागलें मला, भुकेली तुमच्या वचनाची । चटक लागली या स्वरुपाची । घटकेंतून नऊ रंग वृत्ती चालवा उभयतांची । लाज कांहीं धरा क्रियेची । आशावंत मी कांता करिते आठवण रायाची । अलाबला किती घेऊं ? तन्मय झालें पाहुनी ।।२।।

भेट आज झाली लई दिवसा । लालाची लालडी सुंदरा टाकी उसासा । घातला विषयाचा फासा । क्रियाभाग कोठें राहिला, जाळीं गुंतला मासा । मला घेऊनी पलंगीं बसा । घ्या पानाची विडी घ्या, घडी मग मजवर रुसा । नका दुःख देऊं आस मनीं । मदनबाण चेतला बोलती रत्नाची खाणी ।।३।।

वसा पलंगावर मनमोहना, चकचकाट लखालोट अंगावर घालिते गाहिना । तुम्ही पोपट, मी मंजुळा मैना । कवळुन धरते आतां माझ्या मलयगिरी चंदना । आशा मज नाहीं तुमच्या धना । भोगा एकांतीं बसून, तुमच्या फेडिन कल्पना । समजला रतन हिरे खाणी । रामा गाती, गवळी भेती, थिजले पाहुनी ॥ ४ ॥

बघुन चोचल्या इ०—माझ्या घाईच्या वक्ताला तुमचे चाललेले चोचले पाहून फार राग येतो. क्रियाभाग—शपथप्रमाण; लखालोट—लंकालट, अमूप; गाहिना—दागिना.

* * *

## लावणी १५९ वी

पति टाकुनि जातो गावा । कुणि तरी राहावा । संचित कर्माचा ठेवा । काय तरी देवा ॥ धृ० ॥

सण दिपवाळीचा आला, आनंद झाला । इष्काचा डोम पाझरला, सांगते त्याला । पार नाहीं माझ्या दुःखाला, डोंगर कोसळला । चिकासी हुरडा आला, भ्रांत कशाला । कांहीं केलें कमी तुम्हांला धनद्रव्याला । मग प्रवास नको अपल्याला, घोर जिवाला । तुम्ही तिकडे, मी इकडे, कुणास करूं धावा ? ॥ १ ॥

तुम्ही सुखसमुद्र, मी कांता कोमळ तुमची । तुम्ही नेत्र, मी बाहुली, धुळ चरणाची । तुम्ही गुलाब, मी शेवंती, हवा बागाची । तुम्ही चंद्र, मी चांदणी सत्यवचनाची । तुम्ही जंबिया, मी तलवार धार पट्ट्याची । खुणमुद्रा ठसली ही अक्षर ब्रम्ह्याची । पोटच्या लेकरावाणी लोभ ठिवावा ॥ ६ ॥

जायचें नांव निघताच कपाळ उठते । उभें वारें सुटलें, तिळ तिळ काळिज तुटतें । हरणीला गवसलें फाशीं शरीर कंठते । तशी गत मज झाली, उभें वारें मज सुटतें । मुखचंद्र पहा ना, इष्कामधिं

लटपटते । ही मूठ भरमाची जनलोकामधिं फुटते । छातिसी छाती मिळूं द्या, बेत ठरवावा ॥३॥

आली ममता अंतःकरणीं सखीला धरुनी । मिठी घालुन पतिच्या चरणीं करी मनधरणी । पाहिलें उभयतां सखिला नेत्र भरुनी । जायाची कल्पना हरुनी मन थीर करुनी । नको करूं चेडे चेटुक करुनी भवते फिरुनी । **रामा** लिंबाची (?) धरणी विठ्ठल स्मरणीं । नित प्रसंगांत गुण घ्यावा हरि अठवा ॥४॥

उभें वारें सुटणें–वादळ वावटळ उठणें, त्रेधा होणें, औदासीन्य पसरणें.

* * *

## लावणी १६० वी

सखे दुःख सांगु तरी काय । गत या कर्माची ॥धृ०॥

घरामधिं मी नवि तरणी ज्वान । सुबक ठेंगणी छबकडी छान । मजला नूतन आलें न्हाण । हा दुस्मान परद्वारीं ॥१॥

धुंद कैफाची मदन आली तार । सळसळे गेंद उरावर फार । शरिरीं मदन अति करी कहार । चित ना पार, करूं काई ? ॥२॥

धनद्रव्याला मारुनी लात । वाटतें जावें धरुनी हात । अबरू जाईल जघन्यात । अथवा घात करू कांहीं ॥३॥

सांगा चहुकुनी चार । करावें मन माझें थीरगार । **रामा** म्हणे मोहिली नार । झाला प्यार पति ठाई ॥४॥

थीर–स्थिर; गार–थंड; प्यार–प्रेम.

* * *

## लावणी १६१ वी

काधिं बागांत चलाल ? । नेसन शालू, नखरा पहाल ॥धृ०॥

तुमच्या गळीं मी पडले । लाडक्यावाणी पर्दी जडले । इष्कानें मी अडले । लोभ करा, नेत्र चढले । काय अपराध घडले ? । हौस

पुरवा, आज सांपडले । मज लालडीचे लाल । तुम्ही तरी हातीं धरल्याची लाज ठिवाल ॥१॥

चवघीजणीचा थाट । येते अहो लाजून नटबाट । कां करितां बोभाट ? । कांता तुमची मी पहाते वाट । तुम्ही तरी नटबाट । एकमेकींचा पहा घाट । आज करिते जीव तुम्हांला बहाल । वसा शेजारीं पांघरुनी शाल ॥२॥

दुसरीसी एकांत । करतां पाहाते जळते मनांत । मजपेक्षां पाहण्यांत । नाहिं कुणि दुसरी या हो जनांत । अशा तरुणपणांत । भोग द्या, लाजूं नका मनांत । गेंद गुलाल पहाल । सख्या तुम्ही लुटवा नव्या नवतीचा माल ॥३॥

नारीनें पदरीं धरतां आली रंगबहारी । बागामधिं स्वारी । नेली कांता घरवारी । चवभवत्या नारी । मधिं खेळतात गिरधारी । गाइ रामा नवी चाल । करुनि दया बक्षिस द्या हो माझे लाल ॥४॥

नटबाट—लबाड; लुच्चा.

* * *

## लावणी १६२ वी

सोडि सोडि गोपीनाथा वस्त्रं देई ॥ धृ ॥

सासुरवाशी घरच्या नारी । जात होतों आम्ही मथुरे बाजारीं । रंग भरोनी मारी पिचकारी । नको करूं अशी मात ॥ १ ॥

राधा विलासी हा हृषिकेशी । धाउनींच धरितो पदरासी । किति शिकवावें ग या नष्टासी ? । करूं उपाय कांहीं ? ॥ २ ॥

यशोदेपाशीं जाउं मिळोनी । सांगुं ग आपलीं सर्व गाऱ्हाणीं । जिव त्रासविला तुझ्या कुमरानी । आतां सांगु त्याची मात ॥ ३ ॥

हा मनमोहन मुरलीवाला । किति शिकवावें या गव्हाराला ? । दिधलीं वस्त्रें, पळून गेला । रामा हा गुण गाई ॥ ४ ॥

गव्हार—थटिंगण, अडदांड माणूस.

* * *

## लावणी १६३ वी

राजीवनयना केल्या पैना । शरण तुम्हांप्रती आले जी ॥ धृ०॥

कुळीवंताची मी थोराची । माझी लाज तुम्हाला जी । खुणमुद्रा बंगल्या आंत । नेसन शाल्ह गुलाबी जी । मर्शा एकांत करते यात । मज लालडीच्या लाला जी । लाजूं येऊं किती समजावूं ?। ज्योतीसी ज्योत मिळाले जी ॥ १ ॥

लोभ असावा, राग नसावा । किती मरर्जी संभाळूं जी ? । पूर्ण कृपाळा मज संभाळा । तप्त शरीर जीव जाळूं जी । गेंद गुलाला नखरा केला । नको रुत घटका टाळूं जी । पहा सुगरावा मुखडा दावा । तुज पाहतां मन धालें जी ॥ २ ॥

हे गुणराशी, तुमची दासी । चमकुन या उभी राहते जी । करिते मात हात गळ्यांत नेत्र भरुनिया पाहते जी । फार वस्त्र या रंगमहालांत । समजावून गृहीं नेते जी । प्रीत असावी, लाज नसावी । चौथा दिवस आज न्हाले जी ॥ ३ ॥

किती समजावूं प्राण देऊं । हात गळ्यांत असावा जी । विषय-शांती भोग एकांतीं । माझा नखरा पहावा जी । उभयतांची प्रीत रसाची । साजण गृहीं आज यावा जी । रामा गुणी—जन गाती चाहातीं । धाक पडे गवळ्याला जी ॥ ४ ॥

मात—गोष्ट; करिते मात—गोष्टीमात करते, गुजगोष्टी सांगते.

* * *

## लावणी १६४ वी

तुमची खोड मोठी दोड मला सोड कीं रे ॥धृ०॥

घटकेंतुन नौ रंग । पाण्यावर जसा तो तरंग । याच्या काळजीनें झालें रोड रे ॥१॥

घडोघडीं कुच धरितां । रात्रींतुन कितींदा छाळितां ? । कां करितां मशीं उरफोड रे ? ॥२॥

एक वरीष दम धरा । न्हाण येऊं द्या मला जरा । मग मशीं स्नेह करा गोड रे ॥३॥

विषय डोम पाजळला । पतंग ज्योती पाजळल्या । **रामा** म्हणे अमृत रस गोड रे ॥४॥

दोड–द्वाड; नौ-नऊ; पतंग ज्योती–पतंगी रंगाच्या ज्वाळा भडकल्या.

* * *

## लावणी १६५ वी

न्हाण मजला येऊं द्या, बळें कां झोंबतां ? । शेजारीं निजा, दुर कां पळता ? ॥ धृ० ॥

दिर भाये या घरीं सासुला सांगते । भीड धरली आजवरी मागणें मागते । कुच धरितां या करीं नयनीं निद्रा जागते । प्राण माझा मोहिला कवळुन धरतां ॥ १ ॥

आंतरचे कपटी कांहीं ममता येऊं द्या । मी कांता धाकटी चार महिने जाऊंद्या । रुतुकाळीं शेवटीं फलशोभन होउंद्या । मग भोगा मला तुमची ही ममता ॥ २ ॥

सुगरावा आपुला दाविते त्या घडी । देह अर्पण केला लाखाची घडी । मग भोगावें मला प्रीतीनें आवडी । दासी तुमची ही खरी सरली सरली कथा ॥ ३ ॥

रुतु प्राप्त झाला नारीकारण । हाती धरला छबेला भोगे प्रीतीनें । गाइ रामा रंदुला, चाहाती शहर पुणें । रंग राखी बरा विठ्ठलाची सत्ता ॥ ४ ॥

सुगरावा–चातुर्य, नैपुण्य; रंदुला–रणदुल्ला, शूर.

* * *

## लावणी १६६ वी

पति प्रवासी सोडुन गेला ग बाई । संसारीं सुख मज नाहीं ॥धृ०॥

आली भरनवती ही भरज्वानी । राव राजींद्र दावा नयनीं । टाहाव फोडिते मोरावाणी । धनद्रव्याच्या भरल्या खाणी । या नवतीची जळून झाली लाही । सांगा कानीं आवाई ॥ १ ॥

या कर्माचा कैसा ठेवा । मी अपराधी काय तरि देवा । जोगिण होउन शोध करावा । तो सौदागर पलंगिं असावा । या विषयानें अगदिंच झाली लाही । सुचना मात्र करावी ॥२॥

धावा सख्यांनो, या शेजारीं । कधिं येतिल माझे अधिकारी ? । बसले मी रोखुन वाटा चारी । शांतपणें उरिं मारुं कट्यारी । या वरुषाची घडि मज जाति ग बाई । कोणती गत करावी ? ॥ ३ ॥

या नशिबाचे कैसे ताले । राव राजींद्र महालीं आले । सुखसंतोषें सोहळे केले । भोग आतां तुझें भाग्य उदवलें । रामा छंद करुनि नित प्रसंगीं गाई । चौ मुलखांत आवाई ॥ ३ ॥

आवाई–बातमी, अर्थात् येथें पती कोठें आहे याविषयींची.

* * *

## लावणी १६७ वी

मी उभी अंगणीं पाहुं राजसा गृहिं चला सख्या सजणा ॥ धृ ॥

आज कांहिं चुकले सेवेला, पदरीं घाला, सन्मुख उभी राहते ।

संकेत मनाचा केला, घरीं नसेल तुझी वाट पाहाते । जिव जळुन रक्षा झाला, पाहुन तुजला विषयाचें आलें भरतें । प्रीतींत नका वितुष्ट पाडूं, हात किति जोडूं ? लोटला एक महिना ॥ १ ॥

तूं नको अम्हांसी साळू थाथर जाळू, किती सांगावें तुजसी ? । तुजपेक्षां घरची कांता गुणवंता आहे नादर सुकवासी । तुझी आपली संगत घडली, प्रीत जडली, नेशिल रंगमहालासी । होइल जनामधिं ठावें फिरुन काय जाये तूं चंचळ मृगनयना ॥ २ ॥

मी आशावंत स्वामीची तुमच्या करची, आधीं लाविलीस माया । ममतेचा घालुनि फासा राजहांवसा कशी घेतली क्रिया ? । भुलले मी तुमच्या स्वरुपा ज्ञानदीपा, कर मजवरतीं छाया । तुम्हि कुटुंबवत्सल होता असे कळतां कां लाविलंस ध्याना ? ॥ ३ ॥

आली माया आत, करुनी इसकील, धरुनी रंगम्हालामधिं नेली । जाइजुई माल्ती मरवा पाच हिरवा, शेज पलंगावर केली । नाना परि विलास करती जडण मोतिहारी म्हादुच्या चाली । **रामा** लीछ ( ? ) वाणीत गाती सभा चाहाती सर गवळ्यासी येइना ॥ ४ ॥

थाथर–थोतर–म्ह. तोंड; सुकवासी–सुखवासी; असें.कळतां–हें ठाऊक असतां, स्वतः आपण लग्न झालेले कुटुंबवत्सल आहों हें ठाऊक असतां तुम्ही माझ्या नादीं कां लागलात व मला कां मोह घातलात ? इसकोल–तंटा, हर्कत.

* * *

## लावणी १६८ वी

रुसला साजण तो मजला दावा । मज मैनेचा रावा ॥धृ०॥

आवड मज रायाची काय सांगावी । काय वर्णूं चतुराई ? । सख्याला शोभे हिंदुपदपातशाही । चौमुलखांत आवाई । भडक मंदिल पगडी शिंदेशाई । भेट सख्याची घ्यावी । तुरा मोत्यांचा शोभे शिरीं बरवा ॥१॥

गळ्यामधिं मोत्यांचे पेंड साजे । मज लालडीचे राजे । स्वारी शिकार खेळे धनी माझे । शत्रु पाहूनया लाजे । फत्ते तलवार रणीं रणशुर गाजे । गहेरी डंके वाजे । दर्शन होतां पंची भोगावा ॥२॥

हाशीखुषीनं सजणा घ्या जवळी । भोगा काया कवळी । करिन शृंगार सुबक वस्त्र पिवळी । बोले राजस वाळी । उजव्या मांडीवर घ्यावें जवळी । शांत होईन त्या काळीं । कवळुनी धरा सख्या आज रंग वरवा ॥३॥

हौस मनाची पुरवी पंढरीराया । पाव मला तूं सखया । राव राजेंद्र जवळ आले गुण पाह्या । करा कृपेची छाया । सुंदरा पलंग सवारी या सखया । येऊं द्या माझी दया । **रामा** छंद करूनी गाई नवा । मजवर मेहर ठिवा । रुसला साजण तो मज दावा ॥४॥

गहेरी–गहिरे, दाट; गंभीर आवाजाचे पंची–प्रियकर.

* * *

## लावणी १६९ वी

चला चला पलंगावरी । हातीं फुलाचा गजरा घेउन तुरा खोविला शिरीं ॥ धृ० ॥

अहो प्रियकर माझे पति । प्रीतीचें लक्षण जाणतां आनंदमय चित्तवृत्ति । नाजूक लहान आकृति । एकसारखा झोक पतीचा, मी पिवळी शेवंती । चाल । दिसे पाक सुरत कामिना । लाली शोभे वदना । काय वर्णूं चांगुलपणा ? । कवळे लहान जोबन उरीं ॥१॥

नार विषयामधिं लंपट, सरळ नाक झुमकेदार नथ, निवळ पोवळे ओठ । नेसून पातळ वर बुट, पायीं पोल्हारे घुंघर वाजती जोडवी आनवठ । चाल । बांधून बुचडयाची लटक । काय शब्द बोलते तुटक । कुणी करिना तिजला अटक । धनद्रव्य अनकुळ घरीं ॥२॥

गरतीचा थाट करून । दीड मजला पैठणचे पातळ पदर घे सावरून । माणिक चौकामधिं ठरून । इष्कबाज भुलविले कैक जातां वरून मरमरून । चाल । अशी रूप नादर फुलझडी । दिसे लालाची लालडी । छत्रदार हातामधिं छडी । चाले ठमकत झोकावरी ॥३॥

कोमळ कांति नादर । हर जिनसाची सेज फुलांची करिते पलंगावर । चिमण्याची गादी वर आईन्या महाल । चकचकाट खुल्ला वर काढुनी तसबीर । चाल । सुंदरा वाट पाहतां । साजणा आले अवचिता । समजावी नार अनुचित । रामा गातो रंगभरी । प्रसंगीं रतिपति कोणा गुणाला धावुन ये लवकरी ॥ ४ ॥

अनवठ–पायाच्या अंगठयांत घालावयाचा रुप्याचा दागिना; मजला–वस्त्राचा कांठ. मजली ( विशेषण )–एकावर एक किनारी असलेलें वस्त्र उदा. एक मजली, दुमजली, तिमजली पैठणी. तशीच ही येथील दीडमजली पैठणी; माणिक चौक–गांवांतील चार रस्ते मिळणारा मुख्य चौक किंवा चव्हाटा; चिमणांची गादी–ज्यावर निजून इकडे तिकडे हाललें असतां आंतून चिमण्या चिवचिवल्यासारखे आवाज निघतात अशी सुखोपभोगाकरतां केलेली ऐषआरामी कळीची गादी; आईन्याचा महाल–आरसेमहाल; अनुचित–अनुचित्त असे शाहिरास म्हणावयाचें आहे. सजणाच्या अनुचित्ताप्रमाणें म्हणजे त्याच्या मनाचा कल पाहून त्याप्रमाणें सखीनें त्याची समजूत पाडली.

* * *

## लावणी १७० वी

तुम्ही फुल गुलाब गुलचगन गेंद माझे । कर प्रीती जघन्यामाधिं डंका हा वाजे ॥ धृ० ॥

आज आडपडद्याचे कांहीं तरी बोलत जा । तारुण्यपण जाईल मग हो पहाल मजा । छाती र नी मो गे द ध्या होईल हे जा ( ? ) थिर होऊन सावरून बसते पाहा मौजा । तुम्ही कोंदणं मी हिरकणी

हो रंग ताजा । चहुंकडे पाहतां, या शेजारीं निजा । पाहुं पाहुं डोळा आज शिणले माझे ॥ १ ॥

पुतळीला कसा हो, वसा हो या जवळी । भरपुर बागामधिं जाई फुल्ली पिवळी । आवडिनें मला घ्या मांडीवर जवळी । चोचल्या नका, छातीसी मला कवळी । रुत घटका येईल म्हणे राजसबाळी । शरिराची मोट कर, मी चाफ्याची कळी । नित उठुन कां मी बोलुं भाग्य माझें ॥ २ ॥

बरें वरकांतीचें बोलतां हो सजणा । ताजवा हातीं घ्या मी भरते वजना । चंदन मलयागिरी सुवासिक सुखसजणा । पहा कांति माझी आज घासुन पहा ना । घरिं बसल्या अमृत आलें, कां रस घ्या ना ? । दुर्बळास धन सांपडलें असें जाणा । उत्तर आज दे उसरलें भाग्य माझें ॥ ३ ॥

शुभ्र चांदण्यामधीं उभे जरा राहूं । उभयतां पेहरावा आज अत्तर लाऊं । सांगेन तशी वर्तणुक मज दावूं । करंगळ्या उभयतां धरा हो रंग पाहूं । असे बोलतांच धरधरला माझा जीवूं । भोगा लवकर आज सजणा सुख दाऊं । **रामा** म्हणे, कर आज शरीर दान तुझें ॥ ४ ॥

चोचल्या–चोचले. भावार्थ नुसते चोचले करूं नका, प्रत्यक्ष कृति करा; उसरले–ओसरले.

* * *

## लावणी १७१ वी

जीव लावुनिया प्रीतीनें मजकडे पाहा हो । जरिपातळ मजला घ्या हो ॥ धृ० ॥

नूतन तनु ही आली रुतासी । पूर्ण कृपाळा मजकडे न पहासी । जन्मोजन्मीं तुझी होइन दासी । धरियलें उरासी मला, अतां दुर कां हो ? ॥ १ ॥

हसतमुखानें सख्या क्षणभर बोला । पदरांत पडले बघा रत्न अमोला । नेशिन शालु, देह करीन हवाला । मारिते गळ्यासी मिठी, मला भोगा हो ।। २ ।।

बसा पलंगावर मला घेउन शेजारीं । कुच अपहस्तें चुरा अहो घरवारी । कुस्तित कवळुन धरा बांधुन स्वारी । मग शरण तुम्हांला येइन राग सोडा हो ।। ३ ।।

मज कमळणीच्या फुला दृष्ट होइल कीं । वर खालीं पहातां मला दिस जाइल कीं । बसंती शालु दिला केली न्याहाल कीं । **रामाचे** गुण ऐकुनी संतुष्ट मनीं व्हा हो । जरिपातळ मजला घ्या हो ।।४।।

हासी–हांस; अपहस्तें–आपल्या हातानें; घरवारी–घरधनी, मालक; बसंती–पिवळ्या, केशरी रंगाचें; न्याहाल करणें–संतुष्ट करणें; खूष करणें.

* * *

## लावणी १७२ वी

नेत्र भरुन मजकडे पाही रे । ध्यास लागली आस म्हणुनिया त्रास नको करूं, जहाले गाय रे ।।ध्रु०।।

राजसवाणे गोड बोलणें । चातक पक्षापरी येइ रे ।।१।।

कंठुं कुणाच्या बळें मी कळेना । जीव जळुनिया होती लाही रे ।।२।।

माळसी ( ? ) करी का परद्वारीं । मागेन तें मज दान देई रे ।। ३ ।।

अमृतवेळा लावा जिव्हाळा । **रामा** म्हणे पहा आपली सोई रे ।। ४ ।।

गाय होणें–गाईसारखें दीन होणें.

* * *

## लावणी १७३ वी

राजिवनयना तूं राघू, मी मैना, मजवरि कां रुसला?।। ध्रु० ।।

पदरीं पडले दासी, चरणी जडले, अर्जी मी करते । आज सापडले मंजुळ मैना बोले हृदयासी धरते । नेत्र चढले, तुमच्याविण मी अडले, भोगावें पुरते । सोड कल्पना, केली माझी दैना, कपटी आज दिसला ।। १ ।।

राजींद्र धनी चवसर खेळूं, बसोनी उभयता ठरा । द्या डाव गुणी फासा धर पाहेनीं मजवर मेहर करा । अज्ञानपणीं केली म्या मनधरणी कर मर्शी इष्क पुरा। केल्या पैना, भुलले तुमच्या वदना, आज मंदिरीं चला ।। २ ।।

संगिन जोडा, भ्रांत मनाची फेडा, पलंगीं आज वसा । प्रीतीचा तडा, राग मनांतिल सोडा, मजवर मेहर करा। मुखी घ्या हो विडा । नहि तुमचा ताडा ( ? ) पुतळी आज कसा । येउं द्या करुणा अर्जी माझी माझ्या कमळिणिच्या फुला ।। ३ ।।

रंगीत महालीं सेज सुवासिक केली, साजण धणी हातीं । लंपट झाली अशा प्रीतीच्या चाली, भोगी यकांतीं । मर्जि मिळाली । **रामा** गुणिजन । ख्यालीच्या हाती आति दर्ती । लुब्धले गुणा, साक्ष पंढरिराणा, देह हा तुला दिला । राजिवनयना ।। ४ ।।

मेहर–मेहरवानी, कृपा; संगीन–उत्कृष्ट; आतिरतीं–अतीशय प्रीतीनें.

* * *

## लावणी १७४ वी

कधिं ग साळू बोलसी आवडसी आम्हांला ।
प्राणदान देउं तुला, हाच लाभ झाला. ।।धृ.।।
स्वरुप तुझे पाहोनी चंचळ मन झालें ।
रात्रंदिस येवोनी फिरते भवताले ।।

छातीवर कुच दोन्ही पहातांना मन धालें ।
घडींत रंग करूं दे संग, भुललों नखऱ्याला ॥ १ ॥
केव्हां स्नेह घडेल आतां सांपडशी आम्हांसी
होइल कीं तुमची सत्ता प्रीतीच्या सुखासी ।
फार दिवस बोलतां लाजतों मनासी ।
मुखचंद्र दावी तुझा, रिझलों स्वरुपाला ॥२॥
दगलबाज स्त्रिया तुम्ही, कळूं नये कळली गे ।
वाट तुझी धरली आम्ही, घडी आज टळली गे ।
वचनाची दे ग हमी, तूं नट कळली गे ।
आशावंत पुरवी आशा, एक मास झाला ॥३॥
रत्न गुणी माणसा तूं ये आज रंगमहालीं ।
भोग मला, लइ दिवसांनीं भरपाई झाली ।
मी पुतळी लाव कसा, आज पडले ख्यालीं ।
**रामा** म्हणे भोग आतां, आज मिलाफ झाला ॥४॥

लाव कसा—कस लाऊन पहा मी खरी पुतळी आहे कीं नाहीं तें. पुतळींत सर्व शुद्ध सोनें असतें. तींत हीण नसतें; ख्यालीं पडणें—आसक्तिपूर्वक पाठीस लागणें; मागें असणें; नादीं लागणें; मिलाफ—संयोग.

* * *

## लावणी १७५ वी

द्रिष्ट होईल कीं तुला साजणा, मन माझें पाहुन रिझलें ।
नका जाऊं बाहेरी, बसा शेजारीं, उभयतां मुन(?)धजले ॥धृ.॥
एकसारखा जोडा उभयतां, प्रीत असावी मजवरतीं ।
चोरटीं पाउलें वळखलीं, चंचळ झाली चित्तवृत्ति ।

राजवनसी राजेंद्रा कोमळ चंद्रा, तुजला पाहुं किती ? ।
मी चांदणी सुकुमार शोभले, झटपट या पलंगावरती ॥
चेटक करणी जादुगारिणी या रांडा माझ्या सवती ।
मन चंचळता कां आज झाली ? विषयाची जाइल भरती ।
तुम्हासारखें रत्न असावें, ईश्वरास म्या हो पुजिलें ॥ १ ॥

राजिवनयना मनमोहना आहे तुजवर माझी सत्ता ।
कुठें कर्मिली रात्र जिवलगा ? कोण तुम्हां मिळाली कांता ? ।
मर्जिप्रमाणें वर्तत असतां काय म्हणून अंत पाहातां ? ।
पिवळी कांती कां आज दिसती ? सांगा मजला एकांता ।
फिदा तुम्हांवर मी सुकुमारा, झटपट या पलंगावरता ।
हा लागाबांधा पूर्वीचा, चरणावर ठिवला माथा ॥
तुम्हांपासी जीवप्राण, नाहीं देहीं भान, पायीं चालत आले ॥ २ ॥

ऐसे सुकुमारा जिवलग चतुरा, धरा उरासी, घ्या जवळी ।
आवड मनाची मज सांगावी, आज नेसन वस्त्रें पिवळीं ।
उजवा हात छातीवर टाका, मी कमान लवचिक कवळी ।
रागभाग आज सोडुन द्यावा, प्रीत चालवा नवि नवळी ।
हसत सदा मुखडा, गोजिरे गाल जशी नागिण गव्हळी ।
लोभ करा मनहरा, प्रियकरा, आज माझी आज्ञा (?) पाळी ।
अलावला घेईन एकांतीं, चवथा दिवस आज न्हाले ॥ ३ ॥

माझ्या गळ्याची आण तुम्हांला, मनइच्छा पुरवा माझी ।
शब्द सुखाचा बोला तुम्ही बिनमोल तुम्हांला आहे राजी ।
लुटा बार नवतीचा, शब्द बोला हो, कां रुसला दाजी ? ।
नाना परिचे विलास दाविन, तुम्ही करा हो विष्कवाजी ।
सोड मनाची गुळणी वेळणी, खेळुं जरा चवरसबाजी ।

हारजीत होईल तुमची न माझी, तेव्हां करा की खुसमरजी ।
**रामाचे** छंदडे ऐकुनिया दरदी पाहुनिया मनिं गजबजले ॥४॥

एकांता–एकांतांत; गुळणी, वेळणी–अढी,मौन;चवरसबाजी–सोंगट्याचा किंवा फाशाचा खेळ; छंदडे–छंद; दरदी–ज्ञाते.

* * *

# रामतनय

## लावणी १७६ वी

कुंजांत खेळतो कान्हा । तो येशोमतीचा तान्हा कीं गोजिरवाणा ॥ धृ० ॥

तें रम्य काम्य वन वाई । ज्यामध्यें वसे सुखदाई । कीं भवत्या गाई । शेवंती मालती काई । अती फुल्ल मल्लिका जाई कीं चल ते ठाई । ही ऐक वेणुची घाई । इतदुष्ट मल्लबळ बाई । कीं फुंकित साई (?) । तो सखा शेष तनुशायी । आरंभीं लीळा माई कीं हें नवलाई । याविणें नसे चतुराई । उठवी या सुरुचिर तान्हा । कीं होउनी साना ॥ १ ॥

वल्लवी, पल्लवी, तुंगा । येउनी मदनसुखरंगा । कीं धरिती अंगा । धरिती तदां श्रीरंगा । उडवुनीयां भव्य पतंगा । कीं रिचिविती अंगा । होतसे काम गजदंगा । कटिहुनी तैं फिटति पचंगा । कीं वेढिती लुंगा । वाद्य ते छनन मोर्चंगा । बहु मृदुतर मत खसींगा (?) । ही ताल मृदंगा । सुंदरी अशा अव्यंगा । दाविती निजभृंगा । इच्छिती त्याचिया संगा । गोविंद महा नटरंगा । दाउनियां आपुल्या ध्याना । कारिती तनाना ॥ २ ॥

कोणी त्या घालिती पिंगा । निर्लज्ज होती निःसंगा । दाविती ढंगा । घालुनी मिठी उत्संगा । कारिती मग रतिप्रसंगा । कीं धांगड-

धिंगा । आकाशमार्गीं सानंगा (?) । देवीच्या पाहाती चुंगा । कीं वृद्ध मलंगा (?) । देवता फार चवलंगा । संगीत गाती सारंगा । कीं म्हणती अभंगा । पूजिती शंभुच्या लिंगा । वाहती हळुहळु यमुना-गंगा । गुंजारव रसच भृगा । कीं स्मयोत्कर्ष सारंगा । जन करिती सुधेच्या पाना । कीं हालविती माना ।। ३ ।।

ते मात होतसे भारी । माजली भली हे होरी । नव्हे बळजोरी । त्या प्रौढ यौवना नारी । वेढुनी मध्यें कंसारी । कीं झोंबती थोरी । ओतिती रंगयुत झारी । भिजविती गडी तो शौरी । कीं त्या गुल-जारी । कुच मर्दी गोपिकाधारी । घोळुनी गौळ्याच्या पोरी । कीं हळु चुचकारी । मार त्या दारिका घेरी । खवळुनी प्रबळ शर मारी । जन्म येती बहु नारी । आनंदयुक्त ये लहरी । चुंबीतो यादवराणा । कीं प्रिय जो प्राणा ।। ४ ।।

अनिवार गे भडमारी । तक थैय थैय थै कारी : नाचती गोरी । धींम धींमी कदर्धीं भेरी । झणन झणन झणकारी । नाचती गोरी । त्या नृत्यसंधिमाझारीं । कुच झेली कंदुकापरी । कीं कुचविहारी । तै तशा रति-चमत्कारीं । कुसुम संभारीं । कीं सुर अवतारी । ती भुलुनी रास शृंगारी । देवता हर्षती सारी । जनयानी खेळत वारी (?) । केव्हां त्या त्यजुनी विमाना । कीं होय उगाना (?) ।। ५ ।।

अंतरीं स्मरति जगदंबा । त्या चंचळ केश कदंबा । कीं शोभती विंत्रा । उघडितां पीन कुचकुंभा । कटी त्यजिती झुणाही कुसुंबा । कीं थोर अचंबा । भारतीसहित हेरंबा । आणुनी वाजवी भंबा । आवडी सांवा । क्रीडल्या गोपिकदंबा । प्राशिती वृद्धपद अंबा । तो मनीं वृद्ध न विसंबा । तो **रामतनय** सत्राणा । किंकर जाणा ।। ६ ।।

शेष-तनुशायी—शेषाच्या तनूची शय्या करणारा, म्हणजे शेषशायी; बळवी

पल्लवी इत्यादि–हीं गोपींचीं नांवें; मोर्चंग–एक वाद्यविशेष; उत्संग–मांडी; चुंगा–टोळया, जमाव; मात–हकीगत, घटना; शौरी–शौरी कुळांतील, कृष्णाचें विशेषण; गोरी–सुंदरी; झुणा–एक वस्त्रविशेष, मार–मदन; स्मय–मत्सर; कदंब–समूह.

* * *

# धोंडी बापू

## लावणी १७७ वी

करमली रात रे । सखया, कोण्या मंदिरांत रे ? ॥ धृ० ॥

काल सख्या तुम्ही सायंकाळीं । होता कीं उभे तिसऱ्या ताळीं । आड लाउनिया पुष्पांची जाळी । केली विश्रांत रे ॥ १ ॥

दहा घरिंच्या दहाजणी मिळवीशी । तूं तंव त्यांच्या मिळणीं मिळशी । व्यर्थ सख्या तूं कां रे छळिशी ? । घालुनी घोरांत रे ॥२॥

गडी गोपाळ घेउनी संगें । रात्रीं धुंडशी शंभर जागे । धुंडीत फिरशी जागोजागे । अवघ्या शहरांत रे ॥ ३ ॥

तव चरणावरी ठेउनी माथा । प्रेम-आलिंगन दे मज आतां । **धोंडी बापू** म्हणे समजावीं चित्ता । घ्यावें पदरांत रे ॥ ४ ॥

ताळ–मजला; तंव–तेव्हां; विश्रांत करणें–विश्रांति घेणें.

* * *

## लावणी १७८ वी

पति वृद्ध, मला ही रात्र वैऱ्याची जाती ॥ धृ० ॥

पूर्वीचें दूषण, आज हें मजला भासलें । दैवानें गे माझ्या नाहीं केलें चांगलें । वाहिलें पूर्वजन्मीं तें भाळीं लिहिलें । कोणता करूं गे उपाय ? । जळो जळो हे बापमाय । तो पिता व्याघ्र, मी गाय । घेतलें द्रव्यं हाय हाय । जो कन्येचें धन खाय । शेवटाशीं नर्की जाय । असो नसो कर्म ज्याचें तें प्राणी भोगीती ॥ १ ॥

कोणता करूं गे उपाय ? यौवन हें जाळितें । पती असतां सुख-शयनीं सुख नाहीं जीवातें । चुंबन घेउनियां धरी तो वाई माझें स्तनातें । लागतां तयाचें वदन मुखीं माज्या सुटती खाज । पतिमुखा नाहीं ते रदन, जिवीं माझ्या वाटती लाज । छळितो हा मजला मदन, समवय नाहीं पतिराज । या काळजीनें गे जाहली शरीराची माती ॥ २ ॥

परपुरुषाकडे पाहूं देईना मला गे वाई । घेईना गे नवरस माझा, दुसऱ्याला मनाई । अशी काय पूर्वजन्मीं मी याची अन्याई ? । सोशितें मी याचा जाच, बोलतां न ये मजला । अंतरीं विषयाची आंच, सांगत्यें सखे तुजला । होईल दग्ध असाच, बोलतां नये मजला । येइना मरण आतां सये वाई मजप्रती ॥ ३ ॥

किती तरी दिवस घालऊं जन्म हा मीच ऐसी । सांगा मजला उपाय, करूं आतां गत कैशी ? । कोमळ भाषण करितां नम्रता धरूनी ऐसी । प्रतिउत्तर करि **धोंडी बापू** तो गुणग्राही । निर्मिता सखे भाळीं ब्रह्मा अक्षर लिहिलीं । तें घडेल या जन्मीं, करूं नको खेद कांहीं । कवी कवन करून गाती रवीपुढें जशा वाती ॥ ४ ॥

पूर्वीचें दूषण–गत जन्मीचें पाप; रदन–दात; अन्याई–गुन्हेगार.

* * *

## लावणी १७९ वी

झाली प्रभात, उठीं गोपाळा सरली रात ॥ धृ० ॥
नारदतुंबर उभे महाद्वारीं । ते कीर्तनीं गुण गात ॥ १ ॥
इंद्रवरुणाहि चतुरानन ते । तिष्ठती जोडुनी हात ॥ २ ॥
शुकसनकादिक महा महा वैष्णव । सांबहि पातले त्यांत ॥ ३ ॥
**धोंडी बापू** म्हणे मज या समयीं । तारी मला कीं अनाथ ॥ ४ ॥

* * *

## लावणी १८० वी

नको जाऊं रे प्राणसख्या न ये निद्रा मजलागीं ।
काय चुकी मजपासून जाहाली ?
कां हो न ये सखा आज रंगमहालीं ? ।
किंचित नसतां बोलाचाली ।
कोठें तरी पाहु ग प्राणेशा ? ।। १ ।।
मी तरी येक वचनाचा भुकेली ।
सजन पाहुन संगत केली ।
त्यास म्हणावें वृत्ती ही उदेली ।
नको मुख दावूं रे प्राणेशा ।। २ ।।
करणें होतें अधिंच निराशा ।
तरी कां लाविली लटकिच आशा ? ।
धर्म नाहीं कोठें हे जगदीशा ।
किती आण वाहूं रे प्राणेशा ? ।। ३ ।।
आण घालुनिया माझ्या गळ्याची ।
भेट करा ग प्राणसख्याची ।
**धोंडी बापू** गुणि कविरायाची ।
कविता गाऊं रे प्राणेशा ।। ४ ।।

* * *

# गजानन

## लावणी १८१ वी

अतां मज पाव श्रीमहेशा । गंगाधरा सुरेशा । जगवंधना परेशा । तव कृपाभक्त विनिर्दोषा ।। धृ० ।।

धरीं येऊं दे स्वकांता । त्याविण पावले अकांता । झडकरी मिळो

एकांता । ग्लांत किती करूं मी आतां ? । उमाकांता । पाहसी अंत, न साहवे रतेशा ॥१॥

रत्नजडित सदना । हिरे जोडिले तिकोना । उदबत्ती सेज नाना । मद जाईजुई चंपकानि । दुतिकानी ? । ते करा नी ठेविली करोनी हे नरेशा ॥२॥

कारंजी हौद रंगी । म्या भरविली सुरंगी । जशी लक्षिते कुरंगी । जेवी ध्यानभान । मानवाचें अर्थदान । ध्यावयासीं लुब्ध कीं सदाशा ॥३॥

रणशूर नभीं तारा । मम मानसा अधारा । दीन याचकासी थारा । पेंच शिरीं पाचू वरी । जाडितभरी, मारी लहरी । बहरी लोपवी दिनेशा ॥४॥

मनीं चिंतिलें हराला । पती पावले घराला । प्रीती न्हाणिलें वराला । महलीं धसलीं, बसलीं, उभय हसलीं, कामीं ठसलीं । मग ध्याती त्या **गणेशा** ॥५॥

ग्लांत–केविलवाणेपणें केलेलें आर्जव; कुरंगी–हरिणी; बहरी लोपवी दिनेशा–शिरपेचाची प्रभा दिनेशाला म्हणजे सूर्यालाहि फिक्की पाडते. महलीं धसलीं–महालांत प्रवेश केला.

* * *

## लावणी १८२ वी

काय करूं साजणी ? धीर किती देऊं गडे या चित्ताला । भ्रतार पाहुन असें वाटतें अतांची ध्यावा विषप्याला ।

कसा बांधिला गळ्यांत तुंबा । कोण प्रीतीनें याला चुंबा । जसा व्यर्थ किडखादी अंबा । अक्षरशत्रु केवळ ठोंबा । काय करिल नपुंसकासी रंभा ? । भोगावा तरी कर्दळी गाभा । ना तरी काय करावें

शुंभा ?। कां मजवरी कोपलीस अंबा ? । किती अंत पाहाशिल मुंबा?। उदक द्रवेना उपड्या कुंभा । किती शिकवूं भंगीच्या कोंबा ? । डिंबपणें पाझळतो टेंभा । यांत कोणती याची शोभा ? । जसें आंधळ्यापुढें ठेविलें काय होय दर्पण त्याला ? ॥१॥

पित्याच्या शहाणपणाला वट्टा । ठेवुन जनांत करिती थट्टा । काय मुलीला नवरा वट्ठा । म्हणती लोठा बाबर ओठा । काय दुजाला होता तोटा । नव्हे नूतन हा वयस्क मोठा । जैसा माळावरला गोटा । चंगीभंगी अंतर खोटा । बहु वेदना लावुन जातो काय करूं ग बाई कामाला ? ॥२॥

मी तरी पूर्वजन्मींची खोटी । केल्या अपराधाच्या कोटी । घालुन पोटीं प्यावी सदा सौख्या रोटी । असा आनंदें काळ लोटी । घडलें जें होतें लल्लाटीं । नको धनद्रव्याची पेटी । लाविल चिरी कुंकवाची मोठी । अतां कशाला होऊं कष्टी ? । कां देवाला घालुं संकटीं ? । धरिला हा दृढनिश्चय कंठीं । म्हणे **गजानन** सर्व सुंदरी बोल ठेवणें कर्मोला ॥२॥

तुंबा–पोकळ भोपळा; मुंबा–मुंबादेवी; दर्पण–आरसा; वठ्ठा–दांडगा.

* * *

## लावणी १८३ वी

पतिविण जिव व्याकुळ झाला । आतां कोणी जा गे सख्यांनो, आणा विषाचा प्याला ॥ धृ० ॥

तीन वर्षें झालीं ऋतासी । हें काय श्रुत नाहीं तयासी । जा तरी कळवा पितयासी । ऐकुन बहुदु:ख होइल कीं माझे आईला ॥ १ ॥

मी आले जशी ज्वानीं भरांत । तधींपुन पति नाहीं घरांत । युगसमान मज दिसरात । यामागें बोध कसा गे नाहीं कोणी केला ॥ २ ॥

यापूर्वी बाळपणातें । दुःख नाकळलें अपणातें । साधिलें कसें या टिपणातें । ऋतुसमयांत कसा गे निसटुन गेला ? ॥ ३॥

सखीनें मग धरिली उरीं । दिली उटी चंदनें शुभ केशरकस्तुरी । शीत उदक पाजिती करीं । श्रमी सख्या होऊन पंखे वारिती वरी । सावध झाली अंतरीं । ते साजण आले घरीं । मग नेलें सदनांतरीं । तुम्ही आला सख्या मज आज **गणपती** पावला ॥४॥

* * *

## लावणी १८४ वी

ऐशी कोणाची सुंदरी ? कोणा सभाग्याची नारी ? ॥धृ०॥

खुब चालण्यांत मारी लटक । सुरत पाक ओतीव पुतळी सटक। पायीं पोल्हारे वाजती चटक। चांदणी पाहतां नाहीं अटक । भटकले विषयीं लागुन चटक ॥१॥

तेज टवटवीत दिसे शशिवदन । रेखिलें कुंदकळीसम रदन । धुंद करी फुंद शरीरीं मदन । पाहतां अशी कैकाला निधन । गर्दीमधें प्राप्त होईल यमसदन ॥१॥

छानदार गुंडा विसनी अटल । अपुलें रूप पोशागें नटल । भला तरी अपले स्त्रीला विटल । खटलती निजमनीं तिळतिळ अटल। कीं मी सुंदर हा संशय फिटल ॥२॥

झोकीत सरसावी भरजरी पदर । झाकुनी उघडी घडि घडि अधर । दाटीमुळें पहाया न पोचे नदर । कैक मेजवान्या करितील अदर । तुच्छ म्हणे **गणपती** विषयीं कदर ॥३॥

सभाग्य-भाग्यवान; कैकाला निधन-असें सौंदर्य पाहून कित्येकांचा मुडदा पडतो; खटलती-खटलेखोर; अदर-आदरानें.

* * *

## लावणी १८५ वी

सांग दयाळा, तिळभर पाझर न ये हृदयाला ॥धृ०॥

जें दुःख तें सुख मानुनी घेते । काळाचे दिन लोटित नेते । अंतरीं घडि घडि अठवण येते ॥१॥

भरज्वानी रुतुदर्शन झालें । पंचम दिवशीं मी अजि न्हाले । कां मज छळितो मन्मथ वाळे ? ॥२॥

येकट राहुनी काय करावें ? । कीं विष घेउनी सांग मरावें ? । मदनार्णवांतुनि केवीं तरावें ? ॥३॥

अवचित साजण आले सदना । अंतरीं हरुषलि ते शशिवदना । मंदिरीं नेउनि शांतवी मदना । **गणपतीला** स्मरा नाश भयाला ॥४॥

* * *

## लावणी १८६ वी

सांग सखे तरी अजुनि कां हरि मंदिरीं येइना ? ॥धृ०॥

केवि कमींन मी रात्रि तयाविण, सत्वर कां मुखचुंबन देइना ? ॥१॥
त्याविण हा जिव व्याकुळ होतो, काय करूं शुभ मंचकशयना ? ॥२॥
**दास गजानन** नत प्रभुचा, गुरूकृपे यमकाळाशीं भीइना ॥३॥

* * *

## लावणी १८७ वी

प्रियकर सखे प्राणपति दाखवी मला ।
रत्नजडित कंठिंचा हार देइन तुला ।
येकली मी मंदिरांत राहुं तरी कशी ? ।

ही अपुले मनिं तूं करी पुरती चौकशी ।
प्रियकर धरी कवटाळुनी मज कुशीं ।
क्षणमात्र तेव्हां रजनी अशी वाटते मला ॥१॥

नकळत मज उठुनि गेले काय म्हणुन रागें ? ।
मदन-कैफें गर्क झाले अपुले भरा गे ।
किति तुम्हांस विनवुं तरी, प्रार्थना करा गे ।
त्यासी जाउनी म्हणा, सख्या मंदिरीं चला ॥२॥

मजला तरी ठाव कशी देईना धरा ।
सखे म्हणा, श्रमी नका होउं बाई धीर धरा ।
चुंबिल तरि कोण आतां माझे अधरा ? ।
झडकरी ये घेउनी जिवें छंद घेतला ॥३॥

प्रियकर मग घेउनी सखी मंदिरीं अली ।
धरुनी करि प्राणविसावा नेत माहलीं ।
चार प्रहर भोग भोगुनी हर्ष पावली ।
त्यासी तेव्हां **गणपती** मनिं· आठवूं लागला ॥४॥

* * *

## लावणी १८८ वी

खुब लटक चालणें गजगति । चपल नयन जसे मीन तळपती । भवया कमाना लहरा देती साजिरी ॥धृ०॥

ओठ जशा पवळ्याच्या वेला । गाल गुलाबी तरि नरम उशी । अहो छालछबेली पठी बनली ज्वानी उंबर नवी रसमुसली ॥१॥

सुंदर नादर वारिक कंबर । वय नूतन पंधराची उंबर । अग्र स्तनाचे मेघवडंबर शाम परी ॥२॥

ठुमक ठेंगणी शशांकवदना । वर्ण कुंदकळीसमान वदना । रत्न-खचित नग प्रकाश सदनाभीतरी ॥३॥

दाब कटि जडिताची कंठी । नवरत्नाचा हार मनगटीं । छंद बंद वंगले मुद्या भर वाकी हिरे वरी । **कवि गजानन** म्हणे अशी । पाहुन कोण न धीर धरी ॥४॥

उंबर–उमर; दाब–दाम, कंबरपट्टा; बंगला–दागिनाविशेष.

* * *

# तुकनागिरी

## लावणी १८९ वी

अलंकार गोरीचा रे नाना परीचा ॥धृ०॥

पहिला रंग नारिचा सफेत । जसी चंद्राची जोत रे । जवळ चांदणी लखलखीत । शुभ्र दंत गोरे हात रे । घुंगुरु जोडवीं पायांत । शुभ्र मोतीं नाकीं नथ रे । कमरे दाब, तिचा जाडिताचा ॥१॥

दुसरा रंग नारीचा पाहा काळी । नेसली चंद्रकळा रे । काळी जरी गजनीची चोळी । काळीच माथां जाळी रे । काळी गळ्यांतली गळसरी । काळाच पोत मणी रे । काळा साज तिचे वेणीचा ॥ २ ॥

तिसरा रंग नारीचा पाहा पिवळा । अलंकार पिवळा रे । सुंदर नेसली पाटोळा । पीतांबर पिवळा रे । पिवळ्या तापत्याची चोळी । पिवळीच रत्न जाळी रे । पिवळ्या झुबक्याची कानीं बाळी । कर्ण फुल झळाळी रे । पिवळा हार गळां पुतळ्यांचा ॥३॥

चवथा रंग नारीचा पाहा बरवा । झुणा नेसली हिरवा । हिरवी आंगी चोळी पाहा बरवी । शाल ओडनी हिरवी । माथां राखडी जडावी । वर हिरकणी हिरवी । हिरव्या जाडिताचा चुडा तिचा॥४

पांचवा रंग नारीचा पाहा लाल । गळ्यांत हिरामणी लाल रे । मुखामधीं वीडा नारिच्या पाहा लाल । ओठ पोंवळे लाल रे । माथां भांग तिचा पहा लाल । कुंकु कपाळीं लाल रे । बोले **तुकनागिरी** कवी लाल । हमेश झेंडा लाल रे । धोंडी बजाबा करी ख्याल । छंद धरण पर बोल रे । पांचा रंगाचा रंगाचा ॥५॥

* * *

## सगाजी

### लावणी १९० वी

दावा नयनीं प्राणविसावा । भेट सख्याची घ्या ग सख्यानु ।।धृ०।।
आज मला विषयानें छळिलें । उरीं कुचाग्र रसों उचमळले ।
नयनीं माझे कां जळ झरलें ? । म्हणुनी हृदयीं करिते मी नानु ॥१।।
मी तर गेले विषयदु:खांत । दावा राघो प्रेमसुखांत ।
करूनी भोजन घाला मुखांत । याप्रती उत्तर काय मी वानुं ? ।।२।।
नूतन ज्यानी, रति गजबजली । कंचुकी माझी तिळतिळ भिजली ।
दृष्टी मला हे तनु कोमजली । झिजुन मृत्य मी होइन नेणूं ।।३।।
साता गवळी शीघ्र कविश्वर । पावले तुजला श्रीपरमेश्वर ।
म्हणे **सगाजी** आले प्राणेश्वर । गुणी सदाराम गाइ सुज्ञानु ।।४।।

नानू-शोक; राघो-राघू, पोपट, प्रियकर; मी मृत्य होईन-मी मरेन.

* * *

## रघु

### लावणी १९१ वी

जिवलगा रे जिवलगा, निपट मनिं धरुन ।
कपट, पाडितां विपट, करी अपट उपट तळतळुन ।
झाली सजळ नयन, पटपटा इंदुवर बिंदु श्रवति ढळढळुन ।। धृ० ॥

जिला पाहुन मदन करी अधोवदन तें
स्वरूप सदन मुन करिती रुदन ढळढळा ।
अति संचित (?) क्षय लागतां लोपली वदनइंदुची कळा ।
झाली बहुत विकळ, उपभोग सकळ
जिला असुनी दुकळ जीव करी कळकळ तळतळा ।
सदगदित हृदय तगमगीत जसा मीन रहित जळावेगळा ।
मजकडुन किंचित् अपराध, खचित आली
दिसुन प्रचित, करी क्षमा उचित, गुणशीळा ।
हा प्रथम ग्रास मक्षिकापात, केसानें कापितां गळा ।
आहे तनमन तुमचे पदीं, जशी मक्षिका लुब्धली गुळा ।
जळीं पद्म विकासित दिसे, देखतां उदय सूर्य मंडळा ।
उगवता दिवस यापरी पाळिजे अविट प्रीतिचा लळा ।
अरे घाडि घडि रे घडि घडी विषय मज पिडी
अतिशय नाहीं कळत आशय तुला, आला संशयसा कळून ।। १ ।।

शोधितां भुतळ परदु:ख शीतळ नाहीं गोष्ट
नितळ मुनियती तळतळ राजसा ।
अणुमात्र देखला विषमभाव जरी, मग तरी मजवर रुसा ।
भ्रम धरून फुकट अशी दिसती निकट
गांजिता विकट, करी कटकट कोणीतरी पुसा ।
कोण सवत मिळाली पोटजळी वसली करी पायध्या उशा ।
मी अरुप अतुर, तुम्ही परम चतुर
आला दिसुन फितुर, कामातुर भरला रसा ।

पूर्वींचा राहिला वैरभाव शेवटीं साधिला कसा ।
पुरविले मनोरथ बरे, हाच कीं काय दिला भरवसा ? ।

धगधगीत पेटला विरहानल, खरखरित कोरडा घसा ।
कसे उमासे येती, तटतटा प्राण हा रिघो पाहतो जसा ।

माझी दशा रे माझी नूतन, तुम्ही घेऊन वतन,
मी करीते जतन, नका वतन बैसला गिळुन (?) ॥२॥

मी करिते लगट तिचे पतीसगट नाहीं
दिडत प्रगट कशी आलगट करिते धडा ।
चुड घेऊन पाठीलाग कर, तिचा मग होइल तरफडा ।
किती राहि लपुन, मी आहे जपुन
आधीं तिला टिपुन, मग दडपून काढीन छेडा ।
वेणी धरून आणिन चौघांत लाविन रगडुन कानाला खडा ।
किती राहिल दडुन, इनें चहुकडून, माझी आशा खुडून,
कशी अडुन घालिती झडा ।

जर पडल गाठ कधीं तिशी करीन मी अपल्या रगताचा सडा ।
अहो प्रवाळसम हे अधर, मृत्तिका मुखीं घाली भडभडा ।

तळतळुन करिते संताप जिवासी घेते मारुन धडधडा ।
पति पाहुन निष्ठुरता तिशीं सोडला मग ममतेचा पुडा ।

गदगदा रे गदगदा हसुन, मग जवळ बसुन,
तिचे नेत्र पुसुन, कसकसून पाहिलें छळुन ॥३॥

समजला रे समजला रमण, करी उठुन
मन इच्छितें गमन, रातिस्मर मनीं दाखवी खुणा ।
पहुडतां मंचकावरी समुळ संकोच नाठवेना ।
आली रात्र भरत रवीकळा फिरत, नाहीं रती सरत जर नसल
पुरत वासना ।

कुच कठीण लागतां अधिक, अधिक प्रारंभ होत मदना ।
येक ऐन असावी रात्र असा संकल्प करी कल्पना ।
आहो आहार निद्रा काम होतसे वाढविल्या चौगुणा ।
रघु म्हणे बाळकृष्णास आठवी मनीं कामभंजना ॥४॥

आपट उपट–आदळआपट; त्रागा; इंदुवर–मुखेंदूवर; स्वरूपसदन–सुंदर रूप रहित जळावेगळा–वास्तविक 'जळावेगळा' म्हटल्यानंतर पुन्हां रहित शब्दाची जरूरी नव्हती. रहित जळावेगळा म्ह. पाण्यांतून बाहेर काढलेला; तळतळ–तळमळ; दशा–वय, उमर; आलगट–गळेपडू; धडा–धाडस; लाविन रगडून कानाला खडा–कानांत खडा ठेवून वर कान चोळवटणें; हा एक शिक्षेचा प्रकार; पति पाहुन–पतीनें पाहून. स्त्रियेनें इतका आततायीपणा आरंभिलेला पाहून मग नवऱ्यानें तिला समजावण्याकरतां ममतेचा पुडा सोडण्यास सुरवात केली; ऐन–अखंड, न संपणारी.

* * *

# देवराज

## लावणी १९२ वी

शिपाइ फाकडा राजबनसी । तुरे शमलेवाला हौशी ।।धृ०।।
हजारा लोका सरदारी । तयामध्यें खाशाची स्वारी । मोरचेल

अबदागिर चौरी । उडे हातीं रुमाल केशरी । दुरुस्ता मुजरे मानकरी । पुढें चोपदार किलकारी । प्रतापी वीर सूर्यवंशी ॥१॥

करून पोशाख भरजरीचा । अंगामधें झगा बादलीचा । सवाई सरदार पेच शिरिंचा । अक्षदा टिक्का कस्तुरिचा । गळ्यामध्यें शोभे हार परिचा । हति हस्तकी पद्मकरीचा (?) लक्ष्मीकांत तेजराशी ॥२॥

लक्ष मनुष्यांत येक मोहरा । आकाशीं रणमंडळीं तारा । स्वार होऊन तेजी नखरा । हातीं समशेर मारी लहरा । आनंदें सुमुहूर्ते दसरा । आले खेळुनिया स्वामी घरा । राजहंस सुखें सदनासी॥ ३॥

तयाची दृष्ट काढवोन लिंबलोण ओवाळीन । गेली रंगमहलीं घेऊन । सुखीं भोगिलें आनंदानें । **देवराज** तो करी कवन । कवि ऐकुन लज्जितवाण । सवाई पाहिल रासिक रसी ॥४॥

बादलीचा–भरजरीचा; अक्षदा टिक्का कस्तुरीचा–कपाळावर कस्तुरीचा टिळा व अक्षता लावलेल्या; तेजी–घोड्याची एक जात; लज्जितवाण–शरमलेले, शरमिंदे.

* * *

# गणू महादू

## लावणी १९३ वी

सोड गीता-भागवत पाहीं दाखला । तुरा कलगीचा गुलाम सांगता नाहीं लाज तुजला ॥धृ०॥

नव्हता धुंमदुमकार । तेव्हाचा ऐक दाखला निर्गुणनिराकार । तेव्हां तो होता एकला । मग सुटला वायो त्याचे पोटीं तेज झाला ।

त्या तेजाचे पोटीं ब्रह्म—बीज जन्मला । इथून म्होरं मेरूमदार पुसतो तुजला ॥१॥

अनंत्या त्याच्या मावा, कूर्म अवतार त्यानें धरला । पाताळ भुवनामधिं त्यानीं प्रकाश मांडला । अपले मस्तकीं शेष त्यांनीं स्थापला । शेषाचे मस्तकीं आकार गोटीचा केला ॥२॥

निरगुण निराकार त्यांनीं केलीसे लीला । नित अनिमंदा अंगुळ सोपली तिजला (?) । तेव्हां ती सती काये बोले निरगुणाला । काये तुमके पैदा केलें कशाला । जयब्रह्मा विष्णु आहे भ्रतार दिले तुजला । मग करून शृंगार गेली विषय भोगायाला । × × × म्हणतां माझी माता कशी भोगूं तुजला ? ॥३॥

गोटीची लांबी रुंदी सांग हां मला । कोणता ब्रह्म होत मेरूच्या पठाराला । कोणच्या वृक्षाचें फळ पडलें धरणीला ? । त्याची वाहती नदी शाहिरा तिचें नांव बोला । गासी टाणाटोणा तू पाखडाला, दे येवढें सांगून, नाहीं तर हो आमचा चेला ॥४॥

कविराज येमा म्हणे आज पुस्ता झालों तुजला । किती स्वर्गाची उंची ? सांग आम्हांला । किती कोस भरले ? येकदां हिशेब करून बोला । फुगलास डुकरावाणी, शहाणपण कळलं अवघ्याला । कोणत्या गोष्टीमधिं तुरा गुलाम ठरविला ? । कोणत्या निरगुण मजुर शेतीला केला । खडुर गुह्य ने (?) दोही शास्त्राचा दाखला । **गणू महादू** म्हणे कर नागेशावर हल्ला ॥५॥

सोड गीता-भागवत—गीतेची किंवा भागवताची पोथी सोडून शोध कर; अनंत्या—अपरिमित; मावा—कपटें; माव शब्द स्त्रीलिंगी, सबब त्याचें जें विशेषण अनंत त्याचें ' अनंत्या ' हें अनेकवचन होय; खडुर—गढूळ.

* * *

# शाहीर गोविंदराव

## लावणी १९४ वी

ओतिव स्वरुप तेजस्वी चंद्रमा जसा ।
कोण देश ? कुठिल रहिवासी ? सख्यांनो पुसा ।। ध्रृ. ।
भासतो कुणी सरदार डौल अंत्रेरी ।
मंदील शाल शिरपेच तयाचे शिरीं ।
शोभली गळा मोत्यांची माळ दुहेरी ।
फाकलें तेज, चमक ती नक्षत्रापरी ।
अवलख घोड्यावर कलगी साजरी ।
कंडे पट्टे जिन कलावतू झालरी ।
ईश्वरें यासी चांगुलपण दिधलें कुठुन ? ।
निर्मळ तनु सोन्याचा घडली अटुन ।
हें राजहौंस पाखरू अलें येथें कुठुन ? ।
पाहुन शीतळ छाया । उतरला सगुणराशी ।
उदकें गुळणा करुनिया । बैसला हो सुखवासी ।
पाहे पनघट न्यहाळुनिया । मोहना मुखरण खाशी ।
( चाल ) प्रत्यक्ष मदनपुतळी सख्यासी खुण सांगे ।
मी धुते इथे चोळीस, तवर तुम्हि जा गे ।
डाळिंबी कळी कवळी राहिली एकली मागें ।
संशयांत चित्त, प्रयत्न करावा कसा ? ।।१।।
धीट मन करुन एकनिष्ठ उभी राहिली ।
तनु कर्पुर करदळींचें तेज पह्याळी ।
उजळली दिशा, महिताप प्रभा फाकली ।
गुणवती चतुर जाणुनिया बोलाविली ।

वावरी तऱ्हा छबदार अचुक पाहिली ।
अहो, या हो या, गौरव शब्दें मोहिली ।
सौभाग्यवती तूं लावण्याची सुंदरी ।
का आलिस येथें ? काय विचार अंतरीं ? ।
उभयांचें विघ्न, नको पडुं विषयाचे भरीं ।
सांगा मजसी गुणवंता । किमर्थ उदासी धरली ? ।
त्यागिली घरीं कांता । ती तुम्हांस अंतरली ।
एकले मुलखीं फिरतां । दिसे चित्तवृत्ति बावरली ।
( चाल ) असा घरासी चलावें, जिवलगा आजची रात ।
वचनासी मानावें, धरुं नये संशय चित्तांत ।
मी दासी जाणावें, करुं विलास रंगमहालांत ।
पादिं प्राण करिन खुर्बाण, निश्चय ऐसा ॥२॥
वोलणें रसिक ऐकुन कळवळला गुणी ।
झाले विषयांध उभयतां निर्भय मनीं ।
रस्त्यांत झुकत चालली लगबग मोहनी ।
वाड्यांत नेला, उतरविला खुण दाउनी ।
' पाहुणा अला, ' सासुशीं सांगे जाउनी ।
' वहिणीचा मुल तुमचा ' केली संपादणी ।
अंदर बोलाउन भेटविला नेउनी ।
भोजन करविलें स्वहस्तें वाढुनी ।
टाकी बिछोने दासीला सांगुनी ।
शृंगार करी मोहनी । कळि खुलली गुलाबाची ।
तन बागांतिल खिरणी । मूर्तिमंत कनकाची ।
कोमळ नवी तरणी । साडी नेसुन भरजरीची ।
( चाल ) अनुसरली सख्यासी, आलिंगी प्रीतीनें ।

निजली सुखसेजेसी, करि विलास गमतीनें
कर्मिली रात्र ऐसी, गुंग झाली जाग्रतीनें ।
सारखे उभयतां, एक रुपाचा ठसा ॥३॥
उठली अबळा, करविली कुचाची त्वरा ।
सांगितलें, पळभर बागामधिं उतरा ।
होणार गती, तिचा भ्रतार आला घरा ।
त्यासी कळलें सकळ, घेइना विसावा जरा ।
कंबरवस्त तैसाच तेथुन चालला ।
निद्रिस्त मुशाफर बागामधिं पाहिला ।
उपसुन खांडा हात मानेवर मारला ।
झुरुक्यांत उभी सुंदर । न्याहाळी चरित्र ऐसें ।
भिजला घर्में पितांबर । निस्तेज वदन दिसे ।
मस्तकीहुन छेलित पदर । देहीं भान कांहीं नसे ।
( चाल ) सद्गदित सगुण दोहिता (?) क्षोभलास परमेष्ठी ।
आग लागो संचिताला, दुःख लिहिलें ल्लाटीं ।
भागली शोक करितां, क्षणक्षणा होती कष्टी ।
गेलास जिवें मजकरितां रे राजसा ॥४॥
केला धडा मनाचा, निघाली जलदी करुन ।
आठउन सखा उर येतो भरभरून ।
शिर धड जुदे, असें पाहिलें तिनें दुरुन ।
दिली मांडी उशा, घातला हो शेला वरुन ।
कुरवाळी मुख, कवटाळी हृदयावरुन ।
कुरवंडी करीन शरिराची आतां तुजवरुन
घाबरी राजबाळा । भिरभिरा पाहे भवतीं ।
दाटला दुःख उबाळा । घेतला खंजिर हातीं ।

भेदलें हृदयकमळा । मान वाकली मानेवरतीं ।
**गोंविंदराव** म्हणे इष्काचा फिरका असा ।
अविचार स्त्रियाची जात मनाला पुसा ॥५॥

अंबेरी–सरदारी थाटाचा; पनघट–पाणी भरण्याचा घाट; पहाळी–वृष्टी जोराची सर; महिताप–चंद्रज्योत; उदासी–वैराग्य, उदासीनता; खांडा–एक विशिष्ट तरवार; छेलणें–काढून टाकणें, उतरणें; फिरका–प्रभाव,

* * *

## लावणी १९५ वी

चंद्रप्रभा फाकली हो रात्र चांदणी ।
भूषणांत रत्न नाहिं आज घरधनी ॥ धृ० ॥
पौर्णिमेस शशी शुद्ध अभ्रमंडळीं ।
मशिं विसरून पति आणिके स्थळीं ।
सुकतिल जाई जुई बकुळ पाडळी ।
आंगणांत उभी, हात लावि नीढळीं ।
राहिले निवांत कांत कोण्या सदनीं ? ॥१॥
लक्ष लक्षितां हो पाय, चक्षु ताठले ।
पति–वचनानें पंचप्राण दाटले ।
चित्त चिंतनानें तीन प्रहर लोटले ।
वदन नेत्रबिंदु श्रवति आधो वदनीं ॥२॥
हरण जैशी दग्ध वनीं हिंडे एकली ।
ताशी पतिविण दीन धाय मोकली ।
निश्चेष्टित होउन मंचकास टेकली ।
आलें हृदय भरून सद्गदित शोकली ।
आले गृहिं कांत निकट वेळ साधुनी ॥३॥
द्वारकेंत कृष्ण जसे भामा-मंदिरीं ।

संपादणि करुन शांतवीत आदरी ।
तद्वत् हो प्राणसखा भोगि सुंदरी ।
**गोविंदराव कवि** वसति जुन्नरीं ।
**बहिरू बापू** तोड जोड गाति शोधुनी ।।४।।

आणिके स्थळीं—अन्य ठिकाणीं, परकीच्याकडे; निढळ—कपाळ; पाडळी—वकुळीप्रमाणें एक औषधी व सुवासिक झाड. वेलपाडळ व वृक्षपाडळ अशा दोन जाति आहेत. 'योजन सुगंध पाडळ। आळि कुळा मंद वकुळ' 'नव्हाळी दाविताती पाडळ-परिमळाची।'

* * *

## लावणी १९६ वी

राजेंद्र रूप तेजींद्र तुझा मुखचंद्र उगवला अरुण ।
स्वरूपाची फाकली प्रभा जशी सुप्रभा देखिली दुरुन ।।धृ०।।
वय वरशें उंबर पंधराची, कोर चद्राची, चढती कळा
सुंदरा बत्तिसलक्षणी सुलक्षणी चतुर आवळा ।
सकुमार तनु सुरंग, सदा खुशरंग, वर्ण सावळा ।
कवळी काया लससशी, उगवला शशी उदयाचळा ।
वर निळी कीं पोता वरी, मान साजरी, वारिक गळा ।
बोलशी बोल अनमोल, शब्द विनमोल जशी कोकिळा ।
मृग जैसा जानी शाम जसा निशाम उभी गोपुरीं । (?)
श्रीफळासारखे कुच चढल उंच जोबन उरीं ।
श्रृंगार करूनिया साज देखली आज जैशी परी ।
ओतली जशी ग जंत्रात । देख देखणी चपळ नेत्रांत ।
बावडी जशि ग सूत्रांत । बाहुली जशी चित्रांत। त्यालि रंग भरुन।
धनकर त्यानें निर्मिली मोर्त गोजिरी, पाहती जन फिरुन।। १।।
नेसुनिया बारिक झुणा चपळ फुंदणा सर्जामधीं ।
तटतटित तग कांचोळी ल्यालि, पांघरली शाल उदी ।

खुषबोई गुंफिली वेणीं पुष्प खोवूनि केवडा मधीं ।
शीसफुल हिरडा राखडी, दिसे फाकडी चपळ गुणनिधी ।
बिंदील्या जडल्या चुण्या आणिक हिरकण्या नखीं मेहेंदी ।
गोरे गाल तुझा रंग लाल पाहुन खुषियाल हातामधिं मुदी ।
लाविली कुंकाचि चिरीं कपाळावरी शोभली बरी ।
नाकीं नथणी सर्जेदार, दिसे गुल्जार सुरत बावरी ।
मारसी नयनाची नोक चालुनिया येति घरीं ।
रुप लावण्याची खाणी । ल्याली बाळ्याबुगड्या कानीं ।
वय लहान चतुर पद्मिनी।कैकासि लाविलें ध्यानीं।घेशी मन हिरुन
तोंडोळ्यासारखे अधर, घेशि किति पदर मुखावरुन ? ॥२॥
करूनी सोळा शृंगार, चाल गजभार तुझि ग सुंदरी ।
ल्यालीं नवरत्नांचा हार गळा भरदार हिरे दोहिरी ।
गळा मोहनमाळ दुलडी आणिक पंचलडी जयें त्यावरी ।
धुकधुकी जाळीचा मणी, पोत तन्मणी दिसे गोजरी ।
दंडीं वेळा बाजुबंद, ज्यानीचा फुंद तोल अबिरी ।
हातीं हातसर गजरे बेर, दिसे साजरा चुडा सोनेरी ।
ल्याली कंबर पहा सुंदर लहान उंबर तुझी कामिनी ।
वाक्या साखळ्या घनघोर वाजती जोहार नाद पैंजणीं ।
अनवठ विचवे पोलारे उठे झणकार फार मेदिनीं ।
न्याहाळी रुप ऐन्यांत । झालि डुब नार गहिन्यांत ।
गजराज जसा सैन्यांत । तारिफ तुझ्या बोलण्यांत । गेली सरुन ।
लाविला आलम तुझेवर खुशी उभें देवाशीं नवस करुन ॥३॥
शृंगार करून रंगमहालीं उभी राहिली सुंदरा नटुन ।
झाला संध्याकाळ नेमस्त वखत गुजरीचा गेली घनवटुन ।
पाहुन मुशाफर यार म्हणे सकुमार, आला तुम्हि कुठुन ? ।

कर शब्दाचा मान वचन प्रमाण, नका जाऊं उठुन ।
बाहारांत आली नारगी म्हणे बहुरंग जाइल विटुन ।
नको धरूं कोणाचा आदर, सांगते सदर घ्या रंग लुटुन ।
उभयतां घडला संग झाले निसंग आलिंगिती ।
**गुणि गोविंदराव** महाराज धन्य कविराज तुमची मती ।
**राणुभाई जैदेव** निशाणी **भिमा मल्हारी** छाणुन रती ।
कडिबंद ख्याल चवचरणी । गाती सवाई करुनी ।
वैऱ्याची तडकली छाती गेले हरुन ।
झाला शाहिराचा हिरमोड, घेतली हातची डफडी हिरुन ॥४॥

जंत्रांत–यंत्रांत. जंत्रातून ओढणें किंवा काढणें म्ह.:बांधेसूद,साच्यांत ओतल्या-प्रमाणें सुरेख निर्माण करणें. धनकर–सुंदर, शोभिवंत; फुंदणा–फुन्ना, झुबका; उदी–उदी रंगाची; खुषबोई–सुवासिक; तोंडोळें–तोंडलें; गजभार–गजगतीनें, ऐटीनें, डौलांत; दोहिरी–दुहेरी;.धुकधुकी–मोत्यांची माळ; तोल आंबिरी–सरदारी ऐट किंवा दिमाख; जोहार–जवाहीर; सदर–सदर परवानगी असल्याप्रमाणें.

* * *

## लावणी १९७ वी

सुमन कळ्यांचा हार । सखे आज लेईल सखा सुकुमार
सखा गुणिराज राजबनसी । अलबेला मतवाला हौशी
नूतन वय दिव्य देह खासी । जरी पोषाक लेवीन त्यासी
करिन आदर उपचार । सखे आज लेईल सखा सुकुमार ॥ १ ॥
उंच वस्त्र जैनावादी । अष्ट पेटी पदर साधी ।
बसंती रंग आणा आधीं । गंध मृगमद केशर आदी ।
अत्तराचे लईकार । सखे आज लेईल सखा सकुमार ॥२॥
लेवीन जडिताचीं लेणीं । तवकीं, तोषवीन पक्वान्नीं ।
तवक चौफुले साहित्यानीं । दीप प्रकाश रमणिक स्थानीं ।

शेज केली गुलजार । सखे आज लेईल सखा सुकुमार ॥३॥
विलासी नार मनीं भार्या । तोषऊन भोगित ( गुणिराया ) ।
**गुणि गोविंदराव** पाहुन चर्या । **मल्हारी** सांगतसे परी या ।
**बहिरू बापू छेबदार** । सखे आज लेईल सखा सकुमार ॥४॥

जैनावादी—कापडाचा एक प्रकार. जैनाबाद ही जुन्या काळीं एक नामांकित कापडपेठ होती; लईकार—लई प्रकार.

* * *

## लावणी १९८ वी

ये गोविंदा नंद-नंदा वना जाय रे ॥ धृ० ॥
निज गुज बोले माता यश्वदा ।
धेनू सोडी बाळ मुकुंदा ।
उभा कीं रे द्वारीं वडजा पेंदा ।
त्यासी मी सांगुं तरी काय रे ? ॥१॥
ऊठ ऊठ वेगीं, सूर्य उदेला ।
गाई गोधनासी बहु वेळ झाला ।
सिद्ध शिदोरी दह्यांदुधकाला ।
सवंगडियाचे सजय (?) खाय रे ॥२॥
केशवा माधवा कृष्ण मुरारी ।
मुरली अधरीं धरी हरि पूतनारी ।
कुंभ घेऊनी शिरीं उभ्या व्रजनारी ।
घडि घडि राधा तुज पाहे रे ॥३॥
**गोविंदराव** म्हणे त्रैलोक्यपाळा ।
वृत्ती गाई अमुच्या प्रीतीनें पाळा ।
सर्वव्यापक तू जग--प्रतिपाळा ।
बाळक **राघू गणू** गाइ रे ॥४॥

ये—हे !

* * *

## लावणी १९९ वी

हाळदिचा डाग लावून गेले परदेशा ।
द्वादश वर्षें कंठलीं, नाहीं संदेशा ॥धृ.॥

घरी उदंड धनसंपत्ती विषवत् दिसती ।
पाहवेना मला तिजकडे, उदासीन चित्तीं ।
भाऊबहिणी सुखाचे सगती, दुःख मजवरतीं ।
हे जगन्निवासा, कैशी दैवाची प्राप्ती ? ।
माईबाप कोड बहु करती, परि वरकांती ।
आंतरच्या दरदाला गे न चले युक्ती ।
अंगीं भरनवतीचा पुरू ।
नाहीं द्रव्य पेटीमधीं भरूं ।
जीवनाविण सुकला तरू ।
रजु–दर्शन सखु मज होतों पंधरा दिवसा । ॥१॥

म्या वलाऊन सासुला विचार केला ।
पाठवा पत्र लेहुन स्वामीरायाला ।
हौसेनं बाग लाविला, ऐन रसा आला ।
इष्काचे भ्रमर घालुन जातिल घाला ।
आग लागो ह्या जोडिल्या मुलुखगिरीला ।
टाकिले मला निर्वाणीं, निष्ठुर झाला ।
उडते झालें पाखरूं ।
कुठवर मी आवरुन धरूं ? ।
रतिभोग पिंजरा करूं ।
आळस (आलच?) होइल, मग यत्न करावा कैसा? ॥२॥

जासुद गेले लष्करा शोधुन डेरा ।
लाखोटा देऊन सांगितला वृत्तांत सारा ।
वळखुन घरचें अक्षरा हर्ष आंतरा ।
दिली शालजोडी जासुदालागीं मंदिल गहेरा ।
लेहुन आलें उत्तर, वाचे सुंदरा ।
नारी चवमासा छावणी पंढरपुरा ।
आम्ही रजा घेतली आतां ।
काय करूं येऊनी रिता ? ।
आहे तैनातीचा गुंता ।
मनसुव्यानी सरकारी, फशिवला पैसा ॥ ३ ।

दैवाची दशा उजळती वहु सुरती ।
क्षणक्षणा वाम नेत्राचीं लवतीं पातीं ।
पतिराज गृहासी येती, विप्र शुभ वदती ।
वाटली दक्षणा अमुप, नाहीं गणती ।
उभि राहुन गच्चीवरतीं स्वारी न्यहाळती ।
चकचकाट चहुकुन थवे गलुगे (?) तुटती ।
**गोविंदराव** म्हणे सुंदरी ।
घे भोगुनया धनवरी ।
घटकेची रात्र आजी खरी ।
वाहेल ज्वानिचा लोट थोडक्या दिवसा ॥ ४ ॥

संदेशा—वार्ता, निरोप; दरद—दुःख, व्याधि; रजा—परवानगी; विप्र—ब्राह्मण, ज्योतिषी; धनवरी—पुष्कळ; संतुष्ट होईपर्यंत; घटकेची रात्र आजी खरी—आज रात्र घटकेसारखी लवकर संपल्यासारखी वाटेल.

* * *

# पुरवणी टीपा

पृष्ठ

३३ **आदांचीं**—आधांत्री किंवा निराधार.

३६ **खांतिचा**—खणतीचा, भावार्थ संभोगाचा.

४३ **वयस्कर**—म्ह. वृद्ध या अर्थी नव्हे, तर वयांत म्ह. तारुण्यांत आलेली.

४७ **भोगितां चौऱ्यांशी तरतो**—चौऱ्यांशी लक्ष योनी फिरल्यानंतर जीव मुक्त होतो हा नेहमींचा अर्थ. परंतु येथें चौऱ्यांशी आसनांचा निराळाच अर्थ कवीस अभिप्रेत आहे. हीं आसनें म्ह. कामशास्त्रांतील चौऱ्यांशी आसनें !

५० **कल्पवृक्ष भेटतां दैन्य जावें प्रपंचमंगळीं**—' कल्पवृक्ष भेटतां दैन्य जावें प्रपंचीं ( क ), मग गळीं ' असा तर मूळ पाठ नसेल ? गळीं जाणें—फांशी जाणें. नष्ट होणें. प्रपंचीक—प्रापंचिक, संसारांतील.

५१ **चालवा अतां सुखाच्या वगा**—वग–शरीरसंबंध, स्नेह.

५७ **उर पिटला**—' उर पिकला ' असें असावयास पाहिजे. ऊर पिकणें—त्रास, छळ होणें, जीव कंटाळणें, अत्यंत कष्ट होणें; ऊर पिकविणें—छळणें, त्रास देणें.

६३ **प्रभंजन**—येथें कवीनें या शब्दाचा अगदींच चुकीचा उपयोग केला आहे. प्रभंजन म्हणजे तुफानी वारा. पहाटेच्या शीतल वाऱ्याला प्रभंजन म्हणणें अगदींच गैर.

६३ **इतर सुखाचे परिस**—परिस म्ह. पेक्षां, अधिक.

६३ **उपतिष्ठणें**—उमजणें.

६४ **बोलणें चालणें मजालसी खालीं**—मजालसीख्याली—सभ्य, रुबाबदार, दरबारी आचाराचें.

६७ **उदरांत शिरणें**—आश्रय घेणें.

६८ **व्हावी काशी**—हवी काशी.

पृष्ठ—

११४ **पाहुन तुज हृदयीं चाठकले**—‘ पाहुन तुज हृदयींच ठकले ’ असा मूळ पाठ असेल? ठकणें म्हणजे मरणें. भावार्थ, तुला पाहतांच त्याचा मनांतल्या मनांतच मुडदा पडला !

११५ **दीन लीन हीन लक्षणाक्षिण**—‘ हीनलक्षण क्षीण अम्हां लागे ’ असा मूळ पाठ असेल ? क्षीण म्ह. क्षय.

१२२ **पहा वसंत नवतीचा ना फार मानी गुलावा हो**—‘जाफरमानी गुलाब हो ’ असा पाठ घ्यावा. जाफरमानी ही एक गुलाबाची जात असावी. जाफरां म्ह. केशर. त्यावरून लाल केशरी रंगाचा गुलाब तो जाफरमानी गुलाब. ‘ जा ’ बद्दल ‘ ना ’ वाचणें किंवा ‘ ब ’ बद्दल ‘बा’ वाचणें या मोडी वाचनाच्या चुका होत. ‘ जाफरी गुंडी ’ असा एक शब्द आहे. ती एक फुलाची जात आहे. अबोली किंवा गुलमखमल यांनाहि ‘ जाफरी गुंडी ’ असा शब्द लावतात.

१४५ **लावणी नं. ८७**—सर्वच लावणी अत्यंत अशुद्ध व अगम्य आहे. लावतां येईल तशीं अक्षरें लावून छापली आहे.

१४७ **सुकात दीहे**—‘ सुखांत देहे ’ देहे म्ह. देह.

१४८ **येक रात्र कर माय तु चा**—( ? )–‘ एक रात्र कर (हवालीं) ’ असा भावार्थ.

१५० **मन जगीं म्हणत सुजात**—सुजात म्हणजे सुज्ञात, म्हणजेच ज्ञानी लोक

१५६ **वाध प्रीतीच्या पवळी**--बांध प्रीतीच्या पवळी. पवळी म्ह. तट किंवा भिंत.

१६० **जाण तयारींत**--ज्वान तयारींत, तारुण्याच्या भरांत.

१६२ **भाल ( ? ) आज**--भाल म्हणजे शपथ.

१६२ **हे मीच नी ( ? ) सुरेख**—अडाणी नकलकाराची करामत असावी. ‘ नेहमींच सुरेख ’ असा मूळ पाठ असण्याचा संभव वाटतो.

१६८ **क्षत्रियाचा**--योध्याचा.

पृष्ठ

१७१ **विषाचा प्याला इ०**—' बाळा बहिरूचें कवन विषाचा प्याला। गायनीं वचनीं अग्नींतून निघाला ' असा मूळ पाठ असेल. बाळा बहिरूसारखी रचना करणें सोपें नाहीं. विषाचा प्याला पचवून टाकण्याइतकें तें अवघड काम आहे. गायकी चालींत आणि शब्द-योजनेंत तो तावून सुलाखून सरस ठरला आहे.

१७३ **कुल्पी विडा**—सुपारी, वेलदोडा इ० सामान घातलेला, केळीच्या पानांत गुंडाळलेला व चोईनें टोंचलेला असा विडा. हा विडा केव्हां केव्हां ८।८, १०।१० पानांचाहि असतो. जुन्या काळीं समारंभांत असे विडे देण्याची पद्धत असे.

१७७ **तीन बुंदी जोडा**—जोड्यावर तीन रेशमी फुंदणे किंवा तुरे शिवले आहेत असा जोडा, असाहि अर्थ होईल.

१८२ **दाट तिथें होतच आहे इ०**—दाट म्ह. दाटा, जुलूम, बळजोरी.

१८३ **शिरपाऊ**—पागोटें.

१८५ **फटफट**—धिक्कार करून.

१९६ **सांडुनि शिरीं भवराची छाया**—भवर–भ्रमर. येथें पति. छाया —संरक्षण किंवा बदरका. पतीच्या शिपायांचें संरक्षण न घेतां तिनें उदापुराला जाण्याचें ठरविलें, असा एक अर्थ बसेल किंवा ' डोक्यावरून भ्रमराच्या रंगाची छानदार निळी ओढणी किंवा पदर घेतला ' असाहि अर्थ बसेल.

१९८ **वाटती खऱ्याती**—' वाट तिखाऱ्याची ' असा मूळ पाठ असेल. तिखार म्ह. पोलाद. येथें भावार्थ असा कीं, तुझ्यांशीं संग करूं पाहाणें हा तरवारीवर किंवा वस्तऱ्याच्या पात्यावर चालण्या-सारखा जिवावरचा प्रकार आहे; परंतु त्यालाहि मी तयार आहें. मरण आलें तरी पत्करलें, पण तुझ्याशीं संग झालाच पाहिजे.

२१४ **पातडें सोडणें**—पंचांग सांगणें असा मूळ अर्थ. त्यावरून कंटाळवाणी न संपणारी बडबड करीत राहणें असा अर्थ रूढ झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनु. 29715 दि.

पृष्ठ

२२१ **सिद्ध**—सिद्धी प्राप्त झालेले योगी.

२२६ **श्रम हरति पाहतां गे क्षणिं राजा**—'श्रम हरती पाहतां क्षणीं गे राजा' असा अन्वय.

२२७ **पित्यावरोबर मानित्ये त्याला**—म्ह. इतर आलेल्या सर्व राजांना मी बापासारखे मानतें. त्यांना कोणाला वरण्याचा विचारहि माझ्या मनांत येणें शक्य नाहीं.

२२८ **सेवतीं ? जानवसा नगरामधिं**—नगरांत त्यांच्यासाठीं नेमलेल्या जानोशाच्या ठिकाणीं ते वऱ्हाडी रवाना झाले.

२३२ **पळ होतों ग दुर धरून**—' पण होतों ग दुर्धर धरून ' असा मूळ पाठ. म्हणजे २५ वर्षें पूर्ण होईपर्यंत विषयसुखाकडे वळावयाचें नाहीं, पूर्ण ब्रह्मचर्यानें राहावयाचें, अशी माझ्या वस्तादानें मजकडून शपथ घेवविली होती.

२४० **उजवी गुढी देणें**—अनुकूल कौल देणें.

२४० **नखावोटांवर देह नको जाळूं**—दिवस मोजतांना आधीं बोटें मोजावयाचीं व नंतर त्या बोटांवरील नखें मोजावयाचीं अशी रीत आहे. त्यावरून अत्यंत उत्कंठेनें एक एक दिवस मोजीत राहणें असा अर्थ आला.

२६१ स्मय—गर्व.

REFBK-0009124

* * *

Aug '57

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| २७ | विनअन्याई | व्रिनअन्याई |
| ३० | भरवयां | भर वया |
| ४३ | नाकळेक्कपेच्या वळे | नाकळे कृपेच्या वळें |
| ५६ | पडली आडका | पडली आड कां |
| १०८ | अशी दुसरी विरळाहि नव दिसे | अशी दुसरी विरळा न दिसे |
| १०८ | तशा निघाली | तशा ( ? ) निघाली |
| १०९ | तशी तुयझवर | तशी तुझेवर |
| १०९ | बंद्रावाणी | बंद्रा वाणी |
| ११० | पेटला हा कद्रू | पेटला हा कंद्रू |
| ११० | दोन्ही निर्लेप | कुच दोन्ही निर्लेप |
| ११२ | तसें नेतों | तसें येतों |
| ११२ | मग निष्ठुर कां गे ? | मग निष्ठुरता कां गे ? |
| ११८ | हळुच मग हास्यवदन | हळुच मग हास्यवदन बोलली |
| १२३ | प्राण विसाया | प्राणविसावा |
| १४१ | मारिन जुक अठराचे | मागिन जुक अठरांचे |
| १४८ | व्रापा जिव्हारीं | वाण जिव्हारीं |
| १५१ | स्मरती तवरे | स्मरती तंव रे |
| १६५ | बोलवीसी | बोळवीसी ( बोळवण करतोस, निरोप देतोस ) |
| १६८ | सिवडा पलंगासीं 'आला ' | सिवडा मलंगासी आला |
| १७० | चंचल वृत्ती करावी सखया | चंचल वृत्ती ( शांत ) करावी सखया |
| १७१ | वहुत प्रकारें आर्जवान मैत्राला | वहुत प्रकारें आर्जवीत मैत्राला |
| १७५ | देई मुखचुंबन प्राणविसाव्या | देई मुखचुंबन प्राणविसावा |
| १७७ | हे जाली,आहे ( ? ) पुरतें पाप कपाळीं | हे जाली (म) आहे पुरतें पाप कपाळीं |
| १८९ | कोट्यावधि पतीचे भले | कोट्यावधि पतींचे भले |

...मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम क्रमांक ...........
वि. ...........

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १९७ | धर कांहीं शरम अशा, गोष्टींनें | धर कांहीं शरम, अशा गोष्टींनें: |
| १९८ | वाटती खऱ्याती ? | वाटती खऱ्याती (?) |
| २०२ | अंगावानी | अगावानी |
| २०४ | संग त्यानी | संगत्यांनीं |
| २०६ | नीजजन भवहिरद संहरी | निजजनभवद्विरद संहरी |
| २०७ | चहूंसांला | चहूंसांला (?) |
| २१५ | काट भारा ? | काट भारा (?) |
| २१९ | दैवानं सार | दैवानसार |
| २२० | जय शुर्पनखा वधली | जयें शूर्पणखा वधली |
| २२१ | माहां माहांसीद्ध ऋषी | महा महा सिद्ध ऋषी |
| २२१ | केली प्रतीज्ञा ना त्याला मोहीन | केली प्रतिज्ञा त्याला मोहीन |
| २२१ | निष्ठुर वचेनीं ऐकुन | निष्ठुर वचना ऐकुन |
| २२४ | जैमिनी या | जैमिनीया ( म्ह. जैमिनीची ) |
| २२६ | हुदकाला ( ? ) | हुंदका ( आला ) |
| २२८ | केधवां लागेल भ्रांत फीटेल, | केधवा लाभेल, भ्रांत फिटेल |
| २३० | नाहीं तिच्या मनासी कोणी ग ह्या चित्र मनीं आलें। | नाहीं तिच्यां मनासी कोणी ग ह्या चित्रामधिं आलें |
| २३० | अनिरुद्ध चित्रमधिं काढले | अनिरुद्ध चित्रामधिं काढले |
| २३२ | पळ होतो ग दुर धरून | पण(प्रतिज्ञा)होतो ग दुर्धर धरून(करून) |
| २३७ | वेभारी—व्रेवहारी | वेभारी—व्रेव्रहारी |
| २३९ | सला इ० टीपेतील शब्दार्थ या लावणींतला नाहीं | |
| २४१ | सगुण गुणी राया | सगुण गुणीराया |
| २४२ | बसाया शेजारी | बसा या शेजारीं |
| २४५ | उभें वारे सुटलें | उभें वारें सुटतें |
| २५६ | फासा धर पाहेनी | फासा धर पाहेनी (?) |
| २५६ | रामा गुणिजन। ख्यालीच्या हाती अति दतीं लुब्धले गुणा | रामा गुणिजन ख्याली च्याहाती अति पति लुब्धले गुणा |

# वेंचक वाङ्मय

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मीठभाकर | ( काव्य ) | आवृत्ति तिसरी | –ग. ल. ठोकळ | २–८–० |
| सुगी | ( ,, ) | ,, ,, | ,, | ३–०–० |
| गांवगुंड | (कादंबरी) | ,, ,, | ,, | २–०–० |
| कडू साखर | ( कथा ) | ,, दुसरी | ,, | ३–०–० |
| सुगंध | ( ,, ) | ,, ,, | ,, | ३–०–० |
| पहिलें चुंबन | ( ,, ) | ,, ,, | ,, | ३–०–० |
| मोत्यांचा चारा | ( ,, ) | | ,, | २–४–० |
| अंजनी | (कादंबरी) | | —के. नारखेडे | ४–०–० |
| शिवार | ( काव्य ) | आवृत्ति दुसरी | ,, | २–०–० |
| आजकालचे विद्यार्थि | ( प्रबंध ) | | —श्री. म. माटे | २–८–० |
| साहित्यधारा | ( ,, ) | | ,, | २–८–० |
| वारा शास्त्रज्ञ | ( चरित्रें ) | | ,, | ३–०–० |
| सराई | (कादंबरी) | | —र. वा. दिघे | ५–०–० |
| आई आहे शेतांत ! | ( ,, ) | | ,, | ८–०–० |
| जगन्नाथ पंडित | ( ऐति. कादंबरी ) | | —गो. नी. दांडेकर | २–८–० |
| अहल्याबाई होळकर | ( चरित्र ) | | —वा. दा. गोखले | ०-१२-० |
| कर्मवीर भाऊराव पाटील | ( चरित्र व कार्य ) | | —ए.के.घोरपडे | २–४–० |
| महात्मा फुले | ( ,, ) | | ,, | १-१२-० |
| संस्कृति-समवाय | ( सण आणि उत्सव ) | | —वत्सला भाटे | २–८–० |
| प्रौढांचें शिक्षण व साक्षरताप्रसार | (प्रबंध) | | –आ. अ. मानकर | १–८–० |
| साहित्यदर्शन | ( आधुनिक वाङ्मयप्रकार ) | | –सरोजिनी बाबर व –वि. म. कुलकर्णी | ४–०–० |
| लोकशाहीचें माहेर | ( डेन्मार्क ) | | –वा. व. कर्णिक | २–०–० |

**श्री लेखन वाचन भांडार,**

गणपती चौक, लक्ष्मी रस्ता, पुणें २.